दृश्य अदृश्य

अँड शिल्पा सारंग कुलकर्णी

प्रकाशक :
ओमेगा
प्रकशन
पुणे

प्रसिद्धी :
२०२५

© सर्व हक्क
लेखिकाधिन

मुखपृष्ठ
अक्षरजुळवणी
टाईपसेटर्स, पुणे

ऑफसेट छपाई : ए़सल प्रिंटर्स पुणे

किंमत : /–

दृश्य अदृश्य

मनोगत.....

दृश्य अदृश्य ही कथा मला अत्यंतीक आपुलकीची आहे. ही कथा लिहीताना माझे मन कथेत खूप रमले. प्रत्येक वेळा कथा पुढे नेण्याची मनाला आस लागायची ही माझी तिसरी कथा असली तरी मागील दोन कथांप्रमाणेच खूप जिव्हाळयाची आहे.

एक गूढ विषय हाताळताना मला जाणवले की मानवाला कायमच अदृश्य शक्तींबाबत जाणून घ्यायचे असते. मग अदृश्य जग खरंच असते आणि त्या जगात अगदी वेगळया प्रकारचे जीव राहतात जे आपल्या डोळयाला दिसत नाहित हे आपण मनोमन मान्य केलेले असते. आपल्या संस्कृतीत तंत्रविद्या आणि अध्यात्म हे या अदृश्य शक्ती असल्याचे मान्य करतात आणि आपणही मान्य करतो. मग शास्त्रीय संकल्पना याबाबत जरी ठोस असे पूरावे देउ शकत नसतीलही तरी मनोमन आपण सर्वांनी त्या अदृश्य जगाला मान्यता दिली आहे.

माझे लेखन हे गूढकथां आणि थरारकथा प्रकाराचे असल्याने त्यात असे विविध गूढ विषय मी हाताळत असते. दृश्य अदृश्य ही कथा पूर्णपणे काल्पनीक असूनही मनाला सत्य असल्याचे आपल्याला जाणवेल. मग यातील विविध पात्रे म्हणजेच डॉक्टर मंदार साने, वैदेही, सरपोतदार, भैरवशास्त्री हे

आपल्याला काही वेगळी संकल्पना समजावत असताना भासतील. बस्स मी लेखनातून जसा आनंद घेतला तसा वाचकांनाही वाचनातून मिळेल अशी मी आशा बाळगते. आज मी दृश्य अदृश्य ही कथा आपल्या स्वाधीन करत आहे.

याधीच्या दोन कथा म्हणजेच 'तळघर' आणि 'विस्मयी' या दोन्ही कथा वाचकांच्या पसंदीस उतरल्या याबाबत मी समाधानी आहे.

ही कथा नेहमीप्रमाणेच माझी आई डॉ सिमा मराठे यांनी प्रथम वाचली आणि मला मोलाचे मार्गदर्शन केले. ही कथा मी माझी मुलगी रेणूका हिस समर्पित करते. तसेच माझे पती प्रो सारंग कुलकर्णी यांना माझे लाखो धन्यवाद.

जसा अनुभव वाढेल तसे लेखन जास्त खुलून येते त्यामुळे आपले प्रोत्साहन जरूरीचे आहे. आपला अभिप्राय मला जरूर कळवा.

author.shilpak@gmail.com

- ॲड शिल्पा सारंग कुलकर्णी

१.गाठीभेटी

पावसाळयाची सुरवात दणक्यात झाली आणि पहिल्या पावसाच्या सरींनी उन्हाळयाचा हाहाकार थोपवून धरला. ओल्यामातीचा सुगंध आणि थंडगार वारा मन उल्हासित करू लागला. मग सर्वदूर बरसणाऱ्या पावसाचे स्वागत जणू प्रत्येकाने मनोमन केले. उकाडयाने हैराण झालेल्या प्रत्येकाला छतावर, गाडयांच्या टपावर मुक्त बरसणाऱ्या पावसाचा आवाज म्हणजे जणू सुस्वर संगीत भासू लागले. घोंगावणारा वादळवारा पण अगदी जीवलग मित्र भासू लागला. पावसाळयाची आतूरतेने वाट बघणाऱ्या प्रत्येक माणसाच्या डोळयातून आपसूकच आनंद ओसंडून वाहू लागला लहान-मोठी प्रत्येक वयोगटातील माणसे आपापल्यापरीने बदललेल्या वातावरणाचा आस्वाद घेऊ लागली. या सुखद वातावरणात क्षणभर विश्रांती घेऊन जरा निवांत वेळ घालवायची इच्छा कोणाला होणार नाही?

डॉ मंदार सानेही याला अपवाद नव्हते. त्यांच्या क्लिनीकच्या खिडकीतून पाऊस कोसळताना बघताच त्यांनी आज चक्क सुटी

घ्यायचे ठरवले. तसेही संध्याकाळचे सहा वाजलेच होते. संध्याकाळच्या काही ॲपॉइंटमेंटस रद्द करून त्यांनी क्लिनीकमधून लवकरच बाहेर पडायचे ठरवले.

मग मनसुबा केलाच आहे तर मग विलंब कशाला? बघता बघता त्यांनी क्लिनीक मधून काढता पाय घेतला. गॅरेज मधून गाडी बाहेर काढली आणि रस्त्यावर आणली. आज रस्त्यावर गर्दीही थोडी कमीच होती. तेव्हढयात कड... कड... कड... असा आवाज करत वीजेची रेघ आकाशात लखलखाट करत लक्ष वेधून गेली. खिडकीच्या काचेतून मान वाकवत आकाशात बघत डॉक्टरसाहेबांनी हा थरार अनुभवला. तेव्हढयात पावसाचा जोर चांगलाच वाढला. गाडीच्या टपावर पावसाच्या थेंबांच्या आदळण्याचा आवाज जास्त जोराचा झाला. आता वायपर लावण्याशिवाय पर्यायही नव्हाता. मग बराच वेळ मनसोक्त पाऊस अनुभवत ते रस्त्याच्या कडेला गाडी पार्क करून उगाच थांबून राहिले. गाडीच्या टपावर कोसळणाऱ्या पावसाचा आवाज ऐकत डॉक्टरसाहेबांची चांगलीच तंद्री लागली. आज मूडही काही वेगळाच बनला होता. मग तंद्री लावून आणि डोळे बंद करून एखादी छानशी गजल ऐकावी असे वाटू लागले. मग आपसूकच थकलेल्या मनाने एक फर्माईश आवर्जून केली.....गजल आणि ड्रिंक्स.

डॉक्टर मंदार साने मानसोपचारतज्ञ जरी असले तरी आधी एक माणूसही होतेच की! सकाळ पासून चार ते पाच ॲपॉइंटमेंटस

झाल्या मग नंतर कॉलेजमध्ये लेक्चर आणि मानसोपचारांच्या वर्कशॉप मध्ये भाषण, मग परत क्लिनीकमध्ये काम.....बस्स झाले आता! मागचे पंधरा दिवसही असेच धकाधकीचे गेल्याने मन जणू आक्रोश करत होते. मग काय? जणू त्यांच्या आवडत्या पंचतारांकीत हॉटेलचा रस्ता आपसूकच धरला गेला.

हॉटेल येताच नेहमीच्या सेक्युरीटीने त्यांना मान थोडी झुकवून अभिवादन केले. आज गाडी त्यांनी स्वतःच पार्किंगमध्ये नेली गाडीत कोट आणि टाय काढून ठेवला, फुल शर्टच्या बाहया गुंडाळत वर केल्या, शर्टची वरची दोन बटणे काढली, मोबाईल फोन ऑफ करून टाकला आणि स्वतःच्याच तयार केलेल्या जगात तंद्री लावून घेण्यासाठी ते पूर्णपणे तयार झाले. बस्स उद्या सकाळपर्यत डॉक्टरसाहेब चक्क गायब रहाणार. धकाधकीच्या आयुष्यातून कधीकधी असे चोरटे निवांत क्षण वेचणेही मानसीक गरज होऊन बसते नाही का?.

मॅरीऑट हॉटेलच्या लॉबीतून पुढे जात डॉक्टरसाहेबांनी रेष्ठॅरंटमध्ये प्रवेश केला. आज तशी गर्दी कमीच होती. बस्स दोन चार टेबलांवर काही एकलकोंडी माणसे जेवत होती तर काही माणसे निवांत ड्रिंक्स घेत बसली होती.

अतिशय सुंदर आणि श्रीमंती पद्धतीने सजवलेले हे पंचतारांकीत हॉटेल तसे सामान्य माणसांसाठी नव्हतेच. महागडे मद्य आणि उंची रहाणीमान ज्या श्रीमंतांना परवडते त्यांच्यासाठीच हा स्वर्ग

होता. डॉक्टरसाहेबांनी एका कोपऱ्यातल्या टेबलाची निवड केली. आज त्यांना निवांत एकटे क्षण हवे होते.

''गुड इव्हिनिंग सर'',वेटर अदबिने बोलला.

''हो, अरे आज म्युसिक प्लेअरवर जरा गुलामअलीच्या गजल लाव ना!'',डॉक्टरांनी फरमाईश केली. वेटरने फरमाईश लगेच मान्य केली.

''मग साहेब नेहमीचेच ड्रिंक आणायचे का? व्होडका विथ डाएट कोक.?'',वेटरलाही नेहमीच्या कस्टमरची आर्डर चांगलीच माहित होती. स्थानापन्न होत डॉक्टरसाहेबांनी हसूनच होकार दिला.

आजही नेहमीप्रमाणेच मंद प्रकाशात आणि हळूवार संगीताच्या आवाजात जणू एक शांत आणि सुखद निश्चिंतता पसरली होती. त्याचा परिणामही स्पष्ट दिसत होता कारण सगळेच स्वतःच्याच तंद्रीत हरवलेले! तेव्हढयात त्यांचे ड्रिंक आले पण.

'हां.....',डॉक्टरसाहेबांनी दिर्घ निवांत श्वास घेतला. हवेतील दरवळणारा एअरफ्रेशनरचा मंद सुगंध त्यांना आज जरा जास्तच सुखवून गेला. मग व्होडकाचा घोट घशाखाली उतरवताच क्षणभरासाठी त्यांनी डोळे बंद करून घेतले. या निवांत क्षणाचे सुख जणू त्यांना मनसोक्त उपभोगायचे होते. बॅकग्राउंडला गुलाम अलीची गझलही काय झकास लागली होती,'चुपेके चुपके रात दिन आसूं बहाना याद है!'.थकलेल्या

मनाला गर्दीपासून लांब नेत एकटेच शांतपणे संगीताच्या सुरांत आणि मद्याच्या नशेत तरंगत रहाणे म्हणजे निव्वळ आनंद.....वा! छानच!....

डॉक्टर साहेबांचे रहाणीमान आणि त्यांचे व्यक्तिमत्व हे त्यांच्या 'मानसोपचार डॉक्टर' या प्रोफेशनला साजेसेच, म्हणजे चेहऱ्यावर सतत गंभीर भाव आणि मोजकेच बोलणे. डोळयावर सोनेरी फ्रेमचा चश्मा आणि सतत सुट टाय मधील डॉ मंदार साने म्हणजे तसे आदरणीय आणि रूबाबदार दिसत असत. गोरे गोमटे आणि उंचेपुरे डॉक्टर साहेब तसे रिझर्व्ड आणि मितभाशी होते. त्यांच्या स्वभावामुळे त्यांना कोणी शत्रू असे नव्हतेच. तसेही व्यस्त दिनचर्येमधून मोकळा वेळ मिळालाच तर ते मित्रांमध्ये रमण्यापेक्षा सतत वाचन आणि आभ्यास करण्यालाच प्राधान्य देत. मग डोक्याला फार कलकल झालीच तर सरळ सगळयापसून पळ काढत एखादी संध्याकाळ एकटेच असे निवांत क्षण वेचत असत. गेली अनेक वर्षे हे असेच चालले होते. तसेही घरी त्यांची वाट बघणारे असे कोण होते?

कामालाच देव मानणाऱ्या डॉक्टरसाहेबानां लग्न करायला वेळच मिळाला नाही. आई लहानपणीच वारलेली आणि वडिलांनी दूसरे लग्न केलेले. त्यांच्या कडे लक्ष देणारे असे कोणीच नव्हते. स्कॉलरशिपवर शिक्षण झालेल्या साने साहेबांना स्थिरस्थावर व्हायला तसे कष्टातूनच जावे लागले. पण आता स्वतःचा आलिशान बंगला, महागडी गाडी, ऑफिस आणि उंची

रहाणीमान असे त्यांच्याकडे सर्वकाही होते. वयाच्या चाळीसाव्या वर्षी ते सेल्फमेड आणि यशस्वी आयुष्य जगत होते.

''साहेब, ड्रिंक रिपीट करायचय का?'', मोकळा ग्लास बघून वेटरने अदबीने विचारले.

''हो, पण दुसऱ्या पेग नंतर डिनर सर्व्ह कर. जेवण नेहमीचेच हं आणि हो बरोबर सॅलेड विसरू नको'',डॉक्टर साहेबांनी आज्ञा केली. वेटर हो म्हणत निघून गेला. अनेक वर्षे डॉक्टरसाहेबांची हिच ऑर्डर असायची. निवांत दोन पेग आणि मग टोस्टेड व्हेजीटेबल सँडविच आणि सॅलेड विथ इटालियन ड्रेसिंग.

त्यांचे आयुष्यही त्यांच्या जेवणाप्रमाणेच गृहीत आणि चाकोरीबद्ध झाले होते म्हणजे मन लावून काम करणे, वाचन करणे, पोशाखही तसाच आणि जेवणही ठरलेलेच.

पण या सगळयातही मनाच्या एका कोपऱ्यात दडलेला तो बोचरा एकटेपणा मात्र ते बेमालूम लपवायला शिकले होते. पण तरीही कधी कधी आपली काळजी करणारी आणि वाट बघणारी कोणी आपलीशी व्यक्ती असावी असे त्यांनाही वाटले तर आश्चर्य काय?

''अरे,... मगाचचे गाणे परत रिपिट कर ना! हो, चुपके चुपके रात दिन आंसू बहाना याद है.'',डॉक्टरसाहेबांनी स्वतःच्याच तंद्रीत बरळल्यासारखे बोलत फरमाईश केली. वेटरनेही ही

फरमाईश लगेच मान्य केली. पहिल्या पेगमुळे छानशी हल्कीशी नशा चढली होती. त्यांनी ग्लास उंचवत स्वतःलाच चिअर्स केले.

तेव्हढयात..... मागून मोठयाने बोलण्याचा आवाज आला आणि तंद्री तुटल्यासारखे झाले.

''मला कोपऱ्यातले टेबलच हवे हं! ए सी पण जरा वाढवायला सांगा आणि हो रेस्टॉरंट किती वाजता बंद होते?''.....आवाज बाईचा होता.

जोरात बोलण्याच्या आवाजाने डॉक्टर साहेबांना थोडे डिस्टर्ब झाल्यासारखे झाले. चांगली तंद्री लागली होती आणि मध्येच हे काय? त्यांनी वैतागून वळून आवाजाच्या दिशेने पाहिले तर एक महिला वेटरशी बोलत होती. डॉक्टरसाहेब तिच्याकडे उत्सुक्तेने बघू लागले.

तिने तिच्या डोळयावरील काळसर चश्मा काढला आणि मानेला झटका देत कपाळावरील केस बाजूला केले. आजूबाजूला नजर टाकत तिने कोपऱ्यातील एका टेबलाची निवड केली. उंच टाचेच्या सँडलचा आवाज करत ती रूबाबदार चालीने चालत टेबलापर्यंत गेली. तिने हातातील पर्स खुर्चीवर ठेवली, कोट काढला आणि खुर्चीच्या पाठीवर अडकवला. मग ती दुसऱ्या खुर्चीवर विराजमान झाली. तिच्या रहाणीमानावरून ती कोण्या श्रीमंत घरातील असावी. तिच्या बोटातील ती मोठी हिऱ्याची

अंगठी, ब्रँन्डेड लेदर पर्स, हातातील महागडा मोबाईल आणि तिचा तो परदेशी बनावटीचा महागडा कोट.....

तिच्या लक्षात आले नसले तरी अनावधानाने रेस्टॉरंटमधील सगळयांचे लक्ष तिने वेधून घेतले होते. ती होतीच तशी! योगायोगाने तिचे टेबल डॉक्टरसाहेबांच्या समोरीलच होते

''ब्लॅक कॉफी'',तिने वेटरला आज्ञा केली. वेटर निघून जाताच ती तिच्या मोबाईलवर काहीतरी टाईप करू लागली. पिंक नेलपॉलिश लावलेली तिची निमुळती नाजूक बोटे मोबाईलवर भराभर चालत होती.

डॉक्टर साने तिच्याकडे टक लावून बघू लागले. हो! तो चेहरा नक्कीच ओळखीचा होता. तिच्यात वयाप्रमाणे जरूर बदल झाला होता आणि तिचे रहाणीमानही बरेच बदलले होते. पण तरीही तिला ओळखणे तसे अवघड नव्हते.

काय हे असू शकते? म्हणजे साक्षात वैदेही?..... चक्क वीस वर्षांनंतर! हा एक सुखद धक्काच म्हणायला पाहिजे.

पण आता ती विवाहीत असणार मग तिला उगाच अवघडल्या सारखे नको वाटायला, तिच्या नवऱ्याला असे तिने जुन्या मित्राला भेटणे आवडेलच असे नाही. उगाच असे पुढे होत तिच्याशी बोलणे योग्य नाही, असा विचार डॉक्टरसाहेबांच्या मनात उमटून गेला. इथून निघून जाणेच योग्य. तसे घरी पार्सल नेऊन मग जेवण केले तरी चालण्यासारखे होते.

डॉक्टरसाहेबांनी वेटरला खूण करून बोलवून घेतले आणि हळू आवाजातच जेवण पार्सल देण्यास सांगितले. पण वेटरने घोळ करायचा तो केलाच.

''साहेब, काय झाले? जेवण तयारच आहे. हवे तर लगेच सर्व्ह करतो.'', वेटर जरा मोठया आवाजातच बोलला. आणि.....तिने मान वर करत डॉक्टरसाहेबांकडे पाहिले.

क्षणभर न्याहाळल्यावर तिने हातातील मोबाईल खाली ठेवला आणि ती डॉक्टरसाहेबांकडे टक लावून बघू लागली. अचानक तिच्या डोळयात चमक आली आणि चेहऱ्यावर स्मित हास्य उमटले. हो!, तिने त्यांना नक्कीच ओळखले होते आणि तिला असे त्यांना ओळख देण्यात काहीच भीड वाटली नाही.

''हं, सुप्रसिद्ध डॉ मंदार साने काय या सामान्य व्यक्तीशी बोलण्याची कृपा करतील?'',ती मिश्कील भाव डोळयात आणत हसतच बोलली.

आता मात्र तिच्याशी बोलण्यास काहीच हरकत नव्हती. मग काय, डॉक्टरसाहेब उठले आणि तडक तिच्या टेबलापाशी गेले. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद लपता लपत नव्हता. अनोळखी जगात कोणीतरी आपले भेटल्यासारखे वाटले. म्हणजे वैदेही, सुनिधी, मधू, कविता, मनिश, ओंकार आणि मंदार.....कॉलेजमधला भन्नाट ग्रुप.

''वैदेही, अग तू कशी आहेस? आणि इथे तू कशी काय? तू तर अमेरीकेत असतेस ना? म्हणजे कोणाकडून तरी चार पाच वर्षांपूर्वी कळले होते. आणि तू कॉलेजनंतर कुठे गायब झाली होतीस? मग कोणाला तू लग्नालाही बोलावलेही नाहीस'',डॉक्टरसाहेबांनी तिच्यावर प्रष्णांचा भडिमारच केला.

''अरे हो हो..... सांगते सगळे! पण बस इथे, असे उभे राहून बोलू नकोस.'',वैदेहीने समोरच्या खुर्चीकडे खूण करत म्हंटले. डॉक्टर साहेब तिच्या समोरच्या खुर्चीत विराजमान झाले.

''हं सांग, म्हणजे तू आत्ता इथे कशी काय?'',डॉक्टरसाहेबांनी परत विचारले

''हो मी अमेरीकेतच असते. पण बाबा इथे एकटे असतात ना!, त्यामुळे सुट्टीत आम्ही सगळे गावाकडे येतो. बाकी कोणी आले नाही तरी मी येते. बाबांपाशी काही दिवस रहाते. तुला माहितच आहे की मी त्यांची एकुलती एक मुलगी आहे. मागचा एक महिना त्यांच्यापाशीच होते. नवरा आणि मुलगा पंधरा दिवसांपूर्वीच परत अमेरीकेत गेले. त्यांना फार सुट्टी नसते. पण मी अजून काही दिवस इथेच राहणार आहे. शहरात काही काम होते म्हणून इथे आले होते.'', वैदेहीने माहिती दिली.

''तू नेहमीच कर्तव्यदक्ष होतीस.'',डॉक्टरसाहेब तिच्याकडे कौतुकाने बघत बोलले.

''मी पण तूझे नाव वर्तमानपत्रात सतत वाचत असते. तू तर काय बाबा! आता फार मोठा माणूस झाला आहेस. प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ आहेस. काय खरंच तुझ्याकडे खूप विचित्र केसेस येतात काय रे? म्हणजे खरंच खूप अवघड व्यवसाय आहे तूझा.'',वैदेही डॉक्टरसाहेबांकडे बघत बोलली.

''हो अगदी सगळया तऱ्हेच्या केसेस मी हाताळत असतो. म्हणजे दुभंगलेले व्यक्तिमत्व, भास होणे, पॅरॅनॉइया, डिप्रेशन, डिल्यूजन, ऑबसेसिव्ह कम्पलसिव्ह डिसऑर्डर आणि बरेच प्रकार असतात ग. सामान्य माणसाला आश्चर्य वाटावे असे मानसिक आजार असतात. अग 'दुभंगलेले व्यक्तिमत्व' हा आजार तर फार भयंकर आहे. यात एकच व्यक्ती दोन वेगवेगळया माणसांचे आयुष्य एकाच शरीरात जगत असतो.'',डॉक्टरसाहेब हसतच बोलले.

''मी नेहमीच माझ्या नवऱ्याला सांगत असते, ते सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ मंदार साने आहेत ना, ते माझे कॉलेजमधले मित्र आहेत.'',वैदेहीने हसतच सांगितले.

मग बराच वेळ वेडयासारख्या गप्पा झाल्या. जुन्या आठवर्णीना उजाळा मिळाला. आणि भूतकाळात हरवलेले ते कॉलेजमधले भन्नाट दिवस परत एक एक करून जणू समोर येऊन उभे ठाकले. आत्तापेक्षा किती वेगळा काळ होता तो, म्हणजे परीक्षेचे टेंशन, नोट्स मिळवण्यासाठिची धडपड, रिसल्टचे टेंशन, आणि

हो, तो ढ ओंकार ना! कायम नापास, मग मित्र मैत्रीणींपैकी कोणालातरी त्याचा अभ्यास घ्यावा लागत असे. मग पण एकदा का परीक्षा संपली की बस्स धम्माल!, म्हणजे सिनेमाला एकत्र जाणे, लोणावळयाला पिकनीकला जाणे, आणि हो कॉलेजच्या गॅदरींगला केलेला कल्ला आठवून तर हसून हसून पोट दूखू लागले सगळे सगळे परत आठवून पार वेड लागले. जणू त्या धीरगंभीर रेस्टॉरंटला जिवंत करणारे हसण्याचे आनंदी आवाज उमटू लागले.

एव्हढया सुंदर स्त्री बरोबर गप्पा मारत असलेल्या डॉक्टरसाहेबांवर रेस्टॉरंटमधले इतर लोक नक्कीच जळत असणार असे डॉक्टर साहेबांना उगाच वाटले. मानसोपचार तज्ञच ते! लोकांच्या मनातील भाव जणू ओळखू शकत असत.

''मधल्या काळात तू कोणाच्याच संपर्कात नव्हतीस म्हणून तुला माहिती देतो, सुनिधी आता कॉसमॉस बँकेची मॅनेजर आहे बरका, तर कविता गृहिणी असून तिला एक मुलगा आहे, मधूशी तसा काही संपर्क नाही पण ओंकार कॅनडाला असतो'', डॉक्टर साहेबांनी हसतच माहिती दिली.

सगळयांबद्दल माहिती ऐकताच तिच्या चेहऱ्यावरचे हसरे भाव गायब झाले. कारण इतरांची माहिती देताना त्यांनी मनिश म्हणजेच मन्याबद्यल मुद्यामच विषय काढला नाही हे तिच्याही

लक्षात आलं. मनिश आणि तिचे नाते जरा वेगळेच होते. ते दोघे कायम एकत्र असायचे.

डॉक्टरसाहेबांचेही बरोबरच होते की, उगाच तिचा मूड कशाला खराब करा? कारण त्याच्या बाबतीत जे झाले ते काही साधे नव्हते. त्या दोघांचे नाते हे असे तुटेल हे कोणाला वाटलेही नव्हते. त्याचा उल्लेख झाला नाही तरी त्याच्याबाबातीत मनात विचार येणे साहजीकच होते. आणि तिचा चेहरा गंभीर झाला. क्षणभर ती गप्पच झाली. मग तिनेच विषय काढला.

''मनिश कसा आहे रे? तो.....तो..... म्हणजे तो ठीक आहे ना?!'',बोलताना तिच्या मनातली सल जणू डोळयावाटे प्रदर्शित होऊ लागली. तिलाच या दुख-या विषयाला हात घालायचा होता तर! तिने कितीही आग्रह केला तरी उगाच कशाला वादग्रस्त विषय बोलायचा, असा विचार करत डॉक्टरसाहेबांनी विषय बदलून बोलणे सुरू केले.

''इथे शहरात कुणाकडे उतरली आहेस? म्हणजे कोणी नातेवाईक?'', डॉक्टर साहेबांनी विचारले. पण क्षणभर ती गप्पच होती. तिने तिच्या रूमालावर डोळयातील पाणी हळूवार टिपले. तिच्या चेह-याला न्याहाळल्यावर डॉक्टर साहेबांच्या लक्षात आले की ती नाकी डोळी खरंच किती सुबक आणि सुंदर होती. या सुंदर चेह-यावर ही दुःखी छटा शोभत नव्हती.

''इथेच म्हणजे मॅरीऑट मध्येच उतरले आहे. दोन दिवसात परत माहेरी जाणार आहे. गााावात बाबांचा तो हॉलिडे रिसॉर्ट आहेना! तिथेच मी रहात असते. तुला आठवतयं, तिथल्या तलावात मन्या पडला होता. आणि मग घरी येई पर्यंत नुसता थंडीने कुडकुडत होता.'',तिला मनिशच्या बाबतीच बोलायचे होते तर!.....

''तो पहिल्यापासून असाच म्हणजे वेगळाच होता.'', डॉक्टरसाहेब बोलले.

''हो ना! पण त्याला काय दोष द्यायचा म्हणा! त्या दिवशी तो प्रसंगही तसा विचित्रच घडला. किती भयंकर. पण नंतर मन्या माझ्या आयुष्यातून कायमचा निघून गेला रे. मी खूप प्रयत्न केला पण त्याने नाही संपर्क ठेवला. आज तो माझया आयुष्यात असता तर.....'',बोलताना वैदेही अचानक गप्प झाली.

परत मनिश बद्दल बोलणे टाळण्यासाठी डॉक्टरसाहेबांनी परत विषय बदलला.''मला आठवतंय आपण तुझ्या बाबांच्या रिसॉर्टवर पिकनिकला गेलो होतो तेव्हा मी ती मागंची जूनी मोठी हवेली पाहिली होती. तिथे किती छान सृष्टी सौंदर्य आहे ना! तो रिसॉर्ट म्हणजे स्वतःतच रमलेले जणू एक वेगळेच जग आहे.'',डॉक्टर साहेब हसतच बोलले.

पण कितीही विसरायचा प्रयत्न केला तरी तो प्रसंग जणू सगळयांच्याच मनावर कोरला गेला होता. अंगावर शहारा आणणारा तो भयानक प्रसंग.....

अनावधानाने तो प्रसंग जणू परत डोळयासमोर तरळू लागला, आणि., मग काय झाले कोणास ठाऊक पण वातावरण अचानक बदलून गेल्यासारखे झाले. जूने एक बंद दालन परत उघडल्यासारखे वाटले आणि स्मृतीच्या कोपऱ्यात दडलेला तो जीवघेणा प्रसंग परत डोळयासमोर उभा राहिला. सर्व काही आठवून जणू दोघांच्या काळजाचा ठोकाच चुकला. हं.....वैदेहीने दीर्घ श्वास घेतला. मग दोघेही शून्यात बघत क्षणभरासाठी शांत बसले.

''मन्या कसा आहे आता? म्हणजे तूझा त्याच्याशी काही संपर्क?'',वैदेहीने शांतता तोडत विचारले.

''तो बऱ्याच वर्षांपूर्वी दिसला होता. मनोरूग्णांच्या हॉस्पीटलमध्ये एका वॉर्डमध्ये त्याला पाहिले. त्याच्यावर अजूनही मानसोपचार हॉस्पीटलमध्ये उपचार सुरू आहेत. अग काही माणसे मनाने कमकुवत असताात. तो ही तसाच आहे. त्या दिवशीच्या घडलेल्या प्रसंगातून तो कधीच सावरलाच नाही. बरं ते जाऊदे तू काही खाणार का? इथे चायनीज खूप छान मिळते.'',डॉक्टर साहेबांनी विषय बदलत विचारले.

पण अचानक वैदेहीचा मूड बदलला होता. तिच्या डोळयातून एक अनामिक भीती डोकवून जाऊ लागली. क्षणभर स्वतःच्याच तंद्रीत ती विचार केल्यासारखी अस्वस्थपणे बोटाच्या हालचाली करू लागली. ती कमालिची अस्वस्थ झाली.

सगळयांनाच त्यावेळी असाच धक्का बसला होता. म्हणजे मन्या फक्त वैदेहीचाच नाही तर सगळयांचाच खूप चांगला मित्र होता. तसा तो हुशार होता आणि सगळयांनाच अभ्यासात मदतही करत असे. कोणाला नोट्स देत असे तर कोणाच्या चक्क टयुशन घेत असे. तसा तो मनाने हळवा आणि भावूकच होता. असा कणखर व्यक्ती वैगरे नव्हता पण तरी त्याचे हे असे होणे म्हणजे.....वैदेहीने त्या घटनेनंतर कॉलेजच बदलले. सगळयांनी तिला खूप समजवायचा प्रयत्न केला पण ती स्वतःलाच जबाबदार धरत होती. अपराधी भावना तिला शांत जगू देत नव्हती. कारण तिच्या वडिलांच्या रिसॉर्टवरच तर ती घटना घडली. त्या दिवशी नंतर मनिश म्हणजेच मन्या कधीच बरा झाला नाही. म्हणजे याचा शॉक वैदेहीने घेतला आणि .....ती कोणालाच न सांगता लांब निघून गेली. फार वर्षांपूर्वी घडलेले सर्व काही परत आठवू लागले.....सगळं सगळं परत आठवू लागले. मग वैदेहीने एक वेगळाच प्रष्ण विचारून टाकला.

''असं काही अदृश्य अस्तित्व म्हणजे जे इतरांना दिसत नाही पण काही लोकांनाच दिसते म्हणजे खरंच असं काही असतं का?

तूला जर कोणी सांगितले की कोणी अदृश्य बाई आमच्या रिसॉर्टच्या बाहेर भटकत असते तर तुझा विश्वास बसेल का? ''वैदेहीने घाबरतच प्रष्ण केला. या प्रष्णामुळे भांबावलेले डॉक्टरसाहेब तिच्या चेह ऱ्याकडे नुसते बघतच राहिले. कारण अगदी सगळयां समक्ष घडलेल्या त्या दिवशीच्या घटनेला नाकारायला ते तिला कसे सांगणार होते?

त्या दिवशी पिकनिकला मन्याने काहीतरी पाहिले म्हणे.....म्हणजे काहीतरी वेगळेच, आमचा त्याच्या बोलण्यावर विश्वास बसत नव्हता. पण तो मात्र परत परत हेच सांगत होता की जे काही दिसले ते अमानवीय होते आणि मग, तो विचित्र हावभाव करत आणि विचित्र आवाज काढत बोलू लागला जसे काही कोणीतरी त्याच्या शरीरात वेगळेच होते. तो वैदेहीच्या बाबांशी असेच काहीतरी विक्षिप्त बोलू लागला की,''तुला भेटायचे होते. तो तूच तर आहेस ना! तुला मी न्यायला आली आहे.'' त्याने ते असे अंगविक्षेप करत आणि डोळे फिरवत बाईच्या आवाजात बोलणे म्हणजे..... हो तो बाईच्या आवाजात बोलत होता. तो पाच ते सहा माणसांना सुद्धा आवरला जात नव्हता.....सर्व आठवून वैदेहीने अविश्वाने मान झटकली. जे झाले ते अतर्क होते.

तेव्हढयात वेटर जेवणाचे पार्सल घेऊन आला आणि वैदेहीने मागवलेली कॉफीपण आली. ''तू या वेळेलाही कॉफी पितेस? तू

खरंच अमेरीकन झाली आहेस.'',डॉक्टर साहेब हसतच बोलले. पण तिची तंद्री लागली होती. ती शून्यात बघत होती.

''अगं काय झालं वैदेही? कुठे हरवली आहेस?'',डॉक्टर साहेब जरा मोठया आवाजात म्हणाले.

एकदम भानावर येत ती थरथरत्या आवाजात बोलू लागली,''मंदार, तुझ्याशी महत्वाचे बोलायचय. मी शहरात एका महत्वाच्या कामासाठी आले होते आणि तू देवासारखा भेटलास. मला माहित आहे की तू खूप व्यस्त असतोस पण मला तूच मदत करू शकतोस. मला जरा वेगळयाच अतिमहत्वाच्या विषयावर बोलायचय. तुझ्या व्यवसायाचा यात उपयोगच होईल''

तिचे असे भरभर बोलणे, तिचे ते गंभीर हावभाव बघून डॉक्टर साहेब आता चांगलेच चापापले. तिच्या डोळयात ती खोल रूतलेले भीती!, तिची भेदरलेली अवस्था, तिचे थरथरणारे हात!

अखेर त्यांनी काळजीच्या आवाजात विचारणा केली,''काय झालंय वैदेही? अगं किती घाबरली आहेस! तसेही उद्या रविवार असल्यामुळे सुट्टीच आहे. उशीर झाला तरी चालेल पण तुला जे काही बोलायचंय ते तू निवांत बोल. काय हे मनिशच्या बाबतीत आहे?''.

''हो पण त्याच्या बाबतीत म्हणजे.....तसेच काही आहे.'',वैदेहीने कापऱ्या आवाजात सांगितले. मग जणू ती काय आणि कसे सांगावे असा विचार करत क्षणभर बसून राहिली.

तिचे बोलणे ऐकताच डॉक्टरसाहेब चांगलेच चपापले. ते तिच्याकडे बघतच राहिले.

तंद्रितच तिने तिच्या समोर ठेवलेला कप तोंडाला लावत कॉफीचा घोट घेतला. मग अवघडल्यासारखे स्मितहास्य करत विनोदाने ती म्हणाली,''मी कॉफी कधीही घेऊ शकते. मी एअरपोर्टवर काम करते. मग कधी नाईट डयूटी लागली की स्वतःला जागे ठेवायला कॉफीची मदत घ्यावीच लागते. बस्स त्यामुळेच सवय झाली.''

तिने ओढून ताणून चेहऱ्यावर आणलेले खोटे हास्य क्षणात परत हरवून गेले. तिच्या मनावर कसलेतरी प्रचंड मोठे दडपण असावे कारण तिचा चेहरा रडवेला झाला होता. प्रकरण नक्कीच गंभीर असणार, डॉक्टरसाहेबांना याची स्पष्ट कल्पना आली.

''तूझी काही हरकत नसेल तर मी एक सुचवू का?'',डॉक्टरसाहेब विनंतीच्या सुरात विचारले.

वैदेहीने मान हलवत होकार देताच ते परत बोलू लागले,''माझे घर इथून फक्त अर्धातासाच्या अंतरावर आहे. माझी बाल्कनी सॉलीड ब्युटिफ फूल आहे. तिथे मस्त दोन आरामखुर्चा टाकल्या आहेत. आपण तिथे बस्तान बसवू. मग तुला काय हवे ते निवांत सांग. कितीही वेळ लागू दे. घरी माझा नोकर म्हणजेच तुमच्या अमेरीकन शब्दात म्हणायचे झाल्यास बटलर असतो. आमचे सुधाकरकाका तुला हवी तेव्हडी कॉफी करून देईल.''.

डॉक्टर साहेबांचे बोलणे ऐकल्यावर वैदेहीच्या चेहऱ्यावर नकळतच हसू उमटले. म्हणजे नुसते मानसोपचार डॉक्टरला ॲपॉईंटमेंट घेऊन भेटण्याच्या औपचारीक पद्धतीपेक्षा मित्राशी मैत्रीच्या नात्याने कधीही मनमोकळेपणाने बोलता येऊ शकते. तिला क्षणात हायसे वाटले. ''हो चालेल ना! तसंही मला जे बोलायचंय इथे बोलण्यासारखे नाही.'',वैदेही पटकन बोलली.

मग काय दोघे तडक उठले. जुन्या आठवर्णीना उजाळा देत आणि गप्पा मारत गाडीपाशी आले.

''तुझे वडील कसे आहेत गं? म्हणजे त्यांचा तो रिसॉर्ट अजून तसाच आहे का?'',डॉक्टर साहेबांनी गाडीत बसताना चौकशी केली. त्यांचा प्रष्ण ऐकून वैदेही अचानक गंभीर झाली. तिचा चेहरा काळवंडल्या सारखा झाला आणि जणू वातावरण बदलावे असे वाटले. तिच्या चेहऱ्यावरचे आनंदी भाव पार पळून गेले. तिने निर्विकार नजरेने डॉक्टरसाहेबांकडे पाहिले आणि ती गाडीत बसली.

हं म्हणजे ते गंभीर प्रकरण तिच्या वडिलांच्या बाबतीतच असणार, तसा तो रिसॉर्ट पण वेगळाच होता. म्हणजे सगळयांनाच तिथे काहीतरी नक्कीच गूढ जाणवले. नक्की काय ते स्पष्ट सांगता येणार नाही पण वातावरण तसे विचित्रच होते,

त्या दिवशी मन्याने कोणीतरी विचित्र अशी बाई पाहिली होती असे तो परत परत सांगत होता. मग ती बाई इतर कोणालाच

कशी दिसली नाही, फक्त त्यालाच कशी दिसली? मग तो घाबरून पळत सूटला. तो घाबरला होता, बावचळला होता. तो भितीने थरथरत होता. पण तो एकीकडे बोट दाखवत आणि ओरडत पिसाटा सारखा पळत सुटला, जणू कुणीतरी त्याच्या मागे लागले होते. त्याच्या डोळयात उमटलेली ती अनामिक झपाटलेली भीती..... आणि नंतर जे झाले ते अंगावर काटा आणणारे होते. असे त्याने बाईच्या आवाजात बोलणे, वेडेविद्रे अंगविक्षेप करत वैदेहीच्या बाबांच्या अंगावर धाऊन जाणे, काय झाले असावे त्याला?'

अखेर त्याला सर्वांनी बांधून ठेवले पण तो तसाच बाईच्या आवाजात ओरडत राहिला. सगळेच अतर्क आणि स्पष्टीकरण नसलेले झाले. त्या वयात हे असले काही अनुभवायला मिळेल असे कधी वाटलेच नाही. नक्की काय झाले कोणालाच कळले नाही. वैदेहीच्या मनावर तर कायमचा परिणाम झाला.

गाडीने आता वेग घेतला आणि बघता बघता गर्दीचे रस्ते पार करून गाडी मोकळया रस्त्याला लागली. झिम झिम पाऊस आजून सुरूच होता. वैदेही गप्प बसून खिडकीतून बाहेर बघत होती पण तिचे लक्ष आपण कुठे चाललोय या कडे नव्हतेच. ती नुसतेच शुन्यात बघत तंद्री लावून होती.

''वैदेही काय झालंय? तू सगळं काही स्पष्ट बोल. अगदी सगळं सांग. अगदी कितीही विक्षिप्त असले तरी सांग.''मग तिने पटकन

वळून डॉक्टर साहेबांकडे पाहिले आणि त्यांचे बोलणे थांबवत ती बोलू लागली.

''हे बघ मी आता स्पष्टच सांगते. मी जे सांगणार अहे ते बाबांच्या बाबतीत आहे. माझे बाबा! त्यांची तब्यत ठीक नाहीए म्हणजे तसे दिसायला ते ठीक दिसतात पण मानसिक दृश्या ते ठीक नाहीत. त्यांच्याच बाबतीत तुझ्याशी बोलयचे आहे. पण तू गैरसमज वैगरे करून घेऊ नकोस हं! मला जे सांगायचय ते जरा विचित्रच आहे पण.....'',वैदेहीचे बोलणे मध्येच थांबवत डॉक्टरसाहेब बोलू लागले.

''माझा काही गैरसमज वैगरे होणार नाही. तू स्पष्ट बोल'', डॉक्टर साहेबांनी दटावण्याच्या सुरात सांगितले.

''मंदार, ते मन्याचे प्रकरण तसे अजून संपलेले नाही कारण मन्याला दिसलेली ती बाई खरंच असावी. कारण बाबानांही ती त्या दिवशीपासून दिसू लागली, अरे ते त्या बाईशी बोलतात..... मला सुरवातीला वाटले हा एकटेपणाचाच परिणाम असण्याची शक्यता आहे पण ते स्वतःशीच बोलत नव्हते कारण त्या अदृश्य बाईच्या अस्तित्वाच्या खूणा असतात. तिच्या असण्याच्या बाबत धागेदोरे मिळतात. तिचा आवाज ऐकू येतो.'',वैदेही वेडयासारखी बोलतच राहिली. डॉक्टरसाहेब सावध होत सर्व ऐकू लागले.

''म्हणजे, हे नक्की काय असावे? त्या दिवशी मन्याला दिसलेली ती बाई खरंच असेल का? बाबांशी बोलणारी अदृश्य बाई काय तिच असावी? काहिच कळत नाही. तसेच ते खोलीत एकटे असताना कोणीतरी त्यांना धमकावत असते. बंद दरवाज्याच्या बाहेर उभे राहून मी अनेकवेळा एका वेगळयाच माणसाचा धमकावण्याचा आवाज ऐकला आहे. खोलीत गेल्यावर कोणीच नसते. मी पार गोंधळून गेली आहे. मला हे कोणाला सांगताही येत नाही आणि भीती वाटते की कोणी मलाच वेडे समजायला नको.'',वैदेहीने घाबरत सर्व काही भराभर कथन केले.

''मग तुझे बाबा याबाबत काय स्पष्टीकरण देतात?'',डॉक्टरसाहेबांनी प्रष्ण केला.

मी बाबांना याबाबतीत चांगलाच जाब विचारला की, 'तूम्ही हे असे काय विचित्र वागताय?' पण ते काहीतरी भ्रमिष्ठा सारखे बोलतात. ती दररोज त्यांना भेटायला येते आणि ती त्यांच्याशी बोलते असे ते म्हणतात. आणि तो त्यांना धमकावणारा माणूस म्हणे फक्त त्यांनाच दिसतो. मला हे काय चालंलय हे कळायलाच हवे. माझाही त्यांच्या बोलण्यावर विश्वास बसला नव्हता पण मग मलाही काही अनुभव आले आणि मग माझ्या पायाखालची जमिनच सरकली. हे दिसते त्यापेक्षा बरेच खोल प्रकरण आहे. बाबांना कोणीतरी त्रास देतय. कोणी तरी अदृश्य! त्या रिसॉर्टवर काहितरी खूप विचित्र घटत आहे. काहीतरी अदृश्य असे अस्तित्व तिथे आहे. तिथे असा काही खेळ सूरू आहे जो

मला कळतही नाही आणि ज्याला नाकारताही येत नाही.''.वैदेही भराभर बोलून गेली. जणू मनात बराचवेळ साठलेली सल पटकन् मुक्त झाली.....

आणि सगळे ऐकून डॉक्टरसाहेबांच्या नकळत त्यांचा ब्रेकवर पाय दाबला गेला. गाडी रस्त्याच्या मध्येच कच्.. कच्.. कच्.. आवाज करत थांबली.

डॉक्टर मंदार साने डोळयात हजारो प्रष्णचिन्हे दाटवून वैदेहीकडे बघू लागले. धक्का लागल्यासारखे ते निशब्द होत तिला नक्की काय सांगायचे आहे, याचे आकलन करू लागले. डोळयात हजारो प्रष्ण दाटवून ते तिच्याकडे बघतच राहिले.

काय? हे ती काय बोलत आहे? हे कसे शक्य आहे?.....

पण वैदेही तसे खोटे बोलणार नाही. नक्कीच नाही. म्हणजे जूनी कॉलेज मधली प्रामाणिक, हुशार आणि सरळ स्वभावाची वैदेही उगाचच काही बाता मारणार नाही.

वैदेही अवघडल्यासारखे हावभाव करत परत बोलू लागली. ''मग मला बाबांची डायरी मिळाली. त्यांना दररोजच्या घटना डायरीत नमूद करायची सवय आहे. अगदी लहान सहान गोष्टीही ते डायरीत लिहून ठेवतात. आणि त्यांनी त्यात जे लिहीले आहे ते वेड लावणारे आहे. मला सगळे वाचून धक्का लागलाय. मी ती डायरी बरोबर आणली आहे. ही काय माझ्या पर्समध्ये आहे.....तू वाचशील ती प्लिज! त्या सगळया घटना

डायरीत नमूद आहेत. त्या अदृश्य बाईचे भेटण्या बाबतचे वर्णन त्यात लिहिले आहे. तूझी जी काही फी असेल ती मी द्यायला तयार आहे.''

तिच्या डोळयातील ती प्रामाणिक भीती आणि तिचा रडवेला चेहरा हे तिच्या बोलण्यातील सत्यतेचे प्रमाणच देत होता. प्रत्येक अवस्थेमागे काहीतरी कारण हे असतेच की! त्यात तिच्या सारखी सुशिक्षित आणि मॉडर्न बाई जेव्हा अशी अंर्तबाहय घाबरते तेव्हा त्यात काहीतरी तथ्य हे असणारच.

मानसोपचार तज्ञाकडे कुठे सरळ प्रकरणे येतात? त्यांच्याकडे येणारा प्रत्येक माणूस त्यांच्या मनाची गुंतागुंत त्यांच्याने सुटली जात नाही म्हणूनच मदतीसाठी धाव घेत असतो. हो हो तिचे म्हणणे ऐकलेच पाहिजे. एक मानसोपचार तज्ञ म्हणून तरी ऐकलेच पाहिजे.

तसेच खूप वर्षांपूर्वी मन्याबाबत जे झाले होते त्याबाबतही काही संशोधन करण्याची संधी जणू आपणहून चालून आली होती. बिचारा मनिश अजूनही नॉर्मल झाला नव्हता. तो अक्षरशः उध्वस्थ झाला.

अदृश्य व्यक्ती दिसणे म्हणजे भास होणे, डिल्यूजन. हा गुंता म्हणजे जणू मानसोपचार तज्ञा साठीचे एक आव्हानच. हो हो हे प्रकरण मानसशास्त्राच्या संबंधीच भासत होते.

डॉक्टरसाहेबांनी शांतपणे तिला उत्तर दिले,''तू घाबरू नकोस मला सगळे पहिल्यापासून सांग. काहीतरी तोडगा मिळेलच. आणि हो, त्यांच्या डायरीतच कदाचित त्यांच्या अवस्थेचे रहस्य दडले असू शकते. डायरी मी नक्की वाचेन.

अगं मन जर आजारी पडले ना?, तर खूप तऱ्हेचे खेळ करते. तू सांगत आहेस हा खेळ नक्की कोणता याचा मागोवा घ्यायलाच हवा.

नवीन केस चांगलीच थरार होणार याचे संकेत डॉक्टरसाहेबांना जाणवू लागले.

२.डायरी आणि अतर्क मानसीक खेळ

फार वेळ नाही आपल्याकडे. हो हो काहीतरी लवकरच केले पाहिजे. नाहीतर काही अघटीत नक्की घडेल. पण मी तरी काय करावे? माझी शक्ति अपुरी आहे. नक्की काय करायचे आहे हे पण सुचत नाही. अरे देवा! फार वेळ दवडूनही चालणार नाही. हो हो मंदारने ती डायरी वाचायलाच हवी. त्याशिवाय त्यालाही परिस्थितीच्या गांभिर्याची कल्पना येणार नाही. डायरी, डायरी, डायरी.....

ही डायरी.....हो हो आता डायरीच मदत करेल. जणू डायरीतच आहे या बंद कुलपाची चावी.

''हं कुठे तंद्री लागली म्हणायची?'',डॉक्टरसाहेब समोरच्या खुर्चीत बसत बोलले. त्यांच्या बोलण्याने वैदेही दचकून भानावर आली. तिने छातीशी घट्ट धरून ठेवलेली डायरी तिने हळूहळू समोरच्या टेबलावर ठेवली.

''हं निवांत बस. असं टेंशन घेऊ नकोस. आज आपण इथे निवांत बसून चर्चा करणार आहोत. मग मी ती डायरी वाचणार आहे. ठीक आहे?'',डॉक्टरसाहेबांनी तिला समजवण्याच्या सूरात सांगितले. वैदेही निवांत टेकून बसली.

डॉक्टरसाहेबांच्या प्रशस्त बंगल्याची बाल्कनीही खूपच छान सजवली होती. बाल्कनीच्या मध्ये मांडलेले छानसे काचेचे टेबल

आणि भोवती आरामदायी खुर्च्या मांडल्या होत्या. बाल्कनीवरच्या छतामुळे पाऊसही अडला जात होता. म्हणजे बाहेर नजर टाकली तर झिम झिम बरसणारा पाऊस बघताना इतर वेळी मन रमून गेले असते पण आज वैदेही चांगलीच अस्वस्थ होती.

तेव्हढयात तिचे लक्ष समोरच्या भिंतीवरील गूढ पेंटिंगने वेधून घेतले. वैदेहीची नजर त्या पेंटींगवर क्षणभर खिळून राहिली. ते चित्र म्हणजे रंग आणि आकार यांची विचित्र गुंतागुंत होती. आकार नीट कळत नसला तरी ते काहीतरी क्लिष्ट आणि गूढ रंगसंगतींचे जंजाळ होते. पेंटिंगच्या खाली लहान अक्षरात लिहीले होते,''हयुमन माइंड'' म्हणजेच मानवी मन. पेंटिंग बघून तिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले आणि तिच्या डोळयात चमक आली. ती गालातल्या गालात हसत डॉक्टरसाहेबांकडे बघू लागली.

''हं तुझ्या व्यवसायाला साजेसे हे पेंटिंग आहे. तू पण या पेंटिंग सारखाच गूढ व्यक्तिमत्व दिसतोच. कारण आपण एव्हढया गप्पा मारल्या पण तू तुझ्या बद्दल तसे काहीच सांगितले नाहीस.'',वैदेही हसतच बोलली.

''अगं मी चाकोरीबद्ध आणि प्रमाणाच्या बाहेर सरळ आहे. लोकांना माझ्या सारखे सरळ राहणे अशक्यप्राय वाटते. मी कुठल्याच गुंतागुंतीत कधीच अडकत नाही. कारण

मानसोपचारतज्ञाच्या व्यवसायासाठी ते चांगले नाही. माझा व्यवसाय हा खूप क्लिष्ट आहे आणि हे पेंटीग म्हणजे जणू मी स्वतःला घातलेले आव्हानाचे प्रतीक आहे. म्हणजे माझ्या पेशंटच्या मनाची ही गुंतागूंत मला सोडवायची असते आणि त्यासाठी मला ती समजवून घ्यायची असते. जे इतरांना जमत नाही ना ते मला करायचे असते. म्हणूनच मी माझ्या आयुष्याची गुंतागुंत होऊच देत नाही. मी ठीक असेन तर दूसऱ्याला ठीक करू शकेन. नाही का?'',डॉक्टरसाहेब स्पष्टपणे बोलले.

डॉक्टरसाहेबांचे बोलणे ऐकून वैदेही गालातल्या गालात हसली. ''म्हणजेच तू गूढ आहेस. हे असे पाच बेडरूमच्या घरात असे एकटे रहाणे आणि फक्त काम करत राहणे मला नाही जमणार. मी सामान्य माणूस आहे म्हणजेच खूप खूप गप्पा मारणारी, खळखळून हसणारी, लोकांकडून अपेक्षा करणारी, नाराज होणारी, रडणारी, पावसात उगाच भिजणारी, छोटया छोटया गोष्टीत आनंद शोधणारी.''.वैदेहीने तिचे प्रांजळ मत मांडले.

''मी सुधाकरकाकांना तुझ्यासाठी कॉफी करायला सांगितली आहे'',डॉक्टरसाहेब हसतच बोलले.

''वा! छानच!.'', ती आनंदाने म्हणाली.

तेव्हढयात सुधाकर काका कॉफी आणि बिस्किटे घेऊन आले. समोरील टेबलावर कॉफीचे दोन मग आणि बिस्किटांची प्लेट ठेऊन ते निघून गेले.

कॉफीचा एक घोट घेतल्यावर वैदेहीने बोलण्यास सुरवात केली,''तूझा फार वेळ न घेता मी विषयाला हात घालते. कारण आपल्याकडे वेळ फारच थोडा आहे.'',गंभीर चेहऱ्याने स्पष्टच बोलत वैदेहीने समोरील डायरीवर पुढे सरकवली.

''वेळ थोडा आहे म्हणजे काय?'',डॉक्टरसाहेबांनी हसतच विचारले.

''हो आपल्याकडे खरंच वेळ कमी आहे. तुला हेच तर समजावून सांगायचे आहे. आपल्याकडे जेमतेम वीस-बावीस दिवसच आहेत. त्यानंतर काही अघटीत घटायची शक्यता आहे. 'ती अदृश्य बाई बाबांना कायमचे घेऊन जाणार आहे.'',वैदेही पुढचे बोलणार तोच डॉक्टर साहेबांनी हाताने थांबायची खूण केली.

''काय?'', डॉक्टरसाहेबांनी हसतच विचारले.

''मी स्टेप बाय स्टेप समजावून सांगते. या प्रकरणात महत्वाचा भाग आहे तो रिसॉर्ट आणि त्याला लागून असलेली ती निर्यमनुष्य हवेली आहे. अगदी मागच्याच जमिनीवर वसलेली ती हवेली तर या घटनांचे मूळ आहे. कारण, कधी कधी रात्रीच्यावेळी आजूबाजूच्या झाडीतून चालण्याचे आवाज येतात तर हवेलीच्या बाजूने हसण्याचे आवाज ऐकू येऊ लागतात. जंगलातून झाडांच्या मधून कोणीतरी हवेलीच्या दिशेने ये जा करताना स्पष्ट जाणवते. मग बाईच्या गाण्याचे आवाज ऐकू येऊ लागतात तर कधी वाद्यांचे आवाज येतात. त्यात वाऱ्याने असे घूं घूं असा गोंगाट

करणे, मधून आधून ऐकू येणारी किंचाळी.....सगळे सगळे भयानक असते. आठवून अंगावर काटाच येतो.'',वैदेहीचे बोलणे ऐकून डॉक्टर साहेबांच्या चेहऱ्यावर कुतूहल दिसू लागले. अर्थातच या सगळयावर त्यांचा विश्वास बसत नव्हता.

''कोण असावे हवेलीत? तुला नक्की काय म्हणायचे आहे?'',डॉक्टसाहेबांनी आश्चर्याने विचारले. तिने अवघडल्यासारखे डॉक्टरसाहेबांकडे पाहिले आणि ती परत बोलू लागली..

''आमचा विश्वास आहे की, अंधार होताच त्या जुन्या हवेलितील अतिमानवी शक्ति जागृत होत असते. तिथे कोणीतरी आहे म्हणजे आज अनेक वर्षांपासून आहे. म्हणूनच ही डायरी वाचून तुला कदाचित धक्का बसेल. यात त्या अदृश्य बाईचा उल्लेख आणि तिचे वर्णन आहे. अतर्क अशा मानसीक खेळाचे वर्णन आहे.'',वैदेहीच्या डोळयात परत एक तऱ्हेची भीती दाटलेली दिसली.

''मला काही धक्का वैगरे बसणार नाही. मी मानसरोग तज्ञ आहे हे तू विसरू नाकोस. आण ती डायरी, बघू तरी काय आहे त्यात..'',डॉक्टर साहेब स्पष्टच बोलले.

वैदेहीने बाबांची डायरी पुढे सरकवली. तपकिरी रंगाच्या कव्हरची ती डायरी एक दैनंदीनी होती. डॉक्टरसाहेबांनी डायरीकडे क्षणभर बघून त्या डायरीवर हात ठेवला. असे काय

असावे यात? हे काय प्रकरण असावे? डॉक्टर साहेब विचार करत क्षणभर डायरीकडे बघत राहिले.

ती डायरी तिच्या वडिलांच्या व्यक्तिमत्वा बाबतीत बरेच काही सूचवून जात होती. डायरी अतिशय स्वच्छ आणि नीटनेटक्या तऱ्हेने हाताळली गेली होती. डायरीला जपण्यासाठी कव्हरही घातले होते. डायरीचा मालक नक्किच अतिशय पद्धतशीर, शिस्तप्रीय व्यक्ती असायला हरकत नव्हती. नक्कीच ते छोटया छोटया गोष्टींबाबतही लक्ष घालणारा दक्ष माणूस असावेत. हो हो दररोज डायरी लिहायची त्यांची सवयच जणू आज त्यांच्या बद्धल बरेच काही कथन करणार होती. नक्कीच ही डायरीच तर होती तो बंद दरवाजा जो उघडताच जणू रहस्यभेद होणार होता. हो हो वैदेहीच्या मते त्यात काहितरी धक्कादायक लिहीले होते.

डॉक्टर साहेबांनी डायरीचे पहीले पान उघडले आणि आतल्या पहिल्या पानावर ठळक अक्षरात लिहीलेले नाव दिसले, 'पुरूशोत्तम शांताराम सरपोतदार'. अक्षर सुवाच्छ आणि नीटनेटके होते. पहिले पान उघडताच सर्व पाने वाचायची आस आपसूकच लागली. 'हं' डॉक्टरसाहेबांनी दिर्घ श्वास घेतला.

''मला डायरी एकाग्रपणे वाचावी लागणार आहे. तू आराम का नाही करत. मी काकांना तूझी झोपायची व्यवस्था एका खोलीत करायला सांगतो. मला उशिरापर्यंत काम करायची सवय आहेच

पण तू आराम कर.'', डॉक्टरसाहेबांनी वैदेहीला स्पष्टच सांगितले.

''नको, मी हॉलमध्येच सोफावर बसून राहते. माझ्यासाठी हे प्रकरण फार महत्वाचे आहे. मलाही रात्रीच्या जागरणाची सवय आहेच. पण तू शांतपणे डायरी वाच. मी तूझी वाट बघत बसून राहते आणि माझी अर्धी कॉफीपण तशीच राहिली आहे. मी खाली जाऊन काकांकडून ती गरम करून घेते. तू माझी काळजी करू नकोस. तुला डायरी वाचून धक्का बसणार आहे. फक्त मन घट्ट कर'',वैदेही शांतपणे बोलली. ती लगेच हातात कॉफीचा मग घेऊन निघून गेली.

डॉक्टरसाहेबांनी परत त्या डायरीकडे पाहिले आणि ते स्वतःशीच बोलले, ''हूं बघूया यात धक्का लागण्यासारखे काय आहे ते?'' डोळयावर चश्मा चढवून ते एका खुर्चीत स्थानापन्न झाले.

प्रथम पानावर मोठया अक्षरात लिहीलेल्या मजकूरावर त्यांची नजर स्थिरावली.

''माझी प्रत्येक रात्र अविस्मरणीय आणि सुंदर बनवणाऱ्या तिला लाखो धन्यवाद.''

वाचून डॉक्टरसाहेबांच्या डोळयात आपसूकच मिश्कील भाव उमटले. उत्साहात त्यांनी डायरीचे पुढचे पान उघडले. त्या

पानाच्यावर तारीख लिहीली होती. तारीख अंदाजे दहा दिवसांपूर्वीची होती. म्हणजे ही आत्ताचीच चालू डायरी होती तर.

डायरीच्या सुरवातीला तसे काही वेगळे आढळले नाही म्हणजे सकाळपासून रिसॉर्टमध्ये होणाऱ्या दिनचर्येचे वर्णन होते. नोकरांबाबत कुरकुर, तर गेस्टबाबत तक्रार होती. मग वैदेहीबाबत वाटणाऱ्या काळजी बाद्यल लिहीले होते. म्हणजे वैदेही अचानक एकटे राहू लागली होती, नीट जेवत नव्हती, कसलेतरी टेंशन घेऊन असते. तिने अमेरीकेला जाणे पुढे ढकलले आणि म्हणाली,''बाबा! तुमच्यापाशी रहायचे आहे. तुमची काळजी वाटते.'' पहिल्या काही पानांत अगदी सामान्य माहिती होती. म्हणजे नेहमीची दिनचर्या, रिसॉर्ट मधील सामान्य घटना वैगरे...

मग अचानक डॉक्टरसाहेबांचे लक्ष पूढच्या अक्षरांवर रोखले गेले. कारण त्या अदृश्य बाईचा उल्लेख येऊ लागला. सरपोतदारांनी तिच्या बाबत सांगायला सुरवात केली. त्या बाईच्या भेटीबाबत मजकूर सुरू झाला आणि सरपोतदार जणू समोर बसून सर्वकाही स्वतः सांगत आहेत असे आपसूकच वाटू लागले. लेखन पद्धत अशी काही जादुई होती की जणू प्रत्येक शब्द जीवंत होऊन कथा सांगू लागला.

.....'एकीकडे ती यायची वेळ झाली आणि ही माझी कामे उरकतच नव्हती, ती काल रागावली होती ना! ती जणू

नजरेनेच म्हणाली,''तूझे उशीरा येणे आता बस्स झाले! हे तुझे वर्तन मी गृहीतच धरले आहे. आधीच आपल्याकडे फक्त रात्रच असते आणि तू.....'', मग समजूत काढता काढता परत अर्धातास गेला. पण मलाही तिची अशी समजूत काढायला खूप खूप आवडते, त्यात एक आपलेपणा वाटतो.

मग त्या क्षणापुरते ती मानवी नाही हे मी विसरूनच जातो. तिला भेटायची आंतरीक ओढ लागते. मग तिचे वाट पाहणे, माझेही तिथे ठरलेल्या जागी पोचण्याचा आटापिटा करणे, मग तिचे रागवणे आणि मी तिची समजूत काढणे.....सगळेच खूप खूप गोड वाटते. पण तरीही बस्स आज काहीही होऊ दे, आज अकरा वाजताची आमची भेटायची वेळ मी चुकणार नाही असे मी मनोमन ठरवले.

ती कोणत्या मनमोहक रूपात भेटणार कोणास ठाऊक. मी पण सज्ज झालो त्या अद्वितीय अशा मानसीक खेळासाठी आणि आजची रात्र पूर्ण वसूल करण्यासाठी

मी पळतच गेलो, थोडाच उशीर झाला होता. मी पोहोचलो तर ती रागावलेल्या चेह-याने मला बघत होती. रागातही ती किती सुंदर दिसत होती.

''अग असं नको करूस, माझे तूझ्यासारखे नाहीए, मी सामान्य माणूस आहे. मला इतर व्यवहार असतात. तू काय गं, तू मानवी नाहीस, सामान्य मानवाची व्यथा तूला कशी कळणार? तू काय

कुठेही कधीही जाऊ शकतेस.'',मी तिला जरा रागवूनच बोललो. तसेही, ती कितीही रागावली तरी ती मला सोडून कुठे जाणार? आणि मी ही कुठे जाणार?.. थोडयाच वेळात सगळे ठीक झाले. तिने नजरेनेच विचारले, आज तूझी काय इच्छा आहे? म्हणजे काही खास फरमाईश?.....

माझे उत्तर मी पूर्ण विचारांती ठरवलेलेच होते, आज मी कल्पनेचे घोडे मूक्त उधळायचे ठरवले. आजची भेट पूर्ण वसूल करायची होती. मग माझी इच्छा व्यक्त करताना मनात दडलेली सलही आपसूकच मुक्त झाली.

'अगं आज ना मी वेगळयाच मूड मध्ये आहे. म्हणजे, मी आयुष्यात कधी तशी कामापासून सुटीच घेतली नाही. कायमच हा रिसॉर्ट आणि काम बस्स! कर्तव्याच्या बोजाखाली माझा जीव घुसमटायला लागलाय. मी वैतागलो आहे. मी थकलोय. पण आज वस्तुस्थिती पेक्षा खूप वेगळे असे निवांत क्षण मला हवे आहेत. हो हो जसे मी सुट्टीवर असावे ना तसे. 'मला ना निळयाशार समुद्राच्या किना-यावर तुझ्याबरोबर निवांत बसायचंय. फक्त तू आणि मी बस्स! आणि हो, समुद्र किनारा अगदी निर्यमनुष्य असावा म्हणजे कोणाचा उगाच त्रास नको. मग किना-यावरच्या पांढ-या शुभ्र वाळूवर तुझ्याबरोबर गप्पा मारत बसायचंय. तुझा हात हातात घ्यायचाय. तूझ्या डोळयात खोल बघायचंय. तुझे मनमोकळे हसणे मनात साठवून ठेवायचंय. असे हे गोजिरवाणे प्रांजळ क्षण वेचायचे आहेत.

मग सूर्योदयाचा केशरी रंग जसा तूझ्या सुंदर चेहऱ्यावर पडेल ना तेव्हा तूझे अप्रतिम रूप वेडयासारखे न्याहळत बसायचंय. मग तूझे रूप बघून जेव्हा मन भरेल ना तेव्हा तो सूर्योदय बघताना आकाशात आणि पाण्यात उमटलेल्या रंगांच्या विविध छटा तंद्री लावून न्याहळायच्या आहेत. नंतर निळेशार आणि स्फटिकासारखे पाणी बघत आणि गार वारा अंगावर घेत बराच वेळ ध्यान लावून घ्यायचय. मोकळी हवा श्वासातून अंगात भिनवून घ्यायची आहे. काही काळ डोळे बंद करून आनंद लहरींत तरंगत रहायचंय.

नंतर दिवस थोडा पुढे सरला ना की, त्या निळयाशार पाण्यात मनसोक्त पोहायच बरंका!. मग मग....मला त्या जवळच्या शिंपल्यांच्या बेटावर पोहत जायचय आणि तिथे जाऊन शिंपले वेचून काठावर घेऊन यायचेत. शिंपल्यातील मोती बाहेर काढायचे आहेत. ते मोती ओंजळीत घेऊन खूप न्याहाळायचे आहेत आणि मग त्यांचे सौंदर्य पाहून आनंदाने बेभान व्हायचे आहे. असे चकचकीत आणि पांढरे शुभ्र टपोरे ओंजळभर मोती.....वा! सगळं अगदी कसं वेड लावणारं, काय सुंदर दृश्य असेल नाही? मग ते मोती तुझ्या ओंजळीत द्यायचे आहेत आणि तुझ्या चेहऱ्यावर आपसूकच उमटलेला आनंद या नजरेत कैद करायचा आहे. बस्स तुला हसताना बघतच रहायचं आहे अगदी वेडयासारखं..... हा असा माझा स्वर्ग

असावा. फक्त माझा. तो समुद्र किनारा, मी आणि तू बस्स! काय तू मला तिथे घेऊन जाशील?

माझी इच्छा ऐकून ती गालातल्या गालात हसली. मग तीही व्रतस्थ होती माझ्या कल्पना झेलायला. म्हणजेच मी कल्पना करायची आणि तिने नेहमीप्रमाणे पूर्तता करायची.

''सर्व इच्छा मनसोक्त पूर्ण होतील.'',ती मूक भाषेत बोलली. तिच्या नेहमीच्या ऐटदार चालीने चालत ती माझ्या जवळ आली. ती माझी इच्छा पूर्ण करायला सज्ज झाली. मी तिच्या डोळयात खोलवर पाहिले. मग तिच्या डोळयात तीच लाल छटा उमटली. तिने माझ्या डोक्यावर हात ठेवला आणि मी नेहमीप्रणामाणे डोळे बंद केले.

नेहमीची ती जादुई प्रक्रिया सुरू झाली .....

हं हं हं.....श्वास मंद होऊ लागला, मन एकाग्र होऊ लागले.....डोळयासमोर पांढरा प्रकाश दिसू लागला. मस्तिष्कात चलनवलन भासू लागले, अनोख्या आनंद लहरींने मन भरू लागले. क्षणभरातच मी एका मानसीक जगात बंदिस्त होत गेलो. आजूबाजूचे वातावरण बदलू लागले आणि मग शरीर मागे सोडत मनाने जणू काल्पनिक दुनिया तयार केली. जिथे परत मला माझे चिरतारूण्य लाभले.....

नीळेशार आकाश, स्फटिकासारखे पाणी, मऊशार पांढरी वाळू, टपोरे मोती, तिचे अप्रतिम सौंदर्य आणि आनंदाने ओतप्रोत भरलेले माझे वेडे मन...

तो प्रत्येक क्षण मी मनसोक्त जगलो. क्षण अन् क्षण मी मनावर कोरून ठेवला, डोळयात साठवून ठेवला, नसानसात भरून घेतला. ते वेडे आणि प्रेमाने ओतप्रोत भरलेले बेभान क्षण मी आत्मतृप्ती होईपर्यंत बेभानपणे जगलो.

तिने माझ्या इच्छेप्रमाणे मला अनुभव दिला. वास्तव आणि स्वप्न यांच्यातील सिमारेषाा केव्हाच पुसली गेली. कल्पना जिवंत झाल्या आणि मी कल्पनांत रंगून गेलो. जोपर्यंत मन पूर्णपणे भरत नाही ना तोपर्यंत ते क्षण मनसोक्त जगलो. पुन्हा पुन्हा जगलो.

त्या काही तासांत मी अजून एका इच्छेतून मूक्त झालो. अगदी दररोजप्रमाणेच...

ती ना मला माझ्या वेडया आणि बेभान इच्छा पूर्ण करायला मदत करते. कारण मला शेवटच्या श्वासापर्यंत नुसते जिवंत राहाण्यापेक्षा, जगण्याच्या सगळया मर्यादा पार करत प्रत्येक क्षण हजारोपटीने जास्त आणि सखोल जगायचाय, अनुभवायचाय. जोपर्यंत माझे मन जगण्याला थकत नाही आणि सगळया इच्छा पूर्ण होत नाहीत तोपर्यंत मला बेभानपणे आणि मनसोक्त जगण्याचा आस्वाद घ्यायचाय.

हे असे मनसोक्त जगणे हे जणू मलाच दैवाने दिलेले वरदान म्हणायचे. पण हे असे का असावे? म्हणजे मलाच तिने असे भेटणे आणि मग हे असे अलौकिक अनुभव मलाच का? ती मलाच का दिसते? ती कोण असावी?

मी सगळया प्रष्णांकडे सपशेल दुर्लक्ष करायचे ठरवले. अमृत पिणे सोडूल उगाच शंकाकुशंकात कशाला वेळ घालवायचा? शेवटी बस्स एकच विनंती उरते, उद्या अशीच परत भेट. भेटशील ना? प्लीज प्लीज प्लीज.....

तिचेही ते मूक उत्तरही तयारच होते. हो हो हो...

तिचे लाखो लाखो धन्यवाद करत मी निरोप घेतला.

''हां'', डॉक्टरसाहेबांनी दिर्घ श्वास घेतला. एका दिवसाचे लेखन वाचून झाल्यावर डॉक्टरसाहेबांनी डायरी टेबलवर ठेवली आणि ते खुर्चीत टेकून बसले. शब्दांचा खेळ करणे सरपोतदारांना चांगलेच जमले आहे म्हणायचे. त्यांचे भाषेवरचे प्रभुत्व आणि विषय रंगवून सांगण्याची लकब वाखाणण्यासारखी होती. डॉक्टरसाहेबांच्या डोक्यात विचारचक्रे जोरात फिरू लागली. ''हं, काय ती फक्त त्यांना भेटते? म्हणजे ती फक्त त्यांनाच दिसते? ती मानवी नाही? ती त्यांना दररोज भेटते आणि त्यांच्या इच्छा पूर्ण करते? इंटरेस्टींग'',ते स्वतःशीच बोलले.

त्यांच्या डोळयात हजारो प्रष्णचिन्हांबरोबर एक वेगळीच चमक होती. एक चांगली केस सोडवायला मिळणार तर! ही अशी मानसिक गुंतागुंत सोडवण्याची दुर्लभ संधी कोणाला मिळते? नाहीतर परीक्षेची भीती, इंटरव्हूय देण्याचा आत्मविश्वास नसणे, अंधाराची भीती, एकटेपणा, जवळच्या माणसांचे निधन किंवा प्रेमभंगाच्या व्यथेतून उद्भवलेल्या मानसिक समस्या, शहरात या प्रकारची प्रकरणेच जास्त असतात. वैदेहीचे हे असे अचानक भेटणे आणि या केसचे असे आपणहून त्यांच्याकडे येणे!.....ही संधी दवडणे शक्यच नाही.

डॉक्टरसाहेब खुर्चीतून उठले आणि बाल्कनीतून बाहेरचे दृश्य बघू लागले. म्हणजे डोळे जरी समोरचे दृश्य बघत असले तरी मनात मात्र विचारांचे काव्हूर माजले होते.

एक वेळ समुद्राचा तळ सापडेल पण मानवी मनाचा तळ सापडणे अशक्यच. मग काहीजण स्वतःच्याच तयार केलेल्या भावनांच्या भोवऱ्यात आडकतात आणि मग त्यांना बाहेर येताच येत नाही. मग काल्पनिक जग आणि सत्यातले जग यामधील सिमारेषा पुसली जाते.

डॉक्टरसाहेब अस्वस्थपणे हाताच्या हालचाली करत येरझाऱ्या घालू लागले. एका दिवसाच्या वाचनानेच त्यांना अस्वस्थ करून टाकले होते. तेव्हढयात त्यांचे लक्ष दारातून येणाऱ्या सूधाकरकाकांकडे गेले.

सुधाकरकाका हळूहळू चालत डॉक्टर साहेबांच्या समोर येऊन उभे राहिले. ''काहीतरी खाऊन घ्या. काम तर काय चालूच असते. वैदेहीताई पण तशाच सोफावर झोपून गेल्यात.'',सुधाकर काका काळजीने बोलले.

''नाही जेवण नको, कॉफी आणा, जरा कडकच करा!'',डॉक्टरसाहेबांनी काकांना सांगितले. सुधाकर काका काही बोलणार त्याआधीच ते परत खुर्चीत स्थानापन्न झाले आणि लगेचच डायरीचे पुढचे पान उघडू लागले. नाईलाज होऊन सुधाकरकाका हळूहळू चालत वळून निघून गेले.

डॉक्टरसाहेबांच्या चेहऱ्यावर मात्र वेगळीच अस्वस्थता पसरली होती. आता ही डायरी पूर्ण वाचल्याशिवाय समाधान लाभणार नव्हते. जणू आता ती डायरीच त्यांना सोडत नव्हती. त्यांच्या हाताने डायरीचे पुढचे पान जणू आपसूकच उघडले गेले.

दुसऱ्या दिवशीच्या लिखाणात, सुरवातीला नेहमीच्या दिनचर्येबाबतचे वर्णन होते मग जसे पुढे जावे तसे डॉक्टरसाहेब वाचण्यात पार रंगून गेले. जणू प्रत्येक क्षण ते स्वतः अनभवू लागले.....

''औषधे संपली होती, सुयश फार्मसीत औषधांची ऑर्डर दिली. दुपारी किराणामालवाला पावती घेऊन पैसे मागायला आला होता. परत हिशोबात गडबड होतीच. गडबड कसली म्हणा, सपशेल लबाडी! मी जेव्हा डायरीतील माझा हिशोब त्याला

दाखवला तेव्हा मात्र तोंडात मारल्यासारखा बिल दुरूस्त करायला परत घेऊन गेला.....

वैदेही मात्र आज दिवसभर वाचन करत होती. 'जेफ्री आर्चरचे' पुस्तक वाचताना पार रंगून गेली होती. मी तिचे जेवणाचे ताट तिच्या खोलीत घेऊन गेलो तर तिचे माझ्याकडे कुठे लक्ष? तिने क्षणभर मान वर करून पाहिले आणि फक्त दोन वाक्य बोलली,''ताट टेबलावर ठेवा. पंधरा मिनिटाने जेवणार आहे.''.

''ठीक आहे मॅडम आपली मर्जी.'' अखेर ताट टेबलावर झाकून ठेवून परत आलो. तिचे असे नुसते इथे असणेच खूप सुखावणारे आहे.

दहा वाजता आवरायला सुरवात केली कारण रात्रीचे अकरा म्हणजे तिची भेटायची वेळ. मनसोक्त जगायची वेळ. मग बरोबर अकरा वाजता हजर झालो आणि तिचेही बरोबर वेळेत आगमन झाले.....

आज ती शांत होती. मी वेळेवर आलो होतो ना! तिच्या काळयाभोर डोळयातून भावूकता, प्रेम, आपुलकीचा अमाप वर्षाव होऊ लागला. भरजरी साडीत ती किती सुंदर दिसत होती. तिचे लांबसटक केस आणि बोलके काळेभोर टपोरे डोळे. किती किती मोहक. हं.....

मग तिने आजपण तिच्या मूक भाषेत प्रष्ण केला,''आज काय इच्छा साहेबांची?.

मी तिचा हात हातात घेतला आणि तिच्या समोर बसलो. आज उगाच मन भरून आले होते. मी तिच्या डोळयात खोल बघत भावूकतेने बोलू लागलो,''तू आज फक्त माझे बोलणे ऐकायचे..... मनात साठलेली सल मला तुझ्यासमोर मुक्त करायची आहे. अगदी लहानपणापासून ते आत्तापर्यंतच्या या क्षणापर्यंत मला सगळे सगळे परत आठवायचंय. स्मृतीत जपलेले सर्व क्षण जणू परत परत जगायचेत..... आईची आठवण, बाबांचे मला रागावणे, मला मिळालेले पहिले बक्षीस, माझी पहिली कविता, रिसॉर्टचे उद्घाटन, वैदेहीचे आयुष्यात येणे, तिच्या लहानपणाचे सगळे किस्से सांगायचेत, तिचे खूप खूप कौतुक करायचंय. काय तू ऐकशील माझे बोलणे?.....

मग तिच्या डोळयात एक प्रष्ण डोकावून गेला, 'असे का? म्हणजे जे आधीच जगून झालेत तेच क्षण का परत आठवायचे? काही नवीन कल्पना कर, काही असामान्य अशा वेडया काल्पनिक जगात रममाण हो. असे भूतकाळात दुखऱ्या आठवणींत का गुंतायचंय?' माझे उत्तरही अगदी तयारच होते.

कारण मला असे वाटते की, मी माझ्या आयुष्यातच अडकून पडलोय. आयुष्यात झालेल्या घटनांनीच मला माझे राग, लोभ, आनंद, आवडनिवड आणि व्यक्तिमत्व दिले. पण मी नकळतच या आठवणीत कसा अडकून पडलो हे मलाच कळले नाही. आता मला सगळयातूनच मुक्ती हवीए कारण मला मागे वळून बघताना त्रास होतो. काळाच्या ओघात हरवलेले ते क्षण आता कायमचे

जगून झालेत. पण हे मन मान्यच करत नाही आणि पुन्हा पुन्हा मागे वळून बघितले जाते. मग 'हे मी त्यावेळी चुकीचे केले', किंवा 'हे मला टाळता येऊ शकले असते' असे उगाच वाटत राहते. माझे गुन्हे आणि चूका मला सलत राहतात. मग मन भूतकाळातच भरकटत राहते. पण आता मात्र भूतकाळात दडलेल्या त्या प्रत्येक घटना शेवटच्या आठवून मला त्या स्मृतींना कायमचा पूर्णविराम द्यायचाय, मला सगळया आठवणी अगदी समूळ संपवायच्यात. मला जणू पुढच्या प्रवासाचे वेध लागलेत.

ती लगेच तयार झाली आणि समोरच येऊन बसली. तिच्या डोळयात उमटलेले भाव सांगत होते की, अनेक वर्षे साठलेले मनावरचे ओझे मोकळे करून टाक. मुक्त हो! तुझे सर्व दुःख आज मी अलगद टिपून घेणार आहे.....

मग काय अगदी रात्रभर मी आठवर्णीमध्ये हरवून गेलो. जणू माझे सारे आयुष्यच समोर परत उभे राहिले. आज पहिल्यांदा मागे वळून बघताना असे वाटले की, काय खरंच आयुष्यात एव्हडे काही घडून गेलंय? केव्हडे आघात, संकटे मी एकटयाने कशी काय सहन केली? कसे जमले मला? मी माझे आयुष्य किती गंभीरपणे जगलो. आणि सगळे परत आठवून माझे डोळे पाणावले आणि कशा काय पण सर्व भावना तिच्यापर्यंत आपसूकच पोहोचल्या आणि तिच्याही डोळयात पाणी तरळले.

सगळे सगळे परत आठवून मी कधी रडत होतो तर कधी हसत होतो. मुख्यतः जेव्हा वैदेही आयुष्यात आली तेव्हाचा तो क्षण मी

परत परत आठवला आणि जणू त्या छोटया वैदेहीचे रूप डोळयासमोर तरळले.

जेव्हा मी त्या बाळरूप वैदेहीला पहिल्यांदा हातात घेतली ना, तेव्हा तर एका क्षणासाठी मी निःशब्द होऊन तिला नुसते न्याहळतच बसलो. काय वेडा क्षण होता तो! बस्स मला ती कायमची हवी होती. ती माझी झाली होती. यापुढे तो छोटा जीव माझी मुख्य जबाबदारी बनला होता, ती माझी फक्त माझी मुलगी होती. माझी मुलगी वैदेही....माझी वैदेही.....किती हुशार, गुणी आणि समजूतदार आहे माझी पोर.

काही घटना तर मी परत परत सांगत होतो. त्या आठवर्णीना परत परत आठवत होतो अगदी मन भरेपर्यंत.....

ती पण माझ्या बरोबरीने भावूक होत होती. तिच्या डोळयात किती तन्हेचे भाव उमटत होते जणू माझे आयुष्यच तिच्या डोळयात साठले होते. ती माझे सर्व बोलणे मन लावून ऐकत होती.

ती ऐकत होती आणि मी मुक्त होत होतो. हे सर्व कसे होत होते कोणास ठाऊक? ही एक अद्वितीय प्रक्रिया होती.

तिला माझे बोलणे सहज समजते. कधी कधी मला प्रष्ण पडतो ती अशी अद्वितीय कशी काय आहे? ती कोण आहे? ती अतिमानवी आहे हे तर उघडच आहे पण ती कुठून येते आणि

पहाटे चार वाजता कुठे जाते? पण मग मी मलाच दटावले, कारण ती कोण आहे या प्रष्णापेक्षाही महत्वाचे आहे तिचे इथे माझ्या बरोबर असणे. हो हो तिचे जणू व्यसनच लागले आहे. नाही नाही तिच्या शिवाय आता मी जगूच शकत नाही. तिचे ते अद्वितीय रूप, तिचा तो समजूतदारपणा, तिचे ते मला चपखलपणे ओळखणे.....तिचे ते फक्त माझेच असणे.

अखेर पहाटेचे चार वाजले. सत्तर वर्षांतल्या सर्व घटना सखोल कथन करायला बराच वेळ लागणारच की. मी मात्र भारमुक्त झालो. भूतकाळात घडलेल्या बोचऱ्या घटनांतून कायमचे मूक्त झालो.

मी अखेर निरोप घेतला आणि ती बघता बघता अंधारात विरून गेली. मी तिला अगदी दिसेनाशी होईपर्यंत बघत राहिलो.

''हं.....'',डॉक्टरसाहेबांनी दीर्घ श्वास घेत हातातील डायरी परत टेबलवर ठेवली आणि क्षणभरासाठी शांत बसून राहिले. दूसऱ्या दिवशीच्या वर्णनाचे वाचन करून डोके पार चक्रावून गेले होते. त्यातील काही मजकूर त्यांना चांगलाच हबकवून गेला होता.

''ती पहाटे चार वाजता निघून जाते? तिने मूक भाषेत प्रष्ण केला? ती अंधारात विरून गेली? ती अतिमानवी आहे?..... हे सगळे काय असावे?'',ते तंद्रीतच

बोलले. आता मात्र त्यांच्या मनात निर्माण झालेला गोंधळ चेहऱ्यावर स्पष्ट दिसू लागला.

डॉक्टरसाहेबांना बऱ्याच गोष्टी सरपोतदारां बाबतीत खटकल्या होत्या. कारण सरपोतदारांच्या या रूपामागे नक्कीच त्यांच्या मानसीक आजाराचे रहस्य दडले होते. प्रकरण साधे नव्हते. सगळं हळूवार हाताळावे लागणार होते. यात वैदेहीच्या भावना गुंतल्या होत्या. काहीही असो तरीही मनात काही शंका उपस्थित होतच होत्या.

मग अचानक त्या बाईच्या असण्याबाबत सत्यता पडताळण्याची गरज भासू लागली? काय ती खरंच असावी? काय कोणी खरंच अदृश्य.....डॉक्टरसाहेबांनी अविश्वासाने मान झटकली. नाही नाही हे शक्यच नाही, सायन्स हे या अदृश्य अस्तित्वाला मानत नाही. हे असे अदृश्य बाईवर विश्वास ठेवणे अशक्यच. हे तिचे असणे कसे सिद्ध होणार? मग एक वेगळीच शंका उभारून आली.

मग जर 'ती' असल्याचे सिद्ध करता आले तर? ती हवेलीत खरंच भेटली तर? सायन्सच्याही संकल्पना बदलत राहतात, नवीन शोध लागत राहतात आणि काय मानसशास्त्रही नव्या कल्पना अंगीकारायला तयार होईल? काय अदृश्य शक्ति माणसाच्या मानसिकतेवर परिणाम करू शकतात हे सिद्ध करता येऊ शकेल? आणि मग एक शंका उपस्थित झाली. तिचे असणे

ही जर सरपोतदारांची फक्त कल्पना असेल तर ती मन्याला कशी दिसली? वैदेहीलाही तिचे असणे कसे जाणवले?.

तेव्हढयात त्यांच्याच विचारांच्या चक्रव्युहातून बाहेर येत त्यांन मान झटकली. ''हं. हं हे मी काय विचार करतोय? मन काहितरीच भलता विचार करू लागलंय. छे! डोके पार चक्राऊन गेलंय. असं काही अतिमानवी वैगरे काही नसते. या सर्व घटनांचे शास्त्रीय स्पष्टीकरण जरूर मिळेल. काहिही असो या प्रकरणाच्या मुळाशी जावेच लागणार.'',ते स्वतःशीच बोलले.

तेव्हढयात चालण्याच्या आवाजाने डॉक्टर साहेब भानावर आले. मग मान वळवून त्यांनी आवाजाच्या दिशेने पाहिले. सुधाकरकाका कॉफीचा मग घेऊन दरवाज्यातून बाल्कनीत आले. समोरच्या टेबलावर त्यांनी कॉफी ठेवली. ''जेवायचे असेल तर सांगा. मी जेवण गरम करून देतो. नुसत्या कॉफीने काय भूक भागणार?'',सुधाकर काका निघून जाताना बोलले. यावर डॉक्टरसाहेबांनी फक्त 'हूं' असे उत्तर दिले.

जरा क्षणभर विश्रांतीची त्यांना नितांत जरूरी होती. डॉक्टरसाहेबांनी कॉफीचा मग तोंडाला लावत एक घोट घेतला. गरम कॉफीमुळे अंगात उर्जा आल्यासारखे वाटले. मग शांतपणे विचार करत ते बसून राहिले. नुसते डायरीत काही लिहीले म्हणून ते सत्य असेलच असे नाही. तिथे जाऊन पडताळणी ही करावीच लागणार. मानवी मन कसे आपलेच शत्रू होते ते डॉक्टर साहेबांना चांगलेच माहित होते. अनेक वर्षांचा प्रदिर्घ

अनुभव आणि त्यांचे शिक्षण त्यांना कोणा अदृश्य शक्तिवर विश्वास ठेवण्यास स्पष्ट मनाई करत होते.

गालातल्या गालात हसत त्यांनी डायरी परत हातात घेतली. डायरीचे पान उलटत त्यांनी पुढच्या दिवसाचे वाचन सुरू केले.....

''आज दिवसभर रिसॉर्टमध्ये फारसे काहीच झाले नाही, फक्त नेहमीचीच दिनचर्या! कधी कधी सगळे सुरळीत चालले तरी चूकचूकल्यासारखे वाटते नाही? वैदेहीपण दिवसभर पूस्तक वाचत होती. आज रिसॉर्टचे कामही कसे काय सुरळीत चालले होते कोणास ठाऊक? या मागील विनोद बाजूला ठेवला तर सगळेच निवांत असल्यामुळे दिवसभर नुसता आराम झाला. आज तिच्याशी बोलायला मी अगदी तयार होतो, खूप फ्रेश होतो. कधी एकदा रात्र होते याची वाट पहात बसलो.

मी लवकरच आवरले आणि ठरलेल्या ठिकाणी अर्धातास आधीच येऊन बसलो. मग थोडयावेळ मनगटावरील घडयाळयात सारखे बघत बसण्याशिवाय पर्यायच नव्हता. नुसते घडयाळयाचे टिक.....टिक.....टिक....., माझे अधीर मन आणि तिच्या भेटीची आस!,

पार वेड लागले. पण अकरा वाजल्याशिवाय तिलाही येता येणे अशक्यच आणि फक्त एक एक सेकंद पूढे सरकणाऱ्या

घडयाळयालाही त्याच्या मर्यादा होत्याच की. अकरा लवकर वाजतच नव्हते.

मग बऱ्याच प्रतिक्षेनंतर जणू काउंटडाउन सुरू झाले.....१०:५७.....१०:५८.....१०:५९ आणि ११:००.....एक निशब्द शांतता.....

मी कानात जीव आणून कानोसा घेऊ लागलो, डोळे विस्फारून अंधाराला न्याहळू लागलो. हो ती येईलच आता, ती येणारच, मग ती येत का नाहीए? अकरा वाजून गेलेत, आज तिने का उशीर करावा? अग ये ना! आत्तापर्यंत असे झालेच नाही की तिने उशीरा यावे. मग आज का?.....

तेव्हढयात मग लांबून पावलांचे आवाज येऊ लागले, तिच्या पायातील पैंजणांचा छुम छुम छुम आवाज सगळया हवेलीत घुमू लागला. अधीर झालेला मी भीरभीर पहात तिला शोधू लागलो. मग हळूहळू तिच्या अस्तित्वाचे पडसाद उमटू लागले. तिच्या येण्याची चाहूल लागताच मन एका अनामीक आनंदाने भरून गेले कारण, ती येत होती मला हजारो पटीने जास्त जिवंत करायला आणि मला क्षण क्षण सखोल जगायला मदत करायला!..... ती येत होती मला मूक्त करायला!

मग जणू अंधारालाही दार होते. अंधाराच्या दारातून बाहेर येत ती माझ्या समोर उमटत गेली. हळू हळू, अस्पष्ट ती, स्पष्ट होत गेली. बघता बघता ती प्रगट होत समोर येऊन उभी राहिली.

तिने हे असे कसे केले कोणास ठाऊक? अदृश्य ती माझ्या साठी सदृश्य होत गेली.

पण आज जणू तिच्या मनात काही वेगळेच होते. आज मला फक्त मनोरंजन हवे आहे हे तिला जणू केव्हाच कळले होते. मनकवडीच ती! मग ती पण सज्जच होती. तिच्यापासून जणू काहिच लपू शकत नव्हते. माझी सूप्त इच्छा तिने केव्हाच जाणली होती. अगदी मला न विचारताच.

मग काय? हं, म्हणजे, आज काही तिचा वेगळाच आनंदी मूड झाला. तिच्या डोळयात मिश्कील भाव साठले. ती तंद्रीतच हसत उगाच गिरक्या घेऊ लागली. ''अगं आज काय झालंय तुला?'', मी थट्टेने विचारले. पण पायातल्या घुंगरांनीच जणू गुपित उलगडले की आज तिचा थाट एका नर्तकीचा होता.

''अरे वा! नृत्य ही येते तुला?'',पण उत्तरही क्षणात मिळाले. बघत बघता तिने पायाने ठेका धरला आणि जणू सगळया आसमंताने साद दिली, छुम, छुम, छुम.....

घुंगरांच्या मंजूळ आवाजाने जणू जादूच झाली आणि सगळी हवेलीच कात टाकत जिवंत होऊ लागली. मी भिर भिर आजूबाजूला बघू लागलो. हे काय आणि कसं होतय? याचे आकलन करून घेऊ लागलो. पण छे! हे काहीतरी वेगळेच होते. मानवी बुद्धीला समजण्याच्या पलिकडचे होते. मग जणू एक अनामिक मानसिक प्रक्रिया झाली आणि .वाऱ्याचा आवाज,

पावसाचा आवाजही मधुर संगीत भासू लागले. तिच्या नर्तनाला साजेसे सूर कानात उमटू लागले. मग जणू अंतरंगात उठणाऱ्या संगीत तरंगांना बाहय स्वरूप साध्य झाले आणि हवेलीच्या भिंती-भिंतीतून सूर-संगीत परावर्तित होऊ लागले, थिरकवणारा तबल्याचा ठेका, मन हेलावणारे सारंगीचे सूर, कुठून आले कुणास ठाऊक.....जणू साऱ्या आसमंतानेच आपसूकच मेहफिल सजवली. आज सगळया विश्वानेच आनंदविभोर होण्याचे ठरवले होते. सर्व सृष्टीनेच जणू संगीताच्या आनंदसागरात चिंब व्हायचा मनसूबा केला होता. अगदी बेभानपणे, वेड लागल्यासारखे....

मग तिच्या तालबद्ध आणि ग्रेसफुल हलचाली, तिच्या भावमुद्रा, तिचे गिरक्या घेताना हलणारे केस, तिचे तालावर थिरकणे.....तिचे सुंदर दिसणे.....तिचे असे बेभान नाचणे..... विलक्षण, किती सुंदर! किती अद्भुत!

'अग काय तू मला वेड लावणार आहेस का?' पण माझ्या बोलण्याकडे कुठे तिचे लक्ष? ती बेभान नाचतच राहिली..... छुम, छुम, छुम..... मन, शरीर, बुद्धि, सगळे आयुष्यच जणू तिच्या ताब्यात गेले. सगळया भावना मुक्तपणे उचंबळून आल्या. मनात प्रेमाच्या जणू लाटा उठू लागल्या. आनंदविभोर झालेले मन भावूक झाले आणि डोळयात आनंदाश्रू दाटले, मग सौंदर्य, संगीत यांनी ओथंबलेला हा आनंद सोहळा कधीच संपू नये असे वाटू लागले.

मग अगदी पहाटे पर्यंत ही महफिल सुरूच राहिली. निशब्द मी पहाटेपर्यंत समाधी लावून नुसते पहातच राहिलो. मला मनोरंजन हवे होते. पण आज तर तृप्ततेची सर्व परिसीमाच पार झाली होती. तिने माझी इच्छा पूर्ण केली होती.

मग परत पहाटेचे चार वाजणारच होते आणि हे सगळे परत जैसे थे, होणारच होते. आपसूकच माझी समाधी तुटावी असे झाले. काय खरंच मेहफिल संपली? ती धूसर होऊ लागली. संगीत परत आसमंतात विरून जाऊ लागले. हळहळणाऱ्या मनाला समजावतच मी निरोप घेतला. हो हो, ही भेट संपली म्हणून काय झाले? ती उद्या भेटणारच आहे ना!'.....

आश्चर्यचकीत झालेल्या डॉक्टरसाहेबांनी हातातील डायरी टेबलावर ठेवली. डायरीतील शाब्दिक खेळाने मनाला जणू संमोहन झाल्यासारखे वाटले. तो दिवस स्वतःच अनुभवल्या सारखे वाटले. समोरील कपातील कॉफीचा परत एक घोट घेतला. कॉफी गार झाली होती. पण डायरी वाचताना हरवून गेलेल्या डॉक्टरसाहेबांना याबाबत हरकत नव्हती. कॉफी बाबत कोणाला विचार करायला वेळ असणार? कपातील गार कॅाफी त्यांनी एका दमात पिऊन टाकली. डोक्यात विचारांचे काव्हूर माजले होते.

'ती उमटत गेली, ती अंधारात विरून गेली, म्हणजे नक्की काय असावे?'

'तिचे रात्री अकरा वाजता येणे आणि पहाटे चार वाजता जाणे, का असावे?'

कारण म्हणे हिच तर वेळ असते अदृश्य शक्तिच्या जागृत होण्याची. काय खरंच?

छे! काहीतरीच काय? यावर विश्वास ठेवणे म्हणजे हा निव्वळ मूर्खपणा. मग क्षणभरातच डॉक्टरसाहेबांच्या चेहऱ्यावर उत्स्फूर्त हसू उमटले. ही अशी वेळ कोणी ठरवली होती कोणास ठाऊक? काहीतरी भाकड कल्पनांनी समाज पार वेडा झालाय. पण तरीही संपूर्ण डायरी वाचून झाल्यावरच काही निष्कर्ष काढणे शक्य होणार होते. डॉक्टर साहेबांनी डायरीची पुढील पाने तपासून पाहिल्यावर त्यांच्या लक्षात आले की, आता फक्त काही पानांवरच लेखन केले होते. एकाच दिवसाचे वाचन शिल्लक होते. कदाचित त्यानंतर डायरी वैदेहीच्या हातात पडली असावी त्यामुळे त्यात पुढचे काहीच लिखाण झालेले नसावे.

आतामात्र डायरी संपूर्ण वाचल्याशिवाय समाधान मिळणार नव्हते. एखादे चांगले रहस्यमय आणि उत्कंठा वाढवणारे पुस्तक वाचताना जसे रंगून जायला होते ना, तसे डॉक्टरसाहेबांचे झाले होते. डॉक्टरसाहेब उठून उभे राहिले आणि त्यांनी पाय ताणून सरळ केले. मग स्वतःच्याच विचारात गुंग असल्यासारखे नुसतेच शुन्यात बघत उभे राहिले. सगळे

नीट वाचणे जरूरीचे होते. तसेच लवकरात लवकर पुढील निष्कर्ष काढणेही जरूरीचे होते.

''सुधाकरकाका कॉफी आणा?'',डॉक्टरसाहेबांनी ओरडूनच फरर्माइश केली. डॉक्टरसाहेब आता येरझाऱ्या घालू लागले. तेव्हढयात त्यांना वैदेहीने कॉलेजमध्ये असताना त्यांना सांगितलेली एक गोष्ट आठवली. हो हो तिच्या आईच्या बाबत तिने दिलेली माहिती विचित्रच होती. ती म्हणे अचानक गायब झाली होती. हो हो तिचे बाबा सर्वांना सांगत असत की ती चक्क त्या दोघांना सोडून निघून गेली होती. पण असे तिने का निघून जावे? नाही नाही काहितरी घोळ आहे.

डॉक्टरसाहेबांनी विचार करत अस्वस्थपणे येरझाऱ्या मारणे सुरूच ठेवले. डायरीच्या रंगवून सांगितलेल्या वर्णना मागे दडलेले काहीतरी लपवलेले रहस्य जरूर असावे असे डॉक्टरसाहेबांना आता भासू लागले.

''साहेब एव्हडे काम करत राहिलात तर तुम्ही थकून जाल. जेवण नाही का झोप नाही, असं कसं चालायचं.'',सुधाकरकाका कॉफीचा कप समोर ठेवत बोलले. पण डॉक्टरसाहेब त्यांच्या विचारचक्रात पार हरवून गेले होते. ते काहीच बोलत नाहीत हे बघून सुधाकरकाका निघून गेले.

परत कॉफी पिऊन झाल्यावर थोडयाच वेळात ते परत सज्ज झाले या डायरीतल्या शब्दखेळात रंगून जायला.

डॉक्टरसाहेबांनी पुढील वाचन सुरू केले. डॉक्टरसाहेब डायरीतील शब्दांमध्ये परत हरवून गेले.

..... 'दिवसभर फक्त वैदेहीचे बोलणे ऐकत होतो. ती सारखी खोदून खोदून चौकशी करत होती. तिचे असे काळजी करणे खूप छान वाटले. ''बाबा तूम्ही स्वतःची काळजी घेत नाही. तूम्ही आजारी दिसताय. तूमचे वजन कमी होत चालले आहे. तुमच्या डोळयाखाली काळी वर्तुळे आली आहेत. असे काय करता हो? अहो बाबा!, मला अमेरीकेला जाववतच नाही, सारखी तूमची काळजी वाटते? तूमचे जेवण तर लहान मुलाला लाजवेल एव्हडे थोडे आहे. शरीरात शक्तितरी कशी येणार? ते बरणीतले बदाम तसेच पडून आहेत. दूध तर तूम्ही पिताना मी कधी पहातच नाही, अहो फळे खात जा!, विटॅमीनच्या गोळया घेत जा! मी काय बोलतीए त्याच्या कडे तुमचे लक्ष आहे ना?''.....ती दिवसभर नुसती डोस देत मागे मागे फिरत होती.

तिला तरी मी काय सांगणार?, तिला थोडीच काही समजणार आहे, की माझे आयुष्य किती सुंदर झाले आहे, नुसते सामान्य जीवन जगण्यापेक्षाही अनेक पटीने रोमांचकारी झाले आहे. हे तिला कसे कळणार? तिला काय कोणालाच कळणार नाही. उगाच वाद-विवाद करत बसणे योग्य होणार नाही. गप्प राहिलेलेच बरे.

मग जसे डॉक्टरसाहेबांचे लक्ष पुढच्या ओळींवरील अक्षरांवर गेले तसे ते सावध झाले. हो तिच्या बरोबरच्या भेटीचे वर्णन सुरू झाले होते.

.....'ती समोरच्या खुर्चीत कधी आणि कशी येऊन बसली काही कळलेच नाही. क्षणापूर्वी ती नव्हती मग अचानक ती प्रकट झाली. असे वाटते ती सगळीकडेच असते. ती जादुई किमयागार आहे. ती माझ्याकडे नुसते टक लावून बघत होती. तिच्या काळयाभोर डोळयातून झळकणारा शहाणपणा, तिच्या चेहऱ्यावर उमटलेली शांतता, ते सुंदर स्मित हास्य सगळं कसं अद्वितीय आहे. ती खरंच दैवी आहे.

तिचे सौंदर्यही वेगवेगळया रूपात असते. ती कधी सात्वीक असते कोणा देवी सारखी तर कधी मादक असते रंभे सारखी. कधी नर्तकी असते तर कधी मैत्रीण असते. कधी मला बाहूपाशात घट ्ट धरते सांत्वन करायला तर कधी पाठीवर थाप मारते शाबासकी द्यायला. ती माझ्या गरजे प्रमाणे रूप घेते मला तृप्त करायला. पण कायम वेळ मात्र कमीच भासतो. म्हणजे फक्त रात्रच तर असते.

तसे मी आज काहीच ठरवून आलो नव्हतो म्हणजे आज तिच्याकडे काय मागावे काही कळतच नव्हते. मग मनात प्रष्ण आपसूकच उमटला. काय खरंच इच्छा संपत आल्यात? काय मन भरत आलंय? म्हणजे इच्छा संपल्या तर काय ती भेटणार

नाही? नाही नाही ती दररोज भेटलीच पाहिजे. ती आता अगदी शेवटच्या क्षणापर्यंत भेटलीच पाहिजे.

मग अचानक एक इच्छा उफाळून वर आली. तेव्हा मला त्यावेळी जे स्फुरले ते मी तिला विचारून टाकले. कारण जे इतर कोणालाच माहित नव्हते ते मला जाणून घ्यायचे होते.....

''मृत्यू म्हणजे काय असते गं? मृत्यूसमयी कसे वाटते? काय जिवाची घूसमट होते? फार त्रास होतो का गं? मृत्यूनंतर आपण कुठे जातो? काय मला मरणाच्या आधीच हे जाणून घेता येईल?''

मझा प्रष्ण ऐकून ती नुसती मिश्कील हसली. तिच्या हावभावावरून असे वाटले की तिला जणू मृत्यू सखोल माहित होता. ती जीवनमृत्यूच्या पलिकडे गेली होती. ती मूक्त होती आणि मी असहाय मर्त्य कायम मृत्यूला घाबरत आलोय. मृत्यूचा अनुभव कोणालाच नसल्याने कोण मार्गदर्शन करणार? पुस्तक आणि ग्रंथांमधून जे मृत्यूचे वर्णन वाचले तेच सत्य असेल का? पण खरंच काळाच्या पडद्याआड काय गुपित झाकून ठेवले असेल नाही? अनंतात विलीन होणे म्हणजे नक्की काय?

मी तिच्या कडे अनेक प्रष्ण डोळयात दाटवत पाहिले. माझ्या डोळयात भिती दाटली होती पण तिच्या डोळयात मात्र निश्चिंतता होती. ती सगळया प्रष्णांची उत्तरे द्यायला तयार होती. तिने

नजरेनेच सांगून टाकले की ती आज मला मृत्यूचे दर्शन घडवणार होती.

.....ती उठली आणि माझ्या दिशेने चालत येऊ लागली तिला असे येताना बघून माझ्या छातीत धडधड होऊ लागली. कारण आज ती साक्षात मृत्यू होती. माझ्या सर्वांगाचा थरकाप होऊ लागला. मरण म्हणजे अंधःकारात हरवून जाणे, यातना आणि तडफड असे बरेच काही ऐकले होते. खरंच मरण त्रासदायक असेल का? खरंच मरणानंतर जीवाचे काय होत असेल नाही? पण मग हे असे मरण अनुभवणे योग्य होईल का? हे असे करण्यात काही धोका संभवत तर नसेल ना?..... शंका-कुशकांनी पार वेड लागले.

तिने जवळ येताच हसून माझ्या डोळयात पाहिले आणि मला धीर आला. ती जणू न बोलताच सांगत होती,''मी आहे ना बरोबर! शांतपणे आणि धीराने या सगळयाला सामोरे जा, कारण मृत्यू कधी ना कधीतरी येणारच, तू तो टाळू शकत नाहीस''. मग काय? बस्स मी मन घट्ट केले. तयार झालो अज्ञातात भ्रमण करायला, अगम्याचा शोध घ्यायला आणि चक्क मरून जायला...

तिने जवळ येऊन डोक्यावर हात ठेवला, जेव्हा नेहमीप्रमाणे तिच्या डोळयात लालसर छटा आली, मी घाबरतच डोळे बंद केले..... अं.....अं.....मस्तिश्कात मंद वेदना जाणवू लागल्या. जसे मंद विजेचे शॉक लागावे ना तस्सेच!

मग त्या वेदनांच्या लहरीं हळूहळू सर्वांगात पसरू लागल्या. बघता बघता वेदना तीव्र होऊ लागल्या. ''आह आ आ'!''..... सर्वांगाचा थरकाप..... छातीत धडधड..... अस्वस्थतता ..... डोळयासमोर काळोख..... हं हं हळूहळू ती वेदना सर्वांगात व्यापून गेली. हे काय होतयं? हे कळायच्या आतच दुसरी प्रक्रिया सुरू झाली आणि एक लहर पायापासून वर सरकू लागली. लहर जशी वर सरकत गेली तशी खालील शरीराला बधिरता येऊ लागली. जणू अंगातील चेतना पायापासून वर संपत मस्तिश्कापर्यंत आली. एक कोंदटलेला श्वास आणि.....

निशब्द शांतता!.....

.....केशरी-शैंदरी प्रकाश, अनंत शून्यात हरवलेला मी जणू स्थूल तत्वातून क्षणात मूक्त झालो. अगणित सुखदुखःनी बोजड झालेल्या आयुष्याचे ओझे उतरल्यासारखे वाटले आणि अनंतात तरंगणारा मी भारमुक्त झालो. जणू मी आनंदस्वरूप अवस्थेशी एकरूप झालो. फक्त एक अस्तित्व असलेला मी जणू आसमंत झालो. आईच्या कुशीत बालकाला जसे निश्चिंत आणि सुरक्षित वाटते ना तस्सेच पण त्याहीपेक्षा अनंत पटीने आंतरिक संतोषजनक स्थिती मला जाणवली. फक्त चैतन्यस्वरूप असलेला मी प्रकृतीच्या विराट चैतन्याचा जणू एक छोटासा अंश बनलो. जसे अथांग सुखसागरातला मी एक थेंब बनलो. असे नुसते असण्याला काळाचे बंधन नव्हते. इथे समय

पूर्णपणे निष्प्रभ झाला होता. मोती जसा शिंपल्यात ठेवलेला असतो ना, अगदी तस्सेच माझे चैतन्य त्या केशरी प्रकाशात जपून, सांभाळून ठेवल्यासारखे होते. लांबचा आणि खडतर प्रवास करून आणि थकून परत आपल्या आईकडे घरी आल्यासारखे वाटले. ''मी आता थकलोय! परिस्थितीशी झगडून घायाळ झालोय. मला आराम करायचाय. खूप वेळ मला आराम करायचाय. या आनंदमय स्थितीतच रहायचंय'', न बोलताच मी सांगत होतो. ती अवस्था म्हणजे, सगळया शंका-कुशंका, भ्रष्ण, संभ्रम यांच्या पलिकडची कल्पनातीत अशी निश्चिंत अवस्था होती. ही अवस्थाच जणू अंतिम सत्य होती....

म्हणजे मरण हे जणू एक व्दार आहे जे पार केले ना की सगळे बंध मागे सोडले जातात आणि आपण आपल्या घरी परत येतो. बस्स माझे शब्दच अपुरे आहेत हे सगळे वर्णन करायला. आता मात्र इथून परत जाणे शक्यच नाही, हे सुख सोडून कोणी का परत जावे? मी नाही परत जाणार, कध्धीच नाही. बराचवेळ मी या कल्पनातीत अवस्थेत तरंगत राहिलो. त्या चैतन्य अवस्थेत देव स्वरूप बनून राहिलो....

पण काहीवेळात वातावरण बदलू लागले, कोणतीतरी ओढ प्रकर्षाने जाणवू लागली, कोणतीतरी शक्ति जणू खेचू लागली.....'परत जावेच लागणार! अजून तुला इथे रहाण्याची परवानगी नाही मिळालीए. चल परत!..... चल परत!..... चल परत!' हो हो परत बोलावणारा हा

आंतरिक आवाज स्पष्ट होत गेला. खोल गर्तेत कोणी खेचावे असे वाटले. तो दैवी केशरी प्रकाश लांब जात गेला. परत शरीर दिसू लागले. हो हो माझेच शरीर मी जणू बघत होतो. बघता बघता परत तेच जडत्व जाणवू लागले.

एक दीर्घ श्वास..... हां....आं.....हां....आं..... आणि मी कसेतरी जड झालेले डोळे उघडले. जड सशरीर अवस्था आणि हल्की चैतन्यमय अवस्था यातील फरक प्रकर्षाने जाणवू लागला. घुसमटल्याने ठसकल्यासारखे होऊ लागले, श्वास घेणे अवघड होत होते. अतिपरिश्रमाने उठून बसलो आणि बरोबर आणलेली पाण्याची बाटली मी थरथरत्या हाताने उघडून कसेतरी घोटभर पाणी प्यायले. चक्कर येत होती. अशक्तपणा जाणवत होता. प्रकृतीचे कायदे आणि काळाची बंधने मोडल्याचे दुष्परिणाम भोगावे लागणारच की. मग नंतर बराच वेळ जमिनीवर पडून होतो. पाणावलेल्या डोळयांनी आणि किलकील्या नजरेनी मी तिला शोधू लागलो. ती शेजारीच बसून होती. ती सतत माझी साथ द्यायला जणू व्रतस्थ होती. तिच्या डोळयातून होणाऱ्या प्रेमाच्या वर्षावाने जणू परत जगण्याची उमेद आली. पण मला हा अनंतातला प्रवास झेपला नव्हता. दृष्टी अंधुक झाली आणि मी थकलेले डोळे मिटले. झोप लागली का ग्लानी आली होती कोणास ठाऊक.

.....पक्षांचा किलबिलाट ऐकू आला आणि डोळे उघडले तेव्हा पहाट झाली होती. मी किलकील्या डोळयांनी

मनगटावरील घडयाळात पाहिले तर सहा वाजले होते. ती निघून गेली होती कारण पहाटे चारच्या पुढे तिला जावेच लागते. बिच्चारी काळाच्या बंधनात अडकली आहे ना!. तसाच कसातरी लडखडत उठलो आणि जड पावलांनी चालताना स्वतःला खेचतच घरी आणले.

शरीर कितीही थकले असले तरी मनात मात्र आनंद ओतप्रोत भरला होता. असंभव वाटणारे संभव झाले आणि जणू अज्ञाताचा शोध लागला होता. मरण खरंच वेदनामय नाही, मरण म्हणजे अंधःकार नाही, हे गुहय उलगडले गेले आणि मरणाची भीती पूर्णपणे संपुष्टात आली. आता मरण आले तरी बेहत्तर. वेडे मन उगाच भावूक झाले.

तेव्हढयात माझे पाय थबकले कारण विस्मृतीत हरवलेली रात्रीची एक घटना स्पष्टपणे आठवली आणि विजेचा शॉक बसावा असे वाटले. हो हो! अजून एक महत्वाची घटना घटली होती. आता अगदी सगळे स्पष्टपणे आठवले. त्यावेळी जेव्हा नुकताच परत शरीर अवस्थेत आलो होतो तेव्हा अस्वस्थ वाटत होते त्यामुळे कानाडोळा केला. पण आता मात्र दुर्लक्ष करणे अशक्यच. स्मृतीत सखोल रूतलेली ती घटना डोळयासमोर तरळू लागली...

पहाटे चार वाजता ती परत जात होती. तिने मला क्षणभरासाठी उठवले. अशक्त झालेला मी डोळे किलकीले करून तिच्याकडे बघू लागलो. पण यावेळी तिची नजर खूपच रूक्ष आणि कठोर

भासली. तिने बोचऱ्या नजरेनेच मला ठणकावून सांगितले. की तिने तो महत्वाचा निर्णय घेतला होता. १७ जुलै, ती परत परत ही तारीख सुचवत होती. १७ जुलै, १७ जुलै, १७ जुलै..... मनावर ही तारीख कोरली गेली कारण ती नजरेनेच म्हणाली, 'आता बस्स झाले! खूप झाले जगणे.'.....

''आं! खूप झाले जगणे? म्हणजे काय? काय खरंच माझे आयुष्य संपत आलंय? आणि कायमची अनंतात विलीन होण्याची वेळ काय खरंच जवळ आली आहे?'', मनात उठलेले शंकेचे वादळ तिला समजले. मग तिने तिच्या नेहमीच्या मूकभाषेतच मला स्पष्टच कळवले, हो हो हिच तर ती तारीख आहे, हे जग कायमचे सोडायची, १७ जुलै. या दिवशी रात्री १ वाजता मी तुला कायमची घेऊन जाणार. आता असे लपून भेटणे फार झाले.

''पण अगं १७ जुलै म्हणजे फक्त एका महिन्यांनंतर?''

मृत्यू सखोल कळल्यानंतरही मग या आयुष्याची आसक्ती का असावी? कदाचित मरणाची उगाच भीती बाळगण्याची सवयच लागली आहे. उगाच जगत रहायची दिनचर्याच झाली आहे. तोकडया क्षमतेच्या मानवी बुद्धीची जडणघडणच सदोष आहे. कारण अनेक गोष्टींमध्ये गुंतून पडलेल्या माणसाला जगतच रहावे वाटते. पण तिच्या डोळयात मात्र फक्त एक स्थिर, शांत

परखडता होती. जणू तिचा निर्णय पक्का होता. तिच्या निर्णयाच्या विरोधात जाण्याचा प्रष्णच येत नाही. हो हेा मी पण संमती दिली.

माझे दिवस आता फार कमी राहिले आहेत हे सत्य मला कळले आहे. १७ जुलै रात्री १ वाजता माझे मरण अटळ आहे. कारण ती मला येऊन घेऊन जाईल....

डॉक्टरसाहेबांनी डायरी टेबलावर बंद करून ठेवली. शेवटचे पान वाचून झाले होते. हूं.....त्यांनी सुस्कारा सोडला आणि डोळयावरचा चष्मा टेबलावर काढून ठेवला आणि क्षणभर डोळे बंद करून बसून राहिले. सर्व गोष्टींचे आकलन करायचा प्रयत्न करू लागले. हं वैदेहीचे बरोबरच होते. सामान्य माणसासाठी हे धक्कादायकच ठरले असते. पण मग डॉक्टर साहेबांच्या चेहऱ्यावर मात्र एक स्थिर शांतता पसरली. डायरी वाचून झाली होती. प्रकरण त्यांना समजले होते. जणू त्या डायरीतल्या मजकूराने विचार करायला भाग पाडले होते.

आता कुठे वैदेहीशी चर्चा करणे योग्य ठरेल. ते उठून उभे राहिले. मग केसांवरून हात फिरवत बाल्कनीच्या दारातून घरात आले. हळूहळू पायऱ्या उतरत लिव्हींगरूम मध्ये आले. समोरच्या सोफावर पहुडलेल्या वैदेहीला केव्हाच गाढ झोप लागली होती. बिचारी मानसिक आणि शारीरिक दृष्टया थकली होती. सुधाकरकाकांनी तिच्या अंगावर पांघरूण टाकले होते. लेदरच्या मऊशार प्रशस्त सोफावर ती निवांत झोपली होती.

तिच्या रेखीव चेहऱ्यावर उमटलेले निवांत भाव न्याहाळल्यावर डॉक्टर साहेब बराचवेळ नुसतेच उभे राहिले. मग भानावर येत गालातल्या गालात हसत त्यांनी भिंतीवरील घडयाळयाकडे पाहिले. रात्रीचा एक वाजला होता. तिला उठवणे अयोग्य होते. डॉक्टरसाहेबांनी मुख्य दिवा बंद केला आणि मंद छोटा दिवा चालू केला.

डॉक्टरसाहेब हळूहळू चालीने चालत त्यांच्या खोलीत आले. शरीराला झोपेची नितांत आवशक्यता असली तरी डोक्यातले विचार काही थांबत नव्हते. खोलीचे दार बंद करून ते बेडवर पहुडले. मग छतावर टांगलेल्या पंख्याकडे बघत नुसतेच पडून राहिले.

बराचवेळ विचार करून मग गालातल्या गालात हसतच ते स्वतःशीच बोलले,''या आजाराला म्हणतात, 'स्क्रिझोफेनिया, डिल्युजन' आणि पॉसिबल मल्टीपर्सनॅलीटी डिसऑर्डर. म्हणजेच भ्रम आणि भास होणे तसेच एकाधीक व्यक्तिमत्व असण्याचा आजारही नाकारता येणार नाही. हो नक्कीच हा गंभीर मानसीक आजार आहे. हा आजार रूग्णाला प्रचंड आक्रमक करू शकतो. म्हणजेच हे धोकादायक प्रकरण बनले आहे.

''हो सरपोतदार तुम्ही अनेक वर्षांपासून आजारी आहात, मानसिक रूग्ण आहात. ही तुमची अवस्था तुम्ही बेमालूम लपवली

आहे. ती अदृश्य बाई तूमची फक्त एक कल्पना आहे. तुम्ही तूमचेच मानसिक विश्व तयार केले आहे. मग तुमची ही अशी अवस्था का झाली? अशा कोणत्या घटना घटल्या की तुमचे व्यक्तिमत्व दुभंगले गेले? मी हे शोधून काढीन. तूमचा आजार तूम्ही कितीही नाकारला तरी मी सिद्ध करून दाखविन. तुमच्यासाठी दृश्य असलेले तुमचे काल्पनिक जग हे वास्तवात मात्र अदृश्य आहे हे सिद्ध करायचे आव्हान मी स्विकारले आहे.'',डॉक्टरसाहेब स्वतःशीच बोलले.....

३.मी आहे ना!

वैदेहीने तिचे डोळे किलकीले करत उघडले. डोळयासमोर प्रथमतः दिसले ते छातावरचे अनोळखी झुंबर. ते क्षणभर न्याहाळल्यावर मग ती भानावर आली आणि डोळे चोळतच हळूहळू उठून बसली. झोपाळलेल्या नजरेने आजूबाजूला बघू लागली. क्षणभरातच तिच्या लक्षात आले की, रात्री तिला सोफावर बसल्या बसल्या कशी झोप लागली हे कळलेच नव्हते. मग सुधाकर काकांनी तिच्या अंगावर पांघरूण टाकले असावे. हा सोफा पण काय आरामदायी वाटला आणि झोपही काय झक्कास लागली. अगदी सकाळ होईपर्यंत गाढ निद्रा!.....जणू मानसिक आणि शारीरिक ताण असहय झाला आणि शरीराने रात्रीपूरती सपशेल शरणागती पत्करली. जणू मानसिक तणाव सहन करण्याची शक्तिच संपली होती. पण विश्रांती घेतल्यानंतर मात्र आता आयुष्याने कात टाकल्यासारखे वाटले आणि खूपच ताजेतवाने वाटू लागले.

वैदेही उठून उभी राहिली आणि तिने आजूबाजूला पाहिले. खिडक्यांना लावलेल्या पडद्यांमधील फर्टीतून सूर्य प्रकाश डोकवत होता. पक्षांच्या किलकिलाटाचे संगीत सुखावून जात होते. तसेच गुडमॉर्निंग करत स्वयंपाकघरातून चहाचा सुगंध सगळीकडे पसरला होता. वैदेहीने मनगटावरील घडयाळयात

पाहिले तर ७ वाजले होते. तेव्हढयात सुधाकर काका स्वयंपाकघरातून बाहेर आले.

''अरे वा! उठलात का आपण! चहा आणू का?'',सुधाकरकाकांनी हसतच विचारले.

''हो चालेल, मंदार उठला का?'', वैदेहीने चौकशी केली.

''ते ना रात्री फारसे झोपलेच नाहीत कारण पहाटे चार वाजल्यापासून मला दर तासांनी ते चहा आणि कॉफी आणायला सांगत आहेत. कसलीतरी डायरी वाचत होते आणि मग पुस्तक वाचत होते. रात्रभर अगदी हेच सारखं चालंलाय. आत्तापण गॅलरीत बसून पुस्तक वाचताएत. ते असे अभ्यास करत जागे राहिले की मग मला पण कुठली आलीए झोप?'',वैतागलेले सुधाकरकाका पटकन बोलले.

हे ऐकताच वैदेहीच्या चेहऱ्यावरील हावभाव बदलले. तिचा हसरा चेहरा पटकन गंभीर झाला. ती पळतच पायऱ्यांवरून वरच्या मजल्यावरच्या बाल्कनीकडे निघाली. गॅलरीच्या दरवाज्यातून आत पाहिल्यावर तिच्या लक्षात आले की डॉक्टरसाहेब अजूनही पुस्तकात तोंड खुपसून बसले होते. त्यांच्या समोर डायरी उघडून ठेवलेली होती. जणू पुस्कातून ते या प्रकरणाशी असलेला संदर्भ शोधत असावेत. या प्रकरणाचा त्यांचा आभ्यास केव्हाच सुरू झाला होता.

''मंदार, गुड मॉर्निंग? डायरी वाचलीस?'',वैदेही पटकन बोलली. तिचा आवाज ऐकून डॉक्टरसाहेबांनी वर नजर करत तिच्याकडे पाहिले. तिला पहाताच त्यांनी हातातील पुस्तक टेबलावर ठेवले.

''हो गुडमॉर्निंग, ये ना! अग डायरी मी पूर्णपणे आणि परत परत वाचली'',डॉक्टरसाहेबांनी हातातील पुस्तक बंद करत उत्तर दिले. वैदेही समोरच्या खुर्चीत येऊन बसली आणि त्यांच्याकडे हजारो अपेक्षा डोळयात दाटवत बघू लागली. डॉक्टर साहेबांनी लगेच विषयाला हात घातला.

''हो, प्रकरण गंभीर आहे. तसे सहजासहजी सुटणारे नाही. तुझे बाबा गंभीररित्या मानसिक आजारी आहेत. त्यांनी स्वतःचे काल्पनिक जग तयार केलंय. ती बाई त्यांना भेटते आणि मग ती त्यांच्या इच्छा पूर्ण करते. ती बाई अतिमानवी अस्तित्व आहे आणि ती अंधारात विरून जाते, वैगरे मी सगळे वाचले. हा आजार बराच जूना असणार. फक्त आपल्यासमोर आत्ता येतोय. उपचार तातडीने सुरू करावे लागणार आहेत.'', डॉक्टरसाहेबांनी स्पष्टच सांगून टाकले.

''तू मदत करणार आहेस ना? कारण या प्रकरणाचे गांभीर्य बघता मला सगळया तऱ्हेच्या प्रयत्नांची गरज आहे. सगळंच भयावह आणि विचित्र आहे.'',वैदेहीने अगतिकपणे विचारले.

''हो, अगं मानसोपचार तज्ञाकडे येणारी प्रकरणे विचित्रच असतात आणि मी तुला केव्हाच सांगितलय की, मी या प्रकरणात लक्ष घालणार आहे. मी या प्रकरणाच्या मुळाशी जायचे ठरवलंय. तसे हे प्रकरण खूप खोल आणि क्लिष्ट आहे. तिथे गावाकडे जावे लागेल. सरपोतदार यांना भेटावे लागेल, मग हवेलीत जाऊन बघू तरी ती खरंच दिसते का? अग मला तिची भीती वाटत नाही कारण माझी खात्री आहे की ती दिसणार नाही. कारण ती अस्तित्वातच नाहीए. मगच मला सगळयांना पटवता येईल की अदृश्य बाई वैगरे असे काहीच नसते आणि यामागील सत्य काही वेगळेच आहे. तू काळजी करू नकोस मी सरपोतदार साहेबांना सत्य पटवून देईन आणि त्यांच्यावर उपचारपण करीन. त्यांना त्यांचा आजार मान्य करावाच लागेल.'',मंदार साने बोलले. डॉक्टर साहेबांचे बोलणे ऐकून वैदेहीच्या चेहऱ्यावर एक निश्चिंतता तरळू लागली. पण तरीही काही प्रष्ण अजूनही भेडसावत होतेच.

''म्हणजे तुला यात काहीच अतिमानवी असल्यासारखे भासत नाही?'',वैदेहीने हसतच डॉक्टर साहेबांचे मत विचारले.

''नाही वैदेही यात काहीही अतिमानवी नाही. त्या बाईचे असणे हा केवळ काल्पनिक खेळ आहे. त्यांनी कल्पनेचेच जग तयार केलंय. अगं आयुष्यात घटलेल्या धक्कादायक घटना माणसाला मूळापासून बदलतात आणि मग मनात अनेक तऱ्हेच्या विकृती तयार होतात. यात काही अनुवांशिक घटकही जबाबदार

असतात आणि मग मानसिक रोग जडतो. पण ते मानसिक रूग्ण आहेत हे ते कधीच मान्य करणार नाहीत. आपल्याला त्यांना ते पुराव्यासकट समजावून सांगावे लागेल. त्याआधी पुरावा जमा करावा लागेल. एकंदर परिस्थिती बघता सरपोतदारांच्या जिवालाही धोका संभवतो आणि त्यांच्यामुळे इतरांच्याही जिवाला धोका संभवतो. तुला कळतंय ना मी काय बोलतोय? हे असे भास होणे, भ्रम होणे नॉर्मल नाही. हे गंभीर मानसिक आजारपणाचे लक्षण आहे. तसेच मल्टीपर्सन्यालिटी डिसॉडर या आजारात एकाच माणसाला आपण दोन वेगवेगळी माणसे आहोत असे भासू लागते. मग अशी माणसे दोन वेगवेगळया वृत्तीच्या माणसांचे आयुष्य एकाच शरीरात राहून जगू लागतात.'',डॉक्टरसाहेब गंभीर चेहऱ्याने बोलले.

''काय? हे असे रोग फक्त सिनेमांतच पाहिले होते. हा रोग बाबांना असेल असे वाटले नव्हते'',वैदेही म्हणाली.

पण वैदेहीने हे त्यांचे असे बोलणे जणू गृहीतच धरले होते. वैदेहीपण स्वतः उच्चशिक्षित होती, अमेरीकेत रहात होती पण तरीही तिच्या डोळयात अनेक प्रष्णचिन्हे डोकावून जाताना दिसू लागली. तिचे असे घाबरणे हे उगाचच नक्कीच नव्हते. कोठेतरी त्या बाईच्या असण्याबाबत तिची जणू खात्री झाली होती. एखाद्या गोष्टीचा पुरावा नसणे आणि त्या शास्त्रीय दृष्टया सिद्ध करणे अशक्यच असले तरीही.

''तू मानसोपचार तज्ञ आहेस. तुला हे असे अतिमानवी अस्तित्वावर अविश्वास दर्शवणे जणू शिकवलेच गेलंय. याबाबत तुमच्या शास्त्रातही कोणत्यातरी मानसिक आजाराचे भलेमोठे नावही तयार असणार. पण शास्त्र अनेक बाबतीत अजूनही अज्ञातच आहे. शास्त्राच्या सिद्धांताच्या पलिकडेचे अध्यात्म आजही टिकून आहेच ना! आणि अध्यात्म, तंत्रविद्या हे अनेक अदृश्य आणि अतिमानवी अशा अस्तित्वाला मान्य करतेच की. पण तूझे एक मात्र खरे आहे की, तूझे तिथे गावाकडे येणे जरूरीचे आहे आणि सत्य पडताळून पहाणेही जरूरीचे आहे. मला हे प्रकरण लवकरात लवकर सोडवायचंय. म्हणूनच सांगते की तिच्या असण्याबाबत जणू मनात संभ्रम तयार झालाय. मन्याच्या बाबतीत जे झालंय ते पण अतर्कच होते. ती अदृश्य बाई जर असेल तर मलाही तिला भेटायचंय अगदी त्या हवेलीत जाऊन तिला शोधयचंय आणि ती जर सापडली तर तिला बाबांना सोडून देण्याची विनंती करायचीए, तिच्याकडे त्यांच्या जिवाची भीक मागायचीए! तू त्यांची डायरी वाचली आहेस. १७ जुैला त्यांच्या मृत्यू निश्चित आहे असे तिने सांगितलय. काय खरंच ती त्यांना १७ जुलैला घेऊन जाईल?'',वैदेही भावूक होऊन बोलत होती.

''वैदेही, असे अदृश्य शक्ति वगैरे काहीही नसते. ती १७ जुलै ही तारीख ही निव्वळ काल्पनिकच आहे. असे कोणीही मृत्यूची तारीख वैगरे सांगू शकत नाही. सगळे मनाचे खेळ आहेत. अग

मन हे खूप तऱ्हेचे खेळ करते. आणि आपल्या मेंदूमध्येही त्याप्रमाणे वेगवेगळया रासायनिक प्रक्रिया सुरू होतात. रासायनिक असंतूलन झाले की त्या मानसिक आजाराला कारणीभूत होतात. हे सगळे खूप क्लिष्ट आहे. पण आता वेगवेगळी प्रभावी औषधे निघालेली आहेत. हे भ्रम होणे, भास होणे, वेगवेगळे आवाज ऐकू येणे यावर प्रभावी इलाज निघले आहेत. इलाज झाल्यावर रूग्ण सामान्य आयुष्य जगू शकतो. पण यासाठी पेशंटने सहकार्य करणे जरूरीचे आहे. यासाठीच मला तिथे यावे लागेल आणि मग माझे काम तुला दिसेलच. पण लक्षात ठेव कदाचित त्यांना ॲडमिट करावे लागले तर त्यात आश्चर्य वाटून घेऊ नकोस'',डॉक्टरसाहेब खंबीरपणे म्हणाले.

''मंदार तू या प्रकरणात रस दाखवलास त्याब्दल धन्यवाद पण तिथे जे घटत आहे ते तुलाही धक्कादायक ठरणार आहे हे लक्षात ठेव. जर बाबांना भास होत आहेत असे मानले तरी मन्याला त्यादिवशी ती बाई कशी काय दिसली? तो बिचारा अजूनही या धक्कयातून सावरला नाहीए.,''वैदेहीने विचारलेल्या प्रष्णात तथ्य जरूर होते.

''अग मन्याची केस या प्रकरणाशी न जोडता वेगळी तपासली पाहिजे. अग त्याला जे दिसले ते इतरांना का नाही दिसले कारण मला असे वाटते तो पहिल्यापासूनच मानसिक रूग्ण आहे. तो अजूनही मानसिक उपचार घेतोय. मी त्याला काही वर्षांपूर्वी भेटलोय. त्याची केस वेगळीच आहे. तो सडन शॉक सिंन्डोमचा

रूग्ण आहे. लहानपणी घटलेल्या एका धक्कादायक घटनेतून त्याला हा आजार जडला. बस्स त्या दिवशीचे वातावरण त्याचा आजार परत सक्रीय व्हायला कारणीभूत झाले. त्याचे तिथे काही बरळणे आणि त्याचे सरपोतदारांच्या प्रकरणाशी साम्य दर्शवणे, हा निव्वळ योगायोग असू शकतो.'', डॉक्टरसाहेबांनी वैज्ञानिक स्पष्टीकरण दिले आणि क्षणभरासाठी वैदेही निरूत्तर झाली.

पण तरीही जणू काहीतरी खूप क्लिष्ट होते जे मनाला पटत नव्हते. जणू काहीच एव्हडे सरळ आणि साधे नव्हते. जणू कसलेच आणि काहीच स्पष्टीकरण योग्य वाटत नव्हते. तिच्या चेहऱ्यावरचा गोंधळ बघून डॉक्टरसाहेब परत बोलू लागले.

''तुला मन्याचे प्रकरण जर गोंधळात टाकत असेल तर तू या दोन केस वेगळया आहेत असे समज आणि आपण फक्त सरपोतदाराच्या केसवर एकाग्र होत काम करूया. एकदा १७ जुलै सुरळीत पार पडली की मग तूझी खात्री आपोआप होईल की हे सगळे काल्पनिक होते. मग आपण मन्याच्या केसचाही आभ्यास करूया. दोन्हीचे आत्ताच कन्फयुजन नको करूस'', डॉक्टरसाहेब तिला समजावतच बोलले. डॉक्टरसाहेबांचे बोलणे ऐकून वैदेहीच्या चेहऱ्यावर हैदोस घाालणारा गोंधळ जरा कमी झाला.

''पण तरीही कदाचित शास्त्र आणि अध्यात्म या दोन्हिची मदत आपल्याला घ्यावी लागणार आहे. बस्स १७ जुलै सुरळीत पार

होऊदे. तोर्यंत मला सगळे प्रयत्न करू दे. पण तूझे काम तू योग्य पद्धतीने निर्धोकपणे कर आणि तूझी फी काय असेल ती मी द्यायला तयार आहे.'',वैदेही बोलून गेली.

''नाही वैदेही मला याचा मोबदला नकोय. तू बघत आहेसच की माझ्याकडे पैशाला कमी नाहीए. मी हे आव्हान स्वतःलाच घातले आहे असे समज. ही गुंतागुंत मलाच सोडवायचीए, माझी क्षमता मलाच तपासून बघायची आहे. मला यावर्षीचा मानसशास्त्रातला सगळयात मोठा पुरस्कार मिळालाय. मला तोच योग्य ठरवायचाय. मी सरपोतदारांना ठीक करण्याचे आव्हान स्वीकारले आहे असे समज. पण लक्षात ठेव तुला आध्यात्मिक उपाय करायचे असतील तर तेही तू जरूर कर. पण हे फक्त तुझ्या समाधानासाठीच असेल.'',डॉक्टरसाहेब स्पष्टच बोलले.

वैदेहीच्या चेहऱ्यावर समाधान झळकू लागले. काहीतरी तोडगा निघेल, असे वाटू लागले. आशा पल्लवित झाल्या आणि तिच्या चेहऱ्यावर नकळतच हास्य उमटले.

''ठीक आहे तर मी आजच परत गावाकडे जाते. तू कधी येणार आहेस ते कळव. मी तूझी वाट पहाते. पण मी मानसोपचारांबरोबरच आध्यात्मिक आणि तांत्रिक उपायही करायचे ठरवले आहे. कारण काही झाले तरी बाबांचा जीव वाचवायलाच हवा. मी प्रयत्न करणे सोडू शकत नाही. तूझे म्हणणे कितीही बरोबर असले तरी मी मूळापासून घाबरली आहे.

मी त्या बाईचा आवाज, तिचे गाणे म्हणणे आणि चालण्याचा आवाज ऐकला आहे. मनाच्या एका कोपऱ्यात तिच्या असण्याबद्दल खात्री निर्माण झाली आहे. मला सगळे उपाय करणे भाग आहे.'', वैदेहीने तिचे मत कळवले. डॉक्टरसाहेबांनीही मान हलवून होकार दिला.

तसेही उपास-तापास, अंगारे-धूपारे, मंत्रजप, दानधर्म करणे, झाडाला फेऱ्या घालणे आणि मंदिरात खेटया घालणे याने काहीच ठोस होणार नाही अशी डॉक्टरसाहेबांना खात्रीच होती. डॉक्टरसाहेब मनाचे खंबीर होते आणि त्यांच्या मतावर ठाम होते. ते नास्तिक जरी नसले तरी अंधःश्रद्धाळू नक्कीच नव्हते.

पण वैदेही मात्र वेगळयाच हळव्या मनस्थितीत होती. रडवेल्या आवाजात ती म्हणाली,'' माझ्या लग्नानंतर ते अजूनच एकटे झालेत. त्यांना या वैदेही शिवाय कोणीच नाही रे! माझे पालनपोषण, हौस-मौज, शिक्षण, आजारपण, लग्न हे त्यांनी एकटयाने केले. ते फक्त माझ्यासाठीच जगले. आई आम्हाला सोडून निघून गेल्यावर त्यांनी मला आधार दिला आणि आता त्यांना आधार द्यायची माझी जबाबदारी आहे. १७ जुलैला मी त्यांना मरू देणार नाही.'',वैदेही डोळेपूसतच बोलली. तिच्या डोळयातून काळजी, प्रेम, आपुलकी अश्रू रूपात मुक्त होऊ लागले. मग तिने क्षणभरातच स्वतःला सावरले आणि लाजल्यासारखे डॉक्टरसाहेबांकडे पाहिले.

मग काय झाले केाणास ठाऊक ती ताडकन उठली आणि म्हणाली,''१७ जुलैला फक्त २३ दिवस राहिलेत. मी आता निवांत बसू शकत नाही. आता मला गेलेच पाहिजे. तू लवकरात लवकर म्हणजे अगदी चार-पाच दिवसांतच ये.

गावात जाताच मी तांत्रीक उपाय पण करणार आहे. सर्व बाजूंनी प्रयत्न करून बघू. मी भैरवशास्त्रींकडे जाणार आहे. ते तंत्र विद्येचे उपासक आहेत. खूप मुश्किलीने ते भेटायला तयार झालेत. ''

''ठीक आहे मग, मी माझे काम करतो त्यांना त्यांचे काम करू दे. तंत्र विद्या श्रेष्ठ का शास्त्र श्रेष्ठ?, दृश्य गोष्टींवर विश्वास ठेवायचा? का अदृश्य गोष्टींना मानायचे? पाश्चात्य ज्ञान श्रेष्ठ? का परंपरागत चालत आलेल्या धार्मिक विचारांना मानायचे? या प्रष्णांची उत्तरे पुढे आपल्याला मिळतीलच.'',डॉक्टरसाहेबांनी आव्हान स्विकारले होते.

''ठीक आहे मी तूझी वाट पाहीन.'', असे बोलून काही कळायच्या आत तिने डायरी उचलली आणि ती पटकन वळली. वैदेही भराभर पावले टाकत जाऊ लागली. जाताना ती डोळे पूसतच जात होती. मात्र डॉक्टरसाहेब उस्फुर्तपणे बोलले,''तू काळजी करू नकोस वैदेही, मी आहे ना तू माझ्या बरोबर.''.....

४.तांत्रिक भैरव शास्त्री

भैरव शास्त्रींनी तिला आज सकाळी बोलावले होते. ती वेळेच्या अर्धातास आधीपासूनच आश्रमात बसून होती. १७ जुलैला आता फक्त काही दिवस राहिले असल्याने वेळ घालवून चालणारच नव्हते. पण मग इथे आल्यावर कळले की भैरवशास्त्री हवन करण्यात व्यस्त होते. लोकांची त्यांच्यावर श्रद्धाही अपार होती. शास्त्रींना विचारल्या शिवाय त्यांचे भक्त कुठलेही महत्वाचे कार्य करत नसत. अनेक क्लिष्ट समस्या घेऊन लोक त्यांच्याकडे मोठया अपेक्षेने येत असत. त्यांच्या दैवी उपचारांना यश शंभरटक्के येणारच.

भैरवशास्त्रींचे व्यक्तिमत्वही भारदस्त होते. त्यांचे घारे डोळे कमालीचे भेदक होते. त्यांची आरपार छेदणारी भेदक नजर जणू माणसाला आरपार छेदत असे. मानेवर रूळणारे मोठे केस, कपाळावरचे त्रिपुंर्ड् गंध, त्यांचा तो घोघरा खर्जातला आवाज. गळयात घातलेल्या रूद्राक्षाच्या माळा, असे त्यांचे प्रभावी आणि अधिकारी व्यक्तिमत्व परिणामकारी होते. त्यांचा भारतीय पोशाख त्यांच्या कामाच्या स्वरूपाला साजेसा होता. त्यांचा तो धीरगंभीर चेहरा आणि मोजकेच गरजेपुरते बोलणे!.....त्यांच्या समोर नुसते उभे रहायलाही कोणाला भीती वाटावी.

मोठयाने मंत्र घोष करत भैरवशास्त्री आणि त्यांचे शिष्य होमकुंडाच्या बाजूने वेटोळे करून बसले होते. यज्ञात वेगवेगळया तऱ्हेच्या आहुती देणे सुरू होते. होम कुंडाच्या बाजूला अर्धे कापलेले कोहळे गुलालाने माखून ठेवले होते. कुंकवाने माखलेल्या गवताच्या बाहुल्या ओळीने मांडून ठेवल्या होत्या. बाहुल्यांसमोर टाचण्या टोचलेली लिंबे ठेवली होती. भाताच्या पिंडांवर गुलाल आणि बुक्का टाकला होता. यज्ञकुंडातून प्रचंड प्रमाणात धूर बाहेर पडत होता आणि ''ओम ऱ्हाम ऱ्हीम ल्कीम एही एही.....'', मंत्रपठणाने आसमंत दणाणून गेला.

थोडयाच वेळात यज्ञकुंडा समोर बसलेला एक मुलगा झिंगल्यासारखा हलू लागला. तो विचित्र हावभाव करत विकट हास्य करू लागला. तो उठायचा प्रयत्न करत होता पण शास्त्रीनी जणू त्याला मंत्रांनी जखडून ठेवत एका जागी बसायला भाग पाडले होते. अविरत सुरू असलेल्या मंत्रोच्चाराचा परिणाम असावा कारण आता तो मुलगा थरथरू लागला आणि वेदना झाल्यासारखा ओरडू लागला. त्या मुलाचे आई-वडील बाजूला उभे राहून भेदरलेल्या नजरेने सगळे पहात होते. त्यांच्या डोळयात दाटलेल्या वेदना जणू त्यांच्या डोळयातून ओघळणाऱ्या अश्रुंवाटे व्यक्त होत होत्या. जसे मंत्रोच्चार होत गेले तसे तो मुलगा जमिनीवर वेदनेने तडफडल्यासारखे गडाबडा

लोळू लागला. ''आह ओ..... त्याची ती असहय तडफड, त्या जीवघेण्या वेदना, त्या आर्त किंचाळया.....

तो सगळा प्रकार बघून वैदेहीच्या शरीराचा भीतीने थरकाप उडाला आणि कपाळावर घामाचे थेंब जमा झाले. वैदेहीला हे सगळे पहाणे असहय होऊ लागले. पण तिला ते सगळे सहन करण्याशिवाय पर्यायच नव्हता. अखेर तिने मन घट्ट करत स्वतःला सावरले आणि ती भेदरलेल्या नजरेने सगळे बघत असहायपणे बसून राहिली.

एक तासानी हा यज्ञ संपल्यावर भैरव शास्त्री उठून उभे राहिले आणि त्यांनी मूलाच्या कपाळाला गंध लावले. यज्ञ संपताच त्यांच्या शिष्यांचा घोळका त्यांच्या आजूबाजूला जमा होऊ लागला. ''नारळ कापडात बांधून त्यांना दे! नेवेद्याची एक पत्रावळी नदीकाठी ठेऊन ये. सामान आवरून घे! यज्ञाची विभूती एका पिशवीत भरून मूलाच्या वडलांना दे!'',भैरव शास्त्री त्यांच्या शिष्यांना आज्ञा करू लागले. तो मूलगा आता मूर्छा आल्यासारखा निपचीत पडून होता. त्याचे आई वडील त्याच्या बाजूला रडवेला चेहरा करून बसून राहिले होते.

''शास्त्रीजी हा ठीक हाईल ना?'',मुलाच्या आईने रडवेल्या आवाजात विचारले.

''तुम्ही निश्चिंत रहा आता तूम्हाला तो आत्मा यापुढे त्रास देणार नाही. मुलाची तब्येतही ठीक होईल. तुम्हाला सांगितलेला मंत्र

सतत अविरत म्हणा आणि घरात देवीची उपासना सांगितल्याप्रमाणे करत रहा. यज्ञाची विभूती घराच्या बाजूने गोलाकार टाका. दहा दिवसातच तो पूर्ण ठीक होईल.'' शास्त्रींजींचे बोलणे ऐकून त्यांच्या बरोबर असलेल्या दांपत्याच्या डोळयात पाणी दाटले.

''आपले उपकार कधीच फिटणार नाहीत.'',असे वारंवार बोलत दोघांनी आणि त्या मुलानी शास्त्रीजींच्या पायावर लोटांगण घातले. शास्त्रीजींच्या डोळयात करूणा आणि प्रेम दाटले होते आणि त्यांनी आर्शिवादही तोंडभरून दिला,''आयुष्यमान भव! सुखी भव!''.

तो मुलगा पण आता वेगळाच दिसू लागला. त्याच्या चेह-यावरील क्रूर भाव पार निघून गेला आणि तो विनम्रपणे हात जोडून उभा राहिला. अखेर तो त्याच्या आई-वडीलांबरोबर हळूहळू चालत निघून गेला. वैदेही सगळे आश्चर्यचकीत होऊन बघत होती. शास्त्रीजींच्या योगशक्तिमुळे तो मुलगा चांगला झाला होता. चक्क डोळयासमोर झालेला हा चमत्कार कसा नाकारावा?

तेव्हढयात काही शिष्य शास्त्रींशी बोलू लागले. ''चला स्वामी तुमचे ताट वाढून ठेवले आहे. नेवैद्य दाखवल्यावर जेऊन घ्यावे.'',एक शिष्य विनम्रपणे बोलला.

'हं म्हणजे अजून एक तास थांबावे लागणार तर!',वैदेहीच्या मनात विचार उमटून गेला. पण काय करणार? प्रकरणाचे

गांभीर्य बघता थांबणे भागच होते. वैदेही निमूटपणे वाट बघत थांबायला तयार झाली. भैरव शास्त्री शिष्यांसह वळून चालत जाऊ लागले. त्यांना बघून वैदेही उठून उभी राहिली. हातातील फाईल छातीशी घट्ट धरून बिचारी कोपऱ्यात अवघडल्यासारखी उभी राहून सगळे भेदरल्यासारखी बघू लागली.

तेव्हढयात काय झाले कोणास ठाऊक शास्त्रीनी शिष्यांस हाताने थांबण्याची खूण केली आणि ते परत वळले आणि गर्दीत कोणालातरी शोधल्यासारखे बघू लागले. मग मात्र त्यांची तीक्ष्ण नजर वैदेहीवर स्थिरावली. उंचेपुरे तेजस्वी भैरवशास्त्री त्यांच्या घाऱ्या डोळयांच्या भेदक नजरेने वैदेहीकडे नजर रोखून बघू लागले. त्यांनी अंगावरून थोडया घसरलेल्या शालीचे एक टोक परत खांदयावर फेकतच टाकले. आणि भारदस्त चालीने चालत ते वैदेहीपाशी आले. तिच्याकडे तीक्ष्ण नजरेने बघत ते म्हणाले,''मी सांगितलेली कागदपत्रे आणली आहेत का?''. वैदेहीने फक्त मान हलवत हो म्हंटले.

''ठीक आहे मग, चला आपण याबाबत चर्चा करू या.'',भैरव शास्त्री त्यांच्या घोघऱ्या आवाजात बोलले.

त्यांचे असे आपणहून गर्दीतून वाट काढत, कोपऱ्यात निमूटपणे उभ्या तिच्यापाशी चालत येणे, आणि आपणहून तिला बोलावणे म्हणजे तिचे अहोभाग्यच! तिच्या डोळयात आनंदाश्रू दाटले. ही अशी कित्येक अतिमहत्वाची प्रकरणे घेऊन लोक त्यांच्याकडे

येत असतील नाही?. आणि चक्क आज त्यांनी स्वतःहून तिच्या प्रकरणात रस घेतला होता. भैरव शास्त्री अतिशय नावाजलेले ज्योतिषी, तांत्रिक, अध्यात्मिक मार्गदर्शक होते. ती निपूटपणे त्यांच्या मागे चालत निघाली. चालत दोघे एका खोलीत आले.

त्या खोलीच्या एका कोपऱ्यात एक बैठक तयार केली होती. लाकडी पसरट बैठकीवर गादी टाकली होती. बैठकीच्या समोर जमिनीवर पांढऱ्या चादर घातलेल्या गाद्या टाकल्या होत्या. शास्त्रीजी त्यांच्या आसनावर स्थानापन्न झाले आणि त्यांनी वैदेहीला समोरच्या गादीवर बसण्यासाठी खूण केली.

तेव्हढयात त्यांचा एक शिष्य विनम्रपणे समोर येऊन उभा राहिला. शास्त्रीनी मान वर करून त्याच्याकडे पाहिले आणि ते गर्जतच बोलले,''नैवेद्य दाखवला असेल तर सगळयांनी जेऊन घ्या. मला अजून एक तास लागणार आहेत. इथे फक्त नैवेद्य पाठवून दे. नंतर मात्र माझे काम सुरू असताना उगाच सारखे येऊन त्रास देऊ नका.''. त्यांच्या आज्ञेच्या विरोधात जाण्याची हिंम्मत कोणात असणार? शिष्य निमुटपणे निघून गेला.

शिष्य निघून जाताच शास्त्रीनी वैदेहीकडे कागदपत्रांची मागणी केली. तिची कुंडली, बाबांचा फोटो, रिसॉर्टचा फोटो असे बरेचकाही तिने शास्त्रींसमोर ठेवले. शास्त्रीजी क्षणाचाही विलंब न करता पत्रिका उघडून बघू लागले. जसे ते पत्रिका न्याहळू लागले तसे त्यांच्या चेहऱ्यावरील भाव बदलू लागले. रिसॉर्टचे

फोटो तर ते बराचवेळ न्याहळत होते. मग त्यांनी परत पत्रिका हातात घेतली आणि त्यांच्या समोरच्या एका वहीत काहीतरी गाणित करू लागले.

तेव्हढयात त्यांचा शिष्य नैवेद्याचा प्रसाद घेऊन आला आणि काहीच न बोलता समोर ठेऊन निघून गेला. शास्त्रीजींनी हाताने खूण करत वैदेहीला जणू आज्ञाच केली,''प्रसाद खाऊन घ्या, मंतरलेल्या प्रसादाने अंगात शुद्ध उर्जा संचारेल. मी उगाच काहीच सांगत नाही.'' वैदेहीने होकारार्थी मान हलवत निपुटपणे प्रसाद खाण्यास सुरवात केली. प्रसाद खाताच वैदेहीला खरंच ताजेतवाने वाटू लागले.

बराचवेळ शास्त्रींचा अभ्यास सुरू होता. पत्रिका बघून झाल्यावर त्यांनी वैदेहीच्या बाबांच्या फोटोवर हात ठेवला आणि डोळे मिटून घेतले. क्षणभरातच त्यांच्या चेहऱ्यावर अनेक तऱ्हेचे भाव उमटू लागले. पाच मिनिटे ध्यान केल्यावर त्यांनी डोळे उघडले. हातातील फोटो समोर परत ठेवत ते वैदेहीकडे तीक्ष्ण नजरेने बघू लागले. त्यांच्या घाऱ्या डोळयात उमटलेली रूक्ष परखडता तिला जणू बोचू लागली.

''कालभैरव कृपा करो! हं मी जे काही आहे ते स्पष्टच सांगतो. तुझ्या वडिलांचे आयुष्य संपले आहे. जेमतेम वीस दिवस खूप झाले. माझे बोलणे म्हणजे काळया दगडावरची रेघ. तो आत्माच त्यांना घेऊन जाणार. तोच कारण होईल त्यांच्या मत्यूला. त्या

आत्म्याचे आणि त्यांचे जुने रूणानुबंध आहेत. काहीतरी जूना किंवा मागच्या जन्मीचा हिशोब आहे. त्यामुळेच त्यांचे आयुष्य क्षीण झाले आहे. तो आत्मा त्यांच्यासाठीच भूतलावर अडकून बसलाय. म्हणूनच तो त्यांना ताब्यात ठेऊन आहे. त्यांना येणारे ते अनुभव हे तो आत्मा मुद्दामुनच त्यांना देत आहे. त्यांना अद्भूत असे अनुभव देऊन बांधून ठेवत आहे. तो आत्मा चांगला वगैरे नसून तो हे सगळे स्वतःसाठीच करतोय. जणू ते भारावल्यासारखे मरायलाही तयार होतील. त्यांचे वशीकरण झाले आहे. जर १७ जुलैला मृत्यूने त्यांना गाठले नाही तर ते आत्महत्यासुद्धा करतील.''

शास्त्रीजींचे बोलणे ऐकून वैदेहीचा चेहरा पांढराफटक पडला. ती नुसती भीती आणि काळजी डोळयात दाटवून त्यांच्याकडे बघतच राहिली. तिला काय बोलावे ते कळतच नव्हते. काय खरंच 'ती' बाबांना घेऊन जाईल? अरे देवा! आता काय करावे? हे असे खरंच झाले तर? चेहऱ्यावर भीती दर्शवत वैदेही निःशब्द बसून होती.

अखेर क्षणभरातच स्वतःला सावरून तिने प्रष्ण विचारला,''जर त्यांना १७ जुलै सरून जाईपर्यंत मनोरूग्ण हॉस्पिटलमध्ये बळजबरीने दाखल केले तर? त्यांना त्या हवेलीत जाण्यापासून रोखले तर? काय १७ जुलै नंतर त्यांना ती सोडून देईल?''.

''त्याचा काही उपयोग होणार नाही. तो अतृप्त आत्मा त्यांना तसे सोडणार नाही. तो त्यांचा पाठलाग करत कुठेही येईल. मनोरूग्णांचे डॉक्टर बऱ्याच वेगवेगळया रोगांची नावे सांगून त्यांच्यावर औषधांचा भडिमार करतील आणि त्यांना औषधांनी निष्क्रीय करून टाकतील. म्हणजे त्यांना चालता बोलता अर्धमेला माणूस बनवून सोडतील. डॉक्टरतरी काय करणार. त्यांचे शास्त्र रोगाचा पूरावा मागत असते. त्या अदृश्य बाईचे अस्तित्व डॉक्टर मान्य करणारच नाहीत. कारण याबाबत ठोस पूरावा वैगरे असा कधी मिळत नसतो. समोर येते ते झपाटलेल्या माणसाचे विचित्र वागणे. मी अध्यात्मिक इलाजावर विश्वास ठेवतो, आणि माणूस पूर्ण बराही करतो.''

''मग यावरही काही उपाय तर असेल ना? त्यांना त्या आत्म्यापासून कसे वाचवता येईल? प्लिज काही मदत करा.'',वैदेही काळजीने कळवळून बोलली. वैदेही कितीही काळजीने बोलली तरी शास्त्रीजींच्या डोळयात मात्र तेच रूक्ष भाव होते.

''या प्रकरणाच्या बाबतीत उपाय किती परिणामकारण ठरतील ते सांगता येत नाही. कारण तो आत्मा खरंच खूप प्रभावशाली आहे. पण तरीही त्या हवेलीत जाऊन त्या आत्म्याशी थेट संबंध प्रस्थापित करून त्याला वश करावे लागेल. पण ते किती आणि कसे यशस्वी होईल हे सांगता येत नाही.'',भैरव शास्त्रींनी स्पष्टच सांगितले.

''पण आपण प्रयत्न तर करू शकतो ना! मी खूप अपेक्षेने आपल्याकडे आले आहे. जो काही खर्च होईल तो मी करायला तयार आहे.'',वैदेही रडवेल्या आवाजात म्हणाली.

''जो पर्यंत यश येत नाही तो पर्यंत पैसे तर मी घेणार नाहीच. प्रकरणाचे गांर्भीर्य बघता मी माझे काम लवकरात लवकर सुरू करतो.''

त्यांचे बोलणे ऐकून वैदेहीच्या चेहऱ्यावर समाधान पसरले. या अशा संकटाच्यासमयी तिला सगळया तऱ्हेच्या मदतीची गरज होती. अखेर ती हात जोडून रडवेल्या आवाजात बोलली,''आता मी काय करावे? कारण आपल्याकडे दिवस खूपच कमी आहेत.''

भैरवशास्त्रीं विचार करत काही वेळ बसून राहिले. काही क्षणातच त्यांच्या चेहऱ्यावर ते कोणत्यातरी निष्कर्षावर यावे असे समाधान पसरले. ते वैदेहीकडे बघून बोलू लागले. ''पाच दिवसांनी अमावास्या आहे. अमावास्येला या अशा अदृश्य शक्तिंना जास्त बळ मिळते. ती आपल्यासमोर तिचे शक्तिप्रदर्शन नक्की करेल. अमावास्येला आपण तिला अनपेक्षित रित्या गाठायचे आणि तिच्याशी संपर्क साधायचा प्रयत्न करायचा. रात्री बारा वाजता आपण त्या हवेलीत जायचे आणि तिच्या शक्तीचा अंदाज घ्यायचा आणि मगच कोणता उपाय करावा हे कळेल.'',भैरवशास्त्री खंबीरपणे बोलले.

भैरवशास्त्रींचे बोलणे ऐकून वैदेही धक्का लागावा तसे बघतच राहिली. काय रात्री बारा वाजता त्या हवेलीत जायचे? काय खरंच ती शक्तिप्रदर्शन करेल? हे सगळेच अनपेक्षित आणि गूढ होते. कदाचित हे सगळे करणे जरूरी असेलही पण तरीही.....

''ठीक आहे मी आपली वाट पाहीन आणि एक दिवस आधी आपल्याला फोन करून आठवण करून देईन.'',वैदेही उठून उभे रहात बोलली.

''त्याची गरज नाही. अमावास्येच्या दिवशी मी आपल्याशी संपर्क साधीन. तुमच्या वडिलांना कळू नये म्हणून घरी येणार नाही. हवेलीच्या बाहेरच रात्री भेटीन. माझे तीन शिष्य बरोबर असतीलच. माझा शब्द काळया दगडावरची रेघ समजा. पण याबाबत एकही शब्द आपण आपल्या बाबांना सांगू नका. एक मंतरलेला ताईत देतो तो तुम्ही गळयात घाला म्हणजे तुमचे रक्षण होत राहील.'',भैरव शास्त्री गर्जतच बोलले.

एक लाकडी पेटी उघडून त्यांनी एक ताईत बाहेर काढला आणि काहीवेळ ते ताईत हातात घेऊन मंत्र पुटपुटत राहिले. क्षणभरातच त्यांनी तो ताईत वैदेहीच्या हातात दिला. ''कालभैरव कृपा करो'' असे बोलून ते उभे राहिले. मग क्षणभराचाही विलंब न करता झपाझप पाऊले टाकत निघून गेले. भैरवशास्त्रींचे बोलणे संपले होते. वैदेही मात्र सुन्नपणे त्यांना जाताना बघत राहिली.

भैरवशास्त्रींनी दिलेला ताईत घेऊन वैदेही तिथून बाहेर पडली. मनाने हळव्या वैदेहीच्या सहनशक्तिची परीक्षाच होती. या अशा समस्येला कधी सामोरे जावे लागेल असे तिला स्वप्नातही वाटले नव्हते. जड पावलांनी स्वतःला खेचतच ती गाडीपाशी आली. सर्वांगाला भितीने कंप सुटल्याप्रमाणे झाले होते. हात थरथरत असल्यामुळे पर्समधून चावी काढून आणि मग चावीने गाडीचे दार उघडणेही अवघड होत होते. सारखी चावी हातातून पडत होती. जणू मनच थाऱ्यावर नव्हते.

पर्समधील भैरवशास्त्रींनी दिलेला ताईत तिने बाहेर काढला. मग तो ताईत तिची रक्षा करेल असे तिला उगाच वाटू लागले. वेडे मन उगाच स्वतःची समजूत काढू लागले. मग तिने ताईत पटकन गळयात घातला. बिच्चारी वैदेही चांगलीच घाबरली होती. हा मनाचा खेळ असो वा काहिही असो माणसाला मानसिक आधाराची गरज नक्कीच पडत असते आणि मग अगदी हा असा ताईतही सुरक्षीतपणाची भावना निर्माण करतो. वैदेहीलाही ताईत गळयात घालताच निश्चींत वाटू लागले आणि तिने क्षणभर डोळे बंद करून घेतले.

तेव्हढयात तिच्या फोनची रिंग वाजली आणि ती दचकून भानावर आली. तिचा थरथरता हात तिने धडधडत्या छातीवर ठेवला. मग हळूहळू फोन हातात घेऊन तिने नंबर तपासला तर नंबर ओळखीचा होता. फोन डॉ मंदारचा होता.

फोन उचलताच समोरून मंदारचा आनंदी आवाज कानावर पडला. ''मी उद्या येतोय. मला स्टेशनवरून रिसॉर्टवर कसे येऊ याचा पत्ता सांग.'',डॉक्टरसाहेब उत्साहात बोलले. वैदेहीला तिच्या कानावर विश्वासच बसेना काय खरंच मंदार येतोय? त्याचा ओळखीचा आवाज नकळतच खूप आपला वाटला.

''तू स्टेशनवर थांब मी येते तिथे न्यायला. स्टेशनपासून बस्स पंधरा मिनीटावर रिसॉर्ट आहे. फक्त किती वाजता येणार आहेस ते कळव.'',वैदेही आनंदात बोलली.

''ठीक आहे तू दुपारी एक वाजता न्यायला ये. मग भेटल्यावर बोलूच सगळे.'',डॉक्टरसाहेब उत्साहात बोलले.

''बोलावे तर लागणारच, कारण मी आत्ताच भैरवशास्त्री कडे जाऊन आले. त्यांचे मत अशास्त्रीय असले तरी ते खूपच कॉंन्फिडंट वाटले. त्यांच्या डोळयातली परखडता आणि आवाजातील आत्मविश्वास खूपच प्रभावशाली होता. त्यांनी अमावास्येला रात्री त्या हवेलीत जाण्याचे ठरवले आहे. मलाही जावे लागणारच. पण तुला खरंच सांगते मला खूप भीती वाटतीए. कारण ज्या हवेलीकडे रात्रीच्या वेळी कोणी बघायचे सुद्धा धाडस करत नाही तर मग तिथे अमावास्येच्या रात्री जायचे म्हणजे!.....'',वैदेही थरथरत्या आवाजात बोलली.

तिचे बोलणे ऐकून डॉक्टरसाहेबही ठामपणे बोलू लागले.''तू घाबरू नकोस कारण तू बघशील की तिथे असे काही

सापडणारच नाही. माझाही हाच प्लॅन होता. अगदी हाच! मी कोणाला घाबरत नाही कारण मुळात मला त्या आत्म्याच्या असण्यावर विश्वासच नाही. भैरवशास्त्रींच्या कामाशी माझा काही संबंध नाही. त्यांचे अनुमान ते काढतील आणि माझे निष्कर्ष मी काढणार आहे. मलाही सरपोतदारांच्या मागावर त्या हवेलीत जायचंय आणि ते नक्की काय करतात? कोणाशी बोलतात? हे पहायचंय. त्यांच्या वर्तणुकीवरूनच तर मी आजाराच्या तीव्रतेबाबत अनुमान काढणार आहे. म्हणूनच मी पण येईन तुमच्या बरोबर. आता सोक्षमोक्ष लावूनच टाकूया. बघूया तरी अदृश्य 'ती' कोणत्या दृश्य रूपात भेटतीए?'', डॉक्टरसाहेब कठोर आवाजात बोलले.

फोन ठेवताच वैदेही विचार करू लागली. भैरवशास्त्री आणि डॉ मंदार साने यांचे निदान अगदीच विरूद्ध होते. म्हणजे एक अदृश्य शक्तिवर विश्वास ठेऊन होते तर एक दृश्य अशा शास्त्रीय सिद्धांतावर भरवसा ठेऊन होते. दोघेही आपापल्या व्यवसायातील पारंगत तज्ञ होते. डॉक्टरसाहेबांना मानसशास्त्राचा मोठा पुरस्कार मिळाला होता. तर भैरवशास्त्रींच्या योगशक्तिची चुणूक वैदेहीने आत्ताच काही वेळापूर्वी पाहिली होती. दोघेही त्यांच्या मतावर ठाम होते. आपापल्या विद्येवर प्रबळ विश्वास ठेऊन होते. दृश्य आणि अदृश्य यांच्यातील हे द्वंद्व तीव्र होऊन कोणत्या नवीन संकल्पना शिकवून जाईल कोणास ठाऊक?

५.तिच्या पाऊलखुणा

डॉक्टरसाहेब घाईने तयारीला लागले. ''हो रात्री दहा वाजता बाहेर पडायलाच हवे. आज टेरेसवर जाऊन हवेलीचा अंदाज घ्यायचाय. हवेली टेरेसवरून स्पष्ट दिसते म्हणे. रात्रीच्या वेळी तिचे दर्शन घेणे महत्वाचे आहे. तिथून म्हणे माणसांच्या बोलण्याचे आवाज येतात. ती जिवंत होते म्हणे.'',ते मिश्कीलपणे हसत स्वतःशीच बोलत होते. सकाळी तर तसे काहीच वेगळे जाणवले नव्हते.

सकाळी तर हा सुंदर रिसॉर्ट अतिशय सुंदर होता आणि इथली थंड हवा आणि सृष्टीसौंदर्य वेड लावणारे होते. ती मागची हवेली सुद्धा सकाळी अगदी नेत्रदिपक आणि भव्य वास्तू भासत होती.

रिसॉर्टवर आल्यापासून डॉक्टरसाहेब सरपोतदारांशी मुद्यामून बराचवेळ चर्चा करत होते. त्यांच्या व्यक्तिमत्वाला आभ्यासत होते. मग सरपोतदारांच्यात मात्र दोन वेगळया व्यक्तिमत्वांचा वास होता हे निदान डॉक्टरसाहेबांनी काढले होते. त्यांच्याशी बोलताना त्यांच्यात होणारे बदल डॉक्टरसाहेबांनी ओळखले होते. क्षणात त्यांच्या वर्तणुकीत होणारा बदल हा केवळ भास नसून एक ठळक अशी प्रक्रीया होती. एक व्यक्तिमत्व हे सोज्वळ अशा सरपोतदारांचे तर एक व्यक्तिमत्व कोणा आक्रमक माणसाचे असल्याची त्यांची खात्रीच झाली होती. सरपोतदारांशी बराचवेळ संभाषण केल्यावर काढलेला निष्कर्ष हा त्यांच्या

प्रदिर्घ अनुभवाची पावतीच होता. पण वैदेहीचातर यावर विश्वासच बसला नसता म्हणून त्यांनी गप्प राहणे पसंद केले.

त्यांना असुरक्षतेची भावना कोणी दिली की मग त्यांचे त्या दुसऱ्या व्यक्तिमत्वात रूपांतर होते हे डॉक्टरसाहेबांना कळले होते. जर सगळे अलबेल असेल तर ते साधा माणूस असतात. मग असुरक्षीतता हा जर त्यांचा 'ट्रिगर पॉईट' असावा असे त्यांना मनोमन वाटत होते.

काय सरपोतदारांना त्यांच्या आजाराची कल्पना असेल? हो असणारच कारण हे असे दुहेरी आयुष्य जगणे त्यांना फार अवघड जात असणार. वैदेहीला आत्तापर्यंत तरी त्यांच्या आजाराबाबत त्यांनी काहीच समजू दिले नव्हते. ते त्या व्यक्तीमत्वाला काबूत ठेवण्यासाठी सतत प्रयत्न करत असणार. हो आणि ते त्यांना बेमालूम जमले आहे. कारण वैदेहीच्या समोर ते फक्त तिचे वडील होते. प्रेमळ, जबाबदार आणि कर्तव्यदक्ष अशी भूमिका बेमालूम पार पाडणारे निश्णात कलाकार होते.

सर्व तयारी पूर्ण होताच डॉक्टरसाहेबांनी या केसबाबत निष्कर्ष नमूद करायला सुरवात केली.

'Subject is suffering from possible multiple personality disorder with dilusion and paranoia. At the moment two distinct personalities are observed with different

behaviour patterns. Dangerous to general public as occasional aggression is seen especially when second personality is active. Subject capable to cause injury. More investigation needed since cause of disorder is unknown……..'

बराच वेळ केस बाबत विचार करण्यात आणि निष्कर्ष लिहिण्यात गेला. मग लवकरच भिंतीवरच्या घडयाळयाने कळवले की दहा वाजणार होते. लगेचच त्यांनी हातातील डायरी बंद केली आणि आवरायला सुरवात केली. संपूर्ण काळया रंगाचा पोशाख परिधान केला. काळया रंगाच्या पोशाखामुळे अंधारात लपायला मदत होणार होती. मोबाईल फोन कोटाच्या खिशात ठेऊन दिला. दहा वाजता फक्त काळा कोट चढवायचा सॅक पाठीला लावायची, काळी टोपी घालायची की बस्स अगदी तयार.

डॉक्टरसाहेबांनी दीर्घ श्वास घेतला आणि अविश्वासाने मान हलवली. आज टेरेसवर पुढे काय वाढून ठेवले होते कोणास ठाऊक? काय 'ती' खरंच असेल आणि ती एकदम समोर येऊन उभी ठाकली तर? किंवा सरपोतदारच त्यांच्या समोर येऊन उभे राहिले तर? त्यांनी वेडाच्या भरात हल्ला केला तर?..... या सर्व प्रष्णांचे उत्तर मात्र एकच होते, आता घाबरायचे नाही आणि तयारीत रहायचे. स्वतःचे सामर्थ व क्षमता सिद्ध करायची संधी दवडायची नाही.

मग अचानक काही आठवल्यासारखे डॉक्टरसाहेब उठले आणि बॅग मधून त्यांनी घडीचा चाकू काढून कोटाच्या आतल्या खिशात ठेवला. हं आता तयारी पूर्ण झाली म्हणायचे. क्षणभर थांबून त्यांनी एक प्रदीर्घ श्वास घेतला. हं ती वेळ आली तर!.....

बरोबर दहा वाजता डॉक्टरसाहेबांनी खोलीचे दिवे बंद केले. आजूबाजूला कोणीच नाही हे लक्षात येताच ते पॅसेज मधून पुढे चालत निघाले. पॅसेजच्या शेवटी टेरेसकडे जाणाऱ्या पायऱ्या दिसू लागल्या. तिथेच क्षणभर थांबून त्यांनी परत आजूबाजूला नजर टाकली. पण जणू सगळा रिसॉर्टच गाढ निद्रेत होता. फक्त रातकिडयाचे किर्र असे संगीत मात्र अविरत सुरू होते.

वैदेहीने सांगितल्याप्रमाणे टेरेसचा दरवाजा शोधत ते पायऱ्यांवरून चढत वरच्या मजल्यावर गेले. तिथे टेरेसचा दरवाजा शोधणे कठीण गेले नाही. कारण वरच्या मजल्यावर जाताच समोरच तो लोखंडी दरवाजा दिसला. हळूहळू चालत ते दरवाज्या जवळ आले. दरवाज्याला लावलेल्या लोखंडी कुलूपाला हात लावताच त्यांच्या लक्षात आले की वैदेहीने तिचे काम चोख बजावले होते. दरवाज्याचे कुलूप उघडलेले होते. डॉक्टरसाहेबांनी भराभर लोखंडी दरवाजा उघडला आणि ते टेरेसवर आले. येताच त्यांनी परत लोखंडी दरवाजा जसाच्या तसा हळूच लोटून घेतला.

टॉर्चच्या झोतात अंधाराला छेदत ते पळतच टेरेसवर पुढे निघाले. टेरेसच्या मध्यावर येताच ते थांबले कारण तिथूनच ती हवेली दिसणार होती. रिसॉर्टच्या अगदी मागेच ती वसलेली होती. एकदा हवेली पाहिली असल्याने तिच्या भव्यतेची कल्पना होतीच. रात्री कशी दिसेल ती? काय ती खरंच भयानक झपाटलेली वास्तू?.....

छे काहीतरीच काय! डॉक्टरसाहेबांनी अविश्वासाने मान झटकली. त्यांनी वळून हवेलीच्या दिशेने पाहिले आणि अंधाराच्या आवरणामागे त्या भव्य हवेलीच्या असण्याचे संकेत मिळाले. हो हो अंधारातही त्या भव्य इमारतीचा दाट काळा आकार दिसू लागला आणि ताकदवान शत्रूच्या अचाट सामर्थाची कल्पना यावी असे वाटले. मग ती हवेली म्हणजे अंधाराचा आडवसा घेऊन एखादे रानटी जनावर हल्ला करण्याआधी थंडपणे न्याहळत असावे असे उगाच भासले. अगदी त्याच वेळी आकाशातील ढगांनी मेहेरबानी केली आणि क्षणभरासाठी आकाशातील ढगांचे आवरण बाजूला झाले आणि चंद्रप्रकाश सर्वत्र पसरला. चंद्रप्रकाश पसरताच बराच परिसर दृष्टीपथात आला. मग मंद चंद्रकिरणांच्या उजेडात ती हवेली स्पष्ट दिसून गेली. रात्री जणू तिनेही रूप पालटले होते. तिलाही जणू दोन व्यक्तिमत्वे होती.

हं.....डॉक्टरसाहेबांनी प्रदीर्घ श्वास घेतला. क्षणभरासाठी काळजाचा ठोकाच चुकला. निर्यमनुष्य, क्रूर, जीवघेणी आणि

प्रचंड भीतीदायक भव्यता..... त्या वास्तूला बघून एखाद्या अवाढव्य आणि हिंस्त्र जनावराने अंधारातून बाहेर येत अगदी समोर येऊन उभे ठाकावे असे वाटले. नुसत्या दर्शनानेच तिचा दबदबा जाणवू लागला. त्या क्षणभराच्या दर्शनानेच जणू सर्वांगाचा थरकाप उडाला.

चंद्रप्रकाशाच्या अंधूक उजेडातही ती अद्भूत आणि भव्य वास्तू पार वेड लावून जात होती. तिचे दर्शन मनावर कोरले गेले. ही हवेली म्हणजे छोटा किल्लाच होती. पण आता दुर्लक्षीत या हवेलीच्या भिंतींवर वेली चढल्या होत्या. भिंती पावसाच्या पाण्यामुळे काळवंडल्या होत्या. ही वास्तू काय काय रहस्ये गिळंकृत करून होती कोणास ठाऊक? डॉक्टरसाहेबांनी भीतीने आवंढा गिळला. काहीही असो तिच्यावरून नजर हटतच नव्हती. गोठलेल्या मनस्थितीत डॉक्टरसाहेब नुसते डोळे विस्फारून बघतच राहिले. भारावल्यासारखे निःशब्दपणे बराच वेळ नुसते न्याहळतच राहिले..... चंद्रप्रकाशात काही क्षणभरासाठीच दिसलेले हवेलीचे ते उंच खांब, कोरीव कमानींच्या खिडक्या आणि अनेक बंद दरवाजे, ती अद्भुत स्थापत्यकला आता भितीदायक का भासत होती कोणास ठाउक?

रिसॉर्टची मागची भिंत हवेलीच्या कुंपणाला लागून होती. त्यामुळे ती हवेली अगदी जवळून पहाणे शक्य झाले. रिसॉर्टच्या मागच्या भिंतीच्या पलीकडे झाडे झुडपे होती. थोडी मोकळी जमीन आणि

मग थोडया दूरवर हवेलीचा तो भव्य दरवाजा दृष्टीपथात आला. डॉक्टरांनी दुर्बीणीने जमेल तेव्हडा परिसर बघायचा प्रयत्न केला.

तेव्हढयात कसलीतरी सळसळ ऐकू आली. सुरवातीला डॉक्टरसाहेबांनी दुर्लक्ष केले. पण मग झाडीतून पायांचा चालण्याचा आवाज येऊ लागला आणि डॉक्टरसाहेबोचे कान टवकारले गेले..... हो हो आवाज येतच राहिला. या निःशब्द शांततेत आवाज स्पष्ट ऐकू येऊ लागला होता. नक्कीच वाळलेल्या पानांवरून पाऊले टाकत कोणीतरी चालत असावे. डॉक्टरसाहेबांनी सावध होत आवाजाचा अंदाज घेतला. आवाज रिसॉर्टच्या जवळूनच येत होता. आजूबाजूला बघत अंदाज घेत ते पळतच टेरेसच्या रेलिंगला टेकून आवाजाच्या दिशेने बघू लागले. पण तेव्हढयात चंद्रावर ढग आले आणि सगळे दृश्य झाकोळले गेले. पण झाडांच्या हलण्याचा आवाज येतच राहिला. काय कोणतेतरी जनावर? का सरपोतदार? तिथे नक्कीच कोणीतरी होते. ''छे! अंधारामुळे काहिच दिसत नाहिए!'',ते स्वतःशीच बोलले.

ते टॉर्च लावणार तोच त्यांच्या जवळच कोणी उभे असावे असे वाटले. पायाचा आवाजही अगदी जवळून आला. आं काय मन खेळ करू लागलंय? काय ती अदृश्य बाई इथे मागेच अंधारात दबा धरून आहे? ते मागे वळणार तोच खांद्यावर कोणाचातरी हात पडला.

''आं!.....'',ओरडतच दचकून डॉक्टरसाहेबांनी वळून पाहिले. हो हो त्यांच्या जवळ उभी मानवाकृती त्यांच्या नजरेस पडली. कोणीतरी त्यांच्या जवळच अंधारात उभे होते. अगदी जवळच.....

''ए कोण? कोण आहे?'',ओरडतच डॉक्टरसाहेबांनी स्वसंरक्षासाठी हातातील टॉर्च मारण्यासाठी उगारली. ते त्या व्यक्तीला मारणार तोच आवाज त्यांच्या कानावर पडला.....

''अरे मी आहे''. त्या व्यक्तीच्या हातातील मोबाईलचा दिवा उजळला आणि वैदेहीचा चेहरा दृष्टीपथास पडला.

डॉक्टरसाहेबांनी त्यांच्या धडधडत्या छातीवर हात ठेवला. अविश्वासाने डोके हलवत ते म्हणाले,''अग तू? मी चुकून मारले असते तर?''. पण वैदेहीने त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. ती हातानेच खूण करत गप्प राहून आवाज ऐकण्यास सांगत होती. तिने मोबाईलचा दिवा पटकन बंद केला.

''टॉर्च नको लाऊस. अंधारात लांबून उजेड दिसेल आणि मग तिथे जे कोणी आहे ते सावध होईल.'', वैदेहीने लाखमोलाचा सल्ला दिला. पण भितीमुळे क्षणभर डॉक्टरसाहेबांच्या छातीत धडधड सुरूच होती. आधीच गुडूप्प अंधार, त्या भयानक हवेलीतून येणारे विचित्र आवाज, त्या अदृश्य बाईबाबतची मनात रूजलेली भिती आणि जवळच कोणी असल्याचा

आभास.....बस्स हे सर्व पुरे होते एखाद्या भयपटासारखी वातावरण निर्मिती करायला.

तेव्हढयात हवेलीच्या बाजूने परत कसलातरी वेगळा आवाज येऊ लागला, अं.....कोणाच्यातरी बोलण्याचा. हो, हळू आवाजातील कुजबूज ऐकून डॉक्टरसाहेबांचे डोळे मोठे झाले. म्हणजे काय तिथले अस्तित्व जागे होत होते? पण हे कसे शक्य आहे? काय अंधार डोक्यावर परिणाम करू लागलाय?

डोळयात उत्कंठा साठवत ते हवेलीकडे बघू लागले. माझे शिक्षण हे असे अमानवी अस्तित्व मान्य करत नाही. मग जे समोर दिसते ते कसे नाकारावे? हे नक्की काय होत असावे?

वैदेहीला त्यांनी हातानेच गप्पराहण्याची खूण केली आणि ते दोघे आवाज ऐकू लागले. आवाज हवेलीतून येत होता. हो हो नक्कीच दोन माणसे बोलावीत असे वाटले. मग कोणा बाईच्या बोलण्याचा आवाज येऊ लागला.....ती बाई हसत बोलत होती. काय बोलत होती ते कळत नव्हते पण नक्कीच कोणीतरी हवेलीत वावरत होते. मग अचानक गाण्याचा आवाज येऊ लागला. आवाज बाईचा होता. पण असे अंधारात त्या निर्यमनुष्य हवेलीत कोणी का?.....डॉक्टरसाहेबांनी अविश्वासाने डोके झटकले आणि त्यांच्या धडधडत्या छातीवर हात ठेवला. जणू त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली होती.

डॉक्टरसाहेब हवेलीकडे नीरखून बघू लागले आणि, काही वेळापूर्वीची बंद असलेली हवेलीची काही दारे आता उघडली गेली असल्याचे निदर्शनास आले. मुख्य दरवाजा बंद असताना कोणी आत कसे गेले कोणास ठाऊक? मग त्या अंधाऱ्या खोल्यातून हसण्याचे, बोलण्याचे आवाज ऐकू येऊ लागले. त्या जीवघेण्या अंधाऱ्या खोल्यांमध्ये कोणीतरी नक्कीच वावरत होते.

डॉक्टरसाहेबांनी अविश्वासाने वैदेहीकडे पाहिले. हा काय भ्रम आहे? कोणता छलावा आहे? काय मला वेड लागतंय? ''वैदेही काय तूला पण हे सगळं ऐकू येतंय का?'',डॉक्टरसाहेबांनी कापऱ्या आवाजात विचारले.

वैदेही घाबऱ्या नजरेने हवेलीकडेच बघत होती. ''बघ मी तुला सांगितले होते. हे असे नेहमीच होत असते. तू बघ त्या अंधाऱ्या भयानक हवेलीकडे. सांग कोणा माणसाचे यावेळी तिथे जाणे शक्य आहे का? बघ रात्र होताच ही निर्जीव हवेली कशी जिवंत होते ती'',वैदेही हळू आवाजात पुटपुटत बोलली. डॉक्टरसाहेबांची बुद्धी जणू आक्रोश करत सांगत होती की 'नाही नाही याला शास्त्रीय स्पष्टीकरण नक्कीच असणार.

हवेलीतून बोलण्याचे, चालण्याचे, दरवाजे आपटण्याचे आवाज येतच राहिले. तेथील अंधारच जणू जिवंत झाला होता. म्हणजे हवेलीच्या बाजूने आवाज येतात, एकापेक्षा जास्त माणसे तिथे वावरत असतात, कोणी बाई गात असते, हा दावा तर खरा

ठरला होता. वैदेहीला आलेले अनुभव खरे ठरले. शास्त्राला जणू आव्हानीत करणारी कोणी शक्ति नक्कीच असावी का? असा संभ्रम निर्माण झाला. डोके चक्राऊन गेले होते.

आत्तातरी याबाबत काही स्पष्टिकरण सापडणे अशक्यच होते. अजून तपास करणे आवश्यक होते. ही रात्र कितीही विचित्र असली तरी आज अनुभवलेला थरार हा शब्दाच्या पलिकडचा, वर्णनातीत होता.

मग अचानक डाक्टरसाहेबांना काही आठवावे असे ते पटकन वैदेहीकडे बघत बोलले,''तू कशी काय इथे आलीस? कोणी पाहिले नाही ना तुला येताना?''.

''नाही रे! तुला फोन करायचा नव्हता म्हणून मग मी इथेच तुला भेटायचे ठरवले. भैरवशास्त्री काय म्हणाले ते तुला सांगायचे राहूनच गेले. आणि आईचा फोटो तुला दाखवायचा होता.''

डॉक्टरसाहेबांनी सॅक पाठीला लावली. ''चल सरपोतदारांच्या खोलीत जाऊ. बघ साडे अकरा वाजून गेलेत. ते नक्कीच त्यांच्या खोलीत नसणार. हीच योग्य वेळ आहे त्यांच्या खोलीत जायची. तिथे काही महत्वाचे धागेदोरे नक्कीच मिळतील.'',डॉक्टरसाहेब वैदेहीला हळू आवाजात बोलले. वैदेहीने होकारार्थी मान हलवली.

दोघेही भराभर चालत टेरेसच्या दरवाज्याकडे निघाले. परत जाण्याआधी डॉक्टर साहेबांनी शेवटचे वळून हवेलीकडे

बघितले. त्या अजस्त्र भव्यतेला नजरेत साठवून घेतले. आजची रात्र कायमची लक्षात राहिल. हा थरार आयुष्यभर विसरणे शक्यच नव्हते. जणू या थोडयावेळातच हवेलीशी एक वेगळेच नाते तयार झाले होते. मग जसे कोणा माणसाला सांगावे ना,'परत भेटूच' असे हवेलीला सांगावेसे उगाच वाटले. जणू ती हवेली कोणी जिवंत अस्तित्व असावे असे अंर्तमनाने का मान्य करावे कोणास ठाऊक?

वैदेहीच्या मागे चालत डॉक्टरसाहेब सरपोतदारांच्या खोलीपाशी आले. सरपोतदारांची खोली पहिल्या मजल्यावर शेवटची असल्याने तसे आजूबाजूला कोणी नव्हते. तसेही रात्रीचे साडेअकरा वाजून गेले होते. त्यामुळे असल्याने सगळे चिडिचुप्प होते..

दरवाजा उघडून दोघे पटकन आत आले आणि त्यांनी हळूच खोलीचा दरवाजा लावून घेतला. डॉक्टरसाहेबांनी हातानेच दिवे न लावण्याची खूण वैदेहीला केली. डॉक्टरसाहेबांनी सॅकमधली टॉर्च बाहेर काढली. टॉर्च लावताच सगळे दिसू लागले.

हं.....खोली बरीच मोठी होती. खोली स्वच्छ आणि नीटनेटकी ठेवली होती. एका बाजूला सिंगल बेड, बेडच्या बाजूला एका छोटया साईड टेबलावर मोठया शेडचा टेबललँप ठेवला होता. एका भिंतीला लागून लाकडी कपाट आणि जवळच टेबल-खुर्ची होती. खोलीच्या जडणघडणीवरून तरी ही खोली एका सुशिक्षित नीटनेटक्या सुसंस्कृत माणसाची वाटत होती म्हणजेच खोलीत

कुठेच त्यांच्यातले ते दुसरे आक्रमक असे व्यक्तिमत्व दिसत नव्हते. इथे फक्त सरपोतदारांचाच वावर होता.

तेव्हढयात डॉक्टरसाहेबांचे लक्ष एका बुक शेल्फ कडे गेले. बुक शेल्फ पुस्तकांनी भरलेले होते. ते पळतच पुस्तकांपाशी गेले आणि एक एक पुस्तक तपासून बघू लागले.

तेव्हढयात त्यातील एक गुढकथेचे पुस्तक तपासताना त्यातून दोन फोटो खाली पडले. डॉक्टरसाहेबांनी ते फोटो उचलले आणि टॉर्चच्या प्रकाशात तपासून पाहिले. त्यातील एक फोटो एका बाईचा होता. क्षणभर न्याहाळल्यावर ती नक्कीच ओळखिची वाटली. कुठेतरी हिला पाहल्या सारखे वाटले पण कुठे? हा ब्लॅक अँड व्हाईट फोटो बराच जुना होता. अं.....अं.....हिला नक्कीच कुठेतरी पाहिले आहे. अगदी नक्कीच!

मग जणू वीज पडावी, शॉक बसावा आणि साक्षात्कार व्हावा असे वाटले.....हो हो तेच वैदेहीचे डोळे आणि तीच चेहरेपट्टी.....या बाईत आणि वैदेहीत असलेले साम्य हा योगायोग नक्कीच नव्हता. म्हणजे अगदी तिच्यासारखे दिसणारे दूसरे कोणी कसे असू शकेल? ही काय तिची आई?.....

मग ते दूसरा फोटो तपासून बघू लागले. त्या ब्लॅक आणि व्हाईट फोटोत काही मुले एकसारख्या शालेय पोशाखात दिसत होती.

तसेच एक बाई त्यांच्या बरोबर फोटोत होती. हा फोटो नक्कीच पन्नास एक वर्षांपूर्वीचा असावा. डॉक्टरसाहेब निरखून फोटोकडे पाहू लागले. सरपोतदारांनी हा फोटो का बरे जपून ठेवावा? या फोटोचा त्यांच्या आयुष्याशी नक्कीच संबंध असणार. त्या फोटोतील मुलांच्या चेहऱ्याना ते तपासून बघू लागले. एका पंधरा वर्षांच्या मुलाची चेहरेपट्टी सरपोतदार साहेबांसारखी वाटली. हो हो तो मुलगा लहानपणाचे सरपोतदारच असणार कारण त्यांच्या कपाळावरची ती काळी जन्मखूण या मुलाच्या चेहऱ्यावरही होती. हं म्हणजे हा त्यांच्या शाळेचा फोटो असेल.

पण मग एक महत्वाची बाब त्यांना चांगलीच हबकवून गेली. त्या फोटोतील इमारतीवरचा बोर्ड..... 'बाल सुधार केंद्र', पुणे.

म्हणजेच सरपोतदार काय 'बालगुन्हेगार?' काय ते सुधारगृहात होते? ही माहिती धक्कादायक होती. डॉक्टरसाहेबांनी त्या दोन्ही फोटोंना त्यांच्या मोबाईलच्या कॅमेऱ्यात टिपून घेतले.

डॉक्टरसाहेब खोलितील इतर साहित्य तपासून पाहू लागले. मग साहित्यात काही हिशोबांच्या डायद्यया सापडल्या तर काही पावत्या होत्या. अगदी जुन्या हिशोबांच्या पावत्याही त्यांनी सांभाळून ठेवल्या होत्या. तेव्हढयात एका डायरीच्या मधोमध काहीतरी ठेवले असावे असे त्यांना जाणवले. म्हणजे महत्वाच्या

पानावर एखादी खूण म्हणून काही ठेवावे असे जाणवले. त्यांनी डायरीचे ते पान उघडले.

अरेच्चा हे तर व्हिजिटींग कार्ड.....मग मात्र डॉक्टरसाहेब चांगलेच हबकले. ते कार्ड होते डॉ सतिश मोघे, या पुण्याच्या मानसोपचार तज्ञाचे.

ते या मानसोपचार तज्ञाकडून इलाज करून घेत असणार. पण आता जणू एक नवीन बंद दरवाजा उघडावा असे वाटले कारण त्यांना पूण्याला जाऊन डॉक्टर सतिश मोघे यांच्याकडून सरपोतदारांची माहिती काढता येऊ शकणार होती.

मग कपाटात खालच्या कप्प्यात ठेवलेली एक फाईल त्यांच्या दृष्टीपथास पडली. डॉक्टरसाहेबांनी ती फाईल उघडून पाहिली. ती रिसॉर्टच्या जमिनीची कायदेशीर कागदपत्रे होती. ते फाईल परत ठेऊन देणार तोच त्यांचे लक्ष एका कागदावर पडले. त्या कागदावरील एका नावाने त्यांचे लक्ष वेधून घेतले. ते नाव होते सुधा विश्वास गोखले.

डॉक्टरसाहेबांनी मग ती फाईल आणून टेबलावर ठेवली आणि ते खुर्चीत बसून सगळी कागदपत्रे तपासून बघू लागले. जसे ते कागदपत्रे बघत गेले तसे त्यांचे हावभाव बदलत गेले. काय हे असू शकते? हे प्रकरण बरेच खोल आहे तर..... माझे ठोकताळे बरोबर असतील तर मात्र.....

''काय झाले मंदार? काय आहे त्यात?'', डॉक्टरसाहेबांचा धीरगंभीर चेहरा बघून वैदेहीने सावध होत विचारले.

''वैदेही तुझ्या आईचे माहेरचे नाव 'सुधा विश्वास गोखले' होते का?'',डॉक्टरसाहेब गंभीरपणे बोलले. वैदेहीने होकारार्थी मान हलवताच त्यांनी ती फाईल बंद केली आणि ते म्हणाले,''हा रिसॉर्ट, ही जमीन 'सुधा विश्वास गोखले' यांच्या मालकीची होती आणि अजूनही आहे. प्रॉपर्टी टॅक्सची पावती आजूनही त्याच नावावर आहे''.

''ही जमीन आईची आहे. पण मग स्वतःचे घर आणि मुलगी सोडून तिने असे का निघून जावे? असे काय झाले असावे? नाही नाही हे शक्य नाही. तिच्यावर कोणाचातरी दबाव आणला असणार. हो ती बिचारी घाबरली असणार!'',वैदेहीच्या चेहऱ्यार शंकाकुशंकांचा धुमाकूळ दिसत होता.

''तुझी शंका शंभर टक्के बरोबर आहे. स्वतःचे वडिलोपार्जित घर तिने का सोडून जावे? तिचे असे निघून जाणे मनाला पटत नाही. इथे खूप मोठे रहस्य दडले आहे. हे रहस्य सरपोतदार आणि त्या हवेलीतील बाईशी नक्कीच जोडले गेले असावे'' डॉक्टरसाहेब टेबलांचे ड्रॉवर उघडत बोलले. डॉक्टरसाहेबांचे बोलणे ऐकून वैदेही अवाक झाली. तिचा चेहरा पांढरा फटक पडला.

डॉक्टरसाहेब मात्र आता कपाटाचे ड्रॉवर एकामागोमाग उघडून तपासून बघू लागले. अखेर शेवटचा ड्रॉवर बंद करत ते नाराजीने बोलले,''सरपोतदारांनी त्यांच्या डायऱ्या कुठल्यातरी वेगळ्या ठिकाणी लपवून ठेवल्या असणार. वैदेही त्यांना आपली केव्हाच शंका आली आहे. ते अतिशय चाणाक्ष माणूस आहेत. ते मानसिक रूग्ण जरी असले तरी ते हुशार आहेत. त्यांना कोणतातरी धोका असल्याचे जाणवत असणार. ''

''काहीही असो पण तू बाबांच्या बाबतीत वाईट विचार करू नकोस. त्यांनी मला खूप कष्टाने मोठे केलंय. तेच माझी आई आणि तेच माझे वडील होते. ते भैरव शास्त्री हेच सांगत होते की त्या हवेलीतला तो आत्माच त्यांच्या कडून हे करवून घेत आहे. मग दुभंगलेले व्यक्तिमत्व हा रोग त्यांनाच का व्हावा? सांग ना? हे व्हायला तो आत्माच जबाबदार असणार.'',वैदेहीने निरागसपणे रडवेल्या आवाजात बोलली.

''वैदेही, त्यांना गंभीर मानसिक आजार आहे. सोज्वळ भासणारे तुझे वडील एक आक्रमक असे दुसरे व्यक्तिमत्व कायमच लपवून ठेवत आले आहेत. सगळे आपणहून ठीक होणार नाही. आत्तातरी एव्हडेच सांगतो की माझे ठोकताळे बरोबर निघत आहेत आणि मला हे प्रकरण समजायला लागले आहे. मग आमावास्येच्या रात्री त्या हवेलीत सगळयांनी जाऊया. काहितरी धक्कादायक माहिती मिळणारच. माझी खात्री आहे'',डॉक्टरसाहेब कपाटात फाईल ठेवतच बोलले.

वैदेहीच्या चेहऱ्यावरील गोंधळलेले भाव बघून ते म्हणाले,''अमावास्येनंतर मात्र काही दिवस याप्रकरणाच्या संदर्भात बाहेरगावी जावे लागेल कारण यांच्या मानसिक आजाराची मुळे त्यांच्या लहानपणात दडलेली आहेत. त्यांचे सगळे लहानपणच उलगडून बघावे लागेल, 'डॉक्टरसाहेब स्पष्टच बोलले.

डॉक्टरसाहेबांचे आत्मविश्वासपूर्ण बोलणे ऐकून वैदेही त्यांच्याकडे निरखून बघू लागली. त्यांचा हे प्रकरण सोडवण्याचा अट्टहास बघून तिला समाधान वाटले.

''मग मात्र सरपोतदार साहेबांना बरोबर सोळा जुलैला मी समोरासमोर गाठणार आहे आणि सगळे स्पष्टच सांगणार आहे. त्यांचे हे मानसिक आजाराचे गुपित हे त्यांनी हेतुतः लपवून ठेवले असेलही पण त्यांचा आजार आणि त्याचे गंभीर स्वरूप हे त्यांना मान्य करावेच लागेल. आपण सगळे सतरा जुलैला इथेच त्यांच्या आजूबाजूला थांबूया म्हणजे रात्री एक वाजता त्यांच्या जवळ बसून राहूया. तू बघशील त्यांना कहीच होणार नाही.''.

डॉक्टरसाहेबांचे बोलणे ऐकून वैदेही उठून उभी राहिली. तिच्या डोळयात अनेक शंका दाटल्या होत्या. ''म्हणजे तुला त्या अदृश्य बाईच्या असण्याबाबत काहीच शंका येत नाही? आपण तिचे बोलण्याचे आवाज ऐकले आहेत. आवाज हवेलीतूनच येत होते ना! मी भैरव शास्त्रींनी केलेल्या निदानालाही नाकारणार

नाही. त्या दिवशी त्यांनी एका मुलावर केलेला उपचार मी पाहिला आहे.'',वैदेही आश्चर्याने बोलली.

''जे दिसले, जे ऐकू आले यामागे दडलेले एक वेगळेच सत्य आहे. ते सत्य जगासमोर यायला जणू तयार आहे. मी त्या अदृश्य बाईच्या पाऊल खुणा शोधायला आलो होतो आणि मला त्या दृश्य अशा वेगळया स्वरूपात मिळाल्या आहेत. आता आमावास्येचा खेळ हा फक्त या पुढचा पुरावा मिळवण्यासाठीची औपचारीकता असणार आहे. ती बाई मला केव्हाच सखोल कळली आहे.'',डॉक्टरसाहेब आत्मविश्वासाने आणि ताठ मानेने बोलत होते.

''ठीक आहे मग भैरवशार्त्रीच्या मते खरंच अस्तित्वात असलेली अदृश्य 'ती' सापडते का बघू. त्यांनाही तिच्या असण्याबाबत इतकाच आत्मविश्वास आहे जेव्हडा तुला तिच्या नसण्याबाबत'',वैदेहीच्या डोळयात खोल रूतलेले ते प्रष्णचिन्ह आता अजूनच गडद झाले होते.

तेव्हढयात डॉक्टरसाहेब काही आठवल्यासारखे हावभाव करत बोलले, ''तू मला कोणतातरी फोटो दाखावणार होतीस ना?.''

तिने खिशातून मोबाईल फोन काढला. ''आईचा फोटो स्कॅन करून ठेवलाय तोच दाखवायचा होता. क्षणभरातच तिने मोबाईलमधला फोटो स्क्रिनवर घेतला. हा बघ'',फोन पुढे करत ती म्हणाली. डॉक्टरसाहेबांनी फोन हातात घेऊन तो फोटो

निरखून पाहिला आणि..... त्यांच्या पायाखालची जमिनच सरकल्यासारखे वाटले.

म्हणजे हे काय? ही काय गडबड आहे? ही बाई कोण आहे? ही बाई नक्कीच हिची आई नसणार. ही वयाने खूप मोठी दिसत होती. तसेच तिची चेहरेपट्टी खूपच वेगळी होती. काळयावर्णाची ती बाई जणू कोणी वेगळीच होती. डॉक्टरसाहेब केसांवरून हात फिरवत येरझाऱ्या घालत विचार करू लागले. अखेर ते एका खुर्चीत डोक्याला हात लावून बसले.

तेव्हढयात त्यांना काय जाणवले कोणास ठाऊक? त्यांनी त्यांच्या मोबाईलमध्ये टिपलेला तो सूधारगृहाचा फोटो परत पाहिला. क्षणभर तो फोटो बघताच त्यांच्या पायाखालची जमिनच सरकली. धक्का लागावा असा त्यांचा चेहरा पांढरा फटक पडला.

अं हे काय? काय हे शक्य आहे? त्या बाईची ओळख इतक्या लवकर पटेल असे त्यांना वाटले सुद्धा नव्हते. पण काळाआड लपलेले सत्य जणू परत बाहेर येत होते. पुस्तकात दडवलेल्या त्या दोन फोटोंनी कमालच केली होती. डॉक्टरसाहेबांच्या चेहऱ्यावर आनंद झळकू लागला कारण तपासात एक पाऊल पुढे टाकले गेले होते.

वैदेहीच्या मोबाईलमधल्या फोटोतील बाई सुधारगृहाच्या फोटोत सुद्धा होती. हो हो अगदी तीच होती. ती कोणी सुधारगृहात काम

करणारी कर्मचारी बाई असावी. कारण तिचा युनिफॉर्मही तसाच होता.

म्हणजे ती बाई वैदेहीची आई म्हणून काही वर्षे येथे राहिली होती तर! वैदेहिची खरी आई निघून गेली आणि मग ही बाई येथे येऊन राहिली. वैदेहीलाही हिच बाई तिची आई असल्याचे सांगण्यात आले असावे. लहान वैदेहीला कुठे काही कळणार होते.

पण का? कशासाठी? मग अचानक ती पण निघून गेली?

या बायकांनी हे असे अचानक निघून का आणि कोठे जावे? का त्यांचे काही बरेवाईट झाले असावे? या बायकांचे गायब होणे आणि त्या अदृश्य बाईचे हवेलीत असणे याचा काय संबंध असावा? .....

६.अमावास्या

आज अमावास्या.....आजच रात्री हवेलीत जायचे ठरले होते.....हं.....दिर्घ श्वास घेऊन डॉक्टर साहेब सामानाची बॅग भरू लागले. त्यांची नेहमीची सॅक, कॅमेरा, जर्किन आणि इतर उपयोगी वस्तू एकामागोमाग एक सॅक मध्ये ठेवण्यात डॉक्टरसाहेब व्यस्त होते. तेव्हढयात फोनची रिंग वाजली आणि डॉक्टरसाहेबांनी फोनवरील नंबर चेक केला तर फोन वैदेहीचा होता.

फोन उचलताच ती रडवेल्या आवाजात बोलू लागली,''हं मंदार, मला खूप भिती वाटते रे. ज्या हवेलीकडे रात्री नुसते बघावेसे सुद्धा वाटत नाही त्या हवेलीत जायचे म्हणजे! तेही अमावास्येच्या रात्री? अचानक अंधारातून कोणी समोर येऊन उभे ठाकले तर? काहीतरी अमानवीय? मी खरंच या सगळयाला वैतागली आहे. हे सगळं मला सहन होत नाही.'',बोलताना तिचा कंठ दाटून आला आणि ती ओक्षाबोक्षी रडू लागली.

''अगं अशी काय करतेस? मन घट्ट कर बरं. इथपर्यत आलोच आहोत तर पुढे गेलेच पाहिजे. हे सगळं लवकरच संपेल अशी मला खात्री आहे.'', काही असो वैदेही मात्र जाम हादरली होती. आज काय होईल काय माहित? ज्या हवेलीची भीती तिला लहानपणापासून घातली गेली होती त्या हवेलीत असे रात्रीचे जाणे

बिचारीला चांगलेच जड जात होत. अखेर रडतच तिने फोन बंद केला.

आज वातावरणही वादळी होते. सुसाट वारा खिडक्यांचे पडदे उडवून खोलीत प्रवेश करत होता. वाऱ्यामुळे टेबलावरचे वर्तमानपत्र सारखे उडून खाली पडत होते. वाऱ्याचा जोर बघता खिडक्या बंद करून घेणे योग्य होणार होते. डॉक्टरसाहेबांनी हातातील सॅक परत खाली ठेवली आणि पळतच ते खिडकीजवळ आले. वाऱ्याच्या जोरामुळे खिडकी बंद करताना त्यांना चांगलेच झगडावे लागले. खिडकी बंद होताच त्यांनी काचेतून बाहेर नजर टाकली. ''हं आज पाऊस हैदोस घालणार असं वाटतंय. आजच्या दिवसाची एव्हडी तयारी केली आणि पावसाने त्यावर पाणी पडायला नको.'',डॉक्टरसाहेब मान हलवत स्वतःशीच बोलले.

आजच्या रात्रीसाठी तयारी करणे तसे सोपे नव्हते. त्यासाठी मागील काही दिवसात डॉक्टरसाहेबांनी हवेलीची अंतर्गत रचना लक्ष देऊन बघून घेतली. मुख्य दरवाजा कुठे आहे?, कुठल्या खोलीत येऊन बसायचे? सरपोतदार कोणत्या खोलीत येत असतील? असे बरेच आराखडे बांधत आमावास्येचा प्लॅन तयार झाला होता.

रात्रीच्यावेळी जागृत होणाऱ्या त्या अदृश्य बाईच्या कोणत्याच ठळक खूणा सकाळी हवेलीत आढळत नव्हत्या. ती अदृश्य बाई

म्हणजे प्रत्येकाच्या दृष्टीने जणू वेग-वेगळे रूप होती. भैरवशास्त्री तीला अतृत्प आत्मा म्हणत असत तर सरपोतदारांच्या मते ती त्यांना मुक्त करायला आलेली देवदूत होती, तर वैदेहीला ती कोणी अमानवीय अस्तित्व भासत असे तर डॉक्टरसाहेबांच्या मते ती काल्पनिक भास होती. हं म्हणजे प्रत्येकाच्या कल्पने प्रमाणे नकळतच पण प्रत्येकाने जणू तिला अस्तित्व दिले होते.

काही दिवस डॉक्टरसाहेब सकाळी हवेलीत फेरफटका मारत असत आणि रात्री टेरेसवर जाऊन हवेलीच्या बाजूने येणारे आवाज ऐकत असत. बाईच्या गाण्यांचे आवाज, हसण्याचे आवाज, गप्पा मारण्याचे आवाज, रडण्याचे आवाज.....ते सगळे काही मन लावून ऐकत असत. मग जवळच्या डायरीत जे काही अनुभवले ते सगळे इत्यंभूत नमूद करत असत. कुठला धागा कुठे जुळेल हे काय सांगता येईल? तिकडे डॉक्टरसाहेबांनी वैदेहीला सतत बाबांबरोबर थांबायला सांगितले असल्याने ती दोन दिवस त्यांच्यावर नजर ठेऊन होती. दोन दिवस तिला डॉक्टरसाहेबांशी काही संपर्क करायलाही मनाई केली होती. बस्स आता आजची रात्र तपासाला कलाटणी देणारी ठरणार अशी खात्री सगळयांनाच वाटत होती.

वैदेहीने सकाळी भैरवशास्त्रींना फोन केला. भैरवशास्त्री त्यांच्या शब्दाचे पक्के होते. ''मी काहीही विसरत नाही. आठवण करून द्यायची गरज नाही. आमावास्येच्या रात्री दहा वाजता मी

हवेलीच्या दारात येईन. माझी सगळी तयारी झाली आहे. हवेलीत जाऊन मी सर्वेक्षण केले आहे. त्या रात्री तूम्हाला यायचे असेल तर आपण पण दहा वाजता तिथे या.''.भैरवशास्त्री गरजतच बोलले.

डॉक्टरसाहेबांची तयारी केव्हाच संपली होती. त्यांची जरूरी सामानाची सॅक केव्हाच तयार होती. कॅमेराही सॅकच्या शेजारीच ठेवला आणि मग त्यांनी जर्कीनच्या आतल्या खिशात चाकू ठेवला असल्याची खात्री करून घेतली. गोल टोपी आणि जर्कीन खुर्चीवरवरच ठेवला. मोबाईल चार्जरला लावला. ऐत्यावेळी बस्स मोबाईल खिशात ठेवायचा, कॅमेरा गळयात अडकवायचा, सॅक पाठीला आडकवायची आणि बाहेर पडायचे. हं तयारी झाली असे म्हणायला हरकत नाही.

वैदेही मात्र खोलीत डोके धरून बसून होती. मनावर प्रचंड मोठे दडपण होते. टेंशननी जीव पार घाबरा झाला होता. रक्तदाब वाढला होता की काय कोणास ठाऊक पण डोके जड वाटू लागले. पोटात पिळवटल्यासारखे होऊ लागले. ''हे मला नाही सहन होत. हे सगळे माझ्या शक्तिच्या पलिकडचे आहे.'',ती कपाळावर हात आपटत पुटपूटत होती. मग डोळयातील अश्रू पूसत ती स्वतःशीच बोलली,''फक्त तुमच्या साठी बाबा. फक्त तुमच्याच साठी'' अखेर ती तिच्या बेडवर पहुडली आणि छताकडे पहात विचार करत पडून राहिली.

विजेच्या कडकडाटानी दचकून डॉक्टरसाहेब भानावर आले. किलकील्या नजरेने त्यांनी आजूबाजूला पाहिले. तेव्हढयात विजेच्या लखलखाटाने क्षणभरासाठी खोली झगमगून गेली. विजेचा झगमगाट बघून त्यांना जोरदार पावसाच्या आगमनाची जणू चाहूल लागली. ''वा! छान म्हणजे दुष्काळात तेरावा महिना. हवेलीत आमावास्येमुळे अजूनच अंधार असणार.'',डॉक्टरसाहेब वैतागलेल्या आवाजात बोलले. तेव्हढयात विजेच्या कडकडाटाने जणू सगळे आसमंत परत दणाणून गेले. डॉक्टरसाहेबांनी दचकून खिडकीकडे पाहिले. वीज जवळपासच पडली असावी

तसे म्हणायचे तर पावसाळा ऐन भरात होता. पाऊस हा येणारच होता. पण तरीही आजचे निसर्गाचे रूप जरा जास्तच रौद्र वाटले. विजांचा लखलखाट, वादळवाऱ्याचा घोंगावणारा आवाज, उडणारा पालापाचोळा, झाडांच्या फांद्या तुटण्याचा आवाज.....आज काय झालंय वातावरणाला? का वातावरणही जणू धोक्याची सूचना देतंय? आज नक्कीच काहीतरी अविश्वसनीय घटणार असल्याची जणू चाहूल त्यांना लागली. डॉक्टरसाहेबांनी विचार झटकत मनगटावरील घडयाळयाकडे पाहिले. रात्रीचे नऊ वाजले होते. तेव्हढयात धाड् असा स्फोटाचा आवाज आला आणि रिसॉर्टचे लाईटही गेले.

आवाजामुळे वैदेही दचकून भानावर आली. तिने बाजूला ठेवलेला मोबाईल फोन हातात घेत किती वाजले याचा अंदाज घेतला. नऊ

वाजत आलेत हे पाहिल्यावर तिच्या चेहऱ्यावरील भाव क्षणात बदलले. तिच्या डोळयात परत तीच भीती थैमान घालू लागली.

''हं ती वेळ आलीचतर, आता निघावेच लागेल..'',स्वतःशीच पुटपूटत ती उठून उभी राहिली आणि खुर्चीवर ठेवलेले निळया रंगाचे जर्किन तिने अंगावर चढवले. वाऱ्यामुळे विस्कटलेले केस तिने नीट करत पोनीटेल मध्ये घट्ट बांधले. बूटाच्या लेस लावून झाल्यावर ती क्षणभर खुर्चीतच शुन्यात बघत बसून राहिली. जणू युद्धात समोर उभ्या ठाकलेल्या शत्रूच्या अचाट सामर्थाची कल्पना असूनही पुढे लढण्यासाठी जाणाऱ्या सैनीकांप्रमाणे तिची अवस्था झाली असल्यासारखे तिला उगाच वाटले.

तेव्हढयात जर्किनच्या खिशातील मोबाईल फोन वाजला आणि ती दचकून भानावर आली. फोन डॉक्टरसाहेबांचा होता. ''मी तझ्या खोलीच्या बाहेरच उभा आहे. चल लवकर पाऊस सुरू व्हायच्या आत तिथे पोहचू.'', डॉक्टरसाहेब हळू आवाजात बिचकतच बोलत होते.

खोलीचा दरवाजा हळूवार बंद करून तिने आजूबाजूला पाहिले. तेव्हढयात वीज चमकली आणि विजेच्या लखलखाटात तिला पायऱ्यांवर डॉक्टरसाहेब उभे असलेले दिसले. ते हातानेच चल लवकर अशी खूण करत होते. वैदेही पळतच डॉक्टरसाहेबांपाशी गेली.

''स्वयंपाकघराच्या मागच्या खिडकीतून बाहेर जाऊ.'',वैदेहीने कुजबुजत कळवले. मग दोघे क्षणाचाही विलंब नकरता स्वयंपाकघराच्या दिशेने निघाले. गुडूप्प आंधारात फक्त विजेच्या चकचकाटामुळेच मार्ग दिसायला मदत होत होती. मागच्या खिडकीचा दरवाजा हळूच उघडून दोघांनी बाहेर उडी मारली. बाहेर येताच डॉक्टरसाहेबांनी टॉर्च सुरू केली. घराच्या बाहेर येताच वादळाचा जोर त्यांना चांगलाच हबकवून गेला. डॉक्टरसाहेबांनी वाऱ्याच्या जोरामुळे खिडकी अतिकष्टाने परत बंद केली. अंधारात टॉर्चच्या प्रकाशाचाच आधार होता. आजूबाजूचा अंदाज घेत दोघे वादळवाऱ्याला झेलत मार्गस्त झाले.

वादळ वाऱ्यात आणि उडणाऱ्या पाल्यापाचोळयात साधे चालणेही अवघड होत होते. वाऱ्याने वेडीवाडी हलणारी झाडे आणि जमिनीवर पडलेल्या फांद्या बघता कोणते झाड अंगावर पडेल याची काय शाश्वती? हो हो पटकन गेलेलेच बरे. हातातील टॉर्चच्या झोतात दोघे अंदाज घेत पुढे पळतच निघाले. वैदेही डॉक्टरसाहेबांच्या पाठोपाठच थोडया अंतरावर होती. मग थोडे पुढे गेल्यावर थोडयाच अंतरावर रिसॉर्टच्या हद्दीची भिंत दिसू लागली. हो हो हीच भिंत पार केली की हवेलीचा परिसर सुरू होणार होता. रिसॉर्टच्या मागच्या उंच भिंतीपाशी येऊन दोघे क्षणभरासाठी थांबले.

''भिंत ओलांडून पलिकडे जावे लागेल. बघ तिथे शिडी आहे.'',वैदेही हाताने शिडीकडे खूणवत ओरडतच बोलली.

घोंगावणाऱ्या वाऱ्याच्या घूं.....घूं..... आवाजात आणि ढगांच्या गडगडण्याच्या आवाजात एकमेकांचे बोलणेही नीट ऐकू येत नव्हते. आता शिडी लावून मग वादळात तोल सांभाळत पलिकडे जाणे म्हणजे चांगलीच कसरत होणार होती.

''त्याची गरज नाही. पलिकडे जाण्याचा दूसरा मार्ग आहे.'',ओरडतच डॉक्टरसाहेबांनी हातानेच खूण करत थांबायला सांगितले. मग पटकन त्यांनी तिथलीच एका झाडाची फांदी बाजूला केली आणि काय आश्चर्य त्याच्या मागे बेमालूम लपवलेली भेग होती. हो हो हवेली आणि रिसॉर्टच्या मधल्या भिंतीला भेग पडली होती. त्यातून जेमतेम एक माणूस कसाबसा पलिकडे जाऊ शकेल एव्हडा तिचा आकार असेल. भेग बघून वैदेहीच्या चेहऱ्यावर आश्चर्य पसरले.

''दोन दिवस टेरेसवर बसून मी सरपोतदारांना इथूनच जाताना बघितले. बघ ना नाहीतर हवेलीपर्यंत मुख्य रस्त्याने पाहोचणे अवघड आहे. दूसरा मार्ग असणारच असे मला वाटतच होते'', डॉक्टरसाहेबांनी ओरडतच वैदेहीला सांगितले. डॉक्टरसाहेबांचे दररोज टेरेसवरून पहाणी करणे उपयोगीच ठरले. त्यांनी वैदेहीला भेगेतून पलिकडे जाण्याची खूण केली. वैदेही वाकून भगदाडातून पलिकडे गेली. मग डॉक्टरसाहेबही तिच्यामागून पलीकडच्या बाजूला आले. येताच फांदी परत तशीच ठेवायला ते विसरले नाहीत. कारण थोडयाच वेळात

सरपोतदार साहेब इथूनच हवेलीत येणार होते. त्यांना उगाच कुठली शंका नको यायला.

आता रिसॉर्टची हद्द संपली होती आणि त्यांनी हवेलीच्या आवारात प्रवेश केला होता. अंधाराला छेदत, काटेरी झुडूपांमधून कच्चया रस्त्याने चालत जाणे म्हणजे परीक्षाच होती. पण झुडपातून मार्ग काढत आणि एक एक पाऊल सावधतेने टाकत दोघे बघता बघता हवेली समोरच्या मोकळया जागेत येऊन उभे राहिले.

डॉक्टरसाहेबांनी झुडूपातून बाहेर येताच पाठीवरची सॅक काढली आणि ते वैदेहीकडे बघून बोलू लागले,''आता तुलाही टॉर्च लावायला हरकत नाही. हवेलीत तर अंधाराचे राज्य असणार. हवेलीत वीज नाही. दोन टॉर्च लागणारच.''

पण वैदेहीचे त्यांच्या बोलण्याकडे लक्षच नव्हते. वादळवाऱ्यात कसेतरी पाय रोऊन ती स्तब्द उभी समोर बघत होती. ''वैदेही अग मी काय बोलतोय?'',डॉक्टरसाहेबांनी वैदेहीकडे आश्चर्याने पाहिले. पण ती समोरचे दृश्य निशब्द होऊन बघत राहिली होती. तिच्या डोळयात जणू ती हवेली दाटली होती. डॉक्टरसाहेबांनी त्या दिशेला नजर टाकली आणि हबकल्यासारखे ते सावध होत बघतच राहिले.

विजेच्या चकमकाटात त्या हवेलीला बघून जणू त्यांच्या तोंडचे पाणीच पळाले. हवेलीने जणू रूप बदलावे असे वाटले. बलाढय शस्त्रूने हल्ला करण्यासाठी अगदी पूढयात येऊन उभे ठाकावे

असे वाटले. विजेच्या चकमकाटात ती हवेली जणू एखाद्या ताकदवान आणि अवाढव्य दानवा प्रमाणे शक्तिप्रदर्शन करत आव्हान देत असल्याप्रमाणे भासली. हं खरंच हिला रात्री काय होते कोणास ठाऊक? विजेच्या लखलखाटात त्या भव्य इमारतीला बघताना जणू स्वतःच कोणतातरी भयपट जगत असल्यासारखे वाटले. उंच नक्षीदार खांब, कोरीव कमानी, मोठे कोरीव दरवाजे हे सर्व लखलखणाऱ्या विजांचा प्रकाश पडला की क्षणभरापुरते स्पष्ट दर्शन होत असे नाहीतर मग अंधारातूनच कोणी आपल्याकडे टक लावून बघत आहे असे वाटे .....

डॉक्टरसाहेब मान झटकून भानावर आले. डॉक्टरसाहेबांनी अविश्वासाने वैदेहीकडे पाहिले. वैदेही मंत्रमुग्ध अवस्थेत हवेलीकडे बघत होती. तिचे थरथरणारे हात, पांढराफटक पडलेला चेहरा, तिची स्थंबीत अवस्था निक्षून सांगत होती की, तिचा धीर खचला होता. हं हवेलीने अंधाराला हाताशी धरून खेळ केव्हाच सुरू केला होता.

''वैदेही चल मुख्य दरवाजापर्यंत जाऊ या'',डॉक्टरसाहेब जरा मोठया आवाजातच बोलले. त्यांच्या बोलण्याने तिची तंद्री तुटली आणि तिने डॉक्टरसाहेबांकडे पाहिले. मग तंद्रीतच तिने मान हलवत होकार दिला आणि डॉक्टरसाहेबांच्या मागे चालत निघाली. तेव्हढयात पावसाचे मोठे मोठे थेंब जमिनीवर कोसळू लागले. वैदेहीने आकाशाकडे पहात अंदाज घेतला. आकाशातून

पडणाऱ्या पावसाचे थेंब तिच्या चेहऱ्यावर पडताच तिने मान वळवून घेतली. नक्कीच आज पाऊस रात्रभर थैमान घालणार होता.

''पाऊस सुरू झालाय, लवकर चल.'',डॉक्टर साहेब ओरडत परत बोलले. पावसापासून वाचण्यासाठी आता दोघे पळतच मुख्य दरवाज्याच्या दिशेने जाऊ लागले. जसे त्यांचे हवेलीच्या बाजूने पाय पडू लागले तसे तो भलामोठा भव्य लाकडी बंद दरवाजा जवळ येत गेला.

दरवाज्यासमोरच्या मोठया कमानीखाली येताच आडोसा मिळाला आणि पावसापासून सुटका झाली. आत जाण्याआधी क्षणभर इथं थांबावे लागणार होते. डॉक्टर साहेबांनी पाठीवरची सॅक काढली आणि जमिनीवर ठेवली. सॅकमधील नॅपकीन काढून त्यांनी त्यांचा ओला चेहरा पुसला. मग विजांच्या उजेडात त्यांनी वैदेहीकडे पाहिले. पावसाने ओली झाली असली तरी त्याकडे दुर्लक्ष करून ती उंच कोरीव दरवाज्याकडे बघत उभी होती. डॉक्टरसाहेबांनी त्या अंधारलेल्या कमानीखाली उभे राहून आजूबाजूला नजर टाकली. विजांचा प्रकाश आता यापुढील प्रवासात उपयोगी होणार नव्हता याचा अंदाज येताच त्यांनी टॉर्चचा झोत आजूबाजूला टाकत ते बघू लागले. पण सगळेकाही निर्यमनुष्य आणि स्थब्द होते. या काळया अंधाऱ्या बांधकामात जीवंतपणाचा मागमूसही नव्हता.

''दरवाजा कसा उघडायचा? याला तर लोखंडी साखळी आणि कुलूप लावलंय.'',वैदेही दरवाजाकडे बघत बोलली. यावर डॉक्टर साहेबांचे उत्तरही तयारच होते.

''आपण इथून आत जायचेच नाही. आपण जवळच्याच एका खिडकीतून आत प्रवेश करायचा. तुझे बाबा कुठून आत जातात हे जरी कळले नसले तरी आतल्या एका खिडकीची कडी लागत नाही आणि ती फक्त लोटलेली असते हे मला माहित आहे. दोन दिवस मी इथेच फेरफटका मारत होतो. मी सगळे तपासले आणि पाहिले आहे'',डॉक्टरसाहेब बोलताना बॅटरीचा झोत आजूबाजूला टाकत आवार न्याहळत होते.

आता मात्र पाऊस चांगलाच कोसळू लागला. झाडाझुडपांवर, हवेलीच्या छतावर आणि दूरवरच्या प्रत्येक बांधकामावर आदळणाऱ्या पावसाने आवाज करत जणू स्वतःचे आगमन प्रकर्षाने जाणवून दिले. पावसाचा आवाज सर्वदूर पसरला.

तेव्हढयात धडाम् धड्, बंद दरवाज्याच्या मागून काहीतरी पडल्याचा आवाज झाला. आवाज ऐकताच दोघांनी एकमेकांकडे आश्चर्याने पाहिले. मग सावध होत वैदेही उस्त्फुर्तपणे दरवाजापासून लांब सरकली. मग क्षणभर दोघे आवाजाचा अंदाज घेत तिथेच उभे राहिले. पण बराच वेळ थांबूनही दरवाज्यामागून परत आवाज आला नाही.

डॉक्टरसाहेबांनी वैदेहीकडे हसून पाहिले आणि ते म्हणाले,''माणसाच्या मनात एकदा भीती बसली ना, की मग प्रत्येक गोष्टीचा वेगळाच अर्थ काढला जातो. त्यात अंधार आणि हा पाऊस म्हणजे.. ''. तेव्हढयात वैदेहीने हाताने खूण करून शांत राहण्यास सांगितले. आता मात्र दोघांच्या काळजाचा ठोकाच चुकला.....खरंच लांबून माणसांच्या बोलण्याचा अस्पष्ट आवाज येऊ लागला.

कोणीतरी आत होते. हो हो नक्कीच होते. वैदेहीच्या डोळयातून भीती, आश्चर्य, उत्कंठा ओसंडून वाहू लागली. काय हवेली खरंच खेळ करायला लागली होती? अंधारात आणि बंद दरवाज्यामागे असे कोण असणार? पण डॉक्टरसाहेबांच्या चेहऱ्यावर मात्र फक्त सर्व जाणून घ्यायची उत्कंठा दिसत होती.

''जो कोणी असेल त्याला आतच जाऊन भेटू. बघ मी माझ्या मतावर अजूनही ठाम आहे. जे ऐकू येतंय त्याचे स्पष्टीकरण नक्कीच मिळेल. भैरवशास्त्रीच आत असण्याची शक्यता आहे. इथे थांबून वेळ घालवणे योग्य होणार नाही'',डॉक्टरसाहेबांच्या आत्मविश्वास पूर्वक बोलण्याने वैदेहीला जीवात जीव आल्यासारखे वाटले.

''पण भैरवशास्त्रींनी दरवाजापाशीच उभे राहण्यास सांगितले होते. ते इथेच येणार आहेत. उगाच चुकामूक नको व्हायला.'',वैदेहीने शंका बोलून दाखवली.

''आत गेल्यावर त्यांना फोन करूया. दरवाज्यासमोर उभे राहिल्यावर उगाच कोणाला आपण दिसण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच बघूया भैरवशास्त्री खरंच आज येतात का? तसेही माझा तपास त्यांच्या येण्यावर किंवा न येण्यावर अवलंबून नाही.'',डॉक्टर साहेब आत्मविश्वास पूर्वक बोलले.

डॉक्टरसाहेबांनी वैदेहीला त्यांच्या मागे येण्याची खूण केली. दोघे पळतच एका खिडकीपाशी आले. तळमजल्यावरच असलेल्या त्या उंच खिडकीला डॉक्टरसाहेबांनी ढकलून उघडले आणि एका दगडावर चढत त्यांनी खिडकीतून आत प्रवेश केला. मग खिडकीत उभे राहून त्यांनी वैदेहीला आत घेण्यासाठी हात पुढे केला. दोघे आत जाताच डॉक्टरसाहेब खिडकी बंद करायला विसरले नाहीत.

वैदेहीने जर्किनच्या खिशातून फोन बाहेर काढला आणि भैरवशास्त्रींना फोन लावला. समोरून लगेचच उत्तर आले. ''मी आलोय आणि मी माझे काम केव्हाच सुरू केलेय. हवेलीच्या आत मध्यभागी या.'',भैरवशास्त्रींचे बोलणे ऐकून वैदेहीला आश्चर्यच वाटले.

''ते हवेलीच्या आत मध्यभागी या, असे म्हणाले.'',वैदेही हळू आवाजात बोलली. पण डॉक्टरसाहेब केव्हाच पूढे गेले होते. वैदेही अंदाज घेत भांबावल्यासारखी आजूबाजूला बघू लागली.

तेव्हढयात खोलीच्या टोकाला असलेल्या दरवाज्याजवळ तीला टॉर्चचा प्रकाश दिसला.

''वैदेही चल पुढे.'',डॉक्टरांनी तिला हाक मारली. आता हवेलीत अजून आत जाणे भागच होते. डॉक्टरसाहेबांनी खोलीचे उंच आणि मोठे लाकडी दार थोडे उघडले होते आणि ते दरवाज्यातच उभे राहून वैदेहीला पुढे चालण्यासाठी बोलावत होते. वैदेही पळतच दरवाज्यापाशी पोहोचली. दरवाज्यात उभे राहून वैदेही पुढील अंधारात काही दिसते का, याचा अंदाज घेऊ लागली. टॉर्चचा प्रकाश सर्व पहायला तोकडाच होता.

तेव्हढयात वीज चमकली आणि क्षणभरासाठी वीजेचा लखलखाटाचा उजेड हवेलीच्या अगणित खिडक्यांमधून आत येत हवेलीचा आतला भाग दर्शवून गेला आणि श्वासच रोखला गेला..... मोठे सभागृह असावे अशी मोकळी जागा आणि त्याला चहूबाजूने असलेल्या खोल्यांचे बंद दरवाजे दिसले. त्या सभागृहाच्या चहूबाजूला पुतळे ठेवलेले होते आणि भिंतींवर पेंटींग्ज लावली होती.

''हे भव्य आणि अद्भुत आहे म्हणजे ही स्थापत्यकला, हे नक्षीकाम, ही कलाकुसर डोळयाचे पारणे फेडणारी आहे. आज ही हवेली अशी भयाण आणि मोकळी आहे पण कधी काळी ही हवेली माणसांनी गजबजली असेल नाही. कधी काळी ऐश्वर्य उपभोगलेल्या या वास्तूची शान काय असावी नाही का?'', वैदेही मंद्रमुग्ध अवस्थेतच बोलली.

तेव्हढयात वैदेहीची तंद्री मोडणारा डॉक्टर साहेबांचा आवाज मागून ऐकू आला,''हं अगं इथे उगाच थांबायचे कशाला? चल पुढे! काय विचार करतीएस?'' यावर वैदेहीने हसून फक्त होकारार्थी मान हलवली. या भयावह क्षणी सुद्धा जणू कल्पनाशक्तीने काम चोख केले होते. या राजवाडयाचा राजेशाही थाट आणि त्या राजबिंडया रूबाबदार राजाला तिने जणू मनोमन कल्पना करत पाहिले होते.

मग दोघे पळत त्या मोकळया सभागृहाच्या मध्यभागी आले. वैदेही टॉर्चच्या प्रकाशात आजूबाजूचे दृश्य डोळयात भरून घेऊ लागली. ''हे बघ तो समोरचा दरवाजा आहे ना त्यातून आपल्याला मध्यवर्ती सभागृहात जाता येते'', डॉक्टरसाहेबांनी माहिती दिली. दोघे भराभर चालत त्या दरवाज्यापाशी पोहोचले. ते दरवाजा ढकलणार तोच....

'खट्‌खटाक खट्‌',.....काळजाचा ठोका चुकवणारा आवाज येऊ लागला. कोणीतरी त्या दरवाज्याच्या मागे होते. हो हो अगदी समोरच्याच दरवाज्याच्या मागे. आता पळणेही अशक्यच. कोणीतरी आतून दरवाज्याची कडी काढत होते. कोणीतरी त्यांना गाठले होते.

आवाज ऐकून डॉक्टर साहेब पुढे सरसावले आणि एका निडर योद्धया प्रमाणे दरवाज्याच्या समोर उभे राहिले. जणू ते काही

होण्याची वाटच बघत होते. समोरून येणाऱ्या कोणालाही भेटायला ते सज्ज होते.

दरवाजा उघडला गेला आणि दरवाज्यात ती उंचीपुरी व्यक्ती उभी होती. एका हाताने दरवाजा ढकलून त्यांच्या अगदी पुढयात येऊन उभी राहिली.

अगदी समोर उभ्या असलेल्या त्या व्यक्तीने एकटक डॉक्टर साहेबांच्या चेहऱ्याकडे निरखून बघायला सुरवात केली. त्या व्यक्तीच्या हातात मशाल होती. मशालीचा लालसर प्रकाश त्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर पडला होता. तो लालसर प्रकाश त्यांच्या घाऱ्या पारदर्शी डोळयात परावर्तीत झाला होता आणि जणू त्यांचे डोळे लालसर असावे असा आभास होत होता. कपाळावर भस्म, गळयात रूद्रक्षाची माळ, मजबूत शरीरयष्टी आणि डोळयात प्रचंड आत्मविश्वास .....

''हे भैरवशास्त्री आहेत.'',वैदेहीने ओळख करून दिली.

मग डॉक्टर मंदार साने यांनी पुढे होत स्वतःची ओळख दिली. दोन विरूद्ध विचारसरणीचे आणि विरूद्ध व्यवसायाचे आज जणू द्वंद्वच होते. दोन निष्णात योद्धे जणू स्वतःला सिद्ध करायला कटिबद्ध होते. आपापल्या विचारसरणीवर प्रचंड विश्वास ठेवत मैदानात कणखरपणे पाय रोऊन उभे होते. पण आज त्या दोघांचा शत्रूमात्र एकच होता.

''हं आपण मानसोपचार तज्ञ आहात वैदेहीने मला आपण येणार असल्याचे कळवले होते. ठीक आहे तर, कामाला सुरवात करूया. माझे उपाय आपल्यापेक्षा बरेच वेगळे आहेत. पण मी आपल्या कामात कधीच आडकाठी होणार नाही.'',भैरवशास्त्री स्पष्टपणे आणि कणखर आवाजात बोलले.

''हो माझे काम मी करत राहीन. आपल्याला डिस्टर्ब्ड करणार नाही.'',डॉक्टरसाहेब उत्तर देत बोलले.

''आपण बरेच आधी येणे केलेले दिसते?'',वैदेहीने विचारणा केली.

''हो एका खोलीत मला तिचे अस्तित्व जाणवले. मी तिथे एक हवन करायचे ठरवले होते आणि आता रात्री अकरा वाजता आपण तिच्या शक्तिप्रदर्शनाची अपेक्षा करू शकतो. आज अमावास्या आहे.'',भैरवशास्त्रींनी माहिती दिली

त्यांच्या बोलण्याचा वेगळाच परिणाम डॉक्टरांच्या चेहऱ्यावर दिसू लागला. डोळयात उमटलेला अविश्वास आणि आपसूकच ओठांवर उमटलेले मिश्कील स्मित हास्य.

भैरवशास्त्रींनी दोघांना त्यांच्या मागे येण्यास सांगितले. मग बरीच दालने आणि खोल्या पार करत ते तिघे एका मोठया खोलीत येऊन पोहोचले. त्या खोलीत मधोमध एक टेबल आणि एकमेकांसमोर मांडलेल्या दोन खुर्च्या दिसत होत्या. बाकी इतर खोली मोकळीच होती. कोपऱ्यात भैरवशास्त्रींचे दोन शिष्य

हवनाची सामूग्री परत पिशवीत भरून ठेवत जागा साफ करण्यात व्यस्त होते.

भैरवशास्त्री त्यांच्या शिष्यांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्यापाशी निघून गेले. ते गेल्याचे बघून वैदेहीने डॉक्टर साहेबांना प्रष्ण विचारला.,''तुला काय वाटते? बाबा आणि ती खरंच या खोलीत येतात?''

''हो वैदेही मलाही असेच वाटते की तूझे वडील याच खोलीत येतात. पण माझा तर्क वेगळया ठोकताळयांवर अवलंबून आहे. मी दोन दिवस या हवेलीत फिरतोय आणि फक्त याच भागात वर्दळ नसते कारण हवेलीचा हा भाग एका कोपऱ्यात लांब आहे. इथे साफसफाईपण होत नाही त्यामुळे जमिनीवरच्या धुळीत उठलेले पायांचे ठसे मी पाहिले आहेत. ते सरपोतदारांच्या कोल्हापूरी चप्पलचेच होते आणि हो याच खोलीत फक्त टेबलखुर्ची अशी मध्यभागी मांडली आहे. तुला आठवत असेल त्यांच्या डायरीत टेबलखुर्चीचा उल्लेख आहे. महत्वाचे म्हणजे फक्त याच खोलीच्या भिंतीवर हाताचे ठसे आहेत. ते ठसे एकाच माणसाचे आहेत. जर माझा अंदाज बरोबर असेल तर ते सरपोतदारांच्या हाताचे ठेसे आहेत. बघ त्या भिंतीवर!,''डॉक्टर साहेब बोटाने एका भिंतीकडे दाखवू लागले.

वैदेहीने त्या भिंतीकडे लक्ष देऊन पाहिले आणि तिला आश्चर्याचा धक्काच बसला. त्या एका भिंतीला कसलातरी मोठा डाग होता

आणि त्या डागाच्या आजूबाजूने हाताच्या पंजाचे ठसे होते. धुळीने माखलेले हात जणू कोणी त्या भिंतीला सतत लावल्याने उमटलेले ते ठसे असावेत.

हं म्हणजे भैरवशास्त्री आणि डॉक्टर साने या दोघांनाही या खोली बाबत काही वेगळे जाणवले होते. पद्धती वेगवेगळया असल्या तरी दोघांचे मत एकच होते. सरपोतदार याच खोलीत येणार होते. आज त्या अदृश्य शक्तिचा खेळ याच खोलित होणार होता. वैदेहीला या बाबत आश्चर्य वाटले.

तेव्हढयात डॉक्टर साहेबांच्या मोबाईलमधील गजर आवाज करू लागला, 'बीप!, बीप! बीप!

''अकरा वाजायला पाच मिनटे आहेत. आता लपायलाच हवे कारण आता कधीही सरपोतदार इथे येतील.'',डॉक्टर साहेबांनी कळवले.

''आणि 'ती' यायचीही हीच वेळ आहे. हो ती येणारच.'',वैदेही बोलली.

तेव्हढयात भैरवशास्त्रींचा फोन वाजू लागला. भैरवशास्त्रींनी फोन बंद बरून टाकला. बाहेर उभ्या शिष्याने सरपोतदारसाहेब येत असल्याचे कळवण्यासाठी फोन करून इशारा दिला होता. ''ते बाहेरच्या आवारातच आहेत. ते येत आहेत.'',भैरवशास्त्रींनी सांगितले.

हं आता काय करायचे? पुढे काय होईल? मग काय खरंच 'ती' पण इथे येईल? काय ती अदृश्य असेल का ती दिसेल?, वैदेहीच्या चेहऱ्यावर अनेक प्रष्णचिन्हे थैमान घालताना दिसू लागली. भैरवशास्त्रींनी हाताने सगळयांना त्यांच्या मागे येण्याची खूण केली. जसे सगळे त्यांच्या मागे त्या खोलीच्या बाहेर आले त्यांनी दरवाजा बंद करून घेतला. हातातील मशाल विजवल्यावर मात्र आता अंधाराचे राज्य झाले. मग आता कसे काय बघायचे? मग वैदेहीच्या लक्षात आले की त्या खोलीला मोठया मोठया काचेच्या खिडक्या होत्या. त्यामुळे बाहेरील कडाडणाऱ्या विजेचा थोडाफार प्रकाश आत येतच राहणार होता.

आता सगळे शेजारच्या खोलीत आले आणि आत येताच भैरवशास्त्रींनी दरवाजा बंद करून घेतला. सगळे इथुनच दरवाज्याला असलेल्या एका छोटया फटीतून सगळेकाही बघणार होते. वैदेही मात्र भिंतीला टेकून जमिनीवर बसून राहिली. तिच्यासाठी हे सगळे सहनशक्तिची परिसिमा पार करणारे ठरू लागले.

तेव्हढयात कोणाचे चालण्याचे आवाज येऊ लागले. हो कोणीतरी येत होते. हं काय बाबा येत असावे? का 'ती' असावी? चालण्याचे आवाज जवळ येऊ लागले. वैदेहीच्या शरीराचा जणू थरकाप उडाला. डॉक्टरसाहेब आणि भैरवशास्त्री दरवाज्याच्या फटीतून खोलीत बघू लागले. मग दरवाजा

उघडण्याचा कच् कच् कच् आवाज आला. खोलीत कोण आले? हो बाबाच असणार. मग काय आता त्यांच्या पाठोपाठ 'ती' पण येईल? कारण अकरा वाजून गेलेत. तिची येण्याची वेळ झालीच आहे. ती काय मानवी रूप घेऊन येईल? विचारावे तरी कोणाला? डॉक्टरसाहेब आणि भैरवशास्त्री मात्र फटीतून बघण्यात व्यस्त होते. काय तोकडया प्रकाशात खोलीतले सगळे स्पष्ट दिसू शकत होते?..... अखेर वैदेहीने तिच्या दोन्ही तळव्यांनी चेहरा झाकून घेतला आणि डोळे घट्ट बंद केले.

मग अचानक आवाज येणे बंद झाले. डॉक्टरसाहेब मात्र सर्व काही बघण्याचा आटापिटा करत होते. पण खोलीत तसा अंधारच असल्याने फक्त अंधारात कोणी व्यक्ती खुर्चीत बसली आहे एव्हडेच दिसू शकत होते. हो ते सरपोतदारच होते. मग काय झाले कोणास ठाऊक? पण आता विचित्र आवाज येऊ लागले. मग कोणा बाईच्या बोलण्याचे आवाज येऊ लागले.....हं आवाज अगदी स्पष्ट होता. हो कोणी बाई नक्कीच बोलत होती. पण ती दिसत कशी नव्हती. विजेच्या लखलखणाऱ्या प्रकाशात सरपोतदार साहेब तिथे खुर्चीत बसलेले दिसत होते. हं ते हातवारे करत काही बोलत होते. नाही नाही सरपोतदारांच्या व्यतिरिक्त तिथे तसे कोणीच दिसत नव्हते. मग ते कोणाशी बोलत होते? काय ती फक्त त्यांनाच दिसत होती?

त्यांच्या समोरच्या खुर्चीत कोण बसले असावे? प्रकाश तोकडा असल्याने काय ती दिसत नाहीए?

काय दरवाजा उघडून सरळ तिथे जावे? पण तो बोलण्याचा आवाज नक्कीच कोणा बाईचाच आहे. ठीक आहे तर मग सरळ तिथेच जाऊन बघायला काय हरकत आहे? ती अस्तित्वाच नाहीए ही बाब तिथे गेल्या शिवाय सिद्ध होणार नाही.

आता अचानक सरपोतदार जागेवरून उठले. त्यांना उठलेले पहाताच डॉक्टरसाहेब लक्ष देऊन बघू लागले. तेव्हढयात सरपोतदार आता जोरजोरात रडू लागले. डोक्याला हात मारून घेऊ लागले. मग ते रडतच एका भिंतीपाशी चालत गेले. आता ते भिंतीकडे तोंड करून उभे राहिले. अखेर ते त्या भिंतीवर डोके टेकवून हुंदके देत उभे राहिले. मग परत बाईच्या बोलण्याचा आवाज येऊ लागला. हो हो आवाज बाईचाच वाटतोय. ती काय बोलत होती ते कळत नाहीए. ती फक्त काही पुटपूटत असल्यासारखे वाटले. बराच वेळ बोलण्याचा आवाज येतच राहिला.

डॉक्टरसाहेब अखेर बाजूला येऊन उभे राहिले. हे असे किती वेळ बघत बसायचे? खूप झाले आता. सत्य समोर यायची वेळ झाली आहे. ती अदृश्य बाई ही सरपोतदारांची केवळ कल्पना आहे हे सिद्ध करायची हीच वेळ आहे. डॉक्टर साहेबांनी वैदेहीकडे पाहिले तर ती घाबरून त्यांच्याकडेच बघत होती.

अखेर आत खोलीत जाण्यासाठी ते पुढे सरसावणार तोच त्यांचे लक्ष भैरवशास्त्रींकडे गेले.

भैरवशास्त्री त्यांच्या शिष्यांना काही खाणाखूणा करत होते. ते पटकन उठून उभे राहिले. त्यांनी मशाल हातात घेऊन ती पेटवली. मग त्यांनी खूण करताच त्यांच्या शिष्यांनीपण त्यांच्या हातातील मशाली पेटवल्या मग भैरवशास्त्रींनी हातानेच खूण करताच सगळे खोलीच्या दरवाजापाशी जमा झाले. हं ते पण खोलीत आत जायला सज्ज झाले होते. येथेही दोघांचेही एकसारखेच मत पडले तर.

आता शत्रूला आव्हानीत करत सामोरे जायचे. डॉक्टरसाहेबांनी त्यांची टॉर्च चालू केली. आणि ते उठून उभे राहिले. बस्स आता अगदी सरपोतदारांच्या समोर जाऊन उभे रहायचे. मग भैरवशास्त्री आणि डॉक्टरसाहेब यांनी दोघांनीही दरवाजा हाताने ढकलायला सुरवात केली. तो भलामोठा दरवाजा कच्..... कच्..... कच्..... आवाज करत उघडू लागला. अखेर दरवाजा उघडला गेला आणि डॉक्टर साहेब, भैवरशास्त्री आणि त्यांचे शिष्य यांनी एखाद्या आक्रमक सैनीकांच्या तुकडीप्रमाणे खोलीत प्रवेश केला. मशालींच्या लालसर प्रकाशामुळे खोलीत उजेड पसरला आणि सगळे काही स्पष्ट दिसू लागले.

सरपोतदार तसेच भिंतीकडे तोंड करून उभे होते. काहीतरी पुटपुटत ते अविरत एकटेच बोलत होते. डॉक्टरसाहेबांची नजर

त्या बाईला शोधू लागली. पण सरपोतदार सोडले तर बाकी कोणीच दूसरे दिसले नाही. हो ती बाई तिथे दिसत नव्हती. म्हणजे डॉक्टर साहेबांचे तर्क खरे होते तर. ती बाई म्हणजे सरपोतदारच बाईच्या आवाजात बोलत असावे. हा त्यांचा भ्रामकपणाचा मानसीक रोगच होता. किंवा अजून एक दडलेले व्यक्तिमत्व जणू समोर यायला तयार होते.

भैरवशास्त्री काही कळायच्या आत सरपोतदारांच्या बाजूला झपाझप पावले टाकत पुढे गेले. काही कळायच्या आत त्यांनी त्यांच्या हातातील भस्म सरपोतदारांच्या अंगावर टाकले आणि ते गर्जतच बोलले,''कोण आहेस तू? तुला काय हवे आहे?''.

आतामात्र सरपोतदारांनी वळून भैरवशास्त्रींकडे पाहिले. पण त्यांच्या डोळयात काही वेगळेच वेड ठाण मांडून बसले होते. ते विचित्र अंगविक्षेप करू लागले. मग परत भैरवशास्त्रींनी त्यांच्या अंगावर भस्म टाकले आणि त्यांनी परत तोच प्रष्ण विचारला,''कोण आहेस तू? सांग तुला काय हवे आहे?''

पण यावेळी भैरवशास्त्रींना त्यांच्या प्रष्णाचे उत्तर मिळाले, तेही बाईच्या आवाजात.....

''मी कोणीच नाही. मी काहीच नाही. मला नाव नाही किंवा कोणते शरीर नाही. मी मानवाचा अशांत अंतरंग आहे. मनदर्पणात उमटलेली मानवाची अतृप्त इच्छा आहे. मनात खोल

रूतलेली असहय तडफड आहे.'',उत्तर ऐकून डॉक्टरसाहेब विजेचा धक्का बसावा असे ते बघतच बसले.

''तू नक्की कोण आहेस? तू इथे कशी आलीस?'',भैरवशास्त्रीनीं एखाद्या निडर सैनीकाप्रमाणे हल्ला चढवला. उत्तरही जणू तैयारच होते.

''मला असे प्रकट करणे हे प्रत्येकाला साध्य होत नाही. पण आता मला जेव्हा हे असे बाहय स्वरूप मिळालंय तर मी एक अपरिमित, अतर्क, जागृत अवस्था झाली आहे. शक्ति बनली आहे.'',तिचे बोलणे ऐकून डॉक्टरसाहेबांच्या चेहऱ्यावर मिश्कील स्मितहास्य उमटले. भैरवशास्त्रींनी सरपोतदारांच्या अंगावर परत भस्म उधळले.

''तूला काय हवे आहे? तू कशासाठी आली आहेस'',भैरवशास्त्री ओरडत बोलले. प्रष्णाकडे दुर्लक्ष करत यावेळी ती बरळत राहिली. जणू तिला बोलावेच लागले.

''मग पाण्यात जसे कोणी रंग मिसळला की पाणी रंगीत होते ना, माझेही अगदी तस्सेच असते. मानवाची इच्छा बदलली की माझे इच्छारूप बदलते. पण मग मी कधी मानवाची अतृप्तता, तर कधी अंतरंगात दडलेली त्याची आर्त वेदना बनते. मी कधी तडफडवणाऱ्या असहय यातना तर दिनवाण्या याचना बनते. रूप त्याचेच असते, मी फक्त प्रतिमा बनते. सतत बोचणारी सल मला हवी असते, मग उपचारही मीच करते. मी बुद्धीत प्रवेश

करते आणि आयुष्याचा ताबा घेते. तूला तूझ्या पाप आणि पूण्याचे दर्शन घडवते. जेव्हा भावविश्वात अडकलेल्या तूझा हिशोब पूर्ण होतो ना, तेव्हा मी तुला घेऊन जाते. एका जीवाचा हिशोब संपला ना की, मग दूसरीकडे कोणी मानव मला जागृत करेल याची मी वाट बघत बसते. माझे कार्य मी करतच राहते आणि जर कोणी मला अटकाव केलाच तर मात्र.....''. बोलता बोलता अचानक ती थांबली.

मग थोडयावेळ कोणी काहीच बोलले नाही. फक्त एक घुसमटवायला लावणारी शांतता, सगळयांच्या चेहऱ्यावरून एकच प्रष्ण डोकावून जात होता. काय हे खरंच असू शकेल? काय ती शरीर नसलेली एक अतर्क अशी उर्जा आहे. फक्त एक अस्तित्व? सरपोतदारांच्या शरीरात जणू ती वास्तव्य करून आहे. त्यांच्यातल्या कमजोर व्यक्तिमत्वाला तिने ओळखले आणि तिने त्यांच्यात प्रवेश केला. म्हणजे काय भैरवशास्त्रींचे तर्क खरेच होते? काय ती खरंच अदृश्य होती? म्हणजे सरपोतदार बोलताना दिसत होते पण त्यांच्या शरीरातून ती बोलत होती?

अखेर भैरवशास्त्री परत बोलू लागले,''तू सरपोतदारांना सोडून दे, कारण मी तुला त्यांना मारू देणार नाही.''.

त्यांचे बोलणे ऐकताच ती जोरजोरात विकट हस्य करू लागली. मग ती हसतच बोलू लागली,''मानवाने केलेल्या चुका आणि अपराधच त्यांना जगू देत नाहीत. मी यांच्या अंर्तमनाचे बाहय

स्वरूप आहे. मला यांच्या बाबत जे माहित आहे ते कोणालाच कधी कळणारे नाही. यांचे आयुष्यच यांना बोचतंय. यापुढे जगणे यांनाच झेपणारे नाही. मला यांना नेणे भाग आहे. यांनी स्वतःला केव्हाच माझ्या स्वाधीन केलंय. माझा निर्णय पक्का आहे. माझा निर्णयही त्यांच्याच थकलेल्या आयुष्याने मला केलेली याचनाच आहे. मी यांना घेऊन जाणार म्हणजे जाणारच''.

मग अचानक काय झाले कोणास ठाऊक? सरपोतदार पटकन पुढे आले. ते पुढे येताच सगळे सावध झाले. मग ते बाईच्या आवाजात विकट हास्य करू लागले.

त्यांचे ते रूप बघून छातीत धडकीच भरली. हा अंधार, त्यात विजांचे कडकडणे, ही निर्यमनुष्य हवेली, त्या बाईचे असे समोर प्रकट होणे आणि त्यांचे ते मानसिकता उध्वस्थ कराणारे विकट हास्य.....यापेक्षा भयंकर ते काय असणार?.

सरपोतदार एक एक पाऊल पुढे टाकू लागले. आणि मग ते भैरवशास्त्रींच्या अंगावर भयंकर अंगविक्षेप करत हल्ला करत धाऊन आले. अशा हल्ल्याची तीळमात्र कल्पना नसलेले भैरवशास्त्री चांगलेच हबकले. सरपोतदारांनी भैरवशास्त्रींचा गळा एका हाताने धरला आणि मग सर्व शक्तिनिशी आवळायला सुरवात केली. यांच्यात एव्हडी शक्ति कुठून आली होती कुणास ठाऊक? भैरवशास्त्री वेदनेने तडफडू लागले. तेव्हढयात त्यांचे शिष्य पुढे सरसावले आणि त्यांनी सरपोतदारांचे हात

पकडून त्यांना जमिनीवर पाडले. तीन जणांच्यानीही ते काबूत होत नव्हते. सरपोतदार आता शिव्या शाप देऊ लागले. किंचाळू लागले. पण भैरवशास्त्रींच्या शिष्यांनी त्यांच्यांवर भस्म टाकले आणि जणू त्या भस्माच्या शक्तिने त्यांना चांगलेच जखडून ठेवले.

डॉक्टरसाहेब बाजूला उभे राहून सर्वकाही कॅमेरात टीपून घेत होते. झालेल्या सर्व प्रकारा बाबत पुरावे जमा करणे केव्हाच सुरू झाले होते. त्यांचे ठोकताळे चपखल बसत होते. जे काही होत होते त्या सर्वाची जणू त्यांना अपेक्षाच होती. डॉक्टरसाहेबांच्या चेहऱ्यावर आनंदी भाव तरळू लागले. त्यांचा तपास योग्य रितीने पुढे सरकत होता.

भैरवशास्त्रींनी स्वतःला सावरले आणि ते उठून उभे राहिले. गळयावर हात फिरवत ते क्षणभर उभे राहिले. मग लगेचच कापऱ्या हाताने एका पिशवीतून त्यांनी एक पुस्तक बाहेर काढले. थोडयावेळ डोळे बंद करून ध्यान केले. मग डोळे उघडताच त्यांनी शिष्यांकडे पाहिले.

''यांना बांधून ठेवा. पुढचे काही तास मंत्रोच्चाराने या आत्म्याला वश करायची प्रक्रिया करावी लागेल.'',भैरवशास्त्रींनी शिष्यांना आज्ञा केली. शिष्यांनी लगेचच सरपोतदारांचे हात बांधले. सरपोतदार अशांत आणि आक्रमक दिसत होते. आव्हान देणारी आणि रोखलेली त्यांची नजर भयावह होती.

भैरवशास्त्री आता जोरजोरात मंत्र पठण करू लागले. सरपोतदारांच्या कपाळावर हात ठेऊन ते मंत्र म्हणू लागले. जोरजोरात होणाऱ्या मंत्रोच्चारणाने सर्व हवेलीच जणू हादरून गेली. ओम ऱ्हाम ऱ्हीम क्लिम.....बलदा कृश्ण मोहाय.....एही एही एही..... आणि हळूहळू सरपोतदारांचे हावभाव बदलू लागले. त्यांचे शरीर कंप पावू लागले. बघता बघता सरपोतदारांचे हालचाल करणे थांबले ते मूर्च्छा आल्यासारखे पडून राहिले.

मंत्रपठण मात्र बराच वेळ सुरूच होते. त्याच बरोबर विविध तऱ्हेचे धार्मिक विधी संपन्न होऊ लागले. सरपोतदार मात्र सपशेल शरणागती पत्करून निपचीत पडून राहिले. ते जणू बलहीन झाले.

अखेर कार्य संपन्न होताच भैरवशास्त्रींनी हातातील गंध सरपोतदारांच्या कपाळाला लावले. भैरवशास्त्रींचे कार्य संपन्न झाले होते. सरपोतदार आता शांतपणे निपचीत डोळे बंद करून पडून राहिले. भैरवशास्त्रींनी कपाळावर साठलेले घामाचे थेंब त्यांच्या उपरण्यात टिपले. भैरवशास्त्रींच्या चेहऱ्यावर समाधान झळकू लागले. आता हं आत्मा वश झाला..... मोहीम फत्ते झाली.

डॉक्टरसाहेबांनी कॅमेरा बंद केला आणि परत सॅकमध्ये ठेऊन दिला. हं योग्य ती सर्व माहिती गोळा झाली होती. डॉक्टर

साहेबांनी मनगटावरील घडयाळयात डोकाऊन पाहिले. पहाटेचे चार वाजले होते. त्यांनी समाधानाने आजूबाजूला नजर टाकली. वैदेहीला आता पूराव्यासकट समजावता येईल.

हं 'मल्टीपर्सनॅलीटी डिसऑर्डर'..... निदानावर शिक्कामोर्तब झाले. मोहीम फत्ते झाली.

अं हे काय? पण वैदेही कुठे गेली? ती खोलीत दिसत नव्हती. डॉक्टरसाहेब आता तिला शोधत शेजारच्या खोलीत गेले. त्यांनी टॉर्च्चा झोत खोलीत टाकला. पण तरी ती दिसत नव्हती. ''वैदेही वैदेही...'',डॉक्टर साहेबांनी हाक मारत आजूबाजूला पाहिले.

अखेर ती एका भिंतीला टेकून जमिनीवर बसलेली त्यांना दिसली. तिने डोक्याला दोन्ही हात लावले होते. प्रकाशाचा झोत पडताच तिने वर पाहिले. तिचे रडून लाल झालेले डोळे तिने हाताने झाकले. ''मला घरी जाऊदे! भैरवशास्त्रींनाही तसेच सांग. जे झालंय ते मी पाहिलंय आणि ऐकलंय. मला आता हे सहन होत नाही. माझी तब्येत ठीक नाहीए. मला श्वास कोंदटल्या सारखं होतंय. बाबांना होणारा त्रास मला सहन होत नाही.'' ती हुंदके देत रडू लागली. तिला बिचारीला हे सगळं झेपलं नव्हतं.

तेव्हढयात भैरवशास्त्रीनी खोलीत प्रवेश केला. त्यांनी वैदेहीकडे नीरखून पाहिले. ''बाहेर पाऊस लागून राहिला आहे. पाऊस

थोडा उघडताच इथून निघून जाऊया. वडीलांना घरी घेऊन जा. लवकरात लवकर आता इथून गेलेलेच बरे. आपले काम झालंय. तो आत्मा आता त्रास देणार नाही. सरपोतदारांना मात्र यापुढे इथे येऊ द्यायचे नाही. बस्स परवाच १७ जुलै आहे. तारीख एकदा पार झाली की काम पूर्ण झाले समजा. तोपर्यत कटाक्षाने यांना इथे येऊ देऊ नका.'',भैरवशास्त्रींच्या बोलण्यावर तीने रडतच मान हलवून 'हूं' असे म्हणून प्रतिसाद दिला.

हं थोडावेळ आता इथेच बसणे भाग होते. अर्धा एक तासात पाऊस उघडेल असे वाटत होते. डॉक्टरसाहेबांनी त्यांच्या सॅक मधून पाण्याची बाटली बाहेर काढली आणि वैदेहीच्या हातात दिली. वैदेहीने त्यातून घोटभर पाणी प्यायले आणि ती परत डोळे बंद करून शांत बसून राहिली. डॉक्टरसाहेबही जवळच्या खांबाला टेकून जमिनीवर बसले. भैरवशास्त्री आणि त्यांचे शिष्य सरपोतदारांजवळ बसून राहिले. हं आजची भयानक रात्र संपत आली होती. बस्स शेवटचे काही क्षण की मग या हवेलीला कायमचा गुडबाय.....

''तो आवाज त्याच बाईचा असावा नाही का? आणि ती काय खरंच त्यांच्या शरीरात होती? कारण भैरवशास्त्रींनी विचारलेल्या प्रष्णांचे तिने उत्तर दिले. ती खरंच बोलत होती. मग शास्त्रींनी मंत्रोच्चाराने तिला बांधून ठेवले. मग ती निश्क्रिय झाली. जणू बाबांच्या शरीरातून निघून गेली. जे झाले ते अगदी

डोळयासमोर घडले. जे समोर दिसले ते कसे नाकारावे? मग आता या बाबत तुझे सायन्स काय सांगते?'',वैदेहीने प्रष्ण केला.

डॉक्टरसाहेबांनीही हसतच याचे आत्मविश्वास पूर्वक उत्तर दिले,''आयुष्य म्हणजे कोणता चित्रपट आहे का? असे अंगात आत्मा शिरणे वैगरे फक्त सिनेमात होते. याला शास्त्रीय आधार नाही. सिनेमांनी लोकांना पार वेडं केलेय. तू ऐकलस ती काय म्हणत होती? ती जे म्हणत होती ते सोळा आणे सत्य आहे. ती त्यांच्या अंर्तमनाचेच बाहय रूप आहे म्हणजे खरंच सरपोतदारांचे अंतर्मन आहे. म्हणजे ती कोणी वेगळी नाही तर ती सरपोतदारच आहेत. आणि ती निघून वैगरे गेली नाही तर चार वाजले असल्याने ती निघून गेली आहे असे तेच स्वतःला भासवतात.''

डॉक्टरसाहेबांचे बोलणे ऐकून वैदेही आश्चर्यचकीत होऊन त्यांच्याकडे बघू लागली. म्हणजे या मानसिक आजारा बद्दल ऐकले होते पण खरंच असे सत्यात असू शकेल हे सगळे ऐकून ती पार गोंधळून गेली. या बाबत आणखी माहिती ऐकण्यासाठी तिचे कान आतूर झाले.

डॉक्टरसाहेब परत बोलू लागले,''ती म्हणजे त्यांच्यात दडलेले एक वेगळे व्यक्तिमत्व आहे. एका माणसात अशी अनेक व्यक्तिमत्वे असणे हाच तर मानसिक आजार आहे आणि यालाच तर 'मल्टीपर्सन्यालीटी डिसऑर्डर' म्हणतात. पण त्यांच्यातील या बाईच्या व्यक्तिमत्वाची भूमिका वेगळी आहे. ती म्हणजे जसा

एखाद्या रथाचा सारथी असतो ना तशी आहे. सारथी कसा घोडे ताब्यात ठेवत असतो अगदी तस्सेच ती सरपोतदारांच्या मूळ व्यक्तिमत्वाला काबू करत त्यांच्या वतीने निर्णय घेत असते.''

''मग मला हा प्रष्ण पडलाय की हे व्यक्तिमत्व बाईचे का? म्हणजे असे का?'',वैदेहीचा प्रष्णही बरोबर होता.

मग डॉक्टर साहेबांच उत्तरही अगदी तयार होते.''याचे कारणही सरळ आहे. प्रत्येक सामान्य पुरूष आपल्या पत्नीकडून मानसिक आधाराची अपेक्षा करत असतो. मग ती त्याची संगिनी, हितचिंतक असते तर कधी सल्लागार असते. सुशील स्त्री भरकटलेल्या पुरूषाला स्थिरस्थावर करते, संसार सावरते, समाजाशी लढते आणि त्याच्या चूका पोटात घेते. या गरजेतूनच सरपोतदारांनी तिला मानसिक दृष्टया निर्माण केले. त्यांच्यात दडलेले हे व्यक्तिमत्व त्यांची व्यथा समजाऊन घेते, सहानुभूती दाखवते आणि मग तोडगा सुचवते. हिला त्यांचे आयुष्य सावरायला त्यांनीच निर्माण केली. ते एकाच शरीरात मानसिक दृष्या अनेक आयुष्ये जगत आहेत. त्या बाईचे भास होणे हे त्यातील एक आहे. मग तिने १७ जुलै ला आयुष्य संपवण्याचा निर्णय उगाचच घेतलेला नाही. कारणही आपल्याला लवकरच कळेल. बस्स शेवटचे काही धागे दोरे जुळले की मी १६ जुलै ला सर्वांसमोर पूरावे ठेऊन सगळे समजाऊन सांगेन. मी काही लोकांना भेटायला पूण्याला जाणार आहे. परवा दूपार पर्यंत परत येईनच.''.

वैदेहीने डॉक्टरसाहेबांकडे आश्चर्याने पाहिले. तिला अजूनही अनेक प्रष्ण सतावत होते. अनेक शंका-कुशंका मनात उमटत होत्या. म्हणजे या सगळयाचे हे ऐव्हडे सरळ स्पष्टीकरण कसे असू शकते? म्हणजे आत्तापर्यंत हवेलीतून येणारे गाण्याचे आवाज, बोलण्याचे आवाज बाबांचेच होते? पण मग? तरीही? हं.....डोके पार चक्राऊन गेलंय.

तेव्हढयात पावलांचे आवाज येऊ लागले. दोघांनी वळून पाहिले तर भैरवशास्त्री दरवाज्यात उभे दिसले. ''पाऊस उघडला आहे. परत पाऊस सुरू व्हायच्या आत इथून निघून गेलेले बरे. माझे शिष्य सरपोतदारांना घरी पोचवायला मदत करतील. मग मी दिलेली विभूती पुढील दोन दिवस घराच्या बाजूने गोलाकार टाका म्हणजे ती परत घरात येऊ शकणार नाही. १७ जुलै नंतर मला येऊन भेटा. पुढचे उपाय सुरू करू. अजून दोन दिवस धोक्याचे आहेत असे समजा.'',भैरवशास्त्री आत्मविश्वास पूर्वक बोलले.

भैरवशास्त्रींचे बोलणे ऐकून झाल्यावर वैदेही उठून उभी राहिली आणि त्यांच्या कडे चालत गेली. भैरवशास्त्रींसमोर येताच तिचा कंठ दाटून आला. ती डोळयातून ओघळणारे अश्रू पूसतच बोलू लागली,''मी आपले धन्यवाद कसे करू ते कळतच नाहीए. मी अगतीकपणे माझी व्यथा घेऊन आपल्याला भेटायला आले होते. आपण मदत करायला तयार झालात हे माझे अहोभाग्यच. आपण इथे येऊन उपचार केलेत, याबाबत हजारो धन्यवाद. आपले

उपकार न फिटणारे आहेत. आपण यापुढेही मला मार्गदर्शन करावे ही आपणास विनंती''. पण आता तिला बोलवत नव्हते. भावूक झाल्याने जणू तोंडातून आवाजच निघत नव्हता. डोळयातून ओघळणारे अश्रू थांबतच नव्हते..... भैरवशास्त्रींनी मान हलवून होकार दर्शवला.

मग वैदेही डॉक्टरसाहेबांपाशी गेली आणि तिने त्यांचेही हात जोडून विनम्रपणे आभार मानले. तिचे अगतिकपणे विनंती करणे डॉक्टरसाहेबांना चांगलेच बोचले.''अग असं काय करतेस. माझे कसले आभार मानतेस. आपले मैत्रीचे नाते आहे. तू उगाच काहितरी बोलू नकोस. तू ना थकली आहेस. आधी तू घरी जाऊन आराम कर'',डॉक्टरसाहेबांनी अधिकार वाणीने सांगितले. त्यांना तिची हळवी अवस्था कळली. पण त्यांचे आज तिच्या बरोबर असणे हेच तिच्यासाठी लाखमोलाचे होते. आता तिला दोन दिग्गज माणसांचा पाठींबा मिळाला होता.

सरपोतदारांना दोन शिष्यांनी हाताला धरून उभे केले. आता ते शुद्धीत आले होते. मग दोघे जण मिळून त्यांना खेचतच पुढे नेऊ लागले. सरपोतदार एक एक पाऊल पुढे टाकून सहकार्य करू लागले. वैदेही आणि डॉक्टर साहेब त्यांच्या मागे चालत पुढे मार्गस्थ झाले.

बाहेर येताच आश्चर्य म्हणजे बाहेरचे वातावरणही आता शांत वाटत होते. खवळलेल्या निसर्गानेही आता जणू विश्रांती घेतली होती. वादळ निवळले आणि पाऊसही थांबला होता. हवेलीचेही

ते रात्रीचे भयाण रूप आता चांगलेच मवाळ भासू लागले. पक्षांचा किलबीलाट म्हणजे सूर्यदेवतेच्या आगमनाचा जणू पूकाराच होता. नवी पहाट झाली आणि बस्स सगळे ठीक झाले.

तेव्हढयात तिचे लक्ष भैरवशास्त्रींकडे गेले. ते एका विजयी योद्धयाप्रमाणे अभिमानी दिसत होते. ताठ मान आणि डोळयात झळकणारी विजयाची चमक ही त्यांच्या यशाची पावतीच होती. अनेक यशस्वी मालिकांमध्ये अजून एक कडी जोडली गेली होती. आजचे त्यांचे कार्य संपन्न होणे याचा अर्थ, जणू स्वतःच्या सामर्थावरचा आणि ज्ञानावरचा त्यांचा विश्वास त्रिगुणीत होणे असाच होता. हं त्यांच्या मते काम फत्ते झाले आणि मोहीम कल्पनेच्या पलिकडे यशस्वी झाली. हो अगदी नेहमी प्रमाणेच.....

मग वैदेहीने डॉक्टर साहेबांकडे वळून पाहिले तर ते युद्धात पाय रोवून उभ्या असलेल्या आणि स्वतःच्या सामर्थ्यावर अपरंपार विश्वास असणाऱ्या कॅप्टन प्रमाणे भासले. म्हणजे जणू माझे युद्ध मी जींकूनच राहणार, अशी जीद्द बाळगणाऱ्या सेना नायकाप्रमाणे वाटले. त्यांच्या चेहऱ्यावरचा ओसंडणारा आनंद म्हणजे त्यांचे सिद्धांत यशस्वी झाल्याची यशोगाथाच होती. त्यांना हवी असलेली सर्व माहिती त्यांना मिळाली होती. आजची मोहीम ही त्यांच्या मते शंभर टक्के यशस्वी झाली होती.....

हं म्हणजे दृश्य आणि अदृश्य यांच्या मधील युद्ध अजूनही सुरूच होते. शास्त्र आणि अध्यात्म यांच्यातील द्वंद्व सुरूच होते. तर्क आणि सिद्धांत यांच्यात चढाओढ संपली नव्हती. वैदेहीने स्मित हास्य करत परत वळून दोघांकडे पाहिले.

पण मग वैदेहीला आठवण झाली ती १७ जुलैची. ही रात्र म्हणजे फक्त एक अध्याय संपला होता. अजूनही सगळे संपले असे म्हणणे योग्य होणार नव्हते. हं बघूया आता १७ जुलै ला काय होते ते? घोडा मैदान आता तसे लांब नाही. अगदी परवाच रात्री एक वाजता म्हणजेच १७ जुलैला काय होईल काय माहित?.

७. '१७ जुलै' रात्री १ वाजता...

वैदेही खडबडून जागी झाली. छातीत धडधड, हाताचा कंप, कपाळावर घामाचे थेंब जमा झाले होते. केव्हडे हे विचित्र स्वप्न?...

परवाच्या हवेलीतील अनुभव मन उध्वस्थ कराणारा ठरला होता. धसका अजूनही कायम होता. छोटासा आवाज जरी झाला तरी तिला दचकल्या सारखे होत असे. त्या हवेलीच्या प्रसंगातून ती तशी सावरली नव्हतीच. सारखी विचित्र स्वप्न पडत होती. सारखे उगाच रडू येत होते. भूक तर पार खलास झाली होती. कुठल्यातरी कोपऱ्यात दडून रडत बसावेसे वाटत होते. मग तोंडातून ''आई आई.....'' असे बोलत ती बराचवेळ उशी काळजाशी कवटाळून घेऊन बसत असे. नवऱ्याला आणि मुलाला फोन करावा तर त्यांना उगाच टेंशन आले असते. त्यात मुलाची परीक्षा चालू होती.

रात्रीपासून बिचारी बाबांच्या खोलीच्या बाहेर पहारा देत होती. मग पायऱ्यांवर बसल्या बसल्या कधी झोप लागली कळलेच नव्हते. तिने रात्री त्यांच्या खोलीला बाहेरून कुलूप लावले आणि ती अगदी दरवाज्या समोरच्या पायऱ्यांवर ठाण मांडून बसली होती. बाबांना त्या हवेलीत जाऊ द्यायचे नाही असे भैरवशास्त्रींनी सांगितले होते. भैरवशास्त्रींनी निक्षून सांगितले असले तरी पण बाबांनी ऐकले पाहिजे ना? कालची सकाळ तशी ठिक गेली पण

रात्री त्यांचे परत पहिले पाढे पंच्चावन्न. त्यांना हवेलीत जायचे होतेच. म्हणजे एव्हडे समजाऊन सांगूनही....

कधी बाबा ओरडून दार उघडण्याची विनंती करत तर कधी तिलाच रागवत असत. मग त्यांनी बाहेर यायचा हट्ट धरलाच तर ती त्यांना उलट रागवत असे. ''बाबा तूम्हाला मी असे मरू देणार नाही. तुम्ही त्या हवेलीत जायचे नाही, नाही म्हणजे नाही. त्या बाईला शास्त्रीनी मारून टाकले आहे. त्यांनी दिलेली यज्ञाची विभूती मी घराच्या बाजूने गोलाकार टाकली आहे. आता कोणतीही वाईट शक्ति घरात प्रवेश करू शकणार नाही''.

पण तरीही ते बंद दरवाज्यामागून तिला सांगत राहिले,''अगं ती अशी मरणार नाही. ती मरायला काय माणूस आहे? ती मला घेऊन जाणारच. माझे आयुष्यच संपले आहे. मी आता गेलेलेच बरे. जे काही होतंय ते तुला कळतच नाहीए. ते सर्वांसाठीच योग्य होईल. १७जुलैची रात्र ही माझी शेवटची रात्र ठरणार आहे. खंत एव्हडीच राहील की तू परत भेटणार नाहीस. माझी वैदेही माझी आठवण काढेल ना?''.

पण वैदेही कुठे ऐकणार होती. ''तुम्ही काहितरीच बोलू नका. मी तुमच्यासाठी मृत्यूशीपण लढायला तयार आहे. बघू कशी येते ती?'', मग तिच्या हट्टासमोर अखेर बाबांनीसुद्धा सपशेल शरणागती पत्करली. कारण वैदेही ऐकणारच नव्हती. मग तिने सरळ बाबांच्या खोलीच्या दरवाजाला बाहेरून कुलूप लावले

आणि ती रात्रभर पहारा देत त्यांच्या खोलीच्या बाहेर बसून राहिली. माया वेडी असते नाही?.

वैदेहीने घडयाळयात डोकावून पाहिले. हं सकाळचे नऊ वाजले होते. बस्स आजचा एक दिवस सरला की काही टेंशनच नाही.'', तिने स्वतःलाच आधार दिला.

तिने उठून उभे राहून आखडलेले पाय सरळ केले. तेव्हढयात तिला समोरून त्यांचा नोकर येताना दिसला. ''अरे प्लीज चहा घेऊन ये ना. फक्त एक कपच आण. बाबांसाठी नको आणूस. त्यांच्या खोलीत गरम पाण्याची किटली, चहा बॅग्ज, साखर आणि दूधाच्या पावडरचे पाऊच सगळे ठेवले आहेत. हे दार आता डॉक्टर मंदार साने आल्यावरच उघडणार आहे. कोणीही त्यांच्या खोलीचा दरवाजा उघडायचा नाही.'',वैदेहीने निक्षून सांगितले.

''हो वैदेही ताई. चहा तयारच आहे. हे काय घेऊनच येतो.'',नोकर पळतच निघून गेला. वैदेहीने उठून आळस दिला. मग हळूहळू चालत ती शेजारच्या खोलीतील बेसीन पाशी गेली. तोंडावर गार पाण्याचा हबका मारताच जणू उरली सुरली झोपपण पार पळून गेली.

दोन मिनीटात नोकर चहाचा कप घेऊन आला. ''वा! छान'',वैदेही हसतच बोलली. चहाच्या पहिल्या घोटानेच ताजेतवाने केले. चहाही तिने दरवाज्या समोरच्या पायऱ्यांवर

बसून घ्यायचे ठरवले. बस्स आजही इथे ठाण मांडून बसायचे. काहीही होऊदे आजचा एक दिवस सुरळीत सरला पाहिजे, वैदेहीने ठरवलेच होते.

तेव्हढयात तिच्या मोबाईल फोनची रींग वाजली आणि तिने दचकून फोनकडे पाहिले. नंबर डॉक्टरसाहेबांचा होता. फोन उचलताच ते उत्साहात बोलू लागले, ''पुण्याहून निघालोच आहे. माझे सगळे काम सुरळीत पार पडले. बस्स आजच्या रात्री समोरा समोर बसून सगळयाचा सोक्ष मोक्ष लावूनच टाकू. सगळं प्रकरण मला समजंलय''. डॉक्टरसाहेबांचे बोलणे ऐकून वैदेहीला समाधान वाटले. हं आता हे सर्वकाही शेवटचा टप्प्यात आले होते.

''ठीक आहे. तर मी तूझी वाट बघते. मी पण अगदी बाबांच्या खोलीच्या दरवाज्या समोर त्यांच्यावर पाळत ठेवत बसून राहणार आहे. तू फक्त जपून ये कारण आज पून्हा ढग दाटून आलेत. संध्याकाळ पर्यंत पावसाची शक्यता आहेच.'',वैदेहीने डॉक्टर साहेबांना सावधान केले.

पण आज डॉक्टर साहेबांना कसली आलीए पावसाची भीती? आज त्यांच्यात संचारलेला उत्साह वर्णनातीत होता. मनाप्रमाणे काम पार पाडले गेले. पुरावे गोळा झाले. बस्स आज शेवटचा दिवस, मग सगळे परत सुरळीत होण्याची आशा मनात बाळगून डॉक्टरसाहेब पूढच्या कामाला लागले.

वैदेही आळसावलेल्या चालीने चालत लॉबीतल्या खिडकीपाशी गेली. खिडकीची दारे दोन्ही हाताने उघडताच गार वाऱ्याने कोणा घुसखोराप्रमाणे घरात प्रवेश केला. जोराच्या वाऱ्याच्या झोतापासून वाचण्यासाठी वैदेही दोन पावले मागे सरकली. बाहेरील ढगाळ वातावरण आणि घोंगावणाऱ्या वाऱ्याचा जोर पाहून ती चांगलीच हबकली. पावसाळा ऐन भरात होता. काल पावसाने विश्रांती घेतली असली तरी आजचे वातावरण अशांत आणि खवळलेले वाटले. आज रात्री काय वाढून ठेवले होते कोणास ठाऊक? हवेच्या जोराने चेहऱ्यावर येणारे केस सावरत ती खिडकी बाहेर बघू लागली. वाऱ्यामुळे वेडीवाकडी हलणारी झाडे बघताना एक अनामिक भिती मनात उमटून जाऊ लागली.

तिकडे डॉक्टरसाहेबांनी गावाकडे येणाऱ्या बसमध्ये प्रवेश केला. हातातील बॅग वरच्या रॅक वर ठेऊन ते त्यांच्या सीटवर स्थानापन्न झाले. पूण्याचे हवामान ढगाळ असले तरी तसे शांत होते. दोन दिवस रिमझिम पाऊस लागून राहिला होता बस्स. पण आनंद याच गोष्टीचा होत की डॉक्टर साहेबांचे काम निर्धोकपणे संपन्न झाले. ज्यांना भेटायचे होते ते सगळे भेटले. नुसते भेटलेच नाहीत तर त्यांनी सहकार्य केले. वेळही थोडाच असल्याने काम भराभर होणे जरूरीचे होते. अगदी रात्री उशीरापर्यत काम सुरूच होते.

तेव्हढयात बसचा तिकीट चेकर बसमध्ये आला आणि डॉक्टरांच्या सीट जवळ थांबला. डॉक्टरसाहेबांनी तिकीट

दाखवत आजूबाजूला नजर टाकली. मग त्यांच्या लक्षात आले की बस मध्ये सहाच प्रवासी होते. त्यांनी वळून आश्चर्याने तिकीट चेकरला विचारले,''काय झाले?, आज बसमध्ये तशी गर्दी दिसत नाही?''.

''नाही साहेब, तूम्ही वर्तमानपत्र वाचलेले दिसत नाही. तिकडं गावाकडं वादळ येणार आहे. बस लवकरात लवकर पोचण्याचा प्रयत्न करेलच. पण जर जास्त पाऊस असेल तर मात्र जवळच्या गावात थांबायलाच लागेल.'',तिकीट चेकरने माहिती देत सांगितले. तिकीटचेकरचे बोलणे ऐकून डॉक्टर साहेब चांगलेच हादरले.

आज संध्याकाळ पर्यंत पोहोचणे जरूरीचेच होते. नाही नाही काही झाले तरी मार्ग काढत आज गावाकडे पोचलेच पाहिजे. वादळालाही आजच यायला हवे होते.

बघता बघता बसने मार्गस्थ होत गावाचा रस्ता पकडला. प्रवासाबरोबरच पावसालाही सुरवात झाली. बसच्या खिडकीतून बाहेर डोकवत डॉक्टरसाहेब पूण्याच्या रिमझिम पडणाऱ्या पावसाला बघताना त्यांच्या मनात मात्र एकच विचार सारखा डोकावून जात होता,'गावाकडे वेळेत पोचलेच पाहिले. आज तर शेवटचा दिवस आहे?'

इकडे वैदेही बराचवेळ उगाच अस्वस्थपणे येरझाऱ्या घालत होती. पण मग वाचनातही मन लागत नव्हते. तिचे आवडते

रहस्यकथेचे पुस्तकही तिने तसेच पायरीवर बाजूला ठेवले होते. कितीही सारखे घडयाळयात डोकावले तरी काय वेळ थोडीच पूढे जाणार होता.

तेव्हढयात साफसफाई करत एक नोकर तिथे आला. ''अरे बाबांच्या खोलीची साफसफाई आज करायची नाही आणि हो महेशला सांग माझे जेवणाचे ताट इथंच पाठवून दे? एकच ताट पठव. बाबांच्या खोलीत फळे, मेथीचे थेपले, चिवडा, लाडू रात्रीच ठेवले आहे. हे दार आज उशीरा उघडणार आहे.'',वैदेहीने नोकराला निक्षून सांगितले. नोकर होकारार्थी मान हलवत निघून गेला.

पण पंधरा मिनिटातच नोकर परत आला. ''ताई, ताई, तुम्ही ऐकलं का? आज वादळ येणार आहे म्हणे. संध्याकाळी सात वाजता गावाला धडकेल असे रेडिओवर सारखे सांगत आहेत.'',नोकरानी भरभर सांगितले.

बातमी ऐकून वैदेही चांगलीच हबकली. ''काय? आज संध्याकाळी?'',धक्का लागल्यासारखे तिने परत विचारले.

''हो ताई, हे काय वर्तमानपत्रातपण बातमी लिहून आली आहे. गावातले बरेच लोकं दोन दिवसांसाठी गाव सोडून जात आहेत. गावातले माझे दोनं मित्र त्यांच्या कुटुंबाला घेऊन बाहेरगावी गेले पण.....'',नोकरानी सांगितलेली बातमी ऐकून वैदेहीचा चेहरा पांढराफटक पडला. दोन दिवसात पेपर वाचायला आणि

बातम्या ऐकायला चित्त थाऱ्यावर तर हवे? हे इथं बाबांच्या काळजीने चांगलंच वेड लागलं होतं.

''मग गेस्टना ही बातमी सांगायला हवी. नाहीतर ते इथेच आडकून पडायचे.'',वैदेहीने नोकराला काळजीने सांगितले.

''ताई, वादळाची बातमी सगळयांना कळली आहे आणि सगळे गेस्ट निघून जायच्या तयारीत आहेत. एखाद्या तासात रिसॉर्ट मोकळा होईल. म्हणजे मग तसे काही जास्त काम नसेल, मग मी पण घरी जाऊ?, महेश आहे ना तुमच्या सोबतीला. तो स्वयंपाक करेल. सगळे जरूरी असलेले सामान कालच भरून ठेवले आहे. ताई घरी मुले आणि बायको बोलावत आहेत. वादळामुळे सगळे पार घाबरून गेलेत. बस्स परवा सकाळी हजर होतो.'', नोकराने विनवणीच्या सूरात भरभर बोलत विचारले.

''हो, पण मग घरात मी, बाबा, महेश आणि मंदार साने, एव्हडेच लोक राहतील. मग एव्हडया मोठया आवारात आणि या अशा वेळी?.....'',तिला पुढचे काही बोलूच न देता नोकर सारखी विनवणी करू लागला. अखेर क्षणभर विचार करून तिने नोकराला घरी जायची परवानगी दिली. तसेही आजच्या रात्री कमी माणसे असलेलीच बरी.

''ताई रात्र होताच तेव्हडे दरवाजे घट्ट लावून घ्या. महेश मदत करेलच तुम्हाला. तसे मी त्याच्याशी बोलून घेतो. काळजी घ्या

कारण आज रात्री लाईटपण नसेल आणि फोनही बंदच असतील. हॉलचा एमरजन्सी दिवा चार्ज करून ठेवला आहे. मेणबत्त्या आणि काडयापेटी रिसेप्शन काउंटरवरच्या ड्रॉवरमध्ये आहेतच.'',नोकराने जाता जाता नमूद केले. नोकराचे बोलणे ऐकून वैदेहीच्या पायाखालची जमिनच सरकली. ती घाबऱ्या नजरेने नोकराला जाताना बघतच राहिली. आजची रात्र जीवघेणी ठरणार तर! तेव्हढयात.....

'धाड्..... धाड्..... धाड्.....'दरवाज्यावर बाबा जोराने हात मारत आवाज करू लागले. आवाज ऐकून वैदेहीने दचकून दरवाज्याकडे पाहिले. ''दरवाजा उघड. हा माझा रिसॉर्ट आहे. मला लक्ष द्यावेच लागणार.''

''बाबा, दरवाजा मी उघडणार नाही. उगाच आवाज करू नका. तसेही सगळे गेस्ट निघून गेलेत आणि हो गावात वादळ येतंय''.,वैदेहीने वैतागलेल्या आवाजात सांगितले. तिच्या बोलण्याचा परिणाम लगेचच झाला कारण बऱ्याच वेळ बाबांचा काहीच आवाज आला नाही. मग वैदेहीलाच राहवले नाही आणि ती दरवाज्यापाशी जात बोलली,''बाबा, बस्स आजची रात्र सहकार्य करा. प्लीज मी हात जोडून विनंती करते.''.

वैदेहीचे बोलणे ऐकताच बाबांनी हळू आवाजात बोलायला सुरवात केली. ''बघ त्या शास्त्रीने दिलेला अंगारा तू घरा भोवती टाकलास खरा, पण आता तो वाऱ्याने उडून जाईल, पाण्याने

वाहून जाईल आणि मग.....मग.....हं तुला कळतंय ना? तिचा मार्ग मोकळा होईल मग ती येणारच!'',बाबांचे बोलणे ऐकून वैदेही दरवाज्यापासून लांब झाली आणि तिने काळजीने डोकयाला हात लावला. मग येरझाऱ्या घालत अस्वस्थपणे ती विचार करू लागली. कशावर विश्वास ठेवावा? आणि नक्की काय करावे? बस्स ही एक रात्र सुरळीत सरेल ना?. ती खरंच येणार नाही ना? मंदारचे निष्कर्ष खोटे ठरले तर? हो ती विभूती परत टाकली पाहिजे. शास्त्रींनी बरीच दिली आहे.....सगळाच संभ्रम होता.

तेव्हढयात बाबा दरवाजावर परत धक्के देऊ लागले. 'धाड् धडाम् धड्राड' जोराचे आवाज होऊ लागले. जणू त्यांना दरवाजा तोडायचा होता. हे सगळे बघून वैदेहीचे पाचावर धारण झाले. धडधडत्या छातीवर तिने हात ठेवला. मग ती जोरात ओरडून बोलली,''दारावर असे धडका देऊ नका. तुम्हालाच इजा होईल. हा दरवाजा लोखंडी आहे.''

पण मग दरवाज्या मागून खोलीत आदळ आपट करण्याचे आवाज एकू येऊ लागले. ते खुर्ची जोरात जमिनीवर आदळून तोडत असावेत, फलॉवरपॉट फोडण्याचा आवाज असे अनेक तोडफोडीचे आवाज ऐकू येऊ लागले. तरीही वैदेहीने शांत रहायचे ठरवले. पण मग बराच वेळ दरवाज्यामागून कसला ना कसला तरी आवाज येतच राहिला. वैदेही सुन्न नजरेने पायऱ्यांवर बसून बंद दरवाज्याला न्याहळत राहिली.

दरवाज्यावर मागून आघात होतच राहिले. दरवाजा लोखंडी आहे म्हणून तग धरून होता नाहीतर.....मग मात्र वैदेहीची सहनशक्ति कमजोर पडू लागली.

''बाबा असं काय करताय? उगाच त्रागा करू नका. शांत रहा, अहो शांत रहा म्हणते ना मी?.....बाबा, बाबा?'',वैदेहीच्या रागावण्याचा परिणाम झाला असावा की काय कोणास ठाऊक? पण थोडयाच वेळात तोडफोडीचे आवाज येणे बंद झाले आणि परत एक अस्वस्थ करणारी शांतता पसरली. मग भिंतीवरील घडयाळयाचा 'टीक..... टीक..... टीक आवाज आणि छातीत धडधड....

अस्वस्थ करणारी शांततेही त्या जीवघेण्या आवाजांपेक्षा आपलीसी भासून गेली. डोळे मोठे करून ती भेदरलेल्या नजरेने बंद दरवाज्याला बराच वेळ न्याहळत बसून राहिली. हं तर सर्व काही परत ठीक झाले. वैदेहीने सुटकेचा निश्वास टाकत कपाळावरचा घाम पूसला. हं, सगळे परत शांत झाले. ठीक आहे तर!

तेव्हढयात महेश जेवणाचे ताट घेऊन आला. पण आता वैदेहीची भूक पार मरून गेली होती. अजूनही भीतीने पोटात पिळवटल्यासारखे होत होते. डोक्यात वेगळीच विचारचक्रे फिरतच होती. हां बाबा म्हणत होते विभूती उडून जाईल. मग 'ती' येईल. नाही नाही, ती भैरवशास्त्रींनी दिलेली विभूती उडून

नको जायला. ती विभूती म्हणे तिला आत येण्यापासून परावृत्त करणार होती.

इकडे डॉक्टरसाहेबांची बस जशी गावा दिशेने पूढै जात राहिली तसे वादळ तीव्र होताना जाणवू लागले. सूसाट वाऱ्यात घरापर्यंत कसे पोहोचायचे याबाबत ते विचार करू लागले. जर बस जवळच्या गावात थांबली तर काय करायचे?

छे! काहीतरी विचार करून चालणारच नाही. हातपाय गाळून चालणारच नाही. वैदेहीने क्षणभरातच मन घट्ट केले. पायऱ्या चढत बाबांच्या खोलीपाशी जाताना तिने हाक मारतच महेशला सूचना केली, ''महेश तू रिसॉर्टची कोणती खिडकी उघडी नाही याची खात्री करून घे. नीट कडया लावून घे. इतर सर्व खोल्यांचे दरवाजे कुलूप लावून बंद कर. कारण अंधार पडल्यावर हे करता येणार नाही. वादळ लवकरच अजून उग्र होणार आहे. वीज जायची शक्यता आहे.'',वैदेहीने महेशला सूचना केली.

वैदेही परत खोली समोरच्या पायऱ्यांवर येऊन बसली. वाऱ्याचा घूं.....घूं.....आवाज ऐकत राहिली. काय होतंय याचे आकलन करून घेण्याचा विचार तिने तार्त्पूता सोडून दिला. फक्त ही रात्र सरायची वाट पहायची बस्स. पण ते तरी सुखासूखी कसे होणार होते? बस्स आता मंदारचाच आधार आहे. तो लवकर इथे यायला हवा.

तिने मोबाईलवर मंदारचा नंबर फिरवला. ''कुठे आहेस मंदार? कधी येणार आहेस? मला खरंच खूप भिती वाटत आहे.'',तिने घाबऱ्या आवाजात कळवले.

''हे बघ काही झाले तरी त्यांच्या खोलीचा दरवाजा उघडू नकोस. आतून कोणताही विचित्र आवाज आले तरी दरवाजा उघडू नकोस. कोणी विठोबा नावाचा माणूस त्यांच्या खोलीतून बोलत असल्यासारखे भासेल. पण तो त्यांना काहीच इजा करू शकणार नाही. तो कोण आहे ते मी आल्यावर सांगेनच. पण तोपर्यंत चुकूनसुद्धा दरवाजा उघडू नकोस. हो वैदेही मी सगळे पूरावे जमा केलेत. बस्स माझी बस एखाद्या तासात पोहोचायला हरकत नाही. पण इथे वादळ जरा जास्तच उग्र झालंय.....'',डॉक्टर साहेबांचे बोलणे संपायच्या आतच फोन मध्ये र्ख र्ख ख्र असा आवाज येऊ लागला. हं वादळाचा परिणाम असावा. ''हॅलो, हॅलो, हॅलो.....'',ओरडून काहीच उपयोग झाला नाही. अखेर फोन बंद पडला.

''विठोबा? कोण विठोबा? '', ती थकल्या आवाजात स्वतःशीच बोलली. सगळंच अतर्क्य होते. त्यात फोन बंद होणारच होता आणि आता लाईटही जातील वैदेही उठली आणि स्वतःच सगळी दारे खरंच बंद आहेत याची खात्री करून घेऊ लागली. वरच्या मजल्या पासून खालच्या मजल्या पर्यंत सगळी दारे, खिडक्या खरंच बंद आहेत हे तपासत बिचारी वेडयासारखी हिंडू लागली.

''हं कोणी आत नको यायला, मी नाही येऊन देणार. हे माझे आणि बाबांचे घर आहे.'',ती वेडयासारखी स्वतःशीच बोलत राहिली. जणू ती मानसिक आणि शारीरिक दृष्टया थकत चालली होती. तिचे मानसिक संतूलन बिघडत होते. मग पण भयाण रात्र पुढे वाढून ठेवली होती. त्याला ती कशी तोंड देणार होती कोणास ठाऊक?

खिडक्या तपासत अखेर वैदेही परत रिसेप्शन डेस्क जवळ आली. मुख्य दरवाज्याच्या काचेतून बाहेर नजर टाकताच तिचे पाय क्षणभर थबकले. अंधेर पडायला लागला होता. रात्रीची चाहूल लागली म्हणायचे, हं खरंच रात्र सुरू झाली.

तिने लाईटचे बटण चालू केले तर तिच्या लक्षात आले की लाईट केव्हाच गेली होती. रिसेप्शन डेस्कवरचा फोन उचलून बघितल्यावर तिच्या लक्षात आले की फोन बंद पडला होता. मोबाईलतर केव्हाच बंद झाला होता.

मग वेडी वाकडी हालणारी झाडे बघत बिचारी क्षणभर थांबली. मंदारचा अजूनही पत्ता नव्हता. तो आत्तापर्यंत पाहोचायला हवा होता. काय वादळात तो येऊ शकेल? त्याने अंधाराच्या आत येणे जरूरीचे आहे. रात्री तिचे राज्य सुरू होते ना. मग काय विभूती परत टाकावी? विभूती उडून गेली नसेल ना? पण वादळात बाहेर तरी कसे जायचे? बुद्धी काम करेनाशी झाली होती. शंका कुशंकांनी पार वेड लागले.

तेव्हढयात तिचे लक्ष वर छताकडे गेले आणि तिच्या मनात एक शंका आपसूकच उमटून गेली. काय रिसेप्शन आणि लॉबीचा लाकडी संरचना असलेला भाग हा वादळात तग धरेल? अरे देवा पण आता काय करायचे? या अशा वादळात देवावरच भरवसा आहे. ''अरे महेश तूला काय वाटतय, की ती लाकडी लॉबी आणि रिसेप्शन वादळात तग धरेल?'',वैदेहीने समोरून येणाऱ्या महेशला विचारले.

''ताई या इथे बसा बरं. तुम्हाला ना उगाच टेंशन घ्यायची सवय आहे. आधी हा गरम गरम चहा घ्या. बिस्कीटांचा डबा समोरच ठेवलाय. हवे असेल तर थोडया वेळाने परत कामाला लागा. थोडयावेळ आराम केल्याने काही नुकसान होणार नाही.'',महेशने जबरदस्तीने तिला खुर्चीत बसवले आणि तिच्या समोरच्या टेबलावर चहाचा कप ठेवला. महेशने इमरजंसी लाईट सुरू केला. तिने रडवेल्या नजरेने त्याच्याकडे पाहिले तर आज तो जणू देवदूता प्रमाणे वाटत होता. एव्हढया मोठया इमारतीत तिच्या बरोबर महेशने असणे आधार देणारे ठरले होते. वैदेहीने अखेर क्षणभर विश्रांती घ्यायचे ठरवले. कारण आता बुद्धी आणि शरीर साथ देईनासे झाले.

गरम चहाचा पहिला घोटही आमृतासारखा वाटला. चहा पित रिसेप्शन लॉबीच्या काचेतून बाहेर बघत निवांत बसणे हे नितांत गरजेचे असल्याचे जाणवू लागले. बस्स ही एकच रात्र मग

उद्यापासून सगळे सुरळीत, हो १७ जुलैची रात्रच धोक्याची आहे. हं..... ती विचार करतच राहिली.

वैदेहीला काचेतून बाहेर बघताना जाणवले की थोडयावेळातच अंधार जास्त गडद होत गेला होता आणि आता विजांचा कडकडाट सुरू झाला होता. लखलखणाऱ्या वीजा आकाशात मुक्त खेळ करू लागल्या. त्या लखलखाटांत सगळा आसमंत क्षणभरासाठी उजळून जात असे. आणि मग कानठळया बसवणारा जोराचा गडगडाट. आता मात्र बाहेर बघणेही भयावह वाटू लागले. भूतो ना भविष्यती असे हे वादळ कदाचित आयुष्यात अनुभवायला मिळणे दुर्मिळच. तेव्हढयात जोराचा वीज पडल्याचा कडकडाट झाला. वैदेहीने दचकून आजूबाजूला पाहिले आणि ती बोलली,''महेश वीज जवळच पडली असेल नाही.'

पण त्याच्या कडून कोणतेच उत्तर आले नाही. तिने मागे वळून पाहिले पण तो दिसलाच नाही. ''हं अंधारात कुठे गेला काय माहित?'',वैदेहीने भिंतीवरच्या घडयाळयात पाहिले तर संध्याकाळचे सात वाजले होते. वैदेहीने डोळे मोठे करत कपाळावर हात मारला. मग बराचवेळ रेंगाळलेली ही क्षणभर विश्रांती क्षणात संपून गेली. ती ताडकन उठली आणि इमरजन्सी लाईट हातात घेऊन बाबांच्या खोलीच्या दिशेने पळत निघाली. मग पायऱ्या चढत वरच्या मजल्यावर येताच तिने दिवा सर्व बाजूने फिरवत अंदाज घेतला.

तिने परत बाबांच्या खोलीच्या बंद दरवाज्याच्या दिशेने नजर टाकली आणि ..... क्षणभर शॉक बसावा असे झाले.

अं....अं... नाही नाही, असे देवा!.

दरवाजा उघडा होता. बाबांच्या खोलीचा दरवाजा उघडला गेला होता.

पण दरवाजा उघडला कोणी?..

उघडा दरवाजा बघून जणू शरीरातील त्राणच गेला. छातीत धडकी भरली. ती पळतच त्यांच्या खोलीत गेली. दरवाज्यातून आत दिव्याचा झोत टाकताच तिच्या लक्षात आले की खोली मोकळी होती. ''बाबा बाबा'',अनेकवेळा ओरडूनसुद्धा त्यांनी प्रतिसाद दिला नाही. याचा अर्थ एकच 'बाबा बाहेर आले आहेत.'

वैदेही पायऱ्या उतरत रिसेप्शन लॉबीच्या दिशेने पळत सुटली. अंधारात हातातील एमरजन्सी दिव्याच्या प्रकाशात दिसेल तेव्हडे चाचपडत ती, कोणी दिसते का? याचा अंदाज घेऊ लागली. ''दरवाज्याला तर कुलूप लावले होते मग दरवाजा कसा उघडला त्यांनी? काय बाबांनीच महेशला दरवाजा उघडला भाग पाडले? आणि तो तो विठोबा? परमेश्वरा वाचव! हो हो मंदार सांगत होता की दरवाजा उघडू नको. देवा मी काय करू?'',स्वतःशीच पुटपुटत ती पुढे जात राहिली.

ती पळतच रिसेप्शन डेस्कपाशी आली आणि तिने हातातील इमरजन्सी दिवा डेस्कवर ठेवला. पळतच मग ती मूख्य दरवाज्यापाशी गेली आणि तिने मूख्य दरवाजा बंद असल्याची खात्री करून घेतली. मग घाबरलेल्या नजरेने ती आजूबाजूला बघू लागली. ''बाबा आतच आहेत. वादळात त्यांना हवेलीत जाता येणे अशक्यच आहे. महेश कुठे कडमडला कुणास ठाऊक? मंदारही अजून का नाही आला? बाबा कुठे आहेत?'',वैदेही थरथरत्या आवाजात स्वतःशीच बोलत होती. येरझाऱ्या घालत अस्वस्थपणे हाताच्या हालचाली करत होती तर कधी कपाळावर हात मारून घेत होती.

तेव्हढयात तिला पायऱ्यांवरून येणारी मानवाकृती दिसली. अंधारात उभी ती व्यक्ती दबा धरून बसावे अशी स्थब्द उभी होती. कोण असावे? कोणी असे का अंधारात उभे रहावे?

भीतीने तिचा घसा कोरडा पडला, हात थरथरू लागले, कपाळावर घामाचे थेंब जमा झाले, वैदेही घाबऱ्या नजरेने त्याच्याकडे बघू लागली. तो जणू अंधारात लपलेल्या एखाद्या हिंस्त्र जनावरासारखा हल्ला करण्यासाठी योग्य वेळ शोधत असावा असा भासला.

''ए ए क..को...कोण आहेस तू?'',वैदेहीने दबकतच ओरडून विचारले.

तिने आवाज देताच ती आकृती पायऱ्या उतरू लागली. ते बाबा नक्कीच नव्हते कारण त्यांची आंगकाठी बारीक आहे. ही व्यक्ती कोणी वेगळीच होती.

''को.....कोण आहे?'',वैदेहीने परत ओरडत विचारले. पण ती व्यक्ती एक एक पाउल पुढे टाकतच राहिली. अखेर वैदेहीने तिथेच असलेली एक लाकडी काठी हातात घेतली आणि काठी उगारत ती सावध होत हळूहळू चालीने चालत रिसेप्शन डेस्कपाशी आली आणि तिने इमरजन्सी दिव्याचा झोत त्या माणसावर टाकला. त्याच्या चेहऱ्यावर झोत पडला पण काही कळायच्या आता ती व्यक्ती पाय अडखळून पडावी तशी कोसळली आणि पायऱ्यांवरून गडगडत खाली आली. हं हे काय होतंय? ती भांबावल्यासारी लांबून त्याला न्याहळू लागली.

वैदेहीने हातातील काठी उगारतच जोरात ओरडत विचारले,''कोण आहेस तू? ए! उत्तर दे!''. पण तो काहीच हालचाल करत नव्हता. तो नुसता जमिनीवर पडून होता. वैदेही त्याला लांबूनच नीरखून बघू लागली. तो आता आचके देऊ लागला. जणू त्याच्या घशात काही अडकावे असे गुदमरल्यासारखे आवाज करू लागला. मग वैदेहीच्या लक्षात आले की त्याच्या बाजूने रक्ताचे थारोळे जमा होत होते. क्षणभरातच त्याचे ते घर.. घर.. आवाज करणेही बंद झाले.

तो निपचीत पडलेला पाहून वैदेही पुढे सरसावली आणि त्याच्या चेहऱ्यावर तिने प्रकाशाचा झोत टाकला आणि तिच्या पायाखालची जमीनच सरकली..... त्याचा चेहरा कोणी हिंस्त्र जनावराने फाडावा असा रक्तबंबाळ झाला होता. जखमा बऱ्याच खोल होत्या आणि त्यातून रक्त वाहत होते. त्याचा डोळा फुटला होता आणि त्यातून रक्ताच्या चिळकांडया बाहेर पडत होत्या. चेहऱ्यावरून त्याला ओळखणे अशक्यच. त्याच्या शरीराचेही तेच हाल झाले होते. कोणीतरी त्याच्यावर तीक्ष्ण हत्याराने सपासप वार केले असावेत असे वाटले. त्याचा शर्ट रक्ताने माखला होता. त्याच्या मानेवर कोणी जनावराने चावा घ्यावा असे व्रण होते. वैदेही जोरात किंचाळत मागे सरकली. ''हा....हा कोण असावा? याला कोणी असे केले?..... हे काय होतंय?.....

ती अडखळतच उभी राहिली. हातातील दिवा तिने रिसेप्शन डेस्कवर ठेवला मग स्वतःला सावरत ती क्षणभरातच भानावर आली आणि मग लगेचच तिला सत्य परिस्थितीचे आकलक झाले. घरात अजूनही कोणी नराधम खूनी वावरत असून त्याच्या कडे तीक्ष्ण हत्यार आहे. आणि आता या वेळी कोणाची मदत मिळणेही अशक्यच. पोलिसांना फोन करायचा तरी कसा? फोन केव्हाच बंद पडलेत. आता जे करायचंय ते तिलाच करायचंय. सगळे धीराने निभाऊन न्यायचंय. आता घाबरून चालणार नाही. नाही नाही घाबरून चालणारच नाही.....

वैदेहीने जवळच्या कपाटातून एक चादर बाहेर काढली आणि ती त्या प्रेतावर टाकायला ती पुढे गेली. तिने चादरीची घडी काढत चादर झटकली आणि तिचे लक्ष परत प्रेताकडे गेले. त्या मृत माणसाचे रक्त आता जमिनीवर आजूबाजूला पसरू लागले होते. तेव्हढयात अचानक वीज चमकावी असे वैदेहीला त्या मृत व्यक्तीत काही ओळखीचे वाटले. हिंमत करत तिने त्या रक्तबंबाळ प्रेताकडे निरखून पाहिले. मग हाताच्या बोटातील त्याची ती अंगठी? त्याचे कपडे?.....हो हो हे सगळे ओळखीचे होते. क्षणभरातच त्याच्या हातातील अंगठी तिने ओळखली. ते कपडेही.....''काय महेश?''..... तिने तिचा थरथरणारा हात तिच्या डोक्याला लावला. तो महेशच होता. हो हो नक्कीच..... आणि तिच्या पायातले त्राण निघून जावे तसे ती त्याच्या मृत शरीराच्या जवळ हळूहळू बसली. डोळयातील पाणी पूसत ती तिथेच बसून राहिली. महेशला कोणी ठार मारले असेल? किती क्रूरपणे याला मारलंय, बिचारा महेश.....

विजेचा जोराचा कडकडाट झाला. आसमंत दणाणून टाकणारा ध्वनीतांडव आणि वादळाचा प्रमाद.....

वैदेहीने भानावर येत डोके वर करत आवाजाच्या दिशेने पाहिले. मूख्य दरवाज्यातून बाहेर बघताच तिला वादळाच्या रौद्र स्वरूपाचे दर्शन झाले. वेडीवाकडी हलणारी झाडे, विजांचा लखलखाट, पावसाचा जोरदार मारा..... वादळ गावात

येऊन केव्हाच धडकले होते. वैदेहीने इमरजन्सी दिव्याचा झोत भिंतीवरच्या घडयाळावर टाकला. हं रात्रीचे नऊ वाजले होते. हं मंदार वादळामुळे नाही येऊ शकला. त्याला दोष देणे योग्य होणार नाही. त्याचाही नाईलाज आहे. वैदेहीने चादर महेशच्या मृत शरीरावर टाकली. तेव्हढयात..

''वैदेही, अगं किती शोधायचं तुला? तू कुठे होतीस. बाहेर वादळ सुरू झालंय, आणि दिवेही गेलेत. त्यात फोनही बंद पडलेत.'',आवाज बाबांचा होता.

वैदेहीने दचकून मागे पाहिले. लॉबीच्या दरवाज्यात उभे ते जसे काहीच झाले नाही अशा थाटात बोलत होते. जसे ते नेहमी असतात ना, अगदी तसेच होते. अगदी नॉर्मल. पण त्यांच्या पांढऱ्या झब्ब्यावर रक्ताचे लाल डाग होते. त्यांच्या चेहऱ्यावर रक्ताची चिळकांडी उडाली होती. त्यांच्या तोंडाला रक्त लागले होते. कोणाचातरी चावा घ्यावा असे त्यांचे तोंड रक्ताने माखले होते. तसेच त्यांच्या हातात रक्ताने माखलेला कोयता होता. ती क्षणभर घाबरलेल्या नजरेने त्यांच्याकडे बघतच राहिली, महेशला कोणी मारलंय? त्याच्या मानेचा चावा कोणी घेताला? अनेक प्रष्णांची उत्तरे जणू आपणहून समोर प्रकट झाली.....बाबाच..

मंदारचे निष्कर्ष खरे ठरत होते तर? पण मग लगेच तिने स्वतःला सावरले आणि प्रसंगावधान साधत ती बाबांशी संवाद

साधू लागली. ''हो..., हो ना! वादळ किती भयंकर आहे नाही? पण तूम्ही काळजी करू नका. तूम्हाला गरम चहा करून आणू का?''

''अगं नाही. फक्त मला निवांत बसू दे. मी आता थकलोय. मला या शेवटच्या रात्री तरी शांत बसू दे.'',सुस्कारे सोडत बाबा लॉबीतल्या जवळच्याच सोफावर बसले. हातातील कोयता त्यांनी जवळच्या टेबलावर ठेवला. वैदेही निर्विकार चेहऱ्याने त्यांना लांबूनच बघतच राहिली. सावध राहणे कधीही येाग्यच.

''मला काही वेळ असे इथे बसून राहूदे. रिसॉर्टमध्ये असे इथे बसून आणि तुला असे बघतच मला मरण येऊदे. तू समोरच बसून रहा. तू माझी मूलगी आहेस ना. तू माझा काळजाचा तूकडा आहेस ना, माझी पोरं वैदेही.'', बोलताना त्यांनी त्यांच्या हाताने कपाळावर साठलेले घामाचे थेंब पूसले. पण त्यामुळे त्यांच्या हाताला लागलेले रक्त त्यांच्या कपाळावर पसरले गेले. त्यांचा रक्ताने माखलेला चेहरा अक्षशः बघवत नव्हता. त्यांना कसलेच भान नव्हते. ते जणू कुठल्यातरी प्रभावाखाली असल्यासारखे बरळतच राहिले. ''वैदेही माझी लाडकी लेक, हो ना? सांग वैदेही तू माझी लाडकी मूलगी आहेस ना?''. वैदेही मात्र सुन्न नजरेने त्यांच्या कडे बघतच राहिली.

मग अचानक बाबांनाही तिचे असे लांबूनच संशयाने बघत राहणे जाणवले असेल कारण ती काहीच उत्तर देत नव्हती, तिच्या

नजरेतली ती भिती..... मग क्षणभर थांबून ते तिच्याकडे आता शंकेखोर नजरेने बघू लागले. मग काय झाले कोणास ठाऊक ते अचानक अंगविक्षेप करत जोर जोरात हसू लागले. असे हसताना त्यांचे रक्ताने लाल झालेले तोंड कल्पनेच्या पलिकडचे भयावह दिसत होते. त्यांचे हे असे विचित्र चेहरे करत उगाच वेडयासारखे हसणे.... त्यांना असे बघून वैदेहीच्या काळजाचा ठोकाच चुकला.

''विठोबा सांगत होता की वैदेही ना तुला एक दिवस अडचणीत आणेल पण मग मी त्याला दटावले. ए तू नको सांगूस मला काय करायचंय ते! मी तिला मारू शकणार नाही. ती माझी मुलगी आहे. पण मग तो सारखा मागेच लागलाय. तिला मारून टाक, तिला मारून टाक, तिला मारून टाक.....'', बोलता बोलता त्यांचा आवाज बदलू लागला आणि मग जणू कोणी दूसराच माणूस बोलावा असा वेगळयाच घोगऱ्या आवाजात ते ओरडू लागले.

''आह.....आह.....ए.....बस्स झाले आता! माझी मूलगी, माझी मूलगी, माझी मुलगी.....वर्षानूवर्षे मी दबून राहिलोय कारण तुला तिला मारता आले नाही. तूला फक्त तिलाच का मारता आले नाही? अरे मूर्खा तूला फक्त तिला मारायचा निर्णय घ्यायचा होता. बाकीचे मी केले नसते का?'',ते हातवारे करत तावातावाने ओरडत होते. ते स्वतःशीच बोलत होते.

मग काय झालं कोणास ठाऊक? ते अचानक उठले आणि जवळच ठेवलेला कोयता त्यांनी उचलून हातात घेतला. मान वर करत त्यांनी वैदेहीकडे पाहिले. त्यांच्या डोळयातून एक अक्राळ विक्राळ क्रूर दानव डोकावून जाऊ लागला. वैदेही त्यांचे ते भयानक रूप पाहून चांगलीच हादरली. हे काय चाललंय याची कल्पना तिला येऊ लागली. मंदार सांगत होता तसेच झाले होते तर. बाबांच्या शरीरातला हा दूसरा माणूस डोके वर काढत प्रभावी होत होता. ते वैदेहीच्या दिशेने एक एक पाऊल पूढे टाकू लागले.

वैदेही त्यांचे ते रूप बघून थिजल्यासारखी नुसतीच बघत राहिली. हे माझे बाबा आहेत आणि हे मला इजा करू शकणार नाहीत. मला यांनी लहानाचे मोठे केलंय. तिचे अंतर्मन जणू काही वेगळेच सांगू लागले. मग समोर दिसतंय यावर विश्वास ठेवावा का अंतर्मनाचे ऐकावे?

''बाबा बाबा, असं काय करताय? मी वैदेही आहे. तूमची मुलगी. तूम्हाला मी असे वागू देणार नाही.'' वैदेही त्यांना थांबवायचा प्रयत्न करू लागली. पण ते आता झपाझप पाऊले टाकत पुढे येऊ लागले आणि बघता बघता तिच्या समोर येऊन थांबले. त्यांची तिरस्काराने भरलेली नजर बघता जणू त्या क्षणाला ते तिचे बाबा नव्हतेच. त्यांच्या हातातला कोयता आता त्यांनी मुठीत घट्ट पकडला. जणू त्यांचा मनसूबा आज वैदेहीला ठार मारण्याचा होता. अगदी तिचे तुकडे तुकडे करण्याचा होता.

''बाबा! बाबा! मला मारू नका. बघा मी तुमची मुलगी आहे ना! तुम्ही नेहमीच माझा प्रेमाने सांभाळ केलात. मला माझे बाबा हवे आहेत. माझे प्रेमळ बाबा हवे आहेत.'',वैदेही रडतच बोलली.

पण छे आज ते कोणी वेगळेच होते. एक निर्दय मारेकरी होते. काही कळायच्या आत त्यांनी हातातील कोयता तिला मारण्यासाठी उगारला आणि.....वैदेहीने डोळे बंद करून घेतले.

बस्स काळाने आज गाठले म्हणायचे.....

८. रात्री १ वाजता ती येईल.....

''वैदेही वैदेही अग उठ आणि दरवाजा लावून घे. चल लवकर उठ!,'',डॉक्टरसाहेबांच्या आवाजाने वैदेही भानावर आली. तिने डोळे किलकीले करून आजूबाजूला नजर फिरवली. मुख्य दरवाजा उघडा होता आणि त्यातून वादळवारा, पाऊस आत जोराने येत होता. वाऱ्याने मूख्य डेस्कवरचे कागद उडून आजूबाजूला पसरले होते डॉक्टरसाहेबांनी टॉर्चचा उजेड जमिनीवर पडलेल्या सरपोतदारांवर टाकला. सरपोतदार जमिनीवर निपचीत पडले होते.

''मंदार अरे मंदार.... बाबा बाबा.... ते ना मला मारणार होते.....त्यांच्या हातात कोयता होता.....तू तू कसा काय?.....'',वैदेहीने गोंधळलेल्या मनस्थितीत विचारले.

डॉक्टरसाहेब मात्र जोरजोरात बोलत सांगत होते,''मी यांचे हातपाय बांधून ठेवतो तोपर्यंत तू दरवाजा बंद कर आणि हो आधी तो कोयता लांब फेकून दे.''

वैदेही उठली आणि वादळवारा झेलत अडखळतच दरवाजापर्यंत पोहोचली. जोर लावत तिने दरवाजा बंद केला. दरवाज्याची कडी मात्र तुटलेली होती. मग जवळचीच एक खुर्ची तिने ओढत आणून दरवाज्याला टेकवून ठेवली. दरवाजा बंद झाला आणि वारा थोपवला गेल्याने वादळापासून सुटका झाल्यासारखे वाटले. वैदेहीने चेहऱ्यावरील पावसाचे थेंब हातानेच पूसले.

जमिनीवर पडलेला कोयता तिने उचलला आणि रिसेप्शन डेस्कच्या कपाटात ठेऊन दिला. इमरजंसी लाईट आता मंद होऊ लागला असल्याने खोलीत उजेड बेतातच होता.

''तुला आज त्यांनी मारलेच होते. पण तेव्हढयात मी तिथे पोहचलो. दरवाज्याच्या काचेतून मी यांना तुझ्यावर हल्ला करताना पाहिले आणि दरवाजा लाथ मारूनच उघडला. कडीकोयंडा तुटला आणि दरवाजा उघडला गेला. मग हातातील टॉर्च मी यांच्या डोक्यात आदळली. वैदेही अगं तू आज त्यांच्यातल्या त्या आक्रमक विठोबा नावाच्या व्यक्तिमत्वाला भेटलीस.'',डॉक्टरसाहेब सरपोतदारांचे हात दोरीने बांधतच बोलले.

वैदेही मात्र झालेल्या प्रसंगाने पार हादरून गेली होती. झालेल्या प्रकारावर तिचा अजूनही विश्वास बसत नव्हता. माझे बाबा? या वैदेहीवर जीवापाड प्रेम करणारे बाबा? त्यांना काय झालंय कोणास ठाऊक?. तिच्या डोळयात नकळतच अश्रू दाटले. मग अंधारात तोंड लपवत तिने क्षणभर अश्रुंना वाट मोकळी करून दिली. डोळे पूसतच ती रिसेप्शन डेस्कपाशी पाठमोरी उभी राहिली. बस्स आजची रात्र सरली की ते ठीक होतील. हो ते नक्की बरे होतील. वेडे मन अजूनही आशा बाळगून होते.

डॉक्टरसाहेबांनी सरपोतदारांना एका खुर्चीत बसवून त्यांचे हात मागे करून घट्ट बांधून ठेवले. टॉर्चच्या प्रकाशात आजूबाजूला बघत त्यांनी अंदाज घेतला. सर्व ठीक आहे याची खात्री होताच

त्यांनी वैदेहीवर प्रकाशाचा झोत टाकला. ती डोळे पूसत एका खुर्चीत बसली होती.

''हं बघ मी आलोय. आता तुला घाबरायची गरज नाही. मी सर्व औषधेपण बरोबर आणली आहेत. यांना काबूत ठेवणे आता तसे अवघड नाही. हे बघ मी यांना एक इंजेक्षन देतो ज्यानी यांच्या आक्रमकतेला लगाम बसेल. म्हणजेच विठोबा आजच्या रात्रीपूरता गायब राहिल.'',डॉक्टर साहेबांनी रूमालाला तोंड पूसताना उत्तर दिले. मग क्षणभरातच त्यांनी त्यांच्या बॅग मधले इंजेक्षन आणि बाटली बाहेर काढली. ते बाटली उल्टी करून इंजेक्षनमध्ये औषध भरू लागले.

''तुला चहा करू का? गरम चहाने बरे वाटेल तुला. तू भिजला आहेस. तुला थंडी वाजत असणार.'',वैदेहीने रडवेल्या आवाजात विचारणा केली.

''हो हो जरूर! बघ रात्रीचे दहा वाजलेत म्हणजेच एक वाजायला आता फक्त तीन तास राहिलेत. बस्स रहस्यभेद व्हायला थोडाच वेळ बाकी आहे.'', डॉक्टरसाहेब सरपोतदारांना इंजेक्शन देत बोलले. मग त्यांची बॅग उघडली. बॅग मधले कोरडे कपडे आणि टॉवेल बाहेर काढून त्यांनी परत सरपोतदरांवर नजर टाकली. ते अं अं अं असा तोंडाचा आवाज करत हालचाल करत होते. वैदेही चहा करायला शेजारच्याच स्वयंपाकघरात निघून गेली.

''उठा सरपोतदार, मला माहित आहे की तुम्ही माझे बोलणे ऐकू शकता.'',कोरडा शर्ट अंगावर चढवत डॉक्टरसाहेब बोलले. सरपोतदार अर्धवट ग्लानीत असल्यासारखे डोळे उघडायचा प्रयत्न करू लागले. कोरडे कपडे घालताच थंडीमुळे अंगाला सुटलेला कंप बंद झाला होता. ओले कपडे गुंडाळून परत बॅगमध्ये ठेऊन त्यांनी बॅगची चेन बंद केली. डॉक्टर साहेबांनी मग जवळची एक खुर्ची सरपोतदारांच्या जवळ खेचून घेतली आणि त्यावर विराजमान होऊन सरपोतदारांकडे नजर रोखून बघू लागले.

''सरपोतदार, वैदेहीचे बाबा, अहो उठा. वैदेही तुम्हाला बोलावत आहे.'',डॉक्टरसाहेब मुद्दामून हाक मारू लागले. मग 'वैदेही' या नाव ऐकताच जणू सावध होत त्यांनी डोळे उघडले.

शुद्धीत येताच डॉक्टरांनी सरपोतदारांकडे बघून मिश्कील हास्य केले. ''आज रात्री तुम्हाला काहिही होणार नाही कारण तुमचा रिसॉर्ट, तुमची मुलगी सोडून तूम्ही जाऊच शकत नाही. कारण अहो त्यांना तूमची गरज आहे'',डॉक्टरसाहेबांनी त्यांचा शाब्दीक खेळ सुरू केला. मग सरपोतदार थोडयावेळ नुसते डॉक्टरसाहेबांकडे बघत राहिले. डॉक्टरसाहेबांची स्थिर नजर आणि आधिकारी देहबोली सरपोतदारांना चांगलीच बोचली असावी. मग क्षणभरात ते बोलू लागले.

''तुम्ही कोणत्या कारणासाठी इथे आला आहात हे मला माहित होते. म्हणजे अगदी पहिल्यापासूनच. तूम्ही लेखक असल्याचे

खोटे सांगणे मला सावध करून गेले. मी आपले नाव वर्तमानपत्रात वाचले आहे. आपण मानसोपचार तज्ञ आहात हे मला माहित होते. पण तुमच्या शास्त्राच्याही वरची एक शक्ति आहे ती सगळे घडवून आणत असते. तुम्ही शास्त्रीय निष्कर्ष शोधत असला तरी तुमच्या मनाप्रमाणे पूर्तता करायला ती शक्ति बांधील नाही. मला 'ती' दिसणे ही फक्त मला लाभलेली अतिमानवी दृष्टी आहे. हे मला लाभलेले वरदान आहे. हवेलीत असलेली 'ती' तुम्हाला दिसणार नाही आणि समजणारही नाही. ती तुमच्या साठी अदृश्य आहे पण ती मला स्पष्टपणे दिसते. ती आहे आणि ती मला घेऊन जाईल.'',सरपोतदार स्थिर आवाजात बोलले.

''एक वस्तुस्थिती आहे, ती म्हणजे तुमचे मानसिक रूग्ण असणे. आपल्याला जी अदृश्य बाई दिसते ना, त्याला भास होणे म्हणतात. मेंदूत होणाऱ्या रासासनीक प्रक्रियेत विकृती आली की हे असे भास होतात. पण या आजाराला औषधे आहेत आणि उपचारही आहेत. आपल्याला ॲडमीट करून आपण या रोगावर उपचार घेऊ शकता आणि सामान्य आयुष्य जगू शकता. आज कोणीही येऊन तुम्हाला घेऊन जाणार नाही कारण त्या बाईचे असणे हा आपला भास आहे. आज रात्री एक वाजता काहीही होणार नाही आणि मगच आपला विश्वास बसेल.'',डॉक्टर साहेबांनी अधिकारी वाणीत ठणकावून सांगितले.

तेव्हढयात वैदेही चहाचे दोन कप घेऊन आली. वैदेहीकडे बघताच सरपोतदारांच्या डोळयात वात्सल्याचे भाव तरळू लागले. मग वैदेहीपण बाबांकडे धावतच गेली. ''बाबा कसे आहात तुम्ही? असे काय करता हो! तुमच्या मुलीसाठी तरी ठीक व्हा. तुम्हाला चहा प्यायचा आहे का? तुम्हाला थंडी वाजत असेल, थांबा मी तुमच्या अंगावर चादर पांघरते.'',बोलताना वैदेहीचा आवाज भावूक झाला.

''अग तू होतीस म्हणूनच मी जिवंत राहिलो नाहीतर मी केव्हाच आयुष्य संपवून टाकले असते. सगळया जगात तूच एक होतीस जी माझी होतीस. तूझे खूप चांगले संगोपन करायचे हा मी निश्चयच केला होता. नाहीतर या उपऱ्या माणसाला कोण विचारते? मी गेल्यावर स्वतःची काळजी घे. माझे मृत्यूपत्र तूला कपाटाच्या आतल्या सेफ मध्ये सापडेल. मी गेल्यावर सेफ उघड. नंबर आहे ५५५५. सगळे तुलाच मिळावे अशी सोय मी करून ठेवली आहे.'',सरपोतदारांच्या डोळयात पाणी तरळले. वैदेही तिच्या ओढणीने त्यांचे डोळे पूसू लागली.

''बाजूला हो वैदेही. यांच्या पासून तुला धोका आहे. आज यांनी तुला मारायचा प्रयत्न केलाच आहे. आज एका माणसाला तर यांनी ठार मारले आहेच. ते काय त्याचे मृत शरीर तिथे पडले आहे. हे काय करतील याचा काही नेम नाही.'',डॉक्टर साहेबांचे बोलणे ऐकून सरपोतदार रागाने डॉक्टर साहेबांकडे बघू लागले.

''हो सरपोतदार, तुम्ही वैदेहीला मारायला धावला होता तसेच आपण रिसॉर्टमधील एका कर्मचाऱ्याचा निघृण वध केलाय. एव्हढया क्रूरतेने त्याला ठार करणे कसे शक्य झाले आपल्याला? त्याच्यावर कोयत्याने वार केलेत, मग त्याचा डोळा फोडला आणि मग त्याच्या मानेचा कडकडून चावा घेतलात? मग आपण अजून किती लोकांना असं ठार केलंय?'',डॉक्टर साहेब कठोर आवाजात बोलले. डॉक्टर साहेबांचे बोलणे ऐकून सरपोतदार धक्का लागल्यासारखे बघतच राहिले.

''तुम्ही मल्टीपर्सन्यालीटी डिसऑर्डर या मानसिक रोगाने आजारी आहात. तुमच्यात तीन व्यक्तिमत्वे दडली आहेत. एक विठोबा, जो क्रूर आणि दूष्ट आहे आणि दुसरे सरपोतदार, जे मायाळू वैदेहीचे वडील आहेत आणि ती बाई जी तुम्हाला आधार देते. जेव्हा तुम्हाला कोणतातरी धोका जाणवतो तेव्हा हा विठोबा डोके वर काढतो. आणि जेव्हा सगळे अलबेल असते तेव्हा सरपोतदार प्रभावी असतात. आणि मग बाहेरचे जग तूम्हाला समजाऊन घेणार नाही याची खात्रीच असल्याने तूम्हीच ती बाई बनून स्वतःला गोंजारले आणि माफ केलेत. हो ना?'',डॉक्टरसाहेबांचे बोलणे ऐकून सरपोतदार निरूत्तर होऊन बघतच बसले. वैदेहीपण आश्चर्याने डॉक्टरसाहेबांकडे बघू लागली. बाबांच्या शरीरात दडलेल्या विठोबाला ती आज भेटली होती. डॉक्टरसाहेब मग स्पष्टीकरण देत बोलू लागले.

''वैदेहीने विठोबाला याआधी कधी पाहिलेच नाही कारण तिच्या सहवासात तुम्हाला कोणताच धोका जाणवत नव्हता. तिचे प्रेमळ वडील बनल्यावर आपल्याला पण एक नवीन आयुष्य मिळाले. एक नाव, कुटूंब आणि घर मिळाले. वडीलांचा रोल करताना तुम्हाला आनंद होऊ लागला. कारण सरपोतदार हे व्यक्तिमत्व प्रेमळ माणसाचे आहे. मग विठोबा आपणहूनच भूमिगत झाल्यासारखा गायब झाला. पण तो दडून आहे आणि तुम्हाला कोणता धोका जाणवला तर तो परत उफाळून बाहेर येईल ही बाब आपल्याला माहित आहे. फक्त आपण आपला आजार औषधे घेऊन बेमालूमपणे लपवायला शिकला आहात.'',बोलताना डॉक्टरसाहेब उठून उभे राहिले आणि त्यांनी उठून समोरच्या टेबलावर ठेवलेला चहाचा कप उचलून तोंडाला लावला. गरम चहानी अंगात उर्जा आल्यासारखे वाटले.

''बाबा आजची अभद्र रात्र सरली ना की सगळे प्रॉब्लेम्स सुटून जातील. तुम्ही फक्त सहकार्य करा. इलाज करून घ्यायला काय हरकत आहे? खरंच तुम्ही मला मारायला धाऊन आला होता. पण त्यावेळी तूम्ही विठोबा होतात. खरंच, देवा शप्पथ.'',वैदेहीच्या आवाजातली कळकळ बघून सरपोतदार दुःखी झाल्यासारखे दिसू लागले.

''अग मी असे कसे केले गं? तुझ्यावर मी कसा हल्ला केला गं? मी भानावर नव्हतो. हो डॉक्टर खरंच बोलत आहेत. जेव्हा तो विठोबा जागृत होतो ना, तेव्हा मी भानावर नसतो. मी औषध घेणे

बंद केले. माझी चूक मी मान्य करतो. पण उद्यापासून तुला काहीच धोका राहणार नाही कारण आज रात्री मी कायमचा निघून जाईन. माझी छायापण तुझ्यावर पडायला नको'',सरपोतदारांचा कंठ दाटून आला.

पण डॉक्टरसाहेब तटस्थ आणि निर्विकार नजरेने त्यांच्याकडे बघत होते. त्यांना सरपोतदारांबद्दल कोणतीच साहानुभूती नव्हती. ''आपल्याला आपला आजार पूर्णपणे माहित असूनही. तूम्ही तो वैदेही पासून लपवून ठेवलात. तूम्ही तिच्या आणि इतरांच्याही जीवाशी खेळला आहात. हो ना? सांगा सरपोतदार. आता तरी खरे सांगा.'',डॉक्टर साहेब स्पष्टच बोलले. त्यांचे बोलणे ऐकून सरपोतदार नुसते निर्विकार होऊन बघत राहिले. वर्षानुवर्षे बेमालूम लपवलेले रहस्य बाहेर येऊ लागले होते.

''मी पूण्याच्या सुधारगृहात जाऊन आलोय. मी तुमची सगळी माहिती काढली आहे. पण मला तुमच्या तोंडून तुमची बाजू ऐकून घ्यायची आहे. सगळे सत्य सांगा सरपोतदार.'', डॉक्टर साहेबांनी जणू धमकीच दिली. मग नाईलाज झाल्यावर सरपोतदारही बोलू लागले.

''आज मला काही फरक पडत नाही. मी या आयुष्यातून मूक्त झालोय. बस्स थोडया वेळातच ती येईल आणि सगळे संपेल. आज मी पण सगळे सत्य कथन करून हा बोजा संपवून टाकणार आहे. वैदेहीला तिच्या बाबां बद्दल सगळं कळलंच पाहिजे. माझी पोर वैदेही, मी कसेही वागलो असलो तरी

वैदेहीवर मी जीवापाड प्रेम केलंय. मी खूप चुकलो असेनही पण माझी वर्तणूक माझ्याच हातात नव्हती. माझ्या हातून गुन्हे होत गेले'',सरपोतदारांच्या डोळयात दाटलेले अूश्रू त्यांच्या गालावरून ओघळू लागले.

''काय बोलताय बाबा? कसले गुन्हे?'',वैदेही भावूक आवाजात बोलली.

तेव्हढयात बाहेरच्या आवारात काहितरी आपटण्याचा आवाज येऊ लागला. धाड्.....धाड्.....धाड्.....धाड्..... वैदेहीचे लक्ष खिडकीतून बाहेर गेले आणि क्षणभरासाठी असे वाटले की कोणी तिथे बाहेर उभे असावे.

झाडाची हलणारी सावली असावी का? मग तिने परत नीरखून पाहिले तर कोणीच नव्हते. नाही नाही तिथे असे कोणी या वादळात उभे असणे शक्यच नाही. या अशा अंधाराचा आणि या सगळया वातावरणाचा परिणाम असावा की काय पण जणू बुद्धी वेगवेगळे खेळ करू लागली होती. मन ताळयावर नव्हते. तेव्हढयात वैदेहीचे लक्ष महेशच्या मृत देहावर गेले. प्रेतावरची चादर कशी काय पण बाजूला झाली होती कोणास ठाऊक? रक्ताच्या थारोळयात पडलेले ते प्रेत जणू निर्जीव असूनही तिला घाबरवण्याचा यशस्वी खेळ खेळत होते. प्रेताचा तो विद्रूप चेहरा उरलासुरला धीर खचवायला पुरेसा होता.

डॉक्टरसाहेबांनी क्षणभर वैदेहीकंडे पाहिले आणि तिची भेदरलेली अवस्था पाहून त्यांनी तिला समोरच्या सोफावर बसायला सांगितले आणि डॉक्टर साहेब सरपोतदारांकडे वळले. पण वळताच समोरचे दृश्य बघून डॉक्टर साहेबांचे बोलणे अर्धवटच राहिले कारण सरपोतदार वेडयासारखे मान हलवत आनंदाने गालातल्या गालात खदखदून हसू लागले. त्यांच्या डोळयात विकृत भाव थैमान घालू लागले.

''ती आलीए, हो, मला कळंलंय की ती खरंच आलीए. ती बाहेरच उभी आहे. वेळ पूरी होताच ती तिचा खेळ सुरू करेल. ती कोणाच्याने ऐकणार नाही. तुमच्या सगळयांच्या समक्ष ती मला घेऊन जाईल''. मग ते चेहऱ्याचे विचित्र हावभाव करत जोर जोरात हसू लागले. त्यांचे हसणे त्या शांत घरात सर्व बाजूने परावर्तीत होऊ लागले. ''हा, हा, हा, ती येईल, हा हा, ती बाहेरच उभी आहे. ती बाहेरच आहे, ती तिथेच आहे''

ते अंगविक्षेप करत केलेले विकृत हसू म्हणजे समोरच्याची विचारसरणी उद्धस्त करणारे शस्त्र होते. बुद्धी गोठवणारे मायाजाळ होते. समोरच्याला वेडे करून घेतलेला तो पाशवी आनंद होता. ते हसू म्हणजे समोरच्या माणसाचा आत्मविश्वास जमीनदोस्त करणारे विडंबन होते. माणसाच्या मानसिकतेची चिरफाड करणारा विकृत खेळ होता. ते बोचणारे राक्षसी हसू सहन न झाल्याने डॉक्टरसाहेब जोरात रागाने ओरडले,''बस्स झाले तूमचे नाटक. सहनशक्तिची परीक्षा बघू नका.

सांगा सरपोतदार तुम्ही गावात कसे आलात आणि तुम्ही वैदेहीच्या आजोबांच्या घरात कसा शिर्कांव केलात. सांगा''. सरपोतदारांचे हसणे आता क्षणात गायब झाले. ते नजर रोखून डॉक्टरसाहेबांकडे बघू लागले. सरपोतदार बोलत नाहीत हे पाहिल्यावर मग थोडयावेळ थांबून डॉक्टरसाहेब स्वतःच बोलू लागले.

''ऐक वैदेही, लक्ष देऊन ऐक. आज मोठा रहस्यभेद होणार आहे. हा समोर बसलेला माणूस सरपोतदार नावाचा नाही आणि तुझे जन्मजाते वडील तर नाहीच नाही. त्यांचे नावही दूसऱ्या कोणाचे आहे आणि तुझे त्यांचे नातेही खोटे आहे. हा माणूसच खोटा आणि बनाव आहे.'',डॉक्टरसाहेबांचे बोलणे ऐकून वैदेही धक्का लागल्या सारखी नुसते बघतच बसली. भेदरलेल्या तिच्या डोळयात भयाण सत्याचे पडसाद उमटले होते.

''हो वैदेही यांचे मूळ नाव आहे 'विठोबा तूकोजी पाटील''', हे नाव एकताच वैदेहीचा चेहरा पांढराफटक पडला. गोंधळलेली बिचारी नुसते बघतच राहिली.

काय माझे बाबा माझे खरे वडिल नाहीच? हे कसे शक्य आहे.? त्यांनी आत्तापर्यंत माझा खूप चांगला सांभाळ केला आणि मग हे असे दुसरेच व्यक्ती कसे झाले? विचार करून वैदेही पार गोंधळून गेली होती. पण मनाने तर वडिल म्हणून तिने यांनाच

मानले होते तर मग आता परकेपणा येणे अशक्यच. वैदेही विचार करून पार बावचळून गेली होती.

डॉक्टरसाहेब मात्र बोलतच होते.....

''यांनी वयाच्या पंधराव्या वर्षीच निघृण खून केला होता म्हणून यांना सुधार गृहात दाखल केले होते. मग काही वर्षे यांच्यावर मानोरूग्ण हॉस्पिटल मध्ये उपचार पण सुरू होते. यांच्या मानसोपचार तज्ञाशी मी बोललो आहे. यांना कायमच औषधे घेण्याचा सल्ला त्यांनी दिला होता. जर औषधे बंद केली तर आजार परत डोके वर काढायची शक्यता कायम रहाणारच. त्याच बरोबर यांना सतत मानसोपचार तज्ञाची गरज लागणार होती.'',डॉक्टरसाहेबांच्या बोलण्याने वैदेहीच्या डोळयातून अश्रू वाहू लागले. ती मुसमुसत ओढणीने अश्रू टिपून घेऊ लागली.

तेव्हढयात बाहेर जोराची वीज कडाडली आणि डॉक्टर साहेबांनी दचकून आवाजाच्या दिशेने बघितले. बाहेर तोच धाड्.... धाड्.... धाड्.... आवाजमात्र कायम येतच राहिला. मग इमरजंसी दिवाही टिमटिमू लागला. वैदेही भांबावल्यासारखी घाबरून आजूबाजूला बघू लागली. हे भयावह वातावरण, घरात मृत माणूस, त्यात अंधार आणि वादळ.....भिती वाटणे साहजीकच होते.

''अग बॅटरी संपत आली असावी. हो बराचवेळ दिवा सुरूच असल्याने बॅटरी संपली असावी आणि हो हा धाड् धाड् आवाज

म्हणजेच बाहेर कुठलातरी पत्रा वाऱ्याने वाजत असावा'',डॉक्टर साहेबांनी वैदेहीला समजावत हाताने शांत राहण्याची खूण केली.

इमरजन्सी दिवा बंद होतच होता. दिवा बंद होतोय हे लक्षात येताच वैदेही उठली आणि पळतच डेस्क जवळ गेली आणि तिथल्या ड्रॉवर मधून तिने मेणबत्त्या आणि काडयापेटी बाहेर काढली. मग घाई घाईने तिने एक मेणबत्ती कशीबशी पेटवली. दिवाही त्याच वेळेस बंद झाला.

अंधाराला थोपवून धरत मेणबत्तीचा मंद पिवळा प्रकाश सवत्र पसरला. ''मेणबत्ती इथे समोर ठेव वैदेही. यांच्यांकडे लक्ष ठेवायला मला उपयोगच होईल. आणि अजून बरेच धक्कादायक सत्य समोर येणे बाकी आहेच.'',डॉक्टरसाहेब रागातच बोलले. वैदेही मेणबत्ती घेऊन हळूहळू चालत आली आणि तिने मेणबत्ती समोरच्या टेबलावर मेणाने चिकटवून ठेवली.

मग डॉक्टरसाहेबांकडे बघत ती म्हणाली,''हे माझे जन्मदाते वडील नाहीत तर हे कोण आहेत? आणि आईचा आणि यांचा काय संबंध?''. तिचा प्रष्ण रास्तच होता. डॉक्टर साहेब परत बोलू लागले.

''विठोबा आणि पुरूशोत्तम ही दोन वेगवेगळी माणसे होती आणि आहेत.'',डॉक्टरसाहेब बोलू लागले. तेव्हढयात काय झाले कोणास ठाऊक पण सरपोतदार परत बोलू लागले.

''नाही नाही मी वैदेहीचा बाबाच आहे. तिच्यामुळे मला कुटूंब मिळाले. मला तिचे बाबा म्हणूनच जगायचे होते. मला चांगला आणि सज्जन माणूस होण्याची संधी मिळाली. मी मानसोपचार तज्ञाचा सल्ला घेत होतो आणि औषधेही घेत होतो. सामान्य आयुष्य जगतच मी हा रिसॉर्ट काढला व जोपासला. माझी मुलगी आणि हा रिसॉर्ट यांनी मला पुरूशोत्तम सरपोतदार म्हणून जगत रहायला मदत केली. पुरूशोत्तम म्हणजे मी खरंच चांगला माणूस आहे. पण मला आता या आयुष्याचे ओझे झेपत नाही. मी विठोबाच्या रूपात केलेल्या गुन्हयांचा मला अंदाज आहे. पण मग 'ती अदृश्य बाई' आयुष्यात आली आणि सगळं सगळं बदललं. माझे गुन्हे तिने पोटात घेतले आणि मला ती घेऊन जायला तयार झाली. या दुहेरी आणि गुंतागुंतीच्या आयुष्याला आता मी कंटाळलोय. हे सगळे व्हावे अशी माझी कधीच इच्छा नव्हती पण मला देवाने असंच बनवलंय. मी असाच आहे. मला विठोबा म्हणून कधीच जगायचे नव्हते. आता ती येऊन माझी या आयुष्यातून सुटका करेल. मी तिची वाट बघतोय कारण बघा रात्रीचे बारा वाजून गेलेत. आता फक्त काहीच वेळ आहे'',सरपोतदार म्हणाले.

''नाही सरपोतदार, कोणती बाई येणार नाही. तुम्ही स्वतःच्या गुन्हयांचा बोजा सहन न झाल्यामुळे मनोमन तिला तयार केलंय. जग तुम्हाला माफ करणार नाही म्हणून तुम्हीच 'ती' बनून स्वतःला माफ करता. मग ती तुमच्या इच्छा पूर्ण करते असे

तुम्हाला जेव्हा वाटते तेव्हा तुम्हीच स्वतःच्या इच्छा पूर्ण झाल्या आहेत असे स्वतःलाच भासवता. तुम्ही स्वतःच्या कल्पनाविश्वात अडकून पडला आहात. आज रात्री एक वाजता तूमचा भ्रमनिरास होणार आहे.'',डॉक्टरसाहेबांनी स्पष्टच सांगितले. पण हे ऐकताच जणू सरपोतदारांचा पारा चांगलाच चढला.

''नाही नाही नाही, तूमचे निष्कर्ष चुकीचे आहेत. सपशेल चुकीचे आहेत. ती तुम्हाला दिसत नाही कारण तिला तूमच्या समोर प्रकट व्हायचे नाही. तूम्ही माझ्या सारखे तीव्र दुःखी नाही त्यामुळे तूम्हा कोणालाच हे दैवाचे दान मिळणार नाही. नियतीला माझ्या दिनवाण्या परिस्थितीची दया आली म्हणूनच मला 'ती' भेटली. ती येईलच, बघाल ती लवकरच येईल, ती येईल, ती येईल हो हो हो ती येणारच.'',सरपोतदार तंद्रितच ओरडून बोलू लागले.

तेव्हढयात 'धडाम्' जोराचा आवाज झाला...

डॉक्टरसाहेब आणि वैदेहीने आवाजाच्या दिशेन दचकून पाहिले. दरवाज्याला लवलेले सर्व अडथळे बाजूला उडून पडले आणि दरवाजा उघडला गेला. जणू कोणी दरवाज्याला लाथ मारावी आणि दरवाजा जोरात उघडावा अगदी तसेच्च!

हो दरवाजा कसा उघडला गेला? वैदेही धक्का लागल्यासारखे दरवाजाकडे बघू लागली. तिच्या मोठया झालेल्या डोळयात

एकच प्रष्ण थैमान घलत होता,'हे कसे झाले? काय खरंच ती आली?'...

दरवाज्याला लावलेले सगळे अडसर जोराने मागे सरकले गेले होते. उघडया दरवाजातून जोराचा वारा आणि पाऊस घूं.....घूं.....आवाज करत आत येऊ लागला. अगदी क्षणभरातच जोरदार पावसाच्या सरी आणि वादळी वाऱ्याने घरात घूसून चांगलाच उन्माद घालायला सुरवात केली. मग अचानक रिसॉर्टच्या रिसेप्शनच्या लाकडी छताच्या फळया खड् खड् आवाज करू लागल्या. जसे काही कोणी छतावरून पळत जावे ना तसे भासू लागले. पण मनाच्या कोपऱ्यात दडलेल्या भितीने जणू 'ती' आल्याचे भासवले आणि जणू पायातले त्राणच निघून गेले. थिजल्यासारखी वैदेही नुसते बघतच राहिली.

''चलं वैदेही, दरवाजा बंद करूया. तू त्यांच्या घाबरवण्याला बळी पडू नकोस. अगं वाऱ्यानी दरवाजा उघडला गेलाय. दरवाज्याची कडी तुटलेली आहे. या आधी नाही का असाच दरवाजा उघडला गेला होता. तसेही रिसॉर्टचा हा भाग तसा लाकडी फळयांचा बनला आहे. वाऱ्याच्या जोरामुळे या छताच्या फळया आवाज करत आहेत. इथे कुठली बाई वैगरे आली नाहिए'',डॉक्टरसाहेबांचे बोलणे ऐकून वैदेही भानावर आली.

डॉक्टरसाहेब पूढे सरसावले आणि त्यांनी दरवाजा बंद केला. मग वैदेही पुढे पळत आली आणि तिने बंद दरवाज्याला

अडथळा म्हणून खुर्चा मांडायला सुरवात केली. डॉक्टरसाहेबही भराभर टेबल सरकवून आणत दरवाजाला टेकून लावू लागले. बघता बघता दरवाज घट्ट बंद झाला. छताच्या फळयामात्र खड् खड् आवाज करत हलतच राहिल्या.

तेव्हढयात त्यांच्या मागून किंचाळण्याचा आवाज झाला. डॉक्टरसाहेबांनी मागे वळून पाहिले तर वैदेही किंचाळत बोटाने खूण करत महेशच्या प्रेताकडे बघायला सांगत होती.

''तो हलला होता. हो मंदार वाऱ्याने चादर उडाली आणि तो हलचाल करत होता. तो कसा काय हलचाल करतोय? बघ बघ.....'',वैदेही कापऱ्या आवाजात बोलली. डॉक्टरसाहेबांनी प्रेताकडे दचकून पाहिले. काय खरंच? आं हे कसे शक्य आहे?.....खरंच प्रेताची हलचाल दिसत होती. हाताची बोटे आणि पाय कंप पावल्या सारखे हलत होते. वैदेही किंचाळत बाजूला जाऊन उभी राहिली. डॉक्टरसाहेब पुढे सरसावले आणि पळतच प्रेताजवळ गेले. प्रेतावरची चादर वाऱ्याने बाजूला पडली होती. डॉक्टरसाहेब प्रेताजवळ गुढग्यावर बसले आणि त्यांनी प्रेताचा हात हातात घेत पल्स तपासून बघू लागले. मनात एकच प्रष्ण उठत होता. 'काय हा अजूनही जीवंत आहे?'. पण छे! जीवंतपणाचा पुरावा असलेल्या हदयाच्या ठोक्यांनी स्वतःला दर्शवण्यास जणू स्पष्ट असमर्थता दर्शवली.

क्षणभरातच डॉक्टरसाहेबांनी मान हलवतच परत चादर प्रेतावर घातली. ''हं मसल रिफलेस्क! मृत्यू नंतरही कधी कधी होतं असं, म्हणजे स्नायुंमधील चेतना या अशा हालचालींना कारणीभूत होते.'',पण डॉक्टर साहेबांचे बोलणे जणू तिला पटले नव्हते.

''कसंला आलाय मसल रिफलेक्स? मंदार तो माणूस मरून दोन तास झालेत आणि तो चक्क हलत होता.'',ती घाबरलेल्या स्थितीत ओरडून बोलू लागली. गोंधळल्या सारखी लांब उभे राहून प्रेताकडे डोळे विस्फारून बघतच राहिली.

''हे प्रेत असे हालणे म्हणजेच 'ती' आलीए, तुम्हाला कळत नाही का? ती तिच्या अस्तित्वाच्या खूणा दर्शवत आहे. ती तुम्हाला खेळवत आहे. ती घरात येऊन परत बाहेर गेली. अगदी माझ्या समोरूनच ती अशी पलीकडे चालत गेली. मग तुम्ही दरवाज बंद करत होता ना, तेव्हा ती पटकन बाहेर सटकून गेली. ती आता दरवाज्या बाहेर उभी आहे. वेळ भरायची वाट बघत ती बाहेरच आहे. ती कधीही आणि कशीही आत येऊ शकते हे ती दर्शवून गेली.'',सरपोतदार मिश्कील हसत बोलले.

त्यांचे बोलणे ऐकून वैदेही वळून दरवाजाकडे बघू लागली. दरवाजा हलत होता. मग दरवाजा काय वाऱ्याने हलतोय का ती हलवत आहे? वैदेहीचे डोळे जणू बाहेरच्या अंधारात तिला शोधू लागले.

''हं काहितरीच सांगून विषयापासून भरकटवू नका. तुमच्या या अशा नाटक करण्यानी काय होणार? आज मी जे सांगायचे ते सांगूनच राहणार.'',डॉक्टरसाहेब रागाने बोलले.

''सुधारगृहातील आपल्या जुन्या माहितीवरून मला सगळे सत्य समजले आहे. सरपोतदार तुमच्या बद्दल मला सर्व काही समजलंय. मी तुमच्या मानसोपचार तज्ञाला भेटलो आहे. त्यांनी मला आपल्या आजारावद्दल सर्व काही कथन केले आहे. बोला सरपोतदार मी बोलतोय हे खरं आहे ना?'',डॉक्टर साहेबांनी सरपोतदारांना प्रष्ण केला. पण सरपोतदारांच्या डोळयात आता मात्र निश्चिंतता होती.

''आज मला कोणतीच भीती वाटत नाही. माझे आयुष्य फक्त काही मिनीटे राहिले आहे. मी आयुष्यात काय केले? का केले? ते आता काळाच्या पडद्याआड झाकले जाईल. झालेल्या घटनांबाबत मी काही स्पष्टीकरण दिले तरी आपल्या कोणालाच ते पटणार नाही आणि समजणारही नाही. फक्त एक विनंती आहे की वैदेहीची तुम्ही काळजी घ्या. तिला सुरक्षितपणे परत अमेरीकेला पाठवून द्या. ही जागा विकून टाका आणि तिला सगळे पैसे द्या हे सगळे तिच्या आईचे आहे.'',सरपोतदारांचे बोलणे ऐकून वैदेही वळून बघू लागली.

पण सरपोतदार तंद्रीत बोलतच राहिले,''वैदेहीच्या आईचे नाव होते सुधा होते. ती ती एक विलक्षण व्यक्तिमत्व होती. ती फार सुंदर स्त्री होती. तिच्यावर माझे अजूनही प्रेम आहे. ती माझ्या

कायम हृदयात राहिल. वैदेही अगदी तिच्या आईसारखी आहे. वैदेही बाळा माझा सेफ उघड त्यात तुला हवी असलेली सगळी माहिती मिळेल. त्यात अनेक वर्षांच्या माझ्या डायऱ्या आहेत. तूझ्या आईबद्दल मी त्यात लिहीले आहे. पण आता माझी जाण्याची वेळ झाली आहे. बघ एक वाजायला काही सेकंद उरली आहेत. अशी माझ्या समोर बसून रहा. मला तूला बघतच मरू दे.'',सरपोतदारांचे बोलणे ऐकून वैदेहीच्या डोळयात पाणी तरळले. काय खरंच ते हे जग सोडून चाललेत?

''बाबा असं बोलू नका. तुम्ही बरे व्हाल. मी स्वतः तुमच्यावर इलाज करवून घेईन. तूम्ही सहकार्य करा ना!'',वैदेही दाटलेल्या कंठाने बोलली. मग तिची नजर समोरच्या घडयाळाकडे गेली.

सगळे निस्तरताना वेळ कसा गेला होता कुणास ठाऊक? खरंच रात्रीचा एक वाजत आला होता. हं विज्ञानावर अटळ विश्वास असणाऱ्या डॉक्टरसाहेबांना त्यांच्या नकळत सावध व्हायला झाले.

नाही नाही ती अस्तित्वातच नाही तर येईलच कशी? पण मग मनाची चलबिचल का व्हावी? अंगावर भितीने शहारा का यावा? नकळतच तिची दहशत का जाणवू लागावी?

वैदेही आपसूकच उठून उभी राहिली. ती चालत डॉक्टर साहेबांच्या जवळच येऊन उभी राहिली. तिच्या चेहऱ्यावर तणाव

आणि भीती यांचे संमिश्र पडसाद उमटून जाऊ लागले. भिंतीवरील घडयाळयाची टीक.... टीक..... टीक..... आणि वाऱ्याचा ...घूं....घूं..... आवाज, वाऱ्यामुळे दरवाज्याचे धडाड्...धडाड्...धडाड्.... धडकवणे .....बस्स सहनशक्ति संपत आली .....

मग १२:५७ ..... १२:५८ ..... १२:५९.....१.....

निःशब्दता आणि काळजाचे धड् धड् धड्.....

मग अचानक मेणबत्तीच्या दिव्याची वात फडफडू लागली. कुठूनतरी वाऱ्याचा झोत यावा असे वाटले. वैदेहीने डॉक्टरसाहेबांकडे पाहिले तर ते सरपोतदारांकडे नजर रोखून बघत होते. मग मेणबत्तीची वात आणखीनच फडफडू लागली. डॉक्टरसाहेबांनी मेणबत्तीकडे आश्चर्याने पाहिले तर मेणबत्ती लवकरच संपणार आहे असे त्यांना जाणवले. नेमकी याच वेळेला मेणबत्तीला विजायचे होते. आता मोबाईल मधील दिवा लावावा लागणार. डॉक्टरसाहेब मोबाईल उचलून हातात घेणार तोच मेणबत्तीची वात विजली. सगळीकडे जिवघेण्या अंधाराचे राज्य झाले. बस्स फक्त अंधार.....

तेव्हढयात बाहेर कड्.....कड्.....कड्.....असा जोरदार आवाज झाला. आवाज जवळूनच येत होता. डॉक्टरसाहेबांनी आश्चर्याने वर छताकडे पाहिले. हो आवाज

छताकडूनच येत होता. मग हाताने चाचपडतच डॉक्टरसाहेबांनी मोबाइल उचलला. ते दिव्याचे बटन दाबणार तोच काड्ब.....कडाक.....धडाम.....आवाज कानठळया बसवणारा होता.

''मंदार हा आवाज कसला? मंदार मंदार 'ती' खरंच आली असेल का?'',वैदेही ओरडत होती.

डॉक्टरसाहेबांनी लटपटत्या हाताने मोबाईलचा दिवा लावला आणि दिव्याचा प्रकाश सरपोतदारांवर टाकला. सरपोतदारांनी डोळे बंद केले होते. जणू शांतपणे मरणाला सामोरे जायला ते तयार झाले होते. डॉक्टरसाहेबांनी मोबाईला प्रकाश वर छतावर टाकला.

कड् कड् धडाम्..... जोराचा आवाज करत छत तुटत होते. हे काय होतंय? आं आता काय करायचं? हो हो बघता बघता लाकडी छताचे तुटडे होत होते. मग तुटक्या छतातून तो झाडाचा अजस्त्र बुंधा दिसू लागला. झाड छत तोडून खाली येत होते. हो हो कोणतेतेरी अजस्त्र झाड छताचे तुकडे तुकडे करत पडत होते.....

डॉक्टरसाहेब दोन पाऊले मागे सरकत जोरात ओरडले,''वैदेही मागे हो!''. पण वैदेही थिजल्या सारखी नुसतीच बघत उभी होती. अखेर डॉक्टर साहेबांनी वैदेहीच्या दंडाला धरून तिला बाजूला खेचले.

काही कळायच्या आत ते झाड खाली येऊ लागले. लाकडी फळयांनी बनलेले छत उद्धस्त करत ते अजस्त्र झाड झपाटयाने खाली पडू लागले. दोघांचा श्वास रोखला गेला.

सरपोतदारांच्या चेहऱ्यावरचे ते स्मित हास्य आणि त्यांचे ते कानात रेंगाळणारे शब्द.....''ती आली. मला घेऊन जायला आली'',डॉक्टरसाहेब आणि वैदेही नुसते बघतच राहिले.

काही कळायच्या आत घटना घडल्या आणि सावरायला वेळही मिळला नाही. समोर घटणारे धक्कादायक दृश्य बघत राहण्याशिवाय पर्यायच नव्हता. हो हो अगदी उघडया डोळयासमोर बघता बघता झाड छत तोडून खाली येऊन पडले. झाड चांगलेच मोठे होते. समोर बघताच लक्षात आले की झाड जीथे पडले तिथेच तर सरपोतदार बसले होते. हो हेा अगदी त्याच ठिकाणी म्हणजे काय.....

हं हे काय झाले? अगदी उघडया डोळयासमोर! विश्वास बसत नव्हता. ''बाबा, बाबा,'',वैदेही किंचाळत रडू लागली.

पण तेव्हढयात तुटक्या छतातून पावसाच्या धारा घरात कोसळू लागल्या आणि वादळवाराही घोंगावतच घरात सर्व काही अस्ताव्यस्त करू लागला. चेहऱ्यावर पडणारे पावसाचे पाणी पुसत आणि तोल सांभाळत ती आजूबाजूला बघायचा प्रयत्न करू लागली. वीजांच्या लखलखाटात तिचे डोळे बाबांना शोधायचा

आटापिटा करू लागले. मग अखेर वीजेच्या चकचकाटात तिला ते दिसले आणि तिच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांचे ते उघडे डोळे आणि त्यांचे ते निर्जीव शरीर. हो हो झाडाच्या बुंध्याखाली सरपोतदार चिरडले गेले होते. म्हणजे काही कळायच्या आतच.....

म्हणजे सरपोतदार म्हणाले तस्सेच झाले. त्यांचे मरण बरोबर रात्री एक वाजताच झाले. बरोबर रात्री एक वाजता ते झाड सरपोतदार यांच्या अंगावर कसे पडले कोणास ठाऊक? आं आं काय खरंच असे होऊ शकते? म्हणजे .....

त्या अजस्त्र झाडाच्या बुंध्याखाली रक्ताच्या थारोळयात सरपोतदार निपचीत पडले होते. त्यांचे ते शेवटचे शब्द कायम लक्षात राहतील,''ती आली, मला घेऊन जायला आली.''. डॉक्टरसाहेबांच्या विचारसरणीच्या चिंधडया करत हे शब्द कानात परत परत घोळत राहिले. डॉक्टरसाहेब थक्क झाले होते. फक्त सरपोतदारांसाठी दृश्य असलेली ती अदृश्य रूपात येउन तिचे कार्य करून गेली.

''बाबा बाबा.....''वैदेही अविश्वासाने मान हलवत रडतच किंचाळत राहिली.

तुटक्या छताचे तुकडेही खाली पडतच होते. रिसॉर्टचा रक्षक मरताच जणू सगळा रिसॉर्टच तुटू लागला. इथे नुसते उभे राहणेही शक्य नव्हते. तसे आता इथे उभे राहूनतरी काय

करणार म्हणा? सरपोतदारांचा केव्हाच मृत्यू झाला होता. म्हणजे काय सरपोतदारांचे बोलणे खरे ठरले? काय खरंच 'ती' येऊन त्यांना घेऊन गेली? शास्त्रांच्या सिद्धांताच्या चिंधडया उडवत काय 'ती' तिचे अस्तित्व सिद्ध करून गेली?.....

९. दृश्य का उदृश्य?...रहस्यभेद

त्या रात्रीनंतर दुसऱ्याच दिवशी पोलिसांना बोलवणे क्रमप्राप्त होते. वैदेही आणि डॉक्टरसाहेबांनी पोलिसांना सर्व कथन केले आणि महेशचा मृतदेह पोलिसांच्या स्वधीन केला.

त्या रात्री जे झाले ते अजूनही गूढच होते. म्हणजे 'ती' आलेली काही दिसली नाही पण बरोबर रात्री १ वाजता ते झाड सरपोतदारांच्या अंगावर पडणे, मनाला पटत नव्हते. काय सत्य? आणि काय असत्य?, डोके पार चक्राउन गेले होते. त्यात भैरवशास्त्री छाती ठोकपणे सांगत होते की ती विभूती वाऱ्यानी आणि पावसाने धूतली गेली आणि म्हणून तिनेच हे केले आणि ती सरपोतदारांना घेऊन गेली. त्यांच्या मते त्या हवेलीच्या अंधाऱ्या खोलीत तिचे अस्तित्व अजूनही आहे. ती तिथेच आहे.

पण मागील काही दिवसांचा डॉक्टरसाहेबांचा आभ्यास काही वेगळेच सांगत होता. अंतिम रहस्याचे धागेदोरे डॉक्टरसाहेबांना सापडले होते. हवेलीच्या त्या खोलीचे अंतिम रहस्य बस्स सुटणारच होते. डॉक्टर साहेबांना 'ती' जणू वेगळयाच रूपात सापडली होती.

''आज दुपारी जेवण झाल्यावर सगळयांनी सरपोतदारांच्या खोलीत भेटा. आज माझे काम पूर्ण झाले आहे आणि पुरावे समोर ठेवत माझे निष्कर्ष मी आपल्या समोर ठेवीन'' असे डॉक्टर

साहेबांनी वैदेही आणि तिच्या परिवाराला कळवले. तसेच गावाच्या इंस्पेक्टरसाहेबांना पण या वेळी आवर्जून हजर राहणारायला सांगितले होते. डॉक्टरसाहेबांना आता फार वेळ त्यांचा व्यवसाय सोडून इथे राहणे शक्य होणार नव्हते. बस्स आजच सगळयाचा सोक्ष मोक्ष लावायला ते सज्ज झाले

डॉक्टरसाहेबांनी घडयाळाकडे नजर टाकली. दुपारचे अडीच वाजले होते. तेव्हढयात पावलांचे आवाज जवळ येऊ लागले. खोलीचा मुख्य दरवाजा उघडला गेला आणि दारवाज्यात उभ्या वैदेहीकडे डॉक्टरसाहेबांचे लक्ष गेले. तिच्या चेहऱ्यावर थकवा अजूनही ठाण मांडून होताच. तिच्या डोळयाखाली काळी वर्तुळे तयार झाली होती. तिचे वजनही चार एक किलो कमी झाल्यासारखे वाटले. मानसीक धक्क्यातून ती जणू सावरली नव्हती.

''त्या रात्रीनंतर आपल्याला तसे बोलायला वेळच मिळाला नाही. त्या भयाण रात्रीची आठवणही नकोशी वाटते. पण आता जे काही आहे ते मला पूर्णपणे संपवायचंय. अगदी कायमचं. मी आता खूप थकली आहे.'',वैदेही वैतागलेल्या सूरात बोलली. तिच्या मागून तिचा पती आणि मूलगाही आत आले.

''वैदेहीने मला सर्व कथन केले आहे. धक्काच बसला. म्हणजे हे असे असू शकते यावर विश्वासच बसत नव्हता.'',वैदेहीचा पती आश्चर्याने बोलला. बिचारा खरंच हादरला होता.

डॉक्टरसाहेबांनी काही वेळ सगळयांशी आपुलकीने संवाद साधला.

तेव्हढयात दरवाज्यातून गावाचे इंस्पेक्टर आत आले. इंस्पेक्टरसाहेब काही दिवस याप्रकरणाची चौकशी करतच होते. त्यात सरपोतदारांचा असा विचित्र मृत्यू झाल्याने फक्त औपचारीक चौकशी करण्यापलीकडे त्यांच्याकडे काही पर्याय नव्हता.

सगळे खूर्चीत स्थानापन्न झाल्यावर डॉक्टरसाहेबांकडे अपेक्षेने बघू लागले. मग डॉक्टरसाहेब सगळयांच्या समोर येऊन उभे राहिले. त्यांच्या डोळयात आपुलकी बरोबरच समाधानही झळकत होते. त्यांनी सगळयांकडे बघत स्मित हास्य करत त्यांचे बोलणे सुरू केले.

''आजच्या दिवसाची आपण सगळेच वाट बघत होतो अगदी मी पण, कारण आता हे सगळे कल्पनेच्या पलिकडचे थरार झाले. मग सुरवाती पासून सर्व घटना क्रमबद्ध तपासल्या तर वैदेहीच्या बाबांचा आजार बळावणे आणि वैदेहीने मला भेटणे. मग त्या अदृश्य बाईच्या असण्याबाबतचे त्यांच्या डायरीत सापडलेले उल्लेख, रात्री त्या हवेलीच्या दिशेने येणारे आवाज ऐकणे, मग आम्ही सगळयांनी रात्री त्या हवेलीत जाणे, भैरवशास्त्रींनी काढलेले निष्कर्ष आणि ती १७ जुलैची रात्र, महेशचा झालेला खून आणि अखेर सरपोतदरांचे झाड पडण्याने झालेला मृत्यू.....सगळे वेड लावणारे आहे. त्यात

भैरवशास्त्रींचा अध्यात्मिक निष्कर्ष हा वेगळाच निघाला म्हणजे सगळेच गूढ आणि धक्कादायक.

पण तरीही जे झाले ते वैज्ञानीक दृष्टीने आभ्यासायलाच हवे. मग याबाबत मी खूप विचार केला. सरपोतदारांच्या बऱ्याच डायऱ्या वाचल्या, सुधारगृहाला भेट दिली, सरपोतदारांच्या मानसतज्ञ डॉक्टरांना भेटलो. आणि सर्व पुरावे गोळा केले. मग सर्व घटना मानसशास्त्राच्या नजरेतून तपासल्या. आणि मी एका स्पष्ट निष्कर्षावर येऊन पोहोचलो. त्या रात्री बरोबर एक वाजता सरपोतदारांच्या झालेल्या मृत्यू बाबतही मी शास्त्रीय निष्कर्षावर आलो आहे.

सरपोतदारांना 'मल्टीपर्सन्यालीटी डिसॉर्डर'. तसेच 'डिल्यूजन' म्हणजे भास होणे हा रोग त्यांच्या लहानपणीच जडला होता आणि मग तो पुढे बळावतच गेला. सरपोतदार यांचे मूळ नाव होते 'विठोबा तुकोजी पाटील'. हा विठोबा जन्मतः आक्रमक आणि अस्थिर व्यक्ती होता. त्याच्या आई-वडीलांनाही तो सांभाळला जात नव्हाता. मग त्याचे क्रौर्य जगासमोर येणारच होते.

लहानपणीच विठोबांनी छोटयाशा कारणासाठी घरच्या एका नोकराचा निघृण खून केला. म्हणजे प्रेताचे तुकडे करून मग प्रेत पूरून टाकणारा नराधम कोणी लहान मुलगा होता यावर पोलिसांचाही विश्वास बसत नव्हता. या क्रूरकर्मा नराधम मूलाला

पोलिसांनी जेरबंद केले. मग विठोबावर खटला दाखल झाला. विठोबाचे आई-वडील या धक्क्यातून सावरलेच नाही. विठोबा सुधारणे अशक्यच आहे याची खात्री होताच ते जणू उद्वस्थ झाले.

मग वडीलांचे रागावणे, त्यांच्या आईचा मानसीक धक्कयामुळे झालेला मृत्यू, मित्रांचे त्याच्याकडे पाठ फिरवणे आणि त्यांची सुधारण्याची अक्षमता.....

चांगले-वाईट, सत्य-असत्य या संकल्पनांचे जणू मनात एक द्वंद्वच सुरू झाले. जणू एक मन हातून झालेल्या गुन्हयाबाबत अपराधी भावना बाळगून होते तर दुसरे मन भावनाशून्य असे सराईत गुन्हेगार होते. जणू चांगल्या संकल्पना अंर्तमनाला मनाला पटत असत तर एक उन्मत्त मन गुन्हे करायला प्रवृत्त करत असे. चांगला माणूस व्हायचंय, पण कसे? कोणी मनाविरूद्ध केले तर त्याचा खून करावा वाटतं. चांगली तत्वे मनाला पटतात पण मग राग अनावर होतो आणि नावडत्या माणसाचे पार तुकडे करावेसे वाटतात. शाळेच्या शिक्षकांना भोसकावेसे वाटते, मित्रांना मारून त्यांचे हातपाय तोडावेसे वाटतात आई-वडीलांना त्रास द्यायचा नव्हता पण हातून असेच घडत गेले...

या विरोधाभासातूनच त्यांचे व्यक्तिमत्व दुभंगले गेले. मग जणू नवीन व्यक्तिमत्वाचा जन्म झाला. हो विठोबाच्या स्वभावाच्या अगदी विरूद्ध अशा सज्जन, प्रेमळ स्वभावाचे हे वेगळे व्यक्तिमत्व सुधारगृहात चांगले वर्तन करू लागले आणि दुष्ट

विठोबाला ते निष्क्रीय करायला शिकले. विठोबाला काबूत ठेवायला शिकले. औषधांचा आणि उपचारांचा त्यांच्यावर परिणाम होऊ लागला. पण जर उपचार थांबवले तर मात्र तो परत आक्रमक होतो याचा अंदाज त्याला आला. सोईस्कररित्या ते कधी विठोबा बनत तर कधी चांगला व्यक्ती बनत. या तऱ्हेने दोन वेगळी आयुष्ये जगणे त्यांना जमू लागले. चांगल्या वर्तणुकीनंतर ते प्रशंसाही मिळवू लागले आणि त्यांच्या विरोधात जाणाऱ्यांना उद्धस्थ करणेही त्यांना जमू लागले.

मग एके दिवशी वैदेहीचे आजोबा श्री विश्वास गोखले सुधारगृहात आले आणि दोन मुलांची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी त्यांनी दाखवली. सुधारगृहातून दोन मुले निवडली गेली होती. त्यात विठोबापण होता. ही संधी त्यांच्या दृष्टीने महत्वाची होती. बाहेरचे जग त्यांना तसे मान्य करणार नाही याची त्यांना खात्री होती. गुन्हेगार मूलाला काय भविष्य असणार?

पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. वैदेहीच्या बाबांच्या मानसिक आजारामुळे त्यांना वगळण्यात आले. त्यांचा चांगलाच हिरमोड झाला. कारण त्यांना सुधारगृहातून सोडण्याची वेळ जवळ येत चालली होती. मग बाहेर गेल्यावर कुठे जायचे? काय करायचे?

ज्या मुलाची निवड झाली त्याचे नाव माहित आहे काय होते ते? त्याचे नाव होते 'पुरूशोत्तम सरपोतदार'. हो विठोबा आणि

पुरूशोत्तम अशी दोन वेगवेगळी मुले होती. डॉक्टरसाहेबांचे बोलणे ऐकून सगळयांच्या चेहऱ्यावर आश्चर्य उमटले. धक्का लागल्यासारखे ते डॉक्टर साहेबांचे बोलणे लक्ष देऊन ऐकू लागले. म्हणजे समोर दिसणारा साधा माणूसही हे एव्हडे रहस्य लपवून होता यावर जणू त्यांचा पटकन विश्वास बसत नव्हता.

वैदेहीच्या आजोबांनी पुरूशोत्तमला पाहिले नव्हते. याचा फयदा विठोबाने उठवला योगायोगाने विठोबा आणि पुरूशोत्तमचा सुधारगृहातून सुटायचा दिवस एकच होता. दोघे एका वेळेलाच बाहेर पडले.

मग काय, विठोबाने करामती करायला सुरवात केली. खरा पुरूशोत्तम सरपोतदार गावाकडे पोहोचलाच नाही. हो विठोबानीच त्याला गायब केले. खूनी तर तो होताच. हो खऱ्या पुरूशोत्तमला विठोबाने मार्गातून बाजूला केले'',बोलताना क्षणभर थांबून डॉक्टरसाहेबांनी सगळयांच्या चेहऱ्याकडे नजर टाकली. डॉक्टरसाहेबांच्या बोलण्याचे पडसाद आता प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसू लागले. आश्चर्य, कुतूहल, शंका असे अनेक भाव प्रत्येकाच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहू लागले.

मग गालातल्या गालात हसत डॉक्टरसाहेब पुढे बालू लागले,''सरपोतदार म्हणून रहात असलेल्या विठोबाचा जणू दूसरा जन्मच झाला म्हणजे आता त्याच्यातल्या दूसऱ्या चांगल्या व्यक्तिमत्वाला नावही मिळाले. हो आता पुरूशोत्तम सरपोतदार

म्हणून तो सज्जन माणसाचे आयुष्य जगू लागला. तो गावाकडे येऊन गोखल्यांच्या घरी सरपोतदार म्हणून राहू लागला आणि कोणाला काही शंकाही आली नाही.

पुरूशोत्तम वैदेहीच्या आजोबांची सेवा करू लागला. अशीच काही वर्षे सरली. पुरूशोत्तम म्हणून त्याला जगणे आवडू लागले. विठोबा मात्र जणू मनाच्या एका कोपऱ्यात निपचीत बसून राहिला. पुरूशोत्तमला नवीन घर मिळाले, काम मिळाले आणि पैसे मिळू लागले.

''मग वैदेहीचा जन्म कधी झाला? काय पुरूशोत्तमने गोखल्यांच्या मुलीशी लग्न केले?'',वैदेहीच्या नवऱ्याने प्रष्ण विचारला. डॉक्टरसाहेबांनीही पुढची कथा सांगायला सुरवात केली.

''नाही गोखल्यांची मुलगी विवाहीत होती आणि दुसऱ्या शहरात रहात होती. पण काही कारणाचे एके दिवशी ती तिच्या लहान मुलीला घेऊन गावाकडे कायमची रहायला आली. तिच्या नवऱ्याचा मृत्यू झाला होता. त्यांच्या मुलीचे नाव होते सुधा आणि नातीचे नाव होते वैदेही. डॉक्टरसाहेबांचे बोलणे ऐकून वैदेही सावध होत ताठ बसली.

आता पुरूशोत्तमची नजर सुधावर पडली.....

आता पुरूशोत्तमची हाव आजून वाढली. सुधा सुंदर होती, हुशार होती आणि गोखल्यांच्या संपत्तीची एकुलती एक वारस होती.

आता त्याला सुधा, वैदेही आणि घर असे सगळेच हवे होते. तो सुधा आणि वैदेहीला प्रेमाने संभाळायला तयार होता. तो गोखल्यांकडे हा विषय काढणारच होता पण गोखले त्यावेळी जास्तच आजारी पडले. मग बोलायचे तरी कसे?

पण अशातच गोखल्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे घर आणि पैसा सुधाच्या नावावर झाले. मग परत समाजात मान सन्मान मिळवण्यासाठी सुधाशी लग्न करणे हा एकच पर्याय पुरूशोत्तमकडे होता. वेळ साधून पुरूशोत्तमने एक दिवस सुधाला मागणी घातली.

पण सुधाला पुरूशोत्तम बाबत केव्हाच शंका आली होती. हा सामान्य माणसासारखा नाही याबाबत तिला अंदाज आला होता. तिने त्याच्यातला विचित्रपणा जाणला होता. तिने पुरूशोत्तमला निघून जायला सांगितले.

मग मात्र पुरूशोत्तमला त्याच्या कठीण भविष्यकाळाचा अंदाज आला. तसा इथे तो चांगला रूळला होता. गोखले त्याला त्याच्या कामाचे पैसेही देत असत आणि कामही त्याला जमत होते. मग हे घर त्याला आपलेसे वाटू लागले होते. बाहेरच्या जगात त्याला तसे कोणीच राहिले नव्हते. आता कुठे जायचे? काय करायचे? छे हे सगळं कसं काय सोडायचे?

आणि मग.....''डॉक्टर साहेबांनी क्षणभर थांबून सगळयांच्या चेहऱ्यावर नजर टाकली. गोष्टीत रंगलेले सगळे जणू कानात जीव आणून बोलणे ऐकत होते.

''कोपऱ्यात निपचीत बसून राहिलेला विठोबा परत जागृत झाला. विठोबाला कुठे आलिए दया माया? मग एकदिवस सुधा पण तशीच गायब झाली. एकदिवस अचानक चक्क दिसेनाशी झाली.'',वैदेहीने डॉक्टर साहेबांचे अर्धवट वाक्य पूर्ण केले.

''मग सरपोतदारांनी दोघांचे लग्न झाले आहे आणि मग ती कौटुंबिक कलहातून रागावून निघून गेली अशी अफवा सगळीकडे पसरवली. पुरूशोत्तम गोखल्यांकडे अनेक वर्षे रहिला होता हे लोकांना माहितच हेाते. त्याच्या बोलण्यावर कोणी शंका घेतली नाही.'', बोलणे संपवताच डॉक्टरसाहेबांनी वैदेहीच्या खऱ्या आईचा फोटो सगळयांना दाखवला.

सगळे एक एक करून आश्चर्याने तो फोटो हातात घेऊन बघू लागले. वैदेहीतील आणि तिच्यातील साम्य लपणारे नव्हते. हो अगदी तिच चेहरेपट्टी. म्हणजे संशयला काही जागाच राहिली नाही. भूतकाळात नाहिशी झालेली सुधा आज परत जगासमोर येत होती. वैदेहीची आई तिचा गैरसमज दूर करायला परत आली होती.

आईचा तो फोटो बघून वदेहीचा चेहरा धक्का लागल्यासारखा झाला. आज तिला तिच्या आयुष्यभराच्या प्रष्णाचे उत्तर

आपसूकच मिळाले. ''हो आई तू मला तुझ्या मर्जीने सोडून गेली नाहीस तर तूझा नाईलाज झाला. लहान मुलीला असे सोडून जाणाऱ्या तूला मी निर्दय, भावनाशून्य, कठोर, दुष्ट, स्वार्थी असे बरेच काही म्हणाले. त्याबद्दल मला माफ कर. तुझ्यावर बेतलेला प्रसंग कोणाला कळलाच नाही गं. बघ माझा गैरसमज आता दूर झाला आहे. माझी आई, माझी आई'',बोलताना वैदेहीचे डोळे भरून आले. चेहरा लपवत ती तिच्या ओढणीला डोळे पूसू लागली. तिची मनस्थिती बघून सगळे क्षणभर गप्प झाले.

मग क्षणभरातच भानावर येत तिच्या मनातला एक प्रष्ण तिने विचारला ''मग माझी आई म्हणून इथे राहणारी ती बाई कोण होती?'',वैदेहीची शंका शंभरटक्के बरोबर होती. तिचा प्रष्ण एकून डॉक्टरसाहेबांच्या डोळयात चमक आली आणि ते परत बोलू लागले.

''तिचे नाव आहे सुशमाताई'. हो वैदेही, ती बाई आजूनही जीवंत आहे. मी तिचा पत्ता शोधून काढला. ती सुधारगृहातील एका फोटोत मला दिसली होती. पूण्याच्या सुधारगृहातून मला तिचा पत्ता मिळाला. मी तिला भेटलो आणि तिने मला इत्यंभूत सगळी हकिकत कथन केली. विठोबा पाटीलच्या सुधारगृहात येण्या पासून ते तिचे परत पूण्याला येण्यापर्यंत सर्व काही सांगितले. तिच तर आहे या सगळयाची मूख्य साक्षीदार.''

चार पैसे मिळावेत म्हणून ती वैदेहीची आया म्हणून काम करायला तयार झाली. वैदेहीची आई गेली तेव्हा वैदेही बिचारी अगदी लहान पोर होती आणि सरपोतदारांना कुठे होता अनुभव लहान मूल सांभाळायचा? पण मग त्यांना बाहेरच्या जगातील तसे कोणीच माहित नव्हते जे मदत करेल. त्यांच्या मनात एक नाव आपसूकच आले ते म्हणजे, 'सुशमाताई'.

हं त्या सुधारगृहात कामाला होत्या आणि सुधारगृहात असताना त्या सरपोतदारांशी आपूलकीने बोलत असत. बस्स सरपोतदारांनी त्यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांना वैदेहीची आया म्हणून नेमले. वैदेहीला त्या तिची आई आहेत असे सांगण्यात आले. त्या काही दिवस इथे तिची आई म्हणून तिला सांभाळत असत. पण मग सरपोतदारांच्या विक्षिप्त मानसिकतेची चुणूक एकदा त्यांनाही मिळाली आणि त्या चांगल्याच घाबरल्या. मग कोणतेतरी कारण पुढे करून त्यांनी इथून चक्क पळ काढला. पण वैदेही मात्र सुशमाताईनाच आई समजून होती.

त्याच बरोबरीने एक महत्वाची माहिती कळवणारा माणूस होता म्हणजे त्यांचा मानसोपचार तज्ञ. डॉ मोघे. सरपोतदारांना कायमच औषधांची गरज पडत असे. सरपोतदारांना त्यांचे रहस्य मानसोपचार तज्ञांना तरी सांगणे भाग पडत होते. त्यांनीच सरपोतदारांत दडलेली व्यक्तिमत्वे, आणि त्यांना काबूत ठेवण्यासाठीचा इलाजाबाबत सर्व सत्य कथन

केले.'',डॉक्टरसाहेबांनी बोलताना पुराव्यांची एक फाईल समोरच्या टेबलावर ठेवली.

''पण रहस्य इथेच संपत नाही तर एक शेवटचा धक्का अजूनही आहे. त्या हवेलीतील अंधाऱ्या खोलितली ती अदृश्य बाई मला जणू सापडली आहे.'',डॉक्टरसाहेबांचे बोलणे ऐकून उत्कंठा जणू शिगेला पोहोचली.

''वैदेहीने मला दिलेल्या सरपोतदारांच्या डायऱ्या मी काही दिवस सतत वाचतोय. म्हणूनच मला आज त्यापुढचे काही रहस्य समजले. हवेलीतील त्या अंधाऱ्या खोलीबाबत माझी जवळपास खात्रीच झाली आहे. पुरावा म्हणून सरपोतदारांच्या डायरीतील एक उल्लेख मी आपल्या सगळयांना वाचून दाखवतो. या मजकूरात एक रहस्य दडले आहे.'',डॉक्टर साहेबांनी समोरील एक डायरी उघडली आणि डायरीतील एक पान उघडले.

''हं नीट ऐका,'',डॉक्टर साहेबांनी हाताने खूण करत सगळयांना लक्ष देण्यास सांगितले.

ते डायरीच्या पानावरचा मजकूर जोरात वाचू लागले,''मी हवेलीच्या एका खोलीत जे काही जपून ठेवले आहे तेच मला तिथे परत परत जाण्यास भाग पाडते. आयुष्यभराचा हिशोब मला तिथे सापडतो. माझा इतिहास मी तिथे जपून ठेवला आहे. भूतकाळात डोकावताना माझे मन दुःखी होते. मग पावले मला

परत त्या खोलीत नेतात आणि मी माफीची भीक मागतो..'',वाचून झाल्यावर डॉक्टर साहेबांनी मान वर करत सगळयांकडे नजर टाकली.

''म्हणजे काय? मला तर काहीच समजले नाही. नुसता शब्दांचा खेळ आहे.'',वैदेहीचा नवरा आश्चर्याने बोलला.

''सुरवातीला मलाही असेच काही कळले नाही पण मग मी स्वतःलाच काही प्रष्ण विचारले. हवेलीच्या त्याच एका खोलीत असे काय आहे ज्यामुळे सरपोतदार तिथेच जात असत? मग विचार केला ती खोली एका बाजूला कोपऱ्यात आहे आणि ती खोली मोकळी आहे. त्यामुळे त्यांना तिथे कोणी बघणारे नव्हते.

मग एक प्रष्ण उपस्थित होतो की काय त्यांना तिथे काही लपवायचे होते?.....

मग मी मागील काही दिवस त्या खोलीत जात होतो आणि ती खोली तपासत होतो. सुरवातीला मला संशयास्पद असे काहीच आढळले नाही. खोली पूर्णपणे मोकळी होती. काही लपवायचे तरी लपवणार कुठे? मग मला त्या रात्रीची एक महत्वाची गोष्ट आठवली की सरपोतदार एका भिंतीपाशी जाऊन उभे राहत होते. त्या भिंतीला कसलातरी मोठा डाग होता. मी जवळ जाऊन त्यावरील धूळ बाजूला केली तर तो डाग सिमेंटचा होता. हो कोणीतरी भिंतीतील खड्डा बुजवावा असे वाटले. मग मी शेजारच्या खोलीत गेलो तर मला भिंतीतील मोठा कोनाडा

दिसला. मग मी पळत दूसऱ्या खोलीत गेलो तर तिथेही तसाच अजून एक मोठा कोनाडा होता. मग एक गोष्ट वीजेसारखा शॉक देऊन गेली. सगळया खोल्यांमध्ये मोठा कोनाडा आहे मग त्या खोलीत कोनाडा कसा नाही?'',डॉक्टर साहेब बोलताना थोडे थांबले आणि त्यांनी सर्वाच्या चेहऱ्यावरून नजर फिरवली. सर्वांचे चेहरे सांगत होते की त्यांना अंदाज आला होता.

''तिथे काहीतरी पुरले होते? त्या कोनाडयात काहीतरी घालून मग कोनाडा सिमेंटने बंद केला होता हो ना?'',वैदेही उभे राहत बोलली.

''तुमच्या मते तिथे असे काय पुरले असावे?'',इंस्पेक्टर साहेबांनी विचारले.

''विठोबाच्या पहिल्या खून करण्याच्या पद्धतीवरून त्याची विचारसरणी जाणवली की, खून करण्याची त्याची एक वेगळी पद्धत होती. आधी माणूस मारणे, तुकडे करणे आणि मग त्याला पूरणे. हो इंस्पेक्टर साहेब तिथे केणाचातरी सांगाडा जरूर सापडेल असे वाटते'',डॉक्टर साहेबांचे बोलणे सगळयांनाच धक्कादायक झाले होते. सगळे शॉक लागावा तसे एकमेकांकडे बघू लागले.

म्हणजे म्हणून ते त्या खोलीत दररोज जायचे. खरंच त्यांचे गुन्हेच त्यांची पाठ सोडत नव्हते. सर्व ऐकून वैदेहीच्या डोळयात चमक आली.

''मग माझे त्यांच्या डायरीतल्या त्या अदृश्य बाईच्या वर्णनावर लक्ष गेले. तिच्या बाबतचे वर्णन अनेक वेळा नमूद होते. मोठे केस, काळे डोळे, सरळ नाक, मध्यम उंची.....अगदी वैदेहीच्या आईप्रमाणे.

हो विठोबाचे सुधाला ठार मारणे सरपोतदारांना सतत अपराधी भावना देत राहिले. मग त्यांना काल्पनिकदृष्टया दिसणारी अदृश्य बाई ही सुधा सारखीच असल्याचे भासू लागले. विठोबाने तिला ठार मारले आणि पुरूशोत्तम गुन्हयाची बोचणी घेऊन बसला. ज्या माणसाने आसरा दिला त्याच्या मुलीला मारणे पुरूशोत्तमला आवडले नव्हते.'',डॉक्टर साहेब त्यांचा निष्कर्ष समजावत होते. तेव्हढ्यात वैदेहीने त्यांना हाताची खूण करत त्यांचे बोलणे थांबवले आणि ती बोलू लागली.

''भैरवशास्त्रींनी हिच गोष्ट वेगळया पद्धतीने कथन केली होती. त्यांच्यामते हवेलीत 'ती' अजूनही आहे आणि त्या आत्म्याचे आणि बाबांचे जुने रूणानुबंध आहेत. त्याचेच फळ म्हणून त्यांचे आयुष्य क्षीण झाले आहे. तो आत्मा त्यांच्यासाठीच भूतलावर आडकून बसलाय. त्यांच्या मते त्या हवेलीच्या अंधाऱ्या खोलीत तिचे अस्तित्व अजूनही आहे. ती तिथेच आहे. आणि हो त्यांचे ठोकताळेही अगदी बरोबर ठरत आहेत. त्यांच्या सांगण्याप्रमाणे बाबांचा मृत्यूही बरोबर रात्री एक वाजताच झाला?. आपण त्यांचा मृत्यू नाही थांबवू शकलो.'',वैदेही आश्चर्याने बोलली.

''अशा परिस्थितीत मला भैरवशास्त्रींना खोटे ठरवायचे नाही. त्यांची कामाची पद्धत वेगळी आहे. त्यांचे तर्क वेगळे आहेत. मी मात्र या सगळया मागचे शास्त्रीय कारण आणि पूरावे आपल्या समोर ठेवले आहेत.'',डॉक्टर साहेबांनी त्यांचे मत प्रदर्शित केले.

''मग बाबांचा मृत्यू बरोबर रात्री एक वाजताच कसा काय झाला? याबाबतीत काय शास्त्रीय स्पष्टीकरण आहे?'',वैदेहीने विचारले.

''मी आजही कोणा अदृश्य बाईचे अस्तित्व मान्य करायला तयार नाही. मग त्यांच्या अंगावर ते झाड बरोबर रात्री एक वाजता पडणे हा निव्वळ योगायोग होता असे माझे स्पष्ट मत झाले आहे. अशक्यप्राय भासणारे योगायोग या जगात घडतात. इथेही अशक्यप्राय वाटणारा योगायोग घटला. रिसॉटचा तो भाग लाकडी होता. छत लाकडी फळयांनी बनले असल्याने झाडाच्या पडण्याने तुटून गेले. तसेही त्यारात्री वादळाच्या जोराने अनेक झाडे उन्मळून पडलेली आहेतच. तसेच एक झाड रिसॉर्टच्या छतावर येऊन पडले. त्यात त्या अदृश्य बाईचा काहीही संबध नाही. वैदेहीचे बाबा मनोरूग्ण होते आणि इतरांना असंभव वाटणारा मानसिक आजार त्यांना होता. ते एकाच शरीरात अनेक आयुष्ये जगत होते. म्हणजेच 'मल्टीपर्सन्यालीटी डिसॉर्डर'. तसेच 'डिल्यूजन' म्हणजे भास होणे. हे रोग मानसशास्त्रात नमूद आहे आणि यावर उपचारपण आहेत.'',

डॉक्टर साहेबांनी बोलून झाल्यावर वैदेहीकडे नजर टाकली. वैदेही सर्व ऐकून जणू अवाक झाली होती.

''म्हणजेच भैरवशास्त्रीनी काढलेला निष्कर्ष पण खरा ठरला आणि तू काढलेल्या निष्कर्षालाही कोणी नाकारू शकत नाही.'',वैदेहीने नमूद केले.

''दोघांचे निष्कर्ष एकसारखे असले तरी हवेलीतील त्या खोलीत नक्की काय लवपले आहे ते नक्कीच तपासून बघायला हवे. आजून एक महत्वाचे रहस्य सूटायच्या तयारीत आहे.'' डॉक्टरसाहेब आत्मविश्वासपूर्वक बोलले.

'ती' सापडली?

ठरल्याप्रमाणे सर्वजण सकाळी दहा वाजता रिसॉर्टच्या बाहेर येउन उभे राहिले. बस्स आता सोक्षमोक्ष लावायचाच आणि या प्रकरणाला कायमचा पूर्णविराम द्यायचा असे सर्वांनी ठरवले होते. वैदेहीलाही हे प्रकरण लवकरात लवकर संपवायचे होते. आयुष्य जणू ती हवेली आणि ती बाई यांच्यात आडकून पडले होते.

''बघा हवेलीच्या त्या भिंतीत जरूर काही असेल. मग काय आज आपण तिथे जाऊन ती भिंत खणून बघायची?'',वैदेहीच्या मुलाने प्रष्ण केला.

त्याचा प्रष्ण ऐकून इंस्पेक्टर साहेब बोलू लागले, ''हो, मी मागील काही दिवस या प्रकरणावर लक्ष देऊन आहे. मलाही तिथे जाऊन त्या भिंतीमागे काय आहे हे तपासून बघायचे आहे.'',इंस्पेक्टर साहेबांचे बोलणे ऐकून सगळे उत्स्फूर्तपणे उठून उभे राहिले.

मग काय? ठरल्याप्रमाणे सगळे हवेलीत जायला तयार झाले. वैदेही, तिचा नवरा, डॉक्टरसाहेब, इंस्पेक्टर साहेब, पंचनामा करण्यासाठी दोन पोलिस आणि रिसॉर्टमधील दोन नोकर असे सगळे जण दोन गाडयांमध्ये विराजमान झाले. निघताना खणण्यासाठी उपयोगी अवजारे बरोबर घ्यायला ते विसरले नाहीत.

बघता बघता त्यांची गाडी वाऱ्याशी स्पर्धा करत हवेलीच्या बाहेरच्या दरवाजातून आत जात मुख्य दरवाजाच्या समोर येऊन उभी राहिली. हो हो आता सोक्षमोक्ष लावायचाच असे सर्वांनी ठरवलेच होते. सगळयांना बघताच हवेलीचा सूरक्षा रक्षक पुढे येऊन चौकशी करू लागले. पण इंस्पेक्टरसाहेबांनी आज्ञा करताच ते बाजूला झाले.

आता इथे परत येणे वैदेहीला आवडत जरी नसले तरी आता हे शेवटचेच आहे असे स्वतःला समजावत ती हवेलीच्या दिशेने मार्गस्थ झाली. डॉक्टरसाहेब बऱ्याच वेळा त्या खोलीत येऊन गेले असल्याने त्यांना त्या अजस्त्र हवेलीतून मार्ग काढणे अवघड झाले नाही. भराभर चालत ते सगळयांना घेऊन काही वेळातच त्या अंधाऱ्या खोलीपर्यंत पोहोचले.

खोलीत येताच जणू त्यांचे पाय थबकले. परत तेच गूढ आणि कोंदट वातावरण अस्वस्थ करू लागले. खोली तशी अंधारलेलीच होती. ती भयाण रात्र सारखी आठवू लागली आणि अंगावर शहारा आला. डॉक्टरसाहेबांनी भानावर येत मान झटकली.

मग पुढे होत ते त्या भिंतीपाशी आले जीथे सरपोतदार उभे रहात असत. क्षणभर भिंतीला न्याहाळल्यावर त्यांनी हाताने सगळयांना भिंतीजवळ येण्याची खूण केली. ''बघा या भिंतीवर डाग आहे. या सगळयांनी बघा हात लावून, हे सिमेंटने बंद केले आहे'',डॉक्टरसाहेबांनी भींतीवरून हात फिरवत कथन केले.

आधी इंस्पेक्टर पुढे सरसावले आणि त्यांनी त्या भींती वरून हात फिरवला. त्यांच्या अनुभवी डोळयांना ते वेगळे असल्याचे क्षणात जाणवले. ''हो हे काम तसे नवीन वाटते म्हणजे या हवेलीचे मूळ बांधकाम वाटत नाही.'',बोलताना मग क्षणभर थांबून ते त्या भिंतीकडे बघतच बसले.

डॉक्टर साहेबांचे ठोकताळे खरे निघत होते. मग आता काय? खरंच भिंतीत काही असेल? म्हणजे इथे जर सांगाडा सापडला तर डॉक्टरसाहेबांचा निष्कर्ष खरा ठरला असे म्हणावे लागेल.

''चला तर मग ती कुदळ आणा! काम सुरू करू या.'',इंस्पक्टर साहेबांनी जणू आज्ञा केली. वैदेहीचा नवरा पुढे सरसावला आणि त्याने कुदळ हातात घेतली. बरोबर आलेल्या नोकरांनीही पहार आणि कुदळ उचलली. मग बघता बघता भिंतींवर एका मागोमाग घाव पडू लागले.

डॉक्टरसाहेब मात्र तिथेच मागे उभे राहून सर्व बघू लागले. त्यांच्या मतावर ते ठाम होते. त्यांच्या नजरेत आत्मविश्वास ओतप्रोत भरला होता. बऱ्याच दिवसांच्या आभ्यासाचा निष्कर्ष निघायचा आज दिवस होता. बस्स काही वेळातच सत्य बाहेर येणारच. भिंतीतील कोनाडा तसा खोल नव्हता. खणायला फार वेळ लागेल असे वाटत नव्हते.

'घण.....घण.....घण.....भिंतीवर घाव पडू लागले. प्रत्येक घणा बरोबरच बघणाऱ्यांच्या हदयाचे ठोकेही

वाढल्याचे जाणवू लागले. रक्तदाब वाढू लागला. सिंमेंटचे कपचे जसे उडू लागले तसे अस्वस्थता आणखीनच वाढू लागली. सिमेंटच्या बांधकामाला जशा भेगा पडू लागल्या तसे चित्र स्पष्ट होत गेले. काम तसे कच्चेच असल्याने भराभर तुटू लागले.

वैदेही चालत पुढे आली. डोळे मोठे करून तुटणाऱ्या बांधकामाकडे बघू लागली. 'घण.....घण.....घण.....बघता बघता बराच भाग तुटला. पण तरीही आत तसे काही दिसत नव्हते. म्हणजे तसा अंदाज येत नव्हता. आता काय होणार? काय खरंच काही सापडेल? डोके पार चक्राऊन गेले.

मग इंस्पेक्टर साहेब जोरात ओरडले,''हळू घाव घाला! जरा जपून!''. इंस्पक्टरांच्या बोलण्याने सगळे सावध झाले. कारण खरंच एका कोपऱ्यातून काहीतरी काळसर टोक डोकावू लागले. त्याच्या आजूबाजूचे सिमेंट काढताच लक्षात आले की तो कोणा बॅगेचे टोक होते. मोठी व्ही आय पी बॅग असावी असे वाटले आणि क्षणभर श्वास रोखला गेला. इतक्या दिवसांच्या अथःपरिश्रमाचे परिणाम दिसू लागले. डॉक्टरसाहेब आणि वैदेही पटकन पुढे सरसावले. डोळे मोठे करून दोघे लक्ष देऊन बघू लागले.

''बॅगच्या बाजूचे सिमेंट हळू हळू काढा. हं असेच करा!'',इंस्पक्टर साहेब मार्गदर्शन करू लागले. टोकीदार अस्त्राने टोकरल्याने बॅगच्या बाजूचे सिमेंट भराभर बाजूला पडू

लागले. हो हो, ती मोठी व्ही आय पी बॅगच होती. ती बॅग अनेक वर्षांसाठी एका भयाण घटनेला पोटात लपवून होती. सगळयांच्या चेहऱ्यावर एकच प्रष्ण थैमान घालत होता,'काय असेल आत?'

इंस्पेक्टर साहेबांनी हाताने जोरात ओढल्यावर बॅग सिमेंटमधून बाहेर आली. क्षणभर त्यांनी बॅगचे निरीक्षण केले आणि मग ती बॅग हातात उचलून धरताच त्यांच्या लक्षात आले की बॅग चांगलीच जड होती.

''त्या टेबलावर ठेवा'',डॉक्टर साहेबांनी तिथलेच एक टेबल दर्शवत त्यांनी घाई घाईने सांगितले. इंस्पेक्टर ती बॅग घेऊन टेबलाजवळ गेले आणि त्यांनी बॅग अतिकष्टाने टेबलावर ठेवली. सर्वजण डोळयात जीव आणून त्या विस्मयकारी दृश्याला बघत होते.

''हं डॉक्टर साने, बॅग तर मिळली आहे. मग उगाच विलंब कशाला?. चला बॅग उघडूया'',इंस्पेक्टर बॅग कडे बघतच बोलले.

वर्षानूवर्षे सिमेंटच्या बोजाखाली चेपली गेल्याने बॅग तकलादू झाली होती. इंस्पेक्टर साहेबांनी जरा जोर लावताच बॅग उघडली गेली.....

वैदेही पळतच बॅग जवळ आली आणि ती वाकून बघू लागली. बॅगमधून हाडे कुजल्याचा दर्प सगळीकडे पसरला. हं आत

मानवी कपाल आणि हाडे दिसू लागली. इंस्पेक्टर साहेबांनी खिशातून रूमाल काढून नाक तोंड झाकले.

पण वैदेहीला कुठलं आलंय भान? ती त्या हाडांच्या ढिगाला न्याहळू लागली. बॅगेत वीरलेल्या कपडयांचे तुकडे आणि हाडांचा ढीग भरला होता. इंस्पेक्टर साहेब पुढे झाले आणि वाकून बॅगेत बघू लागले. ते भयाण दृश्य बघून सगळे हादरले होते.

''शरीराचे तुकडे करून मग बॅग मध्ये भरले आहेत. एकसंध हाडांसा सापळा दिसत नाहीए. कोणा नराधमाने शरीराचे पार तुकडे केलेत. पण तरीही पोस्टमॉर्टम रिपोर्ट आल्यावर खरी माहिती कळेल'',इंस्पेक्टरांनी कळवले.

''मला जे कळायचंय ते कळलंय इंस्पेक्टर. ही माझी आईच आहे. बघा तिच्या हातात तिच्या फोटोत दिसत आहेत तशा बांगडया आहेत. आईला त्यांनी क्रूरपणे मारले. त्यांचे खरे रूप मला कळलंच नाही. त्या नराधमाने आईला ठार केलंय'',वैदेही दाटलेल्या आवाजात बोलली. आता मात्र तिच्या सहन शक्तिचा बांध फुटला. ती ओक्साबोक्षी रडू लागली. वैदेहीचा नवरा आणि मुलगा तिला सावरायला पुढे सरसावले. पण ती रडतच एक वाक्य वारंवार बोलू लागली,''मी तूम्हाला कधीच माफ करणार नाही बाबा. मी तूम्हाला कधीच माफ करणार नाही.''.

वैदेहीचा पती तिला सावरायला पुढे सरसावला आणि वैदेही कोणा लहान मुली प्रमाणे त्याच्या छातीत तोंड खुपसून रडू लागली.

''चल आई, तुला आता हे झेपणार नाही. चल गाडीपाशी जाऊन थांबू''.वैदेहीला तिचा मुलगा ओढतच बाहेर घेऊन जाऊ लागला. जड पावले टाकत वैदेही निघून जाऊ लागली.

''बस्स हे प्रकरण संपले म्हणायचे. आपले किती व कसे धन्यवाद करू हे मलाच कळत नाही.'',वैदेहीचा नवरा डॉक्टरसाहेबांना म्हणाला.

''नाही, एक शेवटचे रहस्य सुटायचे बाकी आहे. मला अजून पोस्टमॉर्टम रिपोर्ट काय सांगतो हे तपासून पहायचंय. एका शेवटयाच्या कोडयाचे उत्तर त्या रिपोर्टमध्ये मिळण्याची आशा आहे.'',डॉक्टर साहेबांचे बोलणे ऐकून वैदेहीचा नवरा धन्यवाद करत निघून गेला.

इंस्पेक्टरसाहेबांनी ती बॅग बंद केली. ''माझे पुढचे काम मी करीनच. पस्तीस ते चाळीस वर्षांपूर्वी घडलेला गून्हा आज या अशा तऱ्हेने बाहेर यावा याचे मलाच आश्चर्य वाटतंय.'',इंस्पेक्टर डॉक्टर साहेबांकडे बघून बोलले.

''हो ना! हे सगळे अशक्यप्राय वाटणारे आहे. पण जाता जाता एक विनंती अशी की, पोस्टमॉर्टम रिपोर्ट आला की मला जरूर कळवा. या प्रकरणाचे शेवटचे रहस्य अजून उलगडायचे

आहे.'',डॉक्टर साहेबांचे बोलणे ऐकून इंस्पेक्टरांना आश्चर्य वाटले. मग हसतच त्या दोघांनी निरोप घेतला. इंस्पेक्टर पुढील पंचनामा करण्यात व्यस्त झाले आणि डॉक्टरसाहेब मात्र तिथून बाहेर पडले. परत पूण्याला जायचे वेध त्यांना लागले होते. प्रकरण संपले होते.

२० दिवसांनी.....

सकाळचे अकारा वाजले होते. डॉक्टर साहेब ठरल्या प्रमाणे त्यांच्या क्लिनीकमध्ये त्यांच्या पेशंटशी चर्चा करत होते. पूण्याला परत आल्यावर एक आठवडा त्यांनी झालेल्या घटना लिहून काढण्यात घालवला. सरपोतदारांचे हे प्रकरण म्हणजे जणू त्यांच्या शिरपेचातला मानाचा तूरा होता. यशाची नशा बरेच दिवस तशीच होती. या प्रकरणातून बाहेर यायला त्यांना तसा एक आठवडा लागला. मग मात्र परत नेहमीची दिनचर्या सुरू झाली. काम कोणाला चुकलंय का?

आजही पेशंटचा मानसोपचार सेशन संपतच आला होता. तेव्हढयात त्यांच्या मोबाईलची रिंग वाजली. तसे काम सुरू असताना ते कोणता फोन कॉल स्वीकारत नसत पण हा कॉल महत्वाचा होता. हो फोन वैदेहीचा होता. नंबर तरी भारतातलाच होता म्हणजे मॅडम अजून भारतातच होत्या तर.....

''हं बोल, आज कशी काय आठवण आली आमची?'',डॉक्टरसाहेब उगाच थट्टा करत बोलले.

''मंदार पोस्टमॉर्टम रिपोर्ट आलाय.'',वैदेहीचा आवाज गंभीर होता. तिचे बोलणे ऐकून डॉक्टरसाहेब उठून उभे राहिले. मग खोलीतून बाहेर येत ते बाहेरच्या लॉबीत आले.

''हं बोल, पोस्टमॉर्टम रिपोर्टमध्ये काय आलंय?'',डॉक्टर साहेबांनी गंभीर आवाजात विचारले.

''मृतदेह बाईचा आहे. आणि बरोबर ३८ वर्षांपूर्वी तिचा गळा दाबून खून करण्यात आला होता. म्हणजे मी तेव्हा दोन आडीच वर्षांची असणार. ती माझी आईच आहे यात शंकाच नाही. पण त्याहीपेक्षा अजून एक गोष्ट त्या पेटीत सापडली आहे.'',वैदेही बोलताना क्षणभर थांबली.

''काय वैदेही? अजून काय सापडलंय?',डॉक्टर साहेबांच्या आवाजात उत्कंठा पूरेपूर भरली होती.

''तिच्या मनगटात तिचे घडयाळ तसेच होते. आघाताने तुटलेल्या अवस्थेत होते. पण तरीही वेळ आणि तारीख कळत आहे. म्हणजे त्यादिवशी झालेल्या झटापटीत ते तुटले असावे आणि बंद पडले असावे. आणि पोस्टमॉर्टम रिपोर्टप्रमाणेही तिच्या मृत्यूची वेळ आणि तारीख एकच येत आहे'',वैदेही खोलवर गेलेल्या गंभीर आवाजात बोलली.

''हं, वेळ आणि तारीख सांग वैदेही'',डॉक्टर साहेबांना उत्कंठा सहन होत नव्हती.

''बंद घडयाळयातील तारीख आहे १७ जुलै आणि वेळ आहे रात्री १ वाजताची'',वैदेहीचे बोलणे ऐकून डॉक्टर साहेब निःशब्द झाले.

हं म्हणजे, सुधाच्या मृत्यूची वेळ त्यांच्या लक्षात राहिली होती. वैदेहीची आईच जणू ती अदृश्य बाई बनून काल्पनिक दृष्टया सरपोतदारांना तिच्या अस्तित्वाची जाणीव करून देत होती. त्यांनी केलेल्या गुन्हयांमुळे त्यांच्यातील अपराधी भावनाच जणू ती अदृश्य बाई बनून मानवरूपी आकार घेऊन आली होती.

डॉक्टरसाहेब आज कितीही समाधानी दिसत असले तरी, तसे म्हंटले तर भैरवशास्त्रींचे निष्कर्षही खरेच ठरले होते. भैरवशास्त्रींच्या मते ती बाई त्या हवेलीच्या त्याच खोलीत रहात होती. तिचे आणि सरपोतदारांचे जूने एणानुबंध होते. सरपोतदारांचा मृत्यूहीचेही एक गूढही होतेच की, बरोबर रात्री एक वाजताच त्यांचा मृत्यू म्हणजे काय खरंच एक योगायोग होता की..... 'ती' येऊन त्यांना घेऊन गेली.

विज्ञान खरे मानवे का आध्यात्म ज्ञान? दृश्यावर विश्वास ठेवावा का अदृश्य खरे मानावे? या निष्कर्षावर येणे आपापल्या विचारसरणीवर अवलंबून आहे. मग ज्या गोष्टींना शास्त्रीय पुरावा नसतो त्याबाबत काय माणसाला आलेले अनुभव प्रमाण

धरता येणार नाहीत का? विज्ञानावर कितीही विश्वास असला तरी आपल्या संस्कृतीत खोल रूतलेले अध्यात्म, भविष्य ज्ञान, तंत्र विद्या खोटे ठरवणे कसे योग्य होईल? दृश्य नाही म्हणून अदृश्य अस्विकार करणे नक्कीच योग्य होणार नाही.....

डॉक्टर साहेबांनी अविश्वाने मान हलवतच फोन बंद केला.